**(सभापतीस्थानी : माननीय उपसभापती)**

**पृ.शी.**: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.**: सन 2007-2008 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरु...........

श्री.जयंत पाटील (वित्तमंत्री) : सभापती महोदय, सन 2007-2008 च्या अर्थसंकल्पावर या सदनाचे विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांनी आपले मुद्दे मांडले. मी त्या सर्वांचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पासाठी, अर्थसंकल्प मांडल्यानंतर वर्तमानपत्रात ज्या प्रतिक्रिया आल्या आहेत त्यांचा उल्लेख सन्माननीय विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आपल्या भाषणात केला. अर्थसंकल्पाला एकानेही चांगले म्हटले नाही, शिळया कढीला ऊत, अपेक्षांना हरताळ फासणारा अर्थसंकल्प, अर्थसंकल्पाच्या बाबतीत अर्थमंत्री मुंबईचे पालकत्व विसरले, अशा वर्तमानपत्रात छापून आलेल्या प्रतिक्रिया सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपल्या भाषणात वाचून दाखविल्या. अर्थसंकल्पामध्येच मी याचा उल्लेख केलेला आहे की, आपले राज्य आता स्थिरीकरणाकडे चालले आहे. राज्यामध्ये मूल्यवर्धित कर प्रणाली लागू झालेली असल्यामुळे करामध्ये फार मोठा बदल करण्यास वाव राहिलेला नाही आणि बदल केला तर त्यामुळे फार मोठा महसूल वाढीचा प्रयत्न होऊ शकतो, असा अनुभव येण्याची शक्यता नाही. यापूर्वी जेव्हा सेल्स टॅक्स लागू होता त्यावेळी अेयर कंडिशनवरील टॅक्स वाढवला तर 'श्रीमंतावरील टॅक्स वाढला, गरीबांचा टॅक्स कमी झाला', अशा आशयाच्या बातम्या वर्तमानपत्रात येत असत. परंतु, गेल्या दोन वर्षापासून मूल्यवर्धित कर प्रणाली राज्यात लागू झाल्यानंतर आणि काही वस्तूंवर राष्ट्रीय सहमती झाल्यानंतर राज्याच्या हातात टॅक्सेशनच्या बाबतीत फारसे काही राहिलेले नाही. केवळ स्टॅम्पडयुटी रजिस्ट्रेशन किंवा एक्साईज टॅक्स या पलिकडे जाऊन वेगवेगळया प्रकारच्या मोठया टॅक्समध्ये आपण बदल करु शकत नाही. त्यामुळे टॅक्स ॲडमिनिस्ट्रेशन चांगले करणे आणि उत्पन्न वाढविणे याच बाबी राज्याच्या हातात आहेत. माझ्या मते जगातील कोणत्याही देशाचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

29-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A-2

SRR/ KGS/ MAP/ 11:00

श्री.जयंत पाटील...........

अर्थसंकल्प पाहिला, विशेषत: पाश्चिमात्य देशांचा अर्थसंकल्प पाहिला तर आपल्या असे लक्षात येईल की, इन्फ्लेशन रेट वाढू नये, एवढी काळजी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून घेतली जाते आणि विविध योजनांसाठी किती तरतूद दिली, याचा उल्लेख त्यामध्ये असतो. त्यामुळे येथून पुढे सादर होणा-या अर्थसंकल्पाचे असेच स्वरुप आपल्याला दिसेल, असे मला वाटते. खरे म्हणजे, राज्याने हातात घेतलेल्या वेगवेगळया प्रकल्पांना चालना देणारा हा अर्थसंकल्प आहे. या राज्यामधील जलसंपदा विभागाला फार मोठया प्रमाणात निधी द्यावा, अशी सभागृहाची नेहमीच मागणी असते. जलसंपदा विभागाला निधी देण्याच्या बाबतीत यावर्षी आपण 2400 कोटी रुपयांवरुन 4000 कोटी रुपयांच्या पुढे जाण्याचा प्रयत्न केला आहे.

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील......

वीजनिर्मिती आणि वीज वाहून नेण्यासाठी राज्यात चांगली व्यवस्था उभी करण्यासाठीही चांगला निधी देण्याचा प्रयत्न राज्यसरकारने केला. राज्यामध्ये ज्या गोष्टीचा तुटवडा आहे त्याकरिता व इन्फ्रास्ट्रक्चरला चालना देण्यासाठी या अर्थसंकल्पात अधिकाधिक निधी देण्याचा प्रयत्न राज्यसरकारने केलेला आहे. "भारनियमन" हा एक राज्याच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे आणि त्याचप्रमाणे "शेतक-यांची आत्महत्या" हाही तितकाच महत्वाचा प्रश्न आहे. शेतक-यांच्या आत्महत्या कमी करण्याकरिता नव्या घोषणा करुन काही मदत करण्यापेक्षा केंद्रसरकारचे पॅकेज आणि राज्यसरकारच्या अनेक योजनांना अधिक निधी उपलबध करुन देणे अत्यंत महत्वाचे आहे. जलसंपदा विभागासाठी केंद्रसरकारने जो 2,000 कोटी रुपयांचा निधी जाहीर केलेला आहे त्या निधींतर्गत असलेल्या योजना जवळपास मान्य होऊन त्याकरिता पैसेही यावयास सुरुवात झालेली आहे. राज्यसरकारने मागच्या डिसेंबरमध्ये विदर्भातील 06 जिल्हयांकरिता जो निधी जाहीर केलेला होता, तोही राज्यसरकारने देण्याचा प्रयत्न केलेला आहे. शेतक-यांच्या आत्महत्या ज्या ठिकाणी सिव्हीयर आहेत, तेथे राज्यसरकारने जाहीर केलेल्या भूमिकेकरिता शासनाने अर्थसंकल्पात निधीही उपलब्ध करुन दिलेला आहे. राज्याच्या सर्व विभागांमध्ये जलसंपदा विभागाला अधिक ताकदीने इरिगेशनचे प्रोजेक्ट करण्यासाठी शासनाने जास्त निधी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. " राज्याच्या जनतेने कर्जाला घाबरुन जाऊ नये, असे मंत्री महोदय जनतेला सांगतात. या वर्षी साडे बारा हजार कोटी रुपयांचे व्याज राज्याला द्यावे लागत आहे. " असा जो काही सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.फुंडकर साहेबांनी या सभागृहामध्ये उल्लेख केला होता, त्याबद्दल मला असे सांगावयाचे आहे की,ही गोष्ट खरी आहे आपल्या राज्याला तेवढेच व्याज द्यावे लागणार आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी असेही म्हटले की, " कर्जाची कधी परतफेड केली किंवा कशी परतफेड करणार ? याचा कुठेही उल्लेख नाही " यावर मी असे सांगू इच्छितो की, अर्थसंकल्पाच्या माझ्या भाषणाच्या परिच्छेद क्रमांक 09 मध्ये उक्त बाबीबाबत व्यवस्थित उल्लेख आहे. कर्जाच्या संदर्भात टक्केवारीनुसार राज्याची काय परिस्थिती आहे ? आणि आपल्याला पुढच्या काळामध्ये कोणत्या परिस्थितीला तोंड द्यावे लागणार आहे ? सन 2005 - 2006 मध्ये कर्जाची राज्याच्या स्थूल उत्पन्नाशी असणारी टक्केवारी ही 28.76 टक्क्यांनी आणि नंतर ती टक्केवारी 27 टक्क्यांवर आली आहे. सन 2007 -2008 कर्जाची राज्याच्या स्थूल उत्पन्नाशी असणारी टक्केवारी 25.53 टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. एखाद्या राज्याने भरमसाट B - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.......

कर्ज काढून राज्य चालविले पाहिजे ही भूमिका या शासनाने एका वर्षात कमी केली, त्यामुळे टक्केवारीचे प्रमाणे सन 2007 -2008 मध्ये 25.53 टक्के होईल, असा आपला अंदाज आहे. त्याचप्रमाणे आपण जर पुढे बघितले तर महसूली जमेच्या बाहयकर्जाची परतफेडीशी असणारी टक्केवारी सन 2005 -2006 मध्ये 36 .14 टक्के, सन 2006 -2007 मध्ये 30.41 टक्के इतकी कमी होऊन ती सन 2007 -2008मध्ये 29.11 टक्के इतकी कमी होईल, असे अंदाजित करण्यात आले आहे. महसूली तुटीची महसूली जमेशी असलेली टक्केवारी सन 2004 -2005 मधील 24.46 टक्क्यांवरुन सन 2005 -2006 मध्ये 7.93 टक्के होऊन सन 2006-2007 मध्ये 5.30 टक्के पर्यंत कमी होईल, असे अंदाजित करण्यात आले असून,सन 2007-2008 मध्ये महसूली अधिक्य अपेक्षित आहे. या सर्वांचा उल्लेख अर्थसंकल्पात नाही, असा जो उल्लेख सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी केला त्याबाबत मला असे वाटते की, याबाबत अर्थसंकल्पाच्या गुलाबी पुस्तकामध्ये पान क्रमांक 08 वर,तक्ता क्रमांक 06 मध्ये इंटरेस्ट रेव्हेन्यू रिसीट कसा कमी झालेला आहे ? याचा स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे. सन 2004-05मध्ये इंटरेस्ट रेव्हेन्यू रिसीटचा दर 21.82 इतका होता तो सन 2005-06 मध्ये 20.7 वर आला व आता सन 2007-2008 मध्ये 18.16 वर आलेला आहे. ही सर्व आकडेवारी सुधारित आहे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील .........

आता राज्य सरकारला विकासासाठी अधिक निधी खर्च करावयास मिळतो. राज्य सरकारला 12.50 हजार कोटीं रुपये व्याज द्यावे लागले, हे बरोबर आहे. व्याजाची टक्केवारी कशी कमी झालेली आहे, हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले आहे. मी वारंवार हेच सांगतो की, राज्य सरकारवर असलेल्या कर्जाची फार चिंता करण्याची गरज नाही. याचा अर्थ असा नाही की, राज्य सरकार भरमसाठ कर्ज काढण्यासाठी मोकळे आहे. मागच्या 3-4 वर्षामध्ये आपण शिस्त पाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. बाजारामध्ये राज्याची पत सुधारलेली आहे. क्रेडीट रेटींग एजन्सीने मागच्या 6 महिन्यात राज्याची पत सुधारल्याचा निर्वाळा दिलेला आहे. मागच्या 7-8 वर्षापूर्वी राज्य चालविण्यासाठी कर्ज काढण्याची परिस्थिती राज्य सरकारवर येत होती. ती परिस्थिती आता बदललेली आहे. आता राज्य सरकार फक्त प्लॅनसाठी कर्ज काढते. राज्य चांगल्या सुस्थितीत आलेले आहे. ज्यावेळी आम्ही विरोधी पक्षामध्ये बसत होतो त्यावेळी मी असे सांगत होतो की, सरकार चालविण्यासाठी कर्ज काढू नका. आता आपण त्यातून बाहेर आलो आहोत. आता आपण फक्त भांडवली कामासाठी कर्ज काढतो. आपण 20,200 कोटी रुपयांच्या योजना मांडल्या तर त्यासाठी 8 ते 10 हजार कोटी रुपये बाहेरुन उभे करतो. आपण फक्त भांडवली खर्चासाठी कर्ज काढतो. मी सर्व मुद्यांचा उल्लेख केला तर ठरवून दिलेला वेळ पुरणार नाही. मागच्या दोन वर्षातील प्लॅन बघितले तर राज्य सरकारचे प्लॅन जेवढया किंमतीचे होते त्यापेक्षा जास्त निधी खर्च करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. प्लॅन पेक्षा 103 टक्के, 127 टक्के, 123 टक्के इतका निधी आपण प्लॅनवर खर्च करीत आहोत. राज्य सरकारला आर्थिक चणचण राहिलेली नाही. राज्य सरकार प्लॅनसाठी स्वत:चे पैसे खर्च करु शकते.

सभापती महोदय, निवासी शाळांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला. निवासी शाळेसंदर्भात मागच्या वर्षी घोषणा करण्यात आली होती. निवासी शाळेसंदर्भात मी सभागृहाला तपशीलवार माहिती देईन. मी आधी कर्जाचा विषय पूर्ण करतो. कोणत्या सरकारने किती कर्ज काढले याचा उल्लेख करण्याची आवश्यकता नाही. पण ट्रेन्ड काय आहे हे सर्वांना कळले पाहिजे. मी मागच्या सरकारशी या सरकारची तुलना करीत नाही आणि कोणावर टीका करण्याचीही माझी भूमिका नाही. दिनांक 31 मार्च, 1995 मध्ये राज्य सरकारवर 17,485 कोटी रुपये कर्ज होते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील .........

दिनांक 31 मार्च, 2000 मध्ये युतीच्या शासनाने सत्ता सोडली आणि आघाडी शासन सत्तेवर आले त्यावेळी सर्वसाधारणपणे दरवर्षी सरासरी वार्षिक कर्ज वृद्धीचा दर 23.35 टक्के होता. त्यानंतरचे आघाडी शासनाचे 5 वर्षे बघितले तर दिनांक 31 मार्च, 2005 मध्ये राज्यावर 1 लाख 9 हजार 167 कोटी रुपये कर्ज होते. युती शासनाच्या काळात राज्यावर 49,123 कोटी रुपये कर्ज होते. आघाडी शासनाच्या पहिल्या टर्ममध्ये राज्यावर 1 लाख 9 हजार 167 कोटी रुपये कर्ज झाले. कर्ज वृद्धीची वाढ बघितली तर ती 16.94 टक्के झाली आणि त्यानंतर ट्रेन्ड बघितला तर दिनांक 31 मार्च, 2008 मध्ये राज्यावर 1 लाख 44 हजार कोटी रुपये कर्ज होणार आहे, असे गृहीत धरले तरी सरासरी वार्षिक कर्ज वृद्धीचा दर 9.75 टक्के होतो. म्हणजे कर्जामध्ये वाढ होत आहे. कर्ज वाढीचा स्पीड सन 1995 ते 2000 मध्ये 23.35 टक्के होता त्या नंतरच्या 5 वर्षात हा दर 16.94 टक्के झाला.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.....

मागच्या तीन वर्षामध्ये हा दर 9.75 टक्के झाला, म्हणजे आर्थिक अडचणीच्या परिस्थितीवर बऱ्यापैकी नियंत्रण आपण मिळविलेले आहे. राज्याच्या विकास योजनावर कर्ज काढून खर्च केला जात नाही. विविध उपाययोजना केल्यामुळे राज्य सरकारला विकास योजनेवर खर्च करणे शक्य झालेले आहे. आपण जर पूर्वीची परिस्थिती बघितली तर मला आठवते की, पाचवा वेतन आयोग लागू झाला होता, त्याचे सर्व पेमेंट आम्ही केले आहे, त्यावेळी लवकरच आयोगाचा स्वीकार सरकारला करावा लागला होता. त्यामुळे आर्थिक परिस्थितीवर फार ताण आला होता. यामुळे साडेतीन ते चार वर्ष सरकारवर आर्थिक दबाव होता. असे असतानाही राज्य सरकारने पाचव्या वेतन आयोगाची तात्काळ अंमलबजावणी केली. अर्थसंकल्पात त्या सगळया बाबींवर मात करण्यासाठी आपले सरकार आज यशस्वी झालेले आहे हे मला नम्रपणे नमूद करावे वाटते.

सभापती महोदय, पालकमंत्री मुंबईला विसरले असा उल्लेख वारंवार करण्यात आला आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, मुंबईसाठी रेव्हेन्यू जनरेट करणाऱ्या महानगरपालिकेसारख्या अनेक बॉडीज आहेत. रेव्हेन्यू जनरेट करण्याची कन्सेट आपण हळूहळू ॲडॉप्ट केली पाहिजे. मुंबई शहरात राज्य सरकार 421 कोटी रुपयांचे 16 फ्लायओव्हर बांधणार आहे, अर्थसंकल्पात त्याचा उल्लेख केलेला आहे. एक फ्लायओव्हर एम.एम.आर.डी.ए. कडे व उर्वरित 15 फ्लायओव्हर रस्ते महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत बांधण्यात येणार आहेत. त्यातील सहा फ्लायओव्हरचे बांधकाम प्रगतीपथावर आहेत, 9 फ्लायओव्हरचे टेंडर फायनल होत आहेत. अशा प्रकारे 421 कोटी रुपये खर्चून 16 फ्लायओव्हरची कामे आपण पूर्ण करीत आहोत. यापूर्वी 55 फ्लायओव्हर बांधून झालेले आहेत. फ्लायओव्हरमुळे वाहतुक व्यवस्था सुरळीत होऊ शकेल. माझ्या भाषणात फ्लायओव्हरचा उल्लेख करीत असताना माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे सभागृहात दाखल होत आहेत.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, एम.एम.आर.डी.ए. ने 16 फ्लायओव्हरचा प्रश्न मार्गी लावला आहे. सध्या मुंबईमध्ये यापूर्वी जाहीर केलेल्या प्रकल्पांचे काम सुरु असल्याने नवीन प्रकल्प जाहीर करणे शक्य झाले नाही. हाती घेतलेल्या प्रकल्पापैकी एम.यु.टी.पी. करिता 474 कोटी रुपये देत आहोत. एम.यु.आय.पी. प्रकल्पास 100 कोटी, मेगासिटी प्रकल्पास 45 कोटी तरतूद केलेली आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MAP/

श्री.जयंत पाटील.....

सभापती महोदय, वर्तमानपत्रात अग्रलेख छापून आला आहे की, मुंबईला ठेंगा दाखविला आहे. परंतु मी सांगू इच्छितो की, मुंबईसाठी नवीन विकासाची योजना अस्तित्वात आलेली आहे. जवाहरलाल नेहरु अर्बन रेव्हेन्यू प्रोजेक्ट द्वारे ब्रीम-स्टेवार्ड प्रकल्पासाठी 400 कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. त्यासाठी केंद्र सरकारकडून मान्यता मिळाल्यानंतर रक्कम मिळणार आहे. मध्य वैतारणा प्रोजेक्टसाठी केंद्र सरकारकडून निधी मिळाला आहे. राज्य शासनाने वेळोवेळी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला आहे. आपल्या राज्यामध्ये जी साधनसंपत्ती आहे, त्यातील कराद्वारे केंद्र सरकाकडे रक्कम जमा होत असतो. आजपर्यत केंद्रातील महसूल वाढीसाठी महाराष्ट्राने भरीव मदत केलेली आहे. महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारकडून विविध योजना आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. पंतप्रधान श्री.मनमोहनसिंग यांनी मुंबईसाठी 100 टक्के अनुदानाचा ब्रीम-स्टेवार्ड प्रोजेक्ट दिलेला आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MAP/ KGS/ श्री. गागरे नंतर --- 11:20

श्री. जयंत पाटील .....

एवढेच मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी `असाही एक प्रश्न येथे उपस्थित केला की, जो पैसा आपण विभागांना मंजूर करतो तो पूर्णपणे खर्च होतो का ? हे खरे आहे की, काही वेळेस काही विभाग सगळा पैसा खर्च करू शकत नाहीत. पण आता आपण कॅश फ्लो इन्फर्मेशन सिस्टिम आणली आहे त्यामुळे त्याबाबतची माहिती आता येऊ लागली आहे आणि कोणता विभाग किती पैसा खर्च करतो आहे याबाबत विभागाच्या मंत्र्यांना देखील माहिती मिळते आहे आणि मग त्याचा पाठपुरवा तो विभाग करू शकतो. त्या बरोबरच आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आपण उपस्थित केला आहे. तो म्हणजे नवीन प्रशासकीय खर्चामध्ये आपण कपात केली आणि नवीन जिल्ह्यांमध्ये अजून प्रशासकीय कार्यालये नाहीत. या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, आमच्या विभागाने महसूल विभागाला बोलावून एकंदर प्रशासकीय कार्यालयांसाठी किती निधी पाहिजे याची माहिती घेतली असता त्यांनी 70 कोटी रूपयांची मागणी केली आणि आम्ही त्याची तरतूद केली आहे. नवीन जिल्ह्यांतील प्रशासकीय कार्यालये पूर्ण करण्यासाठी या वर्षी आपण 70 कोटी रूपये दिलेले आहेत. तसे मागील वर्षी देखील काही पैसे दिलेले आहे आणि उर्वरित रक्कम या वर्षी दिलेली आहे. त्यामुळे ज्या जिल्ह्यांमध्ये प्रशासकीय कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम हाती घेतले आहे ते पूर्ण व्हावे याचा काळजी सरकारने घेतलेली आहे इतकेच मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या ठिकाणी सेल्स टॅक्स विभागाचाही उल्लेख करण्यात आला. त्याबद्दल दिरंगाई होत आहे असा मुद्दा मांडला गेला. त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, त्या विभागासाठी रिस्ट्रक्चरींगचा प्रस्ताव मंत्रिमंडळाने मान्य केलेला आहे आणि काही महिन्यापूर्वीच त्यादृष्टीने काम सुरू झालेले असून रिस्ट्रक्चरींगसंबंधत मंत्रिमंडळ स्तरावर काही मान्यता देण्याचे राहिले आहे असे नाही. ते काम सुरू झाले असून आता जवळपास ते पूर्णही झाले असेल.

सभापती महोदय, मुंबईचा पालक मंत्री मी मुंबईकरांच्या अपेक्षा पूर्ण करू शकलो नाही असा मुद्दाही येथे मांडला गेला. मी आपल्याला सांगू इच्छितो की, मुंबई-न्हावा-शेवा प्रकल्पाची टेंडर्स आलेली आहेत पण कोर्टात याबाबतचे प्रकरण असल्याने त्यात वेळ जाणार आहे. मात्र टेंडर काढून बाकी पूर्ण तयारी झालेली आहे. यामध्ये काम नेमके कोणी करायचे याबाबत कोर्टात प्रकरण आहे. सभापती महोदय, तसेच या अर्थसंकल्पामध्ये विशेष आर्थिक क्षेत्रासंबंधात काहीही उल्लेख

...... इ 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील .....

नाही असेही म्हटले गेले. परंतु राज्यात विशेष आर्थिक क्षेत्रासंबंधात यापूर्वीच आपण परवानगी दिलेली आहे. महाराष्ट्रात सर्वात जास्त विशेष आर्थिक क्षेत्रे आहेत आणि त्याचा उल्लेख मागील वर्षी आपण केलेला आहे. आता पुन्हा त्याबाबत उल्लेख केला असता तर आपणच म्हटले असते की, दरवर्षी याचा उल्लेख कशाला करायला पाहिजे. म्हणजे उल्लेख केला नाही तरी आपण बोलता आणि उल्लेख केला तरी बोलणार. मला वाटते हे बरोबर होणार नाही. मात्र या ठिकाणी पुन्हा पुन्हा त्याबाबत उल्लेख करण्याची गरज आहे असे मला तरी वाटत नाही, त्यामुळे तो उल्लेख यावेळी केला नाही. दुसरे असे की, या बाबतीत आपण ज्या परवानग्या दिलेल्या आहेत त्याची माहिती वर्तमानपत्रांतून आपण वाचतोच, त्यामुळे अर्थसंकल्पातून जास्त माहिती देण्याची गरज आहे असेही मला वाटत नाही..... सभापती महोदय, मी आमच्या समोरच्या मित्रांना एवढेच सांगू इच्छितो की, आपण खाली बसून जे आमच्या मंत्र्यांबद्दल अभिनंदनीय, गौरवास्पद उल्लेख करीत आहात तेच आपण उभे राहून बोललात तर आपण केलेले कौतुक रेकॉर्डवर तरी येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी जेंडर बजेट असले पाहिजे असे म्हटले आहे, त्याबद्दल त्यांचा आग्रह आहे. त्याबद्दल त्या माझ्याशी व्यक्तिगतदेखील बोलल्या आहेत. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... एफ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

सभापती महोदय, माननीय सदस्या सर्वश्रीमती फौजिया खान, सुधा जोशी यांनी आपल्या भावना व्यक्त करीत असतांना जेंडर बजेटींग करण्याचा आग्रह धरला. परंतु त्याचे प्रोसिजर आपण ठरविले नसल्यामुळे आणि ते व्यवस्थित डिफाईन होत नसल्यामुळे जेंडर बजेटींग कसे करावयाचे या संबंधात सर्व माननीय सदस्यांना एकत्रितपणे निमंत्रित करुन त्यांचे मार्गदर्शन घेण्यात येईल. परंतु देशातील कोणत्याही राज्यामध्ये जेंडर बजेटींग हा विषय अजून हाताळण्यात आलेला नाही. ज्यावेळी जेंडर बजेटींग होईल त्यावेळी त्याचे सेपरेशन कसे करावयाचे हा प्रश्न त्यामधून निर्माण होईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या महिला व बाल कल्याण विभागाने महिला आय.ए.एस. अधिकाऱ्यांचा एक अभ्यास गट तयार केला आहे. राज्याचे बजेट कशाप्रकारे तयार करता येईल या संदर्भात ते आपल्याला माहिती देऊ शकतात. याकामी या क्षेत्रातील तज्ज्ञांची आपल्याला मदत घेता येईल.

श्री. जयंत पाटील : त्याकरिता मी बैठक आयोजित करीत आहे. माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी हयुमन डेव्हलपमेंट इंडेक्ससंबंधी उल्लेख केला. धुळे व नंदूरबार या जिल्हयामध्ये हयुमन डेव्हलपमेंट इंडेक्स कमी असल्यामुळे त्या जिल्हयांना अधिक मदत दिली पाहिजे. माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेबांनी देखील या संदर्भात अतिशय चांगल्या पध्दतीने त्यांची मते मांडली आहेत. त्यांच्या सूचनांचे मी स्वागत करीत असून त्यासंबंधी निश्चितपणे पाठपुरावा करण्यात येईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी देखील याठिकाणी महत्वाचे मुद्दे मांडले. त्यांनी सांगितले की, दोन वेळा आपण अधिक्याचे बजेट सादर केले आणि नंतर त्यामध्ये तूट दाखवावी लागली. तिसऱ्या वेळी देखील आपण अधिक्याचे बजेट दाखवीत असतांना या बजेटमध्ये नेमके पुढे काय रहाणार आहे? असा प्रश्न विचारला आहे. या निमित्ताने सभागृहाला माहिती दिली पाहिजे की, एक काळ असा होता की, 1999-2000 मध्ये हे राज्य 8 ते 9 हजार कोटींनी डेफिशिटमध्ये होते. तेथपासून प्रवास करीत आपण या परिस्थितीपर्यंत आलो आहोत. आपण साधारणपणे गेल्या दोन वर्षामध्ये महसूली अधिक्याचे बजेट मांडले. ते मांडीत असतांना 12 व्या वित्त आयोगाने देशामध्ये एक टारगेट घालून दिले असून 2009 सालापर्यंत महसूली तूट शून्यावर आली पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी केंद्र



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

सरकारने मान्य केली असून त्यांनी स्वत:वर बंधने घालून घेतली आहेत. त्याप्रमाणे देशातील सर्व राज्यांनी बंधने घालून घेतली आहेत. आणि एकत्रितपणे महसूली तूट कशी कमी करता येईल यासंबंधी निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या दोन वर्षामध्ये राज्यात निर्माण झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे आपल्याला अधिकचा खर्च करावा लागला. नैसर्गिक आपत्तीवर गेल्या दोन वर्षामध्ये आपल्याला पूर्णपणे मात करता आली नाही. आपल्या माहितीसाठी सांगितले पाहिजे की, यावर्षी बजेट करतांना 20,200 कोटीच्या जवळपास सर्व रक्कम बजेटींग केली आहे. त्यामुळे बजेट केलेली रक्कम न आल्यामुळे डेफिशिट वाढले अशी परिस्थिती उद्‌भवत नाही. आम्ही जवळपास 80 ते 90 टक्के प्लॅन बजेट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे बजेटमध्ये फार कमी रक्कम राहिली असून ती कमी राहिलेली रक्कम गृहीत धरुन महसूली अधिक्य काढले आहे. या अर्थसंकल्पामध्ये केंद्र सरकारकडून नुकसान भरपाईच्या स्वरुपामध्ये 1200 कोटी रुपये मिळणार आहेत. ती रक्कम सोडून हे आकडे दाखविले गेले आहेत. माझ्या माहितीप्रमाणे उद्या संध्याकाळपर्यंत केंद्र सरकारकडून 600 कोटीपर्यंत रक्कम आली तर पॉझिटीव्ह स्वरुपामध्ये हे आकडे बदलणार आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.जयंत पाटील (पुढे सुरू...

त्यामुळे चालू वर्षाचे बजेट डेफिशिट केलेले आहे. केंद्र सरकारकडून पैसे आले तर फरक पडेल. त्याचबरोबर पुढच्या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये त्याचा उपयोगच होईल. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी उपस्थित केलेल्या मुद्याचा मी आदर करतो. दोन वर्षे आपण बजेट डेफिशिट केले. यावर्षी आपण काळजी घेऊन सगळया तरतुदी या अर्थसंकल्पामध्ये केलेल्या आहेत.

सभापती महोदय मानव विकासाचा अहवाल आलेला आहे. ह्युमन डेव्हलपमेंट इंडेक्स मिशन स्थापन करून काम सुरु केले. त्यासाठी श्री. भोगे यांची नेमणूक केली होती, त्यांनी वर्षभर काम केले. यामध्ये काही सुधारणा केलेल्या आहेत. काही जिल्ह्यातील काही तालुक्यातील....

श्री.मधुकर सरपोतदार : मानव विकासाच्या संबंधात मिशन स्थापन केल्याच्या संदर्भात गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात उल्लेख आहे परंतु या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये त्याचा उल्लेख नसल्यामुळे मला मुद्दा उपस्थित करावा लागला.

श्री.जयंत पाटील : अर्थसंकल्पाचे आकारमान वाढले तर का वाढले म्हणून आरोप होतो. तसेच आकारमान कमी झाले तरी आरोप होतो, दोन्ही बाजूने बोलले जाते. तो बोलण्याचा आपल्याला अधिकार आहे. अर्थसंकल्पाचे आकारमान वाढते तेव्हा विकासावर निधी किती खर्च केला जातो याला महत्व आहे. विकासाकरिता पैसे देण्यामध्ये आम्ही यशस्वी झालेलो आहोत, याची नोंद आपण सगळेजण घ्याल, असा मला विश्वास आहे.

सभापती महोदय, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा पुण्याला होणार आहेत,त्यासाठी निधीची तरतूद केलेली आहे. ज्या ठिकाणी स्पर्धा होणार आहे, त्या बालेवाडी क्रीडा संकुलातील व्यवस्था सुधारण्यासाठी दिलेल्या पैशाचा अंतर्भाव आहे.

सभापती महोदय, सरदार सरोवराच्या संबंधात मुद्दा उपस्थित केला गेला. अर्थसंकल्पामध्ये 1450 मे.वॅ. वीज निर्माण होणार आहे. त्यातील 27 टक्के म्हणजे 391 मे.वॅ. वीज आपल्याला मिळत आहे.

त्यानंतर मिठी नदीच्या परिसरातील अतिक्रमणाच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्या परिसराच्या सुशोभिकरणाचे काम चालू आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमणे होणार नाहीत असे नाही. मिठी नदीमध्ये लॉऱ्या आणून भराव टाकला जात आहे.

श्री.जयंत पाटील : सन्माननीय सदस्य ज्या भागाचा उल्लेख करीत आहेत, त्या ठिकाणी सुशोभिकरणाचे काम पोहोचलेले नसेल, परंतु अतिक्रमण होणार नाही याची मी खत्री देतो. मी पालकमंत्री असल्यामुळे त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ज्या ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे ते पहाण्यासाठी त्यांच्यासोबत मी जाऊन त्यांच्या शंकेचे निरसन करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेन.

त्यानंतर सन्माननीय श्री. सरपोतदार साहेबांनी व्हॅट पेट्रोल आणि डिझेलवर का लावत नाही ? असा उल्लेख केला.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ......

पेट्रोल आणि डिझेलची ॲडमिनिस्टर्ड प्राईस असल्यामुळे आपण पहिल्या पॉइन्टलाच टॅक्स घेणे योग्य आहे. ॲडमिनिस्टर्ड प्राईस असल्यामुळे पुढे व्हॅट लावण्याची आवश्यकता नाही.

सभापती महोदय, व्यवसाय कराच्या संदर्भात महत्वाची घोषणा केलेली आहे. काही लोक अनेक वर्षे व्यवसाय करतात परंतु ते आपल्या नेटमध्ये आलेले नाहीत. त्यामुळे आपण माफीची अभय योजना आणत आहोत. ती योजना आणत असताना सन 2002 च्या आधीपासून जे व्यवसाय करणार लोक आहेत त्यांनी आपल्याकडे नोंद केली तर सन 2002 पासून पुढचा कर त्यांनी भरावा अशी तरतूद केलेली आहे. अर्थसंकल्पाच्या भाषणात त्याचा उल्लेख केलेला आहे. त्यातून राज्यात निश्चितपणे जादा महसूल जमा होईल याची मला खात्री आहे.

सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण साहेबांनी असा मुद्दा मांडला की, शहरीकरण वाढले म्हणजे प्रगती झाली असे नाही, ग्रामीण भागाकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. सन्माननीय सदस्यांचा मुद्दा बरोबर आहे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी बरेच मुद्दे उपस्थित केलेले आहेत. शेवटी त्यांनी असा मुद्दा मांडला की, मुंबईला काहीही दिलेले नाही. मुंबईला काय काय दिले याचा उल्लेख मी केलेला आहे. मुंबईला काही दिले नाही म्हणून सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात निषेध व्यक्त केलेला आहे. हा निषेध त्यांनी मागे घ्यावा अशी माझी नम्र सूचना आहे. या वर्षी मुंबईला बरेच काही दिलेले आहे. जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्यूअल मिशन यामध्ये 1 हजार कोटी रुपये दिलेले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव सोनवणे यांनी ग्रंथालयासाठी डीपीडीसीमध्ये जास्त तरतूद करावी अशी चांगली सूचना केलेली आहे. राज्यातील ग्रंथालये अधिक सक्षम केली पाहिजेत यासाठी मागच्या काळात श्री. पत्की साहेब सदस्य असताना त्यांच्याबरोबर बसून चर्चा करुन ग्रंथालयाचे अनुदान वाढविण्याचा कार्यक्रम तयार केला होता. ग्रंथालये अधिक सक्षम केली पाहिजेत याबद्दल दुमत नाही. डीपीडीसीमधून ग्रंथालयांसाठी विशेष तरतूद करण्याविषयी खास सूचना पुढचा प्लॅन तयार करताना सर्व जिल्ह्यांना देण्याचा प्रयत्न करु. सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना चांगली आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

श्री जयंत पाटील .....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी गिरणी कामगारांच्या मुलांना व्होकेशनल ट्रेनिंग देण्यासाठी शासनाने पावले उचलावीत अशी चांगली सूचना केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी अर्थसंकल्पाच्या बॅगसोबत कंदील देण्यात यावा असे सांगितले. ही मागासलेली मागणी झाली. सन्माननीय सदस्यांनी मॉडर्न मागणी करावयास पाहिजे. देशात आणि राज्यात नवीन नवीन मार्ग स्वीकारल्याशिवाय विजेच्या संकटावर मात करता येणार नाही. विजेच्या बाबतीत आज साडेपाच हजार मेगावॅटचे शॉर्टेज आहे. मला खात्री आहे की, राज्य सरकारने जे प्रयत्न केलेले आहेत त्या प्रयत्नाने आपल्या राज्यामध्ये अधिकची वीज म्हणजे जवळजवळ 2 हजार मेगावॅट वीज निर्माण करण्यासाठी गुंतवणूक करुन परळी, पारस, खापरखेडा अशा काही प्रकल्पांच्या ठिकाणी काम चालू करीत आहोत.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 11:40

(श्री. जयंत पाटील.....)

एन्रॉर प्रकल्पातून निर्माण होणारी संपूर्ण 2200 मेगावॅट वीज ही महाराष्ट्र राज्याला मिळावी म्हणून प्रयत्न सुरु आहेत. ज्या खाजगी कंपन्या आहेत त्यांच्या पुंगळया करा असा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला. तशी वेळ येणार नाही. साडेबारा हजार मेगावॅट वीज निर्मिती बाबतचे एमओयू झालेले आहेत. रिलायन्स मार्फत 4000 मेगावॅट वीज निर्मिती होईल याची खात्री आहे. 2000 मेगावॅट वीज ही राज्य सरकार मार्फत होणा-या प्रकल्पातून निर्माण होईल. एनटीपीसी आणि केन्द सरकारच्या योजनेतून नॅशनल ग्रीडमधून जी वीज मिळते त्यातील काही भाग आपल्याला मिळू शकेल. त्याच प्रमाणे खाजगी गुंतवणूकदार जे प्रकल्प उभे करीत आहेत त्यामधून आपल्याला वीज मिळेल. हे सर्व प्रकल्प शून्यातून सुरु करावयाचे होते. एमओयू झालेल्या सगळया गुंतवणूकदारांनी प्रकल्प सुरु केलेले आहेत असे नाही. आता त्यासंबंधीची माहिती माझ्याकडे नाही. साधारणपणे साडेपाच हजार मेगावॅट विजेची तूट भरुन काढण्यासाठी राज्य सरकारने पावले टाकलेली आहेत. त्याच बरोबर ग्रीडमधील लॉसेस कमी व्हावेत म्हणून राज्य सरकारने विशेष प्रयत्न केलेले आहेत. ग्रीडमधील 5 टक्के लॉस जरी कमी झाला तरी 500 मेगावॅट वीज वाचू शकते. वाचलेली वीज ही सुध्दा एक प्रकारची निर्मितीच आहे. आपल्या राज्यातील ग्रीड सक्षम करण्यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून पैसे खर्च करीत आहोत....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीची माहिती राहू नये म्हणून मी माननीय अर्थ मंत्र्यांना सांगू इच्छितो की, रिलायन्स एनर्जी - 4000 मेगावॅट, टाटा पॉवर इंडस्ट्री - 1000 मेगावॅट, एस्सार पॉवर 1500 मेगावॅट, जिंदाल ग्रुप 1000 मेगावॅट, जीएमआर एनर्जी-1000 मेगावॅट, स्पेक्ट्रम टेक्नॉलॉजी 500 मेगावॅट, जीएमआर एनर्जी-1000 मेगावॅट आणि स्पेक्ट्रम टेक्नॉलॉजी-500 मेगावॅट अशा एकूण 8 प्रकल्पातून साडेबारा हजार मेगावॅट वीज निर्माण होणार आहे. रिलायन्स एनर्जीला एकच जागा दिली...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, 22 तारखेला कर्जरोखे बाजारात आणले असा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला. हे ओपन मार्केट बॉरोइंग कर्जरोखे होते. हे कर्जरोखे प्लॅनमधील होते. बजेट व्यतिरिक्त हे कर्जरोख बाजारात आणले असा गैरसमज होऊ नये म्हणून हे केलेले आहे.

==2==



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय अर्थमंत्र्यांचे उत्तराचे भाषण संपेपर्यन्त कामकाजाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी राज्याच्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात एक कविता केलेली आहे. ती कविता माननीय अर्थमंत्र्यांनी पहावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, कविता केल्याने राज्याचे प्रश्न सुटत नसतात. शासनाने 22 मार्च रोजी बाजारात कर्जरोखे आणले याचा उल्लेख केला आहे. ते प्लॅन कर्ज होते. मनात आले म्हणून बाजारात गेलो अशी परिस्थिती नाही. त्यामुळे मंत्रालयावर जप्ती आणण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सभापती महोदय, जुन्या बातम्यांचा उपयोग नव्या अर्थसंकल्पाच्या वेळी करणे दिसायला बरे दिसत नाही. त्याचबरोबर साधारणपणे पोलिसांच्या आवश्यकतेकडे पाहून बाजारातून कर्जे काढण्यापेक्षा शासनाने मुद्दाम आपला निधी दिला आहे. पोलिसांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करीत आहोत. पोलिसांच्या घरासाठी फार मोठी चालना देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. पोलिसांच्या संदर्भातील मॉडर्नायझेशनकरिता या अर्थसंकल्पातून निधी दिला आहे. सगळयात महत्वाचे म्हणजे या राज्याच्या आदिवासी विकास विभागाला 1800 कोटी रुपये आणि सामाजिक न्याय विभागाला 2000 कोटी रुपये देत आहोत. या राज्यातील मागासलेल्या, मागे राहिलेल्या घटकांना न्याय देण्यासाठी पहिल्यांदा राज्याच्या इतिहासात जवळपास 3800 कोटी रुपयांचा निधी अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेला आहे. राज्याच्या इतिहासात या राज्यातील आदिवासी विकास व सामाजिक न्याय विभागाला एवढ्या मोठ्या प्रमाणात कधी निधी उपलब्ध झाला नव्हता. लोकसंख्येच्या प्रमाणात ही रक्कम देण्यात आली आहे. फार मोठया प्रमाणात शासनाने अर्थसंकल्पात या दोन विभागांना निधी दिलेला आहे. त्याचबरोबर मला याठिकाणी हेही सांगितले पाहिजे की, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी क्रिकेटचा नाद सोडा असा उल्लेख केला होता. तुम्ही आणि मी क्रिकेटचा नाद सोडू म्हणून सांगितले तरी राज्यातील आणि देशातील जनता क्रिकेटवर फार मोठे प्रेम करते हे आपल्याला विसरुन चालणार नाही. कधीतरी निवडणुकीत तुम्ही हरलात, त्यामुळे बेकार झालेले आहात असे समजणे बरोबर नाही. तुमचा निवडणुकीत पराभव झाला म्हणून सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी नागपूरहून मुंबईला येण्याची गरज नाही असे म्हणून चालेल का? खेळात हार जीत होतच असते. परंतु मन किती मोठे आहे, दिलदारपणे काय स्वीकारता यावर सगळे अवलंबून आहे. आपले मन मोठे करण्यासाठी प्रशिक्षणाची व्यवस्था करण्याची गरज असेल तर त्यासाठी क्लास सुरु करण्याची मी व्यवस्था करतो. आपल्या देशाचा क्रिकेट वर्ल्ड कपच्या साखळी सामन्यात पराभव झाला. तेंडूलकर, ढोणी हे क्रिकेटमधील अव्वल दर्जाचे समजले जाणारे खेळाडू सुध्दा शून्यावर बाद झाले.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : क्रिकेटपेक्षा शेतक-यांच्या आत्महत्यांचा विषय महत्वाचा आहे. त्यासाठी वेळ द्यावा अशी मी विनंती केली होती.

श्री.जयंत पाटील : राज्यातील ज्या मुलभूत गरजा आहेत त्याकडे शासन गांभीर्याने लक्ष देत आहे. आत्महत्या झालेल्या भागातील समस्येविषयी मी मघाशी भाष्य केले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी कोकणातील सागरी महामार्गाचा उल्लेख केला. 5 ठिकाणी आता कामे शिल्लक राहिली आहेत. कोकणातील सागरी महामार्गावर 2 ठिकाणी वळण रस्ते, 3 ठिकाणी छोटे पूल तयार करण्यासाठी जवळपास 80 कोटी रुपये लागणार आहेत. येत्या दोन वर्षात ही 5 कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करु. काल या संदर्भात सन्माननीय सदस्यांबरोबर माझी बैठक झाली होती. त्या बैठकीत उपलब्ध झालेल्या माहितीनुसार एकत्रितपणे 80 कोटी रुपयांचा निधी आवश्यक आहे. यावर्षी आणि पुढील वर्षी हा निधी उपलब्ध करुन देऊ. जेणेकरुन सागरी महामार्गाचे काम 2008 ते 2009 पर्यंत पूर्ण होऊ शकेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मुंबईच्या प्रश्नासंबंधी भावना व्यक्त केल्या आहेत. मुंबईसाठी किती निधी देण्यात आला हे मी मघाशी सांगितले आहे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी जेंडर सेन्सिटिव्ह बजेट असावे असा उल्लेख केला आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी भाषणामध्ये एसईझेडसंबंधी पॅरा नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. या मुद्याबद्दल मी मघाशी उल्लेख केला आहे. नवीन उद्योगधंदा सुरु करण्यासाठी किती दिवस लागतात असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी उपस्थित केला होता.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ....

खरे म्हणजे एक खिडकी योजना काढून काही ठराविक काळात त्याचा निर्णय झाला नाही तर त्यास आपोआप परवानगी मिळाली आहे असले समजले जाते. त्यामुळे एक खिडकी योजनेला मूर्त स्वरुप मिळाले आहे. अर्थसंकलाच्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. तसेच सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर साहेबांनी खार भूमीसाठी आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही असे सांगितले परंतु मी सांगू इच्छितो की, खारभूमीच्या संदर्भात अर्थसंकल्पातील पृष्ठ क्रमांक 27 तसेच 58 वर माहिती देण्यात आलेली आहे. अर्थसंकल्पाच्या संदर्भात बोलतांना सन्माननीय सदस्य श्री. मानकर यांनी गोंदिया जिल्हयातील न्यायालयाच्या इमारतीच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. यासंदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, न्यायालयाच्या इमारंतींसाठी आपण प्रायोरिटी ठरवत नाही तर ही प्रायोरिटी चिफ जस्टीस ठरवित असतात. त्यामुळे चिफ जस्टीस यांनी गोंदिया जिल्हयाच्या इमारतीची प्रायोरिटी ठरविल्याशिवाय आपण न्यायालयाच्या इमारतींच्या बांधकामास सुरुवात करणे योग्य होणार नाही. अर्थसंकल्पावर विचार मांडीत असतांना सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबईतील क्रीडा संकुलासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा तसेच महिला सरपंचांना मोफत एस.टी. प्रवासाचे पास उपलब्ध करुन देण्यात यावे अशी मागणी केलेली आहे. या दोन्ही मागण्यांचा सहानुभूतीने विचार करुन, काय करता येईल याबाबतीत निर्णय घेतला जाईल. महिला सरपंचाना मोफत एस.टी. प्रवास करण्याची जी सूचना केलेली आहे ती खरोखरच चांगली आहे. महिला सरपंचांना एस.टी. चा प्रवास मोफत करण्यासाठी एकूण किती खर्च येईल याची माहिती काढून न्याय देण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, शेवटी मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपले राज्य आर्थिक दृष्टया स्थिर झालेले आहे. राज्य सरकार अतिशय चांगल्या पध्दतीने स्थिरीकरणाकडे जात आहे. राज्य स्थिरीकरणाकरणाकडे जात असल्यामुळेच चांगल्या प्रकारचे बजेट मांडण्यात आलेले आहे. कोणत्याही नव्या घोषणा टाळून जी कामे अर्धवट अवस्थेत आहेत ती कामे आपल्याला पूर्ण करावयाची आहेत तसेच जी कामे निकडीची आहेत ती कामे आपल्याला सर्वप्रथम करावयाची आहेत. त्यामुळे अशा कामांना निधी वाढवून देण्याचा संकल्प या अर्थसंकल्पात करण्यात आलेला

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ....

आहे. हा अर्थसंकल्प निश्चितपणे राज्याला पुढे घेऊन जाणारा आहे. त्यामुळे या ठिकाणी मी जो अर्थसंकल्प मांडलेला आहे त्याला सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, विधान सभेत सन्माननीय सदस्यांच्या आमदार निधीच्या फंडात वाढ करण्याच्या संदर्भात शासन सहानुभूतीने विचार करेल अशी भूमिका मांडलेली आहे त्यासंदर्भात आपण भूमिका स्पष्ट करावी अशी विनंती आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, विधानसभेत अजून अर्थसंकल्पावरील उत्तराचे भाषण झालेले नाही. आमदार फंडाच्या निधीत वाढ करण्यासंदर्भात अजून माननीय मुख्यमत्रीमहोदयांशी चर्चा करुन निर्णय घ्यावयाचा आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात आता मी काही बोलणे योग्य होणार नाही. त्यामुळे या ठिकाणी मी जो अर्थसंकल्प मांडलेला आहे त्याला सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

**उपसभापती** : अर्थसंकल्पावरील चर्चा आता संपलेली आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 11.54 ते 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**जालना जिल्ह्यातील मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीने भूखंड वाटपात केलेला गैरव्यवहार**

**(1) * 24779 श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 20867 ला दिनांक 12 डिसेंबर, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **पणनमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जालना जिल्ह्यातील मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीने भूखंड वाटपात केलेल्या गैरव्यवहाराबाबत शासकीय अभियोक्ता जिल्हा व सत्र न्यायालय जालना यांचेकडून दिनांक 27 मार्च, 2006 अन्वये प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार कारवाई करण्यात आली आहे काय,
(2) असल्यास, कारवाईचे स्वरुप काय,
(3) कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची कारणे कोणती ?

**श्री. हर्षवर्धन पाटील** : (1) होय.
(2) कृषि उत्पन्न बाजार समिती, मंठा, जि. जालना यांचा पणन संचालक कार्यालयाने मंजूर केलेला ले आऊट प्लॅन रद्द केला आहे व भूखंड वाटपाची मंजूरीही रद्द केली आहे.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी मागील अधिवेशनात देखील या संदर्भात प्रश्न विचारला होता, त्यावेळी देखील हेच उत्तर देण्यात आले होते. भूखंड वाटपामध्ये अपहार झाल्याचे शासनाने मान्य केलेले आहे. संचालक मंडळाने अपहार केला, त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली ? आता त्याठिकाणी वर्षभरापासून प्रशासक कामकाज पाहत आहेत. तेव्हा संचालक मंडळाची निवडणूक केव्हा घेण्यात येणार आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पणन संचालकामार्फत 72 प्लॉटची मान्यता देण्यात आली होती. 12(1) प्रमाणे तत्कालीन मंडळाने या प्रोसिजरमध्ये बदल करुन 79 प्लॉट देण्याचा निर्णय घेतला. परंतु नंतर चौकशी करण्यात येऊन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24779.................

श्री.हर्षवर्धन पाटील........

12(1) ची परवानगी रद्द करण्यात आली. त्यामुळे तेथे अपहार झालेला नाही. त्याठिकाणचे संचालक मंडळ रद्द करुन तेथे असिसटंट रजिस्ट्रारची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. आता मतदारांच्या याद्या तयार झालेल्या आहेत. निवडणुकीसाठी 31 मार्च पर्यंत स्टे दिलेला आहे. एप्रिल महिन्यात निवडणूक घेतली जाईल.

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले की, संचालक मंडळाने केलेले भूखंडाचे वाटप रद्द करण्यात आले. परंतु माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, पणन संचालक मंडळाने कोणत्या नियमाखाली मंजुरी दिली ? तसेच ज्या लोकांनी भूखंडासाठी पैसे भरलेले आहेत त्यांचे पैसे त्यांना परत मिळणार काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कृषी उत्पन्न बाजार समितीने दिनांक 7.4.2005 रोजी 2 एकर 25 गुंठे जमिनीचा प्रस्ताव नियम 12(1) नुसार कृषी पणन संचालकाकडे सादर केला होता. त्यानुसार त्यास मान्यता दिली होती. प्लॉटसच्या संदर्भात बाजार समितीने डिपॉझीट म्हणून पैसे घेतले असतील तर ते परत दिले जातील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जर कोणी चोरी केली असेल तर आय.पी.सी.प्रमाणे त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात येतो. त्याच्याकडून चोरीचा ऐवज ताब्यात घेऊन ज्याच्याकडे चोरी केली त्यास तो ऐवज परत केला जातो आणि चोरास शिक्षा होते. या संचालक मंडळाने भूखंड वाटपामध्ये गैरव्यवहार केला हे सिध्द झालेले आहे. ही गोष्ट लक्षात आल्यानंतर ते मंडळ बरखास्त करण्यात आले. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, भूखंड वाटपामध्ये भ्रष्टाचार झाला हे सिध्द झाल्यानंतर त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली ? तसेच या संचालक मंडळास पुढील 6 वर्षे निवडणुकीत भाग घेता येणार नाही असा निर्णय शासन घेणार आहे काय ?

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24779....

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सेक्शन 40 च्या अंतर्गत नोटीस दिलेली असून नोटीसीद्वारे त्यांना सगळे चार्जेस कळलेले आहेत. तसेच, सेक्शन 45 (ए) खाली संचालक मंडळ बरखास्त केल्यानंतर संबंधित तत्कालीन माजी सभापती हे औरंगाबाद हायकोर्टामध्ये गेले असून हे प्रकरण अजून कोर्टामध्ये प्रलंबित आहे. यासंबंधी पोलीस केसेस करण्यासंदर्भात प्रशासकाने शासकीय अभियोक्त्यांचे लेखी ओपिनिअन मागितले होते. त्याप्रमाणे त्यांनी असे अभिप्राय दिलेले आहेत की, यासंदर्भात कारवाई झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी या संचालक मंडळास पुढील निवडणूक न लढविण्यासंबधी त्यांना आपण अपात्र ठरवावे, असे सांगितले आहे. त्यांची ही बाब निश्चितपणे तपासून पाहण्यात येईल व त्याप्रमाणे योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हायकोर्टामध्ये जे मॅटर आहे ते कधी पासून आहे, सध्या या प्रकरणाचे सद्य:स्थिती काय आहे व हे मॅटर लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने आपण कोणते प्रयत्न केले ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, यासंबंधी दिनांक 19.9.2006 रोजी उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. परंतु मॅटर केव्हा दाखल झाले, याची तारीख सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु शासनाकडे दिनांक 19.9.2006 रोजी आदेश प्राप्त झालेले आहेत. प्रशासक नेमण्याच्या ऑर्डरला स्टे देण्याच्यासंदर्भात तत्कालीन सभापती श्री.सतिश झोळ यांनी रिट-पिटीशन दाखल केले होते. परंतु उच्च न्यायालयाने सांगितले की, जो प्रशासक नेमला आहे तो योग्य असल्यामुळे स्टे देता येणार नाही. त्यानंतर कोर्टाने इंटेरिअम ऑर्डर देऊन सांगितले की, प्रशासकाने तेथील रुटीन कामकाज करावे व धोरणात्मक निर्णय घेऊ नये. मात्र हायकोर्टाने प्रशासकाला स्टे दिलेला नाही. सरकारची ऑर्डर हायकोर्टाने कन्फर्म केली आहे. त्यास स्टे मिळालेला नाही. फक्त धोरणात्मक निर्णय घेऊ नये, एवढेच हायकोर्टाच्या ऑर्डरमध्ये म्हटलेले आहे.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, शासकीय अभियोक्ता जिल्हा व सत्र न्यायालय, जालना यांच्याकडून जे दिनांक 27 मार्च, 2006 रोजी अभिप्राय प्राप्त झाले, त्याचे स्वरुप काय? तसेच, पणन महासंघाकडून या बाजार समितीने कर्ज घेतले होते का ? असल्यास, घेतलेल्या कर्जातून त्या भूखंडाचा विकास केला होता का ? (..2....

ता.प्र.क्र.24779....

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, विकास करण्याचा प्रश्नच येत नाही. भूखंड वाटपाची ऑर्डर रद्द केल्यामुळे त्या भूखंडावर कुठल्याही प्रकारचा खर्च झालेला नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सदर प्रकरणी स्टे दिलेला आहे, असे माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तरात सांगितले. याबाबतीत शासनाने घेतलेला निर्णय कोर्टाने मान्य केला. याबाबतीत प्रशासकांनी धोरणात्मक भूमिका घेऊ नये याकरिताच निर्देश दिले, असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. याबाबतीत माझा असा प्रश्न आहे की, ज्यांनी लबाडी केली, त्यांना आपण बरखास्त केले व त्याठिकाणी आपण प्रशासक नेमला. परंतु भ्रष्टाचाऱ्यांच्या बाबतीत कोर्टाने रिमार्कस् पास केले नाहीत. त्यामुळे यासंदर्भात माझी अशी मागणी आहे की, बरखास्त झालेल्या संचालक मंडळास 6 वर्षे निवडणूक न लढविता यावी यादृष्टीने त्या संचालक मंडळास आपण बाद करणार असे निर्देश देणार का ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सहकार कायद्यामध्ये 6 वर्षासाठी डिस्क्वालिफाय करण्याची तरतूद आहे. परंतु कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कायद्यामध्ये तशी तरतूद नाही. माननीय रावते साहेब, आपणही पणन मंत्री होतात, त्यामुळे याबाबतची कल्पना आपल्यालाही असेलच. 6 वर्षासाठी डिस्क्वालिफाय करण्याची कायद्यामध्ये तरतूद नसल्यामुळे आपल्याला तसे करता येत नाही.

-------

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना पंचायत समितीच्या हद्दीतील ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी केलेल्या भ्रष्टाचाराबाबत**

**(२) * २८४४१ श्री.सय्यद पाशा पटेल :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना पंचायत समितीच्या हद्दीतील ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत सन २००२-२००४ या कालावधीत संवर्ग विकास अधिकारी, विस्तार अधिकारी आरोग्य व आदर्श ग्रामीण विकास मंडळ पिंपरडा या संस्थेचे अध्यक्ष सचिव यांनी संगनमत करुन कोणतेही बांधकाम न करता व १००% आगाऊ पेमेंट करण्याचे सरकारचे धोरण नसतांना शासनाची फसवणूक करुन रुपये ७ लक्ष ५५ हजार एवढ्या रकमेचा अपहार केल्याचे उघडकीस आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अधिकारी व संस्थेविरुध्द तातडीने फौजदारी विभागीय चौकशी व कारवाई करावी असा ठराव कोरपना पंचायत समितीचे आमसभेत दिनांक १६ जानेवारी, २००५ रोजी पारीत करुन शासनाकडे तशी मागणी करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व दोषी अधिकाऱ्यांविरुध्द व संस्थेविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री.अजित पवार** : (१) तत्कालीन संवर्ग विकास अधिकारी, विस्तार अधिकारी (आरोग्य) यांनी आदर्श ग्रामीण विकास सेवा मंडळ, पिंपर्डा या संस्थेस सन २००१-०२ या कालावधीतील ९३५ शौचालये व १९ शालेय शौचालये या बांधकामासाठी रोख रुपये ५,८९,६५०/- व रु.१,६५,८५०/- किंमतीचे साहित्य मिळून एकूण रु.७,५५,०००/- अग्रिम स्वरुपात मार्च, २००२ मध्ये दिले. सदर संस्थेने सन २००१-०२ ते सन २००२-०३ या कालावधीत यापैकी रु.२,०३,५००/- किंमतीची ४०७ वैयक्तिक शौचालये व रु.३,४०,०००/- किंमतीची १७ शालेय शौचालये, असे एकूण रु.५,४३,५००/- किंमतीचे काम पूर्ण केले आहे व उर्वरित रु.२,१२,०००/- पंचायत समिती कोरपनाकडे जमा केले आहेत.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर संस्थेने धनादेशाद्वारे एकूण रु.२,१२,०००/- रोख रक्कम पंचायत समिती कोरपना यांचेकडे परत केले असल्याचे चौकशीत निदर्शनास आले आहे. संस्थेकडील रोख शिल्लक १,८१,८५६/- रुपये अधिक त्यावर आकारलेले व्याज रु.३८,२९७/- मिळून एकूण वसूलपात्र रुपये २,२०,१५३/- पैकी संस्थेनी रुपये २,१२,०००/- रुपये रोख स्वरुपात पंचायत समितीकडे जमा केलेले आहे. त्यामुळे संस्थेकडून रोख रक्कम ८,१५३/- रुपये अधिक १२३ बॅग सिमेंट साहित्याची रक्कम रुपये १३,१६१/- मिळून रुपये २१,३१४/- व १११ नग मलपात्र संस्थेकडून येणे बाकी आहे. सदर शिल्लक रक्कम व मलपात्रे भरणा करण्याबाबत संस्थेला कळविण्यात आले आहे. परंतु संस्थेने आजपर्यंत रक्कम जमा केलेली नाही. यासंदर्भात तत्कालीन संवर्ग विकास अधिकारी व सहाय्यक लेखा अधिकारी यांना पुढे भविष्यात अशा प्रकारची नियमबाह्य वर्तणूक आढळून येणार नाही. लेखी ताकीद देण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.अजित.....

१२:०५

ता.प्र.क्र.२८४४१.....

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयातील कोरपना तालुक्यामध्ये संबंधित आदर्श ग्रामीण विकास सेवा मंडळ पिंपर्डा संस्थेने किती रुपयांचा भ्रष्टाचार केला ?

नंतर श्री.रोझेकर....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.28441 पुढे सुरु....</u>

श्री.पाशा पटेल.........

कामाचे पैसे उचलले का, पैसे उचलले असतील तर ते पैसे शासनाने परत घेतले आहे का, जर पैसे परत घेतले असतील तर व्याज लावले आहे का ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, प्रश्नाचे लेखी उत्तर बघितले तर त्यामध्ये सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. केवळ एक बाब अशी आहे की, सदर संस्था व्याजाची रक्कम देण्यास तयार नाही. आदर्श ग्रामीण विकास सेवा मंडळाला सन 2001-2002 या वर्षात 935 शौचालये व 19 शालेय शौचालयांच्या बांधकामासाठी रोख रुपये 5,89,650/- व रुपये 1,65,850/- किंमतीचे साहित्य मिळून एकूण रु.7,55,000/- एवढा अग्रिम स्वरुपात मार्च, 2002 मध्ये देण्यात आलेला आहे. सदर संस्थेचे म्हणणे असे आहे की, संस्थेने अग्रिमाची मागणी केली नव्हती तर विभागानेच रक्कम वर्ग केली आहे. बाकीचे काम करीत असतांना अडचण आली, लोकांनी काही ठिकाणी प्रतिसाद दिला नाही, काही ठिकाणी ग्राम पंचायतींनी प्रतिसाद दिला नाही त्यामुळे संस्थेने त्यांना अग्रिम म्हणून दिलेली रक्कम विभागाकडे परत केलेली आहे. पण अग्रिमावरील व्याजाची रक्कम देण्यास संस्था तयार नाही. त्यामुळे व्याजाची रक्कम जर संस्थेने दिली नाही तर संस्थेला अग्रिम वितरीत करणा-या संबंधित अधिका-यांकडून नाईलाजाने ती रक्कम वसूल करण्यात येईल.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, शंभर टक्के रक्कम अग्रिम म्हणून देण्याची तरतूद नियमात नाही. नियमात अशी तरतूद नसल्यामुळे या प्रकरणी अग्रिम वितरीत करणा-या अधिका-यावर शासन कारवाई करणार काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले आहे की, 31 मार्च जवळ आलेला होता, रक्कम संबंधित संस्थेला दिली नसती तर ती व्यपगत झाली असती. शौचालये व्हावीत, शाळेला मदत व्हावी, लाभार्थ्यांना मदत व्हावी हा दृष्टीकोन समोर ठेवून संबंधित अधिका-यांनी अग्रिम वितरीत करण्याचा निर्णय घेतला. जो अग्रिम वितरीत करण्यात आला होता तो विभागाला परत मिळाला असून केवळ व्याजाच्या रकमेचा प्रश्न शिल्लक आहे. सदर संस्थेने व्याजाची रक्कम दिली नाही तर संबंधित अधिका-याकडून ती रक्कम वसूल करण्यात येईल.

--------------

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कर्जत (जि. रायगड) पाली-भुतवली पाटबंधारे योजनेच्या कामाबाबत**

**(३) * २५०८८ श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री.सय्यद जामा : तारांकित प्रश्न क्रमांक ९३४० ला दिनांक ६ डिसेंबर, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकासमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा कर्जत तालुक्यातील पाली-भूतवली धरणाचे कामास पाटबंधारे खात्यातील उपअधिकाऱ्यांनी दिनांक १९ जानेवारी, २००७ रोजी वा त्या सुमारास स्थगीती देण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामास स्थगीती देण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर धरणाचे काम त्वरीत चालु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) अद्याप पर्यंत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) धरणाचे का प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील कर्जत तालुक्यातील पाली-भूतवली धरणाचे काम ब-याच वर्षापासून प्रलंबित आहे. सदर काम प्रलंबित राहण्याची विविध कारणे आहेत. माझा प्रश्न असा आहे की, या धरणाचे काम किती कालावधीत पूर्ण होईल ? सदर काम करणा-या कंत्राटदाराकडून कामाचा दर्जा राखण्यात येत नाही, त्यामध्ये खूप तफावत आहे. वेळोवेळी या कामाची तपासणी झाली असून काही काळ कामही थांबविण्यात आले होते. तेव्हा, सदर कामाच्या दर्जाची तपासणी पुन्हा करण्यात येईल काय ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जून 2008 पर्यन्तची मुदत देण्यात आलेली आहे. कुठेही काम थांबलेले नाही. कामाच्या दर्जाबाबत काही तक्रारी असतील आणि काम वेळेवर पूर्ण होत नसल्याचे आढळले तर त्याबाबत चौकशी करण्यात येईल.

..3.........





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.25088 पुढे सुरु..........**

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, कामाच्या दर्जाबाबत सन्माननीय सदस्यांची तक्रार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष जागेवर जाऊन माननीय सदस्यांचे समाधान सन्माननीय मंत्र्यांनी करुन द्यावे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, धरणाचे काम कधीही थांबलेले नाही, असे मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात व आता दिलेल्या तोंडी उत्तरात स्पष्टपणे म्हटले आहे. माझा प्रश्न असा आहे की, धरणाच्या कामाची अंदाज पत्रकीय किंमत किती आहे व धरण पूर्ण झाल्यानंतर किती जमीन ओलिताखाली येणार आहे ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सर्वसाधारणपणे 571 हेक्टर एवढी जमीन ओलिताखाली येणार आहे. विशेषत: कर्जत तालुक्यातील 15 गावांमधील 950 हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. सदर धरणाचे काम सुरु असून त्यामध्ये कोणतीही अडचण नाही.

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर...... 12:15

ता.प्र.क्र.25088..........

श्री.अजित पवार........

सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या बाबतीत मला असे म्हणावयाचे आहे की, पाली भुतवली या धरणाचे जे वरचे काम चालू आहे, तेथे 180 मीटरच्या पट्टयामध्ये वाळूची क्वालिटी खराब होती, त्याकरिता आमच्या अधिका-यांनी कॉण्ट्रॅक्टरला त्या 180 मीटरमधील वाळू बदलून देण्यास सांगितले होते. तेवढयापुरतीच फक्त क्वालिटीच्या बाबतीत अडचण आली होती, बाकीचे काम व्यवस्थित चालू आहे. जून,2008 पर्यंत हे काम व्यवस्थितपणे पूर्ण होईल. आतापर्यंत 95 टक्के धरणाचे काम पूर्ण झालेले आहे.

श्री.जयंत पाटील : महोदय, सन 1982 सालापासून या धरणाचे काम चालू आहे, अनेक वेळा या सभागृहामध्ये पाली भुतवली धरणाच्या बाबत मी प्रश्न मांडले होते त्यावेळीही मला असेच उत्तर मिळाले होते की, अजून पाली भुतवली धरणाचे काम प्रगतीपथावर आहे, आज 25 वर्ष झाले तरी या धरणाचे काम अद्यापही प्रगतीपथावरच आहे. या धरणाच्या कॅनलकरिता जी जमीन आपण संपादित केली होती, ती जमीन वनखात्याने अडविलेली आहे, ही खरी गोष्ट आहे? माझा मंत्रीमहोदयांना असा प्रश्न आहे की, या धरणाची प्रगती केव्हापर्यंत चालणार आहे ?

डॉ.सुनील देशमुख : महोदय, मी आताच सांगितल्याप्रमाणे या धरणाचे काम 95 टक्के पूर्ण झालेले आहे. जून,2008 पर्यंत हे धरण पूर्ण होणार आहे.

श्री.जयंत पाटील : कॅनलच्या बाबत आपण काय कारवाई करणार आहात ?

डॉ.सुनील देशमुख : कॅनलच्या व इतरही महत्वाच्या बाबीसंदर्भात या धरणाचे काम शासन जून,2008 पर्यंत पूर्ण होईल.

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यात अतिरिक्त ऊसाचे गाळप वेळेवर होण्यासाठी करावयाची उपाययोजना

**(४) * २८४६१ श्री. सुरेश जेथलिया :** सन्माननीय **सहकारमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यंदा सुमारे १०० लाख टन अतिरिक्त ऊसांचे उत्पादन झाले आहे हे खरे काय,
(२) असल्यास, सदर अतिरिक्त ऊसांचे वेळेवर गाळप व्हावे म्हणून शासनाने काही उपाययोजना केली आहे काय,
(३) असल्यास, ती कोणती,
(४) असल्यास, राज्यातील साखरेचेही यावेळी विक्रमी उत्पादन होत आहे हे खरे काय,
(५) असल्यास, अतिरिक्त ऊसांचे गाळप वेळीच न झाल्यास ऊस उत्पादक शेतकरी कर्जबाजारी होत असल्याने गाळपाअभावी राहिलेल्या ऊसापैकी काही रक्कम अनुदान म्हणून देण्यात येणार आहे काय ?

**डॉ.पतंगराव कदम** : (१) होय. सन २००६-२००७ च्या गाळप हंगामामध्ये ७३७.१९ लाख मे.टन ऊस उत्पादक अपेक्षित आहे.
(२) अतिरिक्त ऊस इतर साखर कारखान्यांना अनिवार्यपणे गाळप करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.
(३) साखर आयुक्तालयाचे परवानगीशिवाय कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील अनिवार्य वितरीत केलेल्या ऊसाचे गाळप पूर्ण झाल्याशिवाय कारखाने बंद करु नयेत.

अतिरिक्त ऊसाचे गाळप करणारा साखर कारखाना कमी उताऱ्यापोटी साखर उतारा घट अनुदान व दूर अंतरावरुन ऊस आणून गाळप केल्यामुळे कारखान्यांना आर्थिक नुकसान होवू नये म्हणून वाहतूक अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

अतिरिक्त ऊस गाळप करण्यासाठी साखर आयुक्तालयाचे स्तरावरुन ऊस वितरण आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

शासनाने शेतकऱ्यांना गुऱ्हाळे चालू करण्याकरीता परवानगी दिली आहे.
(४) होय. हंगाम अखेर ८१ लाख मे.टन साखर उत्पादन अपेक्षित असून सदरचे उत्पादन हे आतापर्यंतचे उच्चतम आहे.
(५) अतिरिक्त ऊस गाळपापोटी साखर उतारा घट अनुदान व वाहतुक अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून, शासन निर्णय दिनांक १ मार्च, २००७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तरी वरीलप्रमाणे संपूर्ण गाळपाचे नियोजन केले आहे.

श्री.सुरेश जेथलिया : महोदय, ज्याप्रमाणे विदर्भातील शेतकरी आज आत्महत्या करीत आहेत, त्याचप्रमाणे मराठवाडयातील सुध्दा बरेच शेतकरी ऊस न गेल्यामुळे आत्महत्या करीत आहेत. माझे शासनाला असे निवेदन आहे की, आपण मराठवाडयात जो अतिरिक्त ४० लाख टन ऊस शिल्लक राहिलेला आहे, त्याबद्दल शासन तेथील शेतक-याला दर हेक्टरी किती अनुदान देणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



JPK/ SBT/ KTG/ 12:15

ता.प्र.क्र. २८४६१......

डॉ.पतंगराव कदम : मराठवाडयातीलच नव्हेतर संपूर्ण महाराष्ट्रातील अतिरिक्त ऊसाचे पूर्ण प्लॅनिंग या शासनाकडून करण्यात आलेले आहे. मे,2007 अखेर या राज्यात ऊसाचे एक कांडही शिल्लक राहणार नाही.

श्री.दिवाकर रावते : महोदय, या सदनामध्ये आपल्या आर्शिवादाने, सहकार्याने,मान्यतेने शेतक-यांच्या आत्महत्येवर तीन वेळा चर्चा झाली, त्यावेळी देखील हेच उत्तर मंत्रीमहोदयांनी चर्चेला उत्तर देतांना दिले होते. परंतु ऊस उत्पादक शेतक-याला व जनतेला या सदनात झालेल्या निर्णयांचा किंवा आश्वासनांचा मेसेज जात नाही. सदर बाबीवर चर्चा चालू असतांना देखील बाहेर ऊस उत्पादक शेतकरी आत्महत्या करतो. माझे शासनाला असे निवेदन आहे की, मे,2007 अखेर जर ऊसाचे कांड या राज्यात शिल्लक राहिले अगर ऊस शिल्लक राहिला तर आपण ऊस उत्पादक शेतक-याला दर एकरी 25,000 रुपये अनुदान देणार आहात का ?

डॉ.पतंगराव कदम : सन्माननीय सदस्यांनी विचारले की, मे,2007 अखेरपर्यंत जर ऊस गेला नाही तर काय करणार ? त्यावर माझे असे म्हणणे आहे की, महाराष्ट्रातील अतिरिक्त ऊसाचे पूर्ण प्लॅनिंग शासनाकडे आहे. तरीदेखील जर मे,2007 च्या अखेर ऊस राहिला तर निश्चितपणाने त्या वेळच्या परिस्थितीचा विचार करुन नुकसान भरपाई दिली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय मंत्रीमहोदयांनी याकरिता काहीतरी रक्कम अनुदान म्हणून जाहीर करावी.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगली जिल्हयामध्ये आताच शासनाच्या सुंदर प्लॅनिंगचा परिचय करुन दिला. माननीय मुख्यमंत्र्यांनी दत्तक घेतलेला बालाघाट हा साखर कारखाना दोन महिने उशिरा सुरु झाल्यामुळे त्या भागातील चार शेतक-यांनी ऊस गेला नाही म्हणून आत्महत्या केल्या. याला कोण जबाबदार आहे ?

यानंतर श्री.बोरले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KTG/ SBT/ प्रथम कु.खर्चे ..... 12:20

**ता.प्र.क्र.28461**.....

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मागच्या 4-5 वर्षामध्ये राज्यातील 21 कारखाने बंद पडलेले आहेते. ते कारखाने आता सुरु करण्यात आलेले आहेत. त्या कारखान्यांपैकी 12 साखर कारखाने मराठवाडयातील आहेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्या मतदारसंघातील बालाघाट सहकारी साखर कारखाना दोन महिने उशिरा सुरु झाला. दोन महिने आधी कारखाना सुरु झाला असता तर 1 लाख 80 हजार टन ऊसाचे गाळप झाले असते. माननीय मख्यमंत्र्यांचा मुलगा त्या साखर कारखान्याचा अध्यक्ष आहे. तेथील 4 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. दोन महिने आधी कारखाना सुरु झाला असता तर शेतक-यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली नसती. माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम साहेबांची आणि माननीय मुख्यमंत्र्यांची कारखाना सुरु करण्यासंदर्भात काय चर्चा झाली, याची मला कल्पना नाही. माझा प्रश्न असा आहे की, बालाघाट सहकारी साखर कारखाना दोन महिने उशिरा का सुरु झाला ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, बंद पडलेले जुने कारखाने सुरु करण्यासाठी प्रोसिजर असते. मंत्रिमंडळाने माझ्या अध्यक्षतेखाली उपसमिती नेमली होती. टेंडर काढण्यात आले. प्रोसिजरमुळे कारखाना सुरु करण्यास वेळ लागला. ज्या दिवशी प्रोसिजर पूर्ण झाली त्याच दिवशी हा कारखाना सुरु झालेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी असा प्रश्न विचारला की, मे अखेर पर्यंत ऊस शिल्लक राहिला तर काय करणार ? माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले की, मे अखेर पर्यंत ऊसाचे एकही कांड शिल्लक राहणार नाही. मला अशी माहिती मिळाली की, मराठवाडयामध्ये जवळपास 35 ते 40 लाख टन ऊस शिल्लक राहणार आहे. मे महिन्यानंतर ऊस शिल्लक राहिला तर शासन ऊस उत्पादक शेतक-यांना मदत देण्यार काय ? सभापती महोदय, आपण दौ-यावर होता त्यावेळी 25 तारखेला वंजारवाडी येथील नागनाथ नावाच्या शेतक-याने आत्महत्या केली. त्या दिवसापासून रोज शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत. ऊस ऊत्पादक शेतक-याला शासन मदत देणार आहे, असा मेसेज बाहेर गेल्याशिवाय ऊस उत्पादक शेतक-यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत. ऊस उत्पादक शेतक-याला शासन किती नुकसान भरपाई देणार आहे ?

...2....

**ता.प्र.क्र.28461**.....

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, साखर आयुक्त दर 8 दिवसांनी आढावा घेत आहेत. दिनांक 31 मार्च रोजी दुपारी 2 वाजता साखर संकुलामध्ये मी सर्व साखर कारखान्यांच्या चेअरमची बैठक बोलाविलेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना मी त्या बैठकीचे निमंत्रण देतो. साखर आयुक्त दर 8 दिवसांनी आढावा घेत आहेत. ऊस बिलकुल शिल्लक राहणार नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतक-यांच्या दृष्टीने हा अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे. शासनाने ऊस गाळपासंदर्भात केलेल्या प्लॅनिंगप्रमाणे माननीय सहकारी मंत्री डॉ.पतंगराव कदम साहेब उत्तर देत आहेत. महाराष्ट्रातील शेतक-यांवर संकट आलेले आहे. संकटाला कंटाळून शेतकरी आत्महत्या करीत आहेत. राज्य शासन गेंडयाच्या कातळीचे बनलेले आहे. शेतकरी मरो अथवा जगो, याचा सरकारवर काही फरक पडत नाही. कारण शेतक-यांनी जिल्हापरिषदेच्या निवडणुकीमध्ये त्यांना निवडून दिलेले आहे. सांगली जिल्हयामध्ये त्यांनी निवडणूक जिंकलेली आहे. शासनाने प्लॅनिंग केलेले आहे, असे माननीय सहकार मंत्री सांगत आहेत. माझा प्रश्न असा आहे की, शासनाने प्लॅनिंग केले असेल तर मराठवाडा परिसरातील ऊसाचे गाळप कशा पद्धतीने होणार आहे ? माननीय सहकारी मंत्री प्रश्न उडवून नेण्याच्या दृष्टीने उत्तर देत आहेत. सन्माननीय सदस्यांचे समाधान होईल, असे उत्तर माननीस सहकार मंत्र्यांनी द्यावे. 70 टक्के शेतक-यांच्या बळावर महाराष्ट्र राज्य चालते. शासनाने शेतक-यांकडे दुर्लक्ष करु नये.

यानंतर श्री.गागरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.28461.....

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, ऊसाच्या प्रश्नावर सरकार अतिशय गंभीर आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या सर्व अडचणीबाबत आम्ही गंभीरपणे विचार केलेला आहे. कोणत्या कारखान्याला कोणत्या भागातील किती ऊस न्यावयाचा आहे ? याचे नियोजन केले आहे. या नियोजनाचा साखर आयुक्त प्रत्येक आठवडयात आढावा घेत आहेत. गाळप न झालेल्या ऊसासाठी कोणकोणत्या सवलती द्यावयाच्या आहेत, याचा शासनाने विचार केला आहे. त्याप्रमाणे चालू वर्षात ऊस खरेदी कर वसुलीबाबतची कार्यवाही स्थगित केली आहे, ज्या कारखान्यांना वसुलीबाबत नोटीसा दिलेल्या आहेत, त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये व कारखान्यांची बँक खाती गोठविली असल्यास ती पूर्ववत चालू करण्यात यावी असे ठरले आहे. ऊस वाहतूक करण्यासाठी ट्रान्सपोर्टेशन अनुदानावर सबसिडी देण्यात येणार आहे. दूर अंतरावरुन आणलेल्या ऊस वाहतुकीसाठी अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. साधारणपणे पहिल्या 50 कि.मी. पर्यत आम्ही वाहतुक अनुदान देणार नाही. 51 ते 75 कि.मी. पर्यत 50 प्रती टन अनुदान देणार आहे. 76 ते 100 कि.मी. पर्यत 75 रुपये प्रती टन, 101 ते 125 कि.मी. साठी 100 रुपये प्रती टन, 126 ते 150 कि.मी.साठी 125 प्रती टन, 150 कि.मी. पेक्षा जास्त 150 रुपये प्रती टन अनुदान दिले जाणार आहे. तसेच उशिरा गाळप झालेल्या ऊसापासून साखरेच्या कमी येणाऱ्या उताऱ्यापोटी साखर उतारा घट अनुदान व सबसिडी देण्याचा निर्णय घेतला आहे. साखर उताऱ्यात 0.5 टक्के अपेक्षित घट झ ालयास 50 रुपये प्रती टन अनुदान देण्यात येईल, 1 टक्के घट आल्यास 100 रुपये अनुदान, 1.5 टक्के घट आल्यास 150 रुपये अनुदान, 2 टक्के घट आल्यास 200 रुपये अनुदान असे गाळपाच्या कालावधीनुसार निश्चित केले आहे. मोलासिसवरील बंदी पूर्णपणे उठविण्याचा निर्णय घेण्यात आला असून देशांतर्गत मळी वाहतुकीबाबत आता परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, आपला ऊस गाळपाअभावी शिल्लक राहणार आहे, अशा भावनेतून काही शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यांना काहीही मदत केलेली नाही, त्यांच्यासाठी आता कोणती मदत करणार ? आता आपण जाहीर केलेली मदत सहकारी व खाजगी दोन्ही क्षेत्रातील साखर कारखान्यांना मिळणार आहे का ?

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : होय, सहकारी व खाजगी या दोन्ही क्षेत्रातील साखर कारखान्यांना वरीलप्रमाणे सवलती देण्यात येतील.

( गोंधळ )

**सभापती** : सभागृहात ऊस गाळपाच्या प्रश्नावर आपण तीन वेळा चर्चा केलेली आहे. माननीय सहकार मंत्र्यांनी याबाबत धोरण जाहीर केलेले आहे तसेच दिनांक 31.3.2007 रोजी याबाबत बैठक बोलावली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शासन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना भरीव मदत देणार आहे का ? याबाबत शासनाकडून ठोस उत्तर मिळत नसल्यामुळे आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी बहिर्गमन केले)

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.भास्कर जाधव )**

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भेंडा (ता. नेवासे जि. नगर) येथील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याजवळ बांधण्यात आलेले तलाव फुटल्याने चार-पाच गावांना मोठा धोका निर्माण होऊन शेतीचे झालेले नुकसान**

**(५) * २५२५२ श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भेंडा (ता. नेवासे जि. नगर) येथील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याजवळ नव्याने बांधण्यात आलेला जलसाठवण तलाव दिनांक १९ डिसेंबर, २००६ रोजी वा त्या दरम्यान फुटल्याने सुमारे चार-पाच गावांना मोठा धोका निर्माण होऊन शेतीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे आढळून आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलावाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने तलाव फुटला असल्याचे आढळून आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली व शेतीचे व घरांचे झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच तलावाचे दुरुस्तीचे काम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. अजित पवार** : (१) हे अंशत: खरे आहे, भेंडा कुकाणा प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत पाणी साठविण्याकरीता बांधण्यात आलेल्या आर.सी.सी. साठवण तलाव (बॅलंसीग टँक) ची एक बाजू पाण्याच्या दाबाने वाकल्यामुळे टँक जवळील काही घरांचे व काही प्रमाणात शेतीचे नुकसान झाल्याचे आढळून आले. तथापि कोणत्याही गावांला धोका निर्माण झालेला नाही.

(२) व (३) सदर बांधकामाची तज्ञामार्फत पाहणी करुन कामाचे संकल्पन चित्र तपासले असता त्यात काही दोष असल्याचे प्राथमिक तपासणीत आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि निकृष्ट दर्जाचे बांधकामामुळे तलाव फुटला नाही.

(४) शेतीच्या व घरांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई आपद्ग्रस्तांना ठेकेदारामार्फत दिनांक २३ जानेवारी २००७ रोजी देण्यात आली आहे. साठवण तलावाच्या भिंतीचे पुर्नबांधणीच्या दृष्टीने पुर्नसंकल्पन करुन पुर्नबांधणीसाठी ठेकेदारास कळविण्यात आले आहे. ठेकेदाराकडून पुर्नसंकल्पन प्राप्त होताच त्यास मंजूरी घेवून पुढील कामांना सुरुवात करण्यात येईल.

(५) कार्यवाही प्रगतीपथावर असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरातील क्र. 2 व 3 मध्ये म्हटलेले आहे की, प्राथमिक तपासणीमध्ये काही दोष आढळून आले आहेत. हे दोष कोणते आहेत ? कोणत्या दोषामुळे हा तलाव फुटला आहे ? त्याच बरोबर उत्तर क्र.5 मध्ये असे म्हटले आहे की, कार्यवाही प्रगतीपथावर आहे. याबाबत माझा प्रश्न आहे की, प्रगतीपथावर म्हणजे किती दिवसात ही कार्यवाही पूर्ण होणार आहे ? याचा खुलासा करावा.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25252 ....

श्री. अजित पवार : सभापती महोदय, यामध्ये आयआयटी,पवई आणि विश्वेश्वरैया इंजिनिअरींग इन्स्टिटट्यूट,नागपूर या दोन संस्थांकडून सगळी चौकशी करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे आणि त्यासाठी त्यांना दोन महिन्यांची मुदत दिलेली आहे. दोन महिन्यांच्या आत या दोन फार नामांकित संस्था आहेत त्यांच्याकडून चौकशी केली जाईल आणि त्यात कोण दोषी आहेत ? कंत्राटदार दोषी आहे की अधिकारी दोषी आहेत याचा शोध घेतला जाईल. सभापती महोदय, ही तांत्रिक बाब असल्यानेच या दोन नामांकित संस्थांना चौकशी काम दिले असून त्यांच्याकडून दोन महिन्यात अहवाल आल्यावर त्यानुसार कारवाई केली जाईल आणि दरम्यानच्या काळामध्ये त्या भागातील लोकांनादेखील पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे यासाठी पुढील कारवाई केली जाईल त्यात ते पुन्हा व्यवस्थितपणे बांधून काही पाण्याचा साठा करणे वगैरे बाबतीतील निर्णय देखील विभाग निश्चितपणे घेईल.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, यामध्ये प्राथमिक तपासणीत काही दोष आढळून आल्याचे म्हटले आहे, तर ते दोष कोणते आहेत ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, डिझाईन संबंधातील दोष आढळले आहेत. परंतु ते नेमके कशा कशा प्रकारचे आहेत हे आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. म्हणूनच मी त्या दोन संस्थांची नावे वाचून दाखविली आहेत. त्यांना याबाबत एकदम बारकाईने चौकशी करण्यास लावून दोन महिन्यात अहवाल मागितला आहे, अहवाल आपल्यानंतर आापल्यापुढे स्पष्ट चित्र येऊ शकेल की, आरसीसी बांधकामामध्ये दोष आहे की, कंत्राटदाराने डिझाईनप्रमाणे काम केले नाही की आणखी काही दोष आहेत म्हणून इतर गोष्टींही त्यात गुंतल्या आहेत याची शहानिशा होईल आणि मग दोषींवर कडक कारवाई केली जाईल.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सर्व प्रथम आपल्या यशस्वी इस्लामाबाद दौऱ्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. सभापती महोदय, या साठवण तलावाच्या भिंतीचे पुनर्बांधणीच्या दृष्टीने पुन:संकल्पन करून पुनर्बांधणीचे काम तो ठेकेदार स्वखर्चाने करणार आहे की, शासनाचा निधी त्यासाठी वापरला जाणार आहे ? आणि या संबंधी ठेकेदारामार्फत किती आपद्ग्रस्तांच्या शेतीचे आणि घरांचे नुकसान झाल्याबद्दल नुकसान भरपाई दिली गेली आहे व किती लोकांना ही भरपाई मिळाली आहे ?

...... आर 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार : सभापती महोदय, यामध्ये 16 घरांचे नुकसान झालेले आहे आणि त्याबद्दल 3.96 लाख रूपये भरपाई दिलेली आहे. तसेच साधारणत: 37 शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले असून त्याबद्दल 7,34,938 रूपये भरपाई दिलेली आहे. तसेच चार शेतकऱ्यांच्या गुरांचे नुकसान झाले असून त्यासाठी 27500 रूपयांची भरपाई दिली आहे आणि वाहून गेलेले शेत होते त्यांची संख्या 6 असून त्याबद्दल 16950 रूपये भरपाई दिलेली आहे. अशा प्रकारे एकंदर 12,26,647 रूपयांची भरपाई दिलेली आहे आणि पेंट्रॉन सिसिल इंजिनिअरींग कंपनी,मुंबई या कंपनीकडून ते केले जात असून त्याबद्दलही कोणाची तक्रार नाही. त्याबाबतीत आता जे काही नुकसान झाले आहे ते कंत्राटदाराकडून भरून घेणार की शासन देणार असा जो सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे त्याबाबत मी सुरूवातीलाच सन्माननीय सदस्य श्री.गणगणे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले आहे की, याबाबत चौकशी करण्यास दोन संस्थांना सांगितले असून त्यांच्याकडून चौकशी अहवाल आल्यानंतर त्यामध्ये कंत्राटदार दोषी असेल तर त्यांच्याकडून त्याची भरपाई भरून घेतली जाईल आणि त्यांच्याकडून काम करून घेतले जाईल. मात्र त्यात कंत्राटदार दोषी नसेल आणि डिझ ााईनमध्ये दोष असेल तर कंत्राटदारांकडून भरपाईदाखल काम करून न घेता संबंधिज जे कोणी दोषी असतील, जबाबदार असतील त्यांच्याकडून ती रक्कम वसूल करण्याचा प्रयत्न केला जाईल.

****

...... आर 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उल्हास नदीवरील उपसा प्रकल्पाबाबत**

**(6) * 25554 श्री. संजय दत्त, श्री. गोविंदराव आदिक, श्री. धनाजी साठे, श्री. रमेश निकोसे** : सन्माननीय **पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर महापालिका क्षेत्रासाठी पाणीपुरवठा होण्याकरीता उल्हास नदीवर उपसा प्रकल्प उभारण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकल्पाद्वारे दरवर्षी उल्हासनगर महापालिकेस किती पाणीपुरवठा करण्यात येणार आहे,
(3) उक्त प्रकल्पासाठी अंदाजे किती निधी खर्च येणे अपेक्षित आहे व हा निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे,
(4) उक्त प्रकल्पाच्या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे व हा प्रकल्प केव्हा कार्यान्वित होणार आहे ?

**श्री. रणजित कांबळे, श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (1) होय. उल्हासनगर महापालिका क्षेत्रासाठी पिण्याचे पाणीपुरवठा करण्यासाठी उल्हासनदी उद्भव घेवून पाणी पुरवठा योजना हाती घेण्याची प्रस्तावित आहे.
(2) सदर पाणी पुरवठा योजनेद्वारे दरवर्षी उल्हासनगर महापालिकेस 122 द.ल.लि. पाणी पुरवठा करण्यात येणार असून, दरवर्षी मागणीनुसार त्याच्यात वाढ करण्यात येणार आहे.
(3) सदर योजना पूर्ण करण्यासाठी रु. 94.00 कोटी रुपये इतका निधी लागणार आहे. सदर प्रकल्प हा बांधा, वापरा व हस्तांतर या तत्वावर राबविण्याचे प्रस्तावित असून, त्याचा संपूर्ण खर्च ठेकेदाराने उभारावयाचा आहे.
(4) प्रकल्पाच्या कामाच्या निविदा मागविण्यात येवून, योजनेची निवीदा स्विकृत करण्यात आलेली असून त्यासंबंधीचा करारनामा करण्याची कार्यवाही पूर्ण झाल्यावर कामे हाती घेण्यात येतील. कामास सुरवात झाल्यानंतर दोन वर्षाच्या कालावधीत योजना कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, या संबंधात मला दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. या प्रकल्पाच्या कामाच्या निविदा केव्हा मागविण्यात आल्या आणि किती निविदा प्राप्त झाल्या ? तसेच स्वीकृत निविदा किती रकमेची होती ? आणि बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर किती वर्षांच्या कराराने ही योजना देण्यात आलेली आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या योजनेचे टेंडर 12.12.2006 ला आले आणि त्यात तीन ठेकेदारांनी निविदा भरल्या होत्या त्यात केवळ एकच क्वालिफाय झाले आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... एस 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25554...

श्री.रणजित कांबळे...

ही योजना बी.ओ.टी. तत्वावर 30 वर्षासाठी देण्यात आली असून योजना पूर्ण झाल्यानंतर 30 वर्षे ते चालविणार आहेत आणि उल्हासनगर महानगरपालिकेला पाणीपुरवठा उपलब्ध करुन देणार आहेत.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, उल्हासनगरमध्ये अनियमित व कमी पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर तेथील पाण्याचा प्रश्न सुटू शकेल. उत्तरामध्ये म्हटले आहे की, निविदा स्वीकृत झाली आहे,फक्त करारनामा होण्याची कारवाई बाकी आहे. करारनामा करण्याची कारवाई किती दिवसात पूर्ण होईल? कामाला सुरुवात झाल्यानंतर दोन वर्षात प्रकल्प पूर्ण होईल. तेव्हा कामाला सुरुवात केव्हां होईल? त्याचप्रमाणे आठ-दहा दिवसापासून उल्हासनगर शहरामधील वेगवेगळया भागात वेगवेगळया पक्षांचे कार्यकर्ते व नगरसेवक पाण्याच्या प्रश्नाकरिता उपोषणाला बसले आहेत. त्यामध्ये श्री. अरुण अशान हे आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांचे उपोषण तातडीने सोडण्याकरिता आपण प्रयत्न करणार काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, करार करण्यासाठी जास्त वेळ लागत नाही. यामध्ये तीन कंपन्यांनी सहभाग घेतला होता त्यापैकी एका कंपनीला टेंडर मिळाले नाही म्हणून ती कंपनी कोर्टामध्ये गेली आहे. सध्या हे प्रकरण कोर्टामध्ये असून कोर्टाचा निकाल लागल्यानंतर महानगरपालिकेबरोबर ताबडतोब करार करण्यात येईल. उपोषणाला बसलेल्या कार्यकर्त्यांचे जे काही प्रश्न असतील ते समजावून घेऊन ते सोडविण्यासाठी माझ्या विभागाच्या अधिकाऱ्यांना त्या ठिकाणी आजच्या आज पाठविण्यात येईल आणि त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या प्रकल्पातील पाणीपट्टीचा दर कोणत्या तत्वानुसार महानगरपालिकेने मान्य केला आहे?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, ही योजना उल्हासनगर महानगरपालिकेने घ्यायचे ठरविले त्यावेळी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे त्यांनी बी.ओ.टी. तत्वावर करण्याचे ठरविले. एखाद्या व्यक्तिला बी.ओ.टी. तत्वावर प्रकल्पाचे काम देत असतांना फार कमी पैश्यामध्ये ते पाणी उपलब्ध करुन देतील अशातला भाग नाही. आता माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे हे प्रकरण कोर्टामध्ये आहे. जवाहरलाल नेहरु अर्बन रिनिव्हल मिशनच्या



ता.प्र.क्र. 25554...

श्री. अजित पवार...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माध्यमातून मोठया शहरांमधील योजनांकरिता केंद्र सरकारने करोडो रुपयांचे अनुदान देण्यास सुरुवात केली आहे. त्या अनुदानाच्या रक्कमेमधून जर ही योजना घेतली तर 30 टक्के रक्कम महानगरपालिकेला भरावी लागेल, 20 टक्के रक्कम राज्य सरकारला भरावी लागेल आणि 50 टक्के रक्कम केंद्र सरकारकडून मिळेल. अशाप्रकारे या योजनेसाठी केंद्र सरकार व राज्य सरकारची मिळून 70 टक्के रक्कम अनुदान म्हणून मिळणार आहे. त्यामुळे ही योजना घेतली तर पाण्याचा एकंदर दर हजारी खर्च कमी होईल व तेथील नागरिकांचा फायदा होईल यादृष्टीने माझ्या विभागाचे प्रयत्न सुरु आहेत. पूर्वी अस्तित्वात असलेल्या महानगरपालिकेचे पदाधिकारी व नव्याने निवडून आलेले महानगरपालिकेचे पदाधिकारी यांना माझ्या विभागाच्या माध्यमातून हे अधिवेशन संपण्यापूर्वी किंवा अधिवेशन संपल्यानंतर बोलावून घेऊन त्यांना सांगण्यात येईल की, ही योजना बी.ओ.टी. तत्वावर करावयास घेतली तर दर हजारी 5.53, 5.78, 7.17, 7.47, आणि काम पूर्ण होईपर्यंत या पाण्याचा दर 9.60 पर्यंत जाईल. उद्या जर संबंधित कॉट्रॅक्टरने काम केल्यानंतर व त्यामध्ये 94 कोटी रुपये खर्च केल्यानंतर त्यावेळी दर हजारी जो पाण्याचा दर लावला जाईल त्यामुळे नवीन समस्या निर्माण होणार नाही यासंबंधात या पदाधिकाऱ्यांना सांगितले जाईल. दुसऱ्या बाजूला जवाहरलाल नेहरु अर्बन रिनिव्हल मिशनच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून बऱ्यापैकी रक्कम वेगवेगळया राज्यांना व शहरांना मिळू लागली असल्यामुळे आजच्या परिस्थितीत हे चित्र बदलले आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, पाण्याच्या खाजगीकरणामुळे दोन महत्वाचे प्रश्न निर्माण होतात. उद्‌भवातून उचलले जाणारे पाणी पूर्णपणे महानगरपालिकेने विकणे बंधनकारक आहे काय? अतिरिक्त पाणी महानगरपालिका खाजगी व्यक्तिला विकू शकते काय? दुसरा प्रश्न असा की, कॉट्रॅक्टरला रिपेमेंट करण्यासाठी महानगरपालिकेच्या अकाऊंटमधून स्क्रोल करुन डायरेक्ट पेमेंट करण्याची परवानगी देण्यात येईल काय?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25554 (पुढे सुरु..

श्री.अजित पवार : उल्हासनगरपालिका क्षेत्रातील जनतेला जेवढे पिण्याचे पाणी लागणार आहे तेवढे पाणी पाटबंधारे विभागाने उपलब करून दिलेले आहे. त्यापेक्षा जास्त पाणी उपलब्ध झाले तर त्या पाण्याची कशी विल्हेवाट लावायची हा त्याचा प्रश्न आहे. कारण आपण त्याला बी.ओ.टी. तत्वावर हे काम दिलेले आहे. सन 2009 पर्यन्त साधरणत: 122 द.ल. लिटर पाणी आणि 2015 मध्ये 132 द.ल.लिटर पाणी उपलब्ध करून देण्याचे बंधन 30 वर्षापर्यन्त घातलेले आहे. देखभाव आणि दुरुस्ती ही त्यांनीच करावयाची आहे. परंतु हे करत असताना बऱ्याचशा अडचणी आहेत. साधारणत: महानगरपालिकेच्या निवडणूक प्रक्रिया सुरू असताना, थोडे घाईगर्दीमध्ये काम झालेले आहे. थोडेसे बारकाईने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. आता कोर्ट मॅटर झालेले आहे. शहरातील नागरिकांचा फायदा होण्यासाठी थोडे थांबून जवाहरलाल नेहरू अर्बन रिन्युअल मिशन मार्फत कामाला सुरुवात केली तर फायदा होईल. यासाठी शासन सर्वतापरी सहकार्य करेल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KTG/ SBT/

**विदर्भातील जवाहर विहिरी निधी अभावी अपूर्ण असल्याबाबत**

**(7) * 25963 श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री.सागर मेघे , श्री.केशवराव मानकर** : सन्माननीय **रोजगार हमी योजनामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सन 1997 ते 2005 दरम्यान शासनाने राज्यातील 2 लाख शेतकऱ्यांच्या जवाहर विहिरींना मान्यता दिली होती व त्यासाठी 1,800 कोटींचा निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, विदर्भातील 14 हजार पेक्षा अधिक जवाहर विहिरी निधीअभावी अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, जो पर्यंत अपूर्ण विहीरी पूर्ण होत नाही तोपर्यंत नवीन विहिरींना मंजूरी देऊ नये या शासनाच्या धोरणामुळे जुन्या विहिरी पूर्ण होत नाही व नवीन विहिरींनाही मान्यता मिळत नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, यातून मार्ग काढण्यासाठी शासनाने कोणते प्रयत्न केले आहेत व करण्यात येत आहेत ?

**श्री.राणा जगजितसिह पाटील,श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता** : (1) सन 1997 ते 2005 दरम्यान 1,29,907 विहिरींचे लक्षांक मंजूर करण्यात आले होते व त्यासाठी या कालावधीत 538.98 कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला.

(2) नाही.

(3) नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्न विचारलेला होता की, "सन 1997 ते 2005 दरम्यान शासनाने राज्यातील 2 लाख शेतकऱ्यांच्या जवाहर विहिरींना मान्यता दिली होती व त्यासाठी 1,800 कोटींचा निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय ?" या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे की, "सन 1997 ते 2005 दरम्यान 1,29,907 विहिरींचे लक्षांक मंजूर करण्यात आले होते, त्यासाठी या कालावधीत 538.98 कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला." माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, निधी मंजूर झाला, लक्षांक ठरविण्यात आले, पण आजमितीला राज्यामध्ये 40 हजार विहिरींचे काम अपूर्ण आहे. विदर्भातील जवळपास 14 हजार विहिरींचे काम निधीअभावी अपूर्णावस्थेत आहे. आता ठरविण्यात आलेले लक्ष किती प्रमाणात पूर्ण झालेले आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25963 .....

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरू

विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यामधील किती विहिरी अपूर्णावस्थेत आहेत ? त्या पूर्ण करण्यासाठी किती पैसे लागणार आहेत ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : जवाहर विहिरीची योजना 1989-90 पासून 1999 पर्यन्त जाहीर केलेली होती. 1999 पर्यन्त 99,746 विहिरींचे लक्षांक होते, त्यापैकी साधरणपणे 23,288 विहिरी पूर्ण झालेल्या आहेत आणि 12,971 विहिरी या प्रगतीपथावर आहेत. 1999-2000 मध्ये 1 लाख विहिरींचे लक्षांक होते, त्यापैकी 75,680 विहिरी पूर्ण झालेल्या आहेत आणि 16,555 विहिरी प्रगतीपथावर आहेत. सन 2005-06 मध्ये 114 कोटी रुपये उपलब्ध करून दिलेले होते आणि सन 2006-07 मध्ये 146 कोटी रुपये उपलब्ध केलेले आहेत. त्यामुळे विहिरींसाठी पैशाची कमतरता झ ालेली आहे, अशी अवस्था नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : आता विहिरी मंजूर झालेल्या आहेत, त्यांना पहिला हप्ता देण्यात आलेला आहे. लाभार्थींनी विहिरींचे काम सुरु केलेले आहे. परंतु नंतरचा दुसरा हप्ता त्यांना मिळालेला नाही, त्यामुळे विहिरी अर्धवट अवस्थेमध्ये आहेत. विदर्भातील आणि राज्यातील किती विहिरी अपूर्णावस्थेत आहेत ? या विहिरी पूर्ण करण्यासाठी किती पैसे लागणार आहेत ? त्या विहिरी केव्हा पूर्ण होणार आहेत ?

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25963 .....

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण सर्व अपूर्ण विहिरींची कामे पूर्ण करण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे गेल्या वर्षी आणि या वर्षी नवीन उद्दिष्ट दिलेले नाही. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे 15 ते 16 हजार विहिरींची कामे अपूर्ण आहेत. 30 जून, 2007 पर्यंत या सर्व अपूर्ण विहिरींची कामे पूर्ण केली जातील. त्यासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : हा आकडा राज्यातील आहे की, विदर्भातील आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : हा आकडा राज्यातील आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, राज्यातील 16 ते 17 हजार विहिरींची कामे अपूर्ण असल्याचे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. माननीय मंत्रिमहोदयांनी त्यांच्या दालनामध्ये तसेच सभागृहामध्ये असा शब्द दिला होता की, ज्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये प्रत्येक विहिरीसाठी 65 हजार रुपये रक्कम देण्यात येते त्याप्रमाणे रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सुध्दा देण्यात येईल. परंतु अद्यापपर्यंत त्याबाबत अंमलबजावणी झालेली नाही. त्याबाबत अंमलबजावणी केव्हा होणार आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सिधुदुर्ग जिल्ह्यासाठी वेगळा निकष लावला होता. त्यासाठी 61,500 रुपयांचा नॉर्म ठरविला होता. त्यासंदर्भात अधीक्षक अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली होती. त्या समितीचा अहवाल प्राप्त झालेला आहे. लवकरच रत्नागिरी जिल्ह्यासाठी सुध्दा हा निर्णय करण्यात येईल.

श्री. जगदीश गुप्ता : विधानमंडळाच्या पंचायती राज समितीने या अपूर्ण राहिलेल्या विहिरींबाबत असंतोष व्यक्त केला होता, हे खरे आहे काय ? ज्या विहिरी पूर्ण झाल्या त्या ठिकाणी विजेचे कनेक्शन न मिळाल्यामुळे त्या विहिरींचा काहीही उपयोग होत नाही. त्यासाठी शासन काही विशेष योजना करणार आहे काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : एक तर विविध स्तरावरुन अपूर्ण विहिरींच्या संदर्भातील मागणी सातत्याने पुढे येते. समितीमध्ये सुध्दा त्यासंदर्भात चर्चा झाली होती. त्या समितीने सचिवांना त्याविषयावरील चर्चेकरिता बोलविले होते. आम्ही 30 जून, 2007 ही तारीख ठरविलेली असून त्या

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG

ता.प्र.क्र. 25963 ..... श्री. हर्षवर्धन पाटील ....

तारखेपर्यंत सर्व कामे पूर्ण करणार आहोत. त्यांना वीज कनेक्शन देण्याच्या बाबतीत प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. यासंदर्भातील मंजुरीचे अधिकार पालकमंत्र्यांकडे आहेत. सर्व पालकमंत्र्यांना कळविले जाईल की, डीपीडीसीच्या बैठकीमध्ये नियोजन करीत असताना रोजगार हमी योजनेच्या विहिरींना कनेक्शन देण्याच्या बाबतीत प्राधान्यक्रम ठेवावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण शेतकऱ्यांना जवाहर विहीर बांधण्यासाठी पैसे देतो. ते शेतकरी विहीर बांधतात. विहीर बांधून झाल्यानंतर विद्युत पंपाला वीज कनेक्शन मिळण्यासाठी अर्ज केल्यानंतर दोन तीन वर्षे विद्युत मंडळ वीज कनेक्शन देत नाही. त्यामुळे विहीर खोदून उपयोग होत नाही. ज्यांनी जवाहर विहीर योजनेच्या अंतर्गत विहीर खोदली असेल त्या शेतकऱ्यांना प्राधान्य देऊन ताबडतोबीने वीज कनेक्शन देण्याच्या बाबतीत शासन त्या त्या विभागाला सूचना देणार काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, याबाबतीत सूचना आहेतच. पुन्हा सूचना देण्यात येतील.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG

**बोरनदीवरील (तालुका सेलू, जिल्हा वर्धा) कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या बांधकामाची सद्य:स्थिती**

**(८) * २५४२१ श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे : तारांकित प्रश्न क्रमांक २१०४७ ला दिनांक १९ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकासमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोर (ता. सेलू जि. वर्धा) नदीवरील देऊळगांव कोल्हापूर पध्दतीचा बंधाऱ्याच्या बांधकामास सुरुवात करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम किती झाले आहे व उर्वरित बांधकामाचे नियोजन काय आहे,

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (१) होय.

(२) बांधकाम १० टक्के पूर्ण आहे व उर्वरित बांधकाम जून २००७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, छापलेल्या उत्तरामध्ये मला आपल्या अनुमतीने थोडी दुरुस्ती करावयाची आहे. प्रश्न क्रमांक 2 च्या उत्तरामध्ये "10 टक्के" ऐवजी "35 टक्के" असे वाचावे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, 1 कोटी 65 लाख रुपये किंमतीचा हा बंधारा आहे. या बंधाऱ्याच्या कामास प्रथम 16.6.1996 रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानंतर वाढीव सुधारित मान्यता 16.9.2005 रोजी दिली. 2005 पासून या कामामध्ये सुधारणा झाली आहे. प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, 35 टक्के काम पूर्ण झालेले आहे व उर्वरित काम जून, 2007 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. आधीच सात वर्षे लागलेली आहेत. काम पूर्ण होण्यासाठी पुन्हा सात वर्षे लावणार की, जून, 2007 पर्यंत हे काम पूर्ण करणार ?

डॉ. सुनील देशमुख : या प्रकल्पाचा समावेश पंतप्रधान पॅकेजमध्ये आहे. जून, 2007 पर्यंत शंभर टक्के काम पूर्ण होईल.

-----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG

**पुसद (जि.यवतमाळ) येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या भांडारपाल आणि १६ व्यापाऱ्यांनी संगनमताने वखार महामंडळाची अडीच कोटी रुपयांची फसवणूक केल्याबाबत**

**(९) * २८३२० श्री.राजन तेली , श्री. संजय दत्त : :** सन्माननीय **सहकारमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या भांडारपाल आणि १६ व्यापाऱ्यांनी संगनमताने गोडाऊनमध्ये धान्य नसताना बनावट दस्तऐवज तयार करुन बँकेतून कर्ज उचलून वखार महामंडळाची अडीच कोटी रुपयांची फसवणूक केली असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २००७ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वखार महामंडळाने उपव्यवस्थापक यांनी शहर पोलिसांत तक्रार दाखल केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) याप्रकरणी पुढील चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार याबाबत संबंधित दोषी असणाऱ्या भांडारपाल व व्यापाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. जयप्रकाश दांडेगावकर,श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता :** (१) होय. तपासणी पथकाने पुसद, जि.यवतमाळ येथील गोदामात दिनांक १९/१२/२००६ पासून दिनांक ४/१/२००७ पर्यंत केलेल्या तपासणीत महामंडळाचे साठा अधिक्षक/केंद्रप्रमुख आणि इतर १५ व्यापारी यांनी गोदामात धान्य नसताना बनावट दस्तऐवज तयार करुन व्यापाऱ्यांनी बँकेतून कर्ज उचल करुन वखार महामंडळाची रु.२,३३,७६,६३१/- एवढ्या रक्कमेची फसवणूक केली असल्याचे उघडकीस आले आहे.

(२) होय. महामंडळाच्या उपव्यवस्थापकांनी, शहर पोलीस ठाणे पुसद (जि.यवतमाळ) यांचेकडे लेखी तक्रार दाखल केली असून त्याबाबत एफ.आय.आर.क्र.००२४००१, दिनांक १४/०१/२००७ अन्वये नोंदविण्यात आला आहे.

(३) व (४) महामंडळाच्या वरिष्ठ व्यवस्थापकांनी चौकशी केली असून पुसद येथील संबंधित साठा अधिक्षक/केंद्रप्रमुखास दिनांक ९/१/२००७ पासून निलंबित करण्यात आले आहे. तसेच तपासणी अधिकारी यांनी तपासणी व्यवस्थित न केल्याचे आढळल्याने त्यांनाही दिनांक ५/३/२००७ पासून निलंबित करण्यात आले आहे. तसेच महामंडळाने साठा अधिक्षक व १५ व्यापाऱ्यांविरुद्ध दाखल केलेल्या तक्रारीनुसार पोलीस खात्याकडून चौकशीची कार्यवाही सुरु आहे. महामंडळाने मुख्यालय पातळीवरुन परिक्षण पथक पाठविले असून त्याचीही कार्यवाही सुरु आहे.

श्री. राजन तेली : यामध्ये एकूण किती लोकांना अटक झाली ? 14 जानेवारी, 2007 ला गुन्हा नोंदविण्यात आला. ही फसवणूक केव्हापासून झालेली आहे ? वखार महामंडळाची जी 2,33,76,631 रुपयांची फसवणूक झालेली आहे त्यातील किती रक्कम वसूल करण्यात आली ? महामंडळाने मुख्यालय पातळीवरुन परीक्षक पथक पाठविले त्यांचा काय रिपोर्ट आला ?

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 28320....)

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. 15 व्यापारी आणि संबंधित अधिकारी यांनी ॲण्टिसिपेटरी बेल घेतलेला आहे. 2 कोटी 33 लाख रु.च्या बनावट पावत्या केलेल्या होत्या. व्यापारी आणि अधिकारी यांनी संगनमताने ही फसवणूक केलेली आहे. दूरध्वनी आल्यानंतर चौकशी केली असता हे प्रकरण उघडकीस आले. या प्रकरणी 16 लोक दोषी असून 92 लाख 36 हजार 74 रु.च्या पावत्या जप्त करण्यात आलेल्या आहे. बाकी वसुलीची कारवाई सुरु आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निम्न पेढी प्रकल्पाच्या बांधकामाबाबत**

**(१०) * २५४५७ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड : तारांकित प्रश्न क्रमांक २२१९० ला दिनांक ५ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकासमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १२ ऑगस्ट, २००४ च्या शासन निर्णयान्वये रुपये १६१.१७ कोटी किंमतीला प्रशासकीय मान्यता प्राप्त व कार्यारंभ आदेश निर्गमित झालेल्या निम्न पेढी प्रकल्पाच्या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे,

(२) सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात या प्रकल्पावर किती निधी खर्च होण्याचे नियोजन आहे,

(३) जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यातील या प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करण्याचे काय नियोजन करण्यात आले आहे ?

**डॉ. सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (१) मुख्य कामाच्या निविदा निश्चित झाल्या असून भूसंपादनाची व पुनर्वसनाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कामास सुरुवात करण्यात येईल.

(२) सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात ७.५० कोटी रुपये इतका निधी खर्च होण्याचे सुधारीत नियोजन आहे.

(३) निम्न पेढी प्रकल्प ता. भातकुली, जि. अमरावती ह्या प्रकल्पाचे बांधकाम पुर्ण करण्याचे सुधारीत नियोजन खालील प्रमाणे आहे.

प्रशासकीय मान्यता किंमत - १६१.१७ कोटी रुपये

| **अ.क्र.** | **वर्ष** | **नियोजन कोटी रुपये** |
|---|---|---|
| १. | २००५-२००६ | २.५१ |
| २. | २००६-२००७ | ७.५० |
| ३. | २००७-२००८ | ६०.०० |
| ४. | २००८-२००९ | ६०.०० |
| ५. | २००९-२०१० | २०.०० |
| ६. | २०१०-२०११ | ११.१६ |
| | | **१६१.१७** |

प्रा. बी.टी.देशमुख : या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता आणि कार्यारंभ आदेश ताबडतोबीने दिले त्याबद्दल मी शासनाला जरुर धन्यवाद देतो. परंतु काम सुरु करण्यासाठी भूसंपादन होत नाही अशी यामध्ये स्थिती असल्याचे दिसते. या स्थितीतून हा प्रकल्प बाहेर काढणे अत्यंत आवश्यक आहे. तेव्हा भूसंपादन अधिका-याला निश्चित मुदतीच्या आत डॅमसाईटच्या भागाचे भूसंपादन

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्याचे आदेश दिले जातील काय ?

डॉ. सुनील देशमुख : एकूण 706 हेक्टर जमिनीचा प्रस्ताव जिल्हाधिका-यांकडे दिलेला आहे. डॅमसाईटच्या कामाबद्दल तातडीने आदेश दिले जातील. डॅमसाईटच्या भूसंपादनाचे काम तातडीने सुरु करण्यात येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : या प्रकल्पाचे वैशिष्ट्य आणि महत्व असे आहे की, हा खारपाण पट्टयातील प्रकल्प आहे. याबाबतीत दगडगावकर ते चितळे पर्यन्त जल आयोगाने अहवाल दिलेले आहेत. जलसिंचन आयोगाने याबाबतीत विशेष शिफारस करुन निश्चित मुदत घालून दिलेली होती. म्हणून याबाबतीत निश्चित मुदत घालून दिली जाईल काय आणि ती किती दिली जाईल ?

डॉ. सुनील देशमुख : हा खारपाण पट्टयातील प्रकल्प असल्यामुळे सिंचनामुळे जमीन खराब होईल अशी शंका त्या परिसरातील शेतक-यांमध्ये होती. त्यामुळे वाल्मिचा रिपोर्ट येईपर्यन्त हा प्रकल्प सुरु करु नये अशी भूमिका घेतली होती. वाल्मिचा रिपोर्ट नुकताच प्राप्त झालेला आहे. सिंचनामुळे जमीन खराब होणार नाही असा सुस्पष्ट अभिप्राय वाल्मिने दिलेला आहे. त्यानंतर संबंधित लोकांची बैठक घेऊन त्यांचा विरोध मावळावा म्हणून प्रयत्न करण्यात आले. तेथील लोकांचे समाधान झाले नसले तरी जिल्हाधिका-यांमार्फत भूसंपादनाचे काम तातडीने सुरु करण्यात येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : तातडीने म्हणजे केव्हा सुरु करण्यात येईल ?

श्री. अजित पवार : या बाबतीत अधिका-यांना आणि अमरावतींच्या पालकमंत्र्यांना तातडीने सूचना दिल्या जातील. महसूल विभागाच्या अधिका-यांना कार्यवाही करण्यासाठी जे काही 15-20 दिवस लागतील तेवढा अवधी त्यांना दिला जाईल. त्यांनी 21 दिवसात कार्यवाही करतो असे सांगितले तर त्यांना आणखी 5-6 दिवस जास्त देऊन एक महिन्याच्या आत ते काम पूर्ण करण्यास सांगितले जाईल. ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अनुशेष आहे तेथे माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार मोठ्या प्रमाणावर निधी दिलेला आहे. भौगोलिकदृष्टया हा प्रकल्प होणे गरजेचे आहे. म्हणून अधिका-यांनी महिन्याचा वेळ लागेल असे सांगितले तर महिना पूर्ण झाल्यानंतर पुढचे काम सुरु करण्याच्या सूचना दिल्या जातील. दर आठवड्याला कामाची देखरेख करावी असे तेथील पालकमंत्र्यांना सांगितले जाईल.

...नंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25457.........

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, त्या भागामध्ये दोन मतप्रवाह आहेत. नागपूर अधिवेशनामध्ये सन्माननीय मंत्र्यांना मी या संदर्भात प्रश्न विचारला होता. त्या भागातील माझे मित्र आहेत, त्यांनी इरिगेशन केले आणि त्यांच्या शेतीचे नुकसान झाले. त्यामुळे हा विषय अतिशय गांभीर्याने हाताळण्याची आवश्यकता आहे. जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन प्रश्न हाताळला पाहिजे. घाईघाईने निर्णय घेतला आणि तेथे इरिगेशन होऊ शकले नाही तर शासनाचा पैसा वाया जाईल आणि जो अपेक्षित हेतू आहे तो साध्य होणार नाही. वाल्मीचा अहवाल आला आहे त्या संदर्भात तेथील लोकांनी जे काही आंदोलन सुरु केले आहे. त्या भागामध्ये इरिगेशन झ ाले पाहिजे या मताशी आम्ही सगळेच सहमत आहोत. जो काही अहवाल आला आहे त्याबद्दल जी शंका व्यक्त होत आहे ती विचारात घेता त्या परिसरातील सर्व लोकप्रतिनिधी सुध्दा लोकांची समजूत घालण्याचा प्रयत्न करतील. याबद्दल शासन काही विशेष प्रयत्न करणार आहे का?

डॉ.सुनील देशमुख : वाल्मीचा अहवाल सर्व लोकप्रतिनिधींना पाठविण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, वाल्मीचा अहवाल गेल्या दीड-दोन महिन्यातील आहे. सिंचन आयोगाच्या अहवालात स्पष्टपणे म्हटले आहे की, निसर्गाच्या गोड्या पाण्याने जून-जुलैमध्ये शेती खराब होत नाही ती ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये तुषार सिंचनामुळे कशी खराब होते? Rehabilitation is a painful process. तो वेगळा विषय आहे. पुनर्वसनाच्या कारणामुळे हे लोक विरोध करतात, हा त्यातील मुख्य भाग आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे एक ते दीड महिन्यात कारवाई पूर्ण करण्यास सांगणार का? वाल्मीच्या अहवालासोबत चितळे आयोगाच्या अहवालातील रिलेव्हंट चॅप्टर लोकप्रतिनिधींकडे पाठविला जाईल का?

डॉ.सुनील देशमुख : होय.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## जुलै, ऑगस्ट २००६ मध्ये जळगांव जिल्हयात अतिवृष्टीमुळे विहिरीचे झालेले नुकसान

**(११) * २८७१२ श्री. गुरुमुख जगवानी , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. जगदीश गुप्ता , श्री.केशवराव मानकर :** सन्माननीय **जलसंधारणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुलै-ऑगस्ट, २००६ मध्ये अतिवृष्टीमुळे जळगांव जिल्हयात झालेल्या नुकसानीची पाहणी व उपाययोजना यावर जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या बैठकीत लोक प्रतिनिधींच्या मागणीप्रमाणे जिल्हा पालक मंत्री हयांनी जिल्हा सिंचन विभागाला अतिवृष्टीत नुकसान झालेल्या विहिरीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) या आदेशाप्रमाणे जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागाने जळगांव जिल्हयातील पंचनाम्याचे काम संपवून डिसेंबर, २००६ अखेर किंवा जानेवारी २००७ च्या पहिल्या वा दुसऱ्या आठवडयात जिल्हा प्रशासनाला अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) सिंचन विभागाने १२५० गावांना भेटी देऊन केलेल्या अहवालात २९ हजार ७४८ विहिरींचे नुकसान यामध्ये पाचोरा व जामनेर तालुक्यात सर्वात जास्त विहिरींचे नुकसान झाल्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(४) सिंचन विभागाच्या अहवालाप्रमाणे ज्यांच्या विहिरींचे नुकसान झाले आहे, त्यांना शासनातर्फे काय मदत देण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे, श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (१) होय,

(२) नाही, सदर अहवाल दिनांक ०६.०३.२००७ रोजी जिल्हा प्रशासनाला सादर केलेला आहे.

(३) होय,

(४) व (५) याबाबतचा अंतिम अहवाल दिनांक १३.०३.२००७ रोजी जिल्हाधिकारी जळगांव यांनी विभागीय आयुक्त, नाशिक यांना सादर केलेला असून अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर नुकसान भरपाई देण्याबाबत आवश्यक तो विचार करण्यात येईल.

----------

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, विभागीय आयुक्तांकडून अंतिम अहवाल प्राप्त झालेला नाही असे उत्तरामध्ये म्हटले आहे. हा अहवाल केव्हा पूर्ण होणार आहे आणि तो अहवाल प्राप्त झाल्यानंतर नुकसानभरपाई केव्हा दिली जाईल?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, विभागीय आयुक्तांकडे हा पाहणीचा प्रस्ताव आलेला आहे. लवकरच शासनाकडे तो मागविला जाईल. शासन स्तरावर तपासणी केली जाईल आणि ही धोरणात्मक बाब असल्यामुळे त्या दृष्टीकोनातून कार्यवाही केली जाईल.

---





## आपतकालीन परिस्थितीत प्यायला पुरेसे पाणी मिळावे यासाठी पाणीपुरवठा विभागाने तयार केलेली योजना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(१२) * २५४८८ श्री. मधुकर चव्हाण : :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आपत्कालीन परिस्थितीत प्यायला पुरेसे पाणी मिळावे यासाठी शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने एक योजना तयार केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप कोणते आहे,

(३) या योजनेचा प्रारंभ केव्हा पासून होणार आहे आणि याचा लाभ जनतेला केव्हा पासून मिळणार आहे ?

**श्री. अजित पवार** : (१) होय.

(२) व (३) मुंबई महानगर उप प्रदेशातील वेगवेगळ्या स्त्रोतांचा व पाणी पुरवठा योजनांचा एकत्रीत अभ्यास करुन आपत्कालीन परिस्थितीत एखाद्या शहराचा स्त्रोत क्षतिग्रस्त होऊन पाणी पुरवठा खंडीत झाल्यास दुसऱ्या यंत्रणेच्या पाणी पुरवठा योजनेतून /स्त्रोतावरील पाईपलाईनची जोडणी (Pipe Grid) करुन किमान पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या शक्यतेचा अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल दि. ३.११.२००६ रोजी शासनास प्राप्त झाला असून अहवाल स्वीकृत करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. अहवाल स्वीकृत झाल्यानंतर त्यातील शिफारशीनुसार आपत्कालीन योजनेची अंमलबजावणी करण्याचे प्रस्तावित आहे.

----------

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपत्कालीन परिस्थितीत प्यायला पुरेसे पाणी मिळावे यासाठी शासनाने योजना तयार केली आहे असे उत्तर दिले आहे. असल्यास स्वरुप कोणते आहे? या प्रश्नाला असे उत्तर दिले आहे की, मुंबई महानगर उप प्रदेशातील वेगवेगळया स्त्रोतांचा व पाणी पुरवठा योजनांचा एकत्रित अभ्यास करुन आपत्कालीन परिस्थितीत एखाद्या शहराचा स्त्रोत क्षतिग्रस्त होऊन पाणी पुरवठा खंडित झाल्यास दुसऱ्या यंत्रणेच्या पाणी पुरवठा योजनेतून पाईपलाईनची जोडणी करुन किमान पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या शक्यतेचा अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीचा अहवाल दिनांक ३ नोव्हेंबर, २००६ रोजी शासनास प्राप्त झाला असून अहवाल स्वीकृत करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. मला असे वाटते की, हा प्रश्न महत्वाचा आहे. अहवाल आलेला नाही. तो अहवाल येण्यास विलंब का झाला? विलंब झाल्यामुळे जे नुकसान होणार आहे त्यासंबंधी कोण जबाबदार आहे? जबाबदार अधिकाऱ्यांकडे विचारणा करणार आहात का?

..४..



ता.प्र.क्र.२५४८८..........

श्री.अजित पवार : सभापती महोदय, अहवाल आलेला आहे. त्या संदर्भात दिनांक २४ मार्च, २००७ रोजी पाटबंधारे आणि स्वच्छता विभागाने सर्व वेगवेगळया महानगरपालिकांना जे

कळवावयाचे होते ते कळविले आहे. ही सगळी कारवाई करण्यासाठी २६१ कोटी रुपये लागतात. हे काम पूर्ण करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेला २ वर्षे लागतील, मिरा-भाईंदर महानगरपालिकेला १ वर्ष आणि उर्वरित ५ महानगरपालिका व १३ नगरपालिकांना ६ महिने लागतील. हे काम केल्यानंतर अशी आपत्कालीन घटना घडली तर ताबडतोब काही तासातच इतर व्यवस्था करु. पिण्याच्या पाण्याच्या संदर्भातील कोणती अडचण येणार नाही. अहवाल अतिशय व्यवस्थित आलेला आहे. त्यानंतर २४ मार्च रोजी शासनाने तशा प्रकारचे आदेश प्रत्येक महानगरपालिकेला निर्गमित केलेले आहेत. २६१ कोटी रुपयांपैकी कोणत्या महानगरपालिकेला किती खर्च येईल त्याची माहिती त्यामध्ये दिलेली आहे. ती रक्कम महानगरपालिकांनी तशा पध्दतीने खर्च करावयाची आहे. कुठून पाणी घेऊ शकता हे शासनाने अहवालामध्ये सांगितले आहे. मागील काळात अंबरनाथ शहराच्या बाबतीत असे संकट निर्माण झाल्यानंतर शासनाने पुढाकार घेऊन ताबडतोब पाण्याची व्यवस्था केली होती.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 25488** .........

श्री. अजित पवार....

तशा प्रकारे अभ्यास करुन चांगल्या प्रकारचा अहवाल तयार केलेला आहे.

**सभापती** : आज आपण 12 प्रश्न पूर्ण करु शकलो आहोत. 12 प्रश्न पूर्ण करणे हा अलिकडच्या काळातील विक्रम आहे. अशीच स्थिती राहिली तर नवीन सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी मिळू शकेल.

श्री. हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, आपण इस्लामाबादहून आल्यापासून चांगली सुरुवात झालेली आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---------------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

श्री.प्रीतमकुमार शेगावंकर (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन 1999-2000 व 2000-2001 चे वार्षिक लेखा आणि लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा आणि लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

--------------

श्री.प्रीतमकुमार शेगावंकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र सागरी मंडळाचा सन 2004-2005 चा प्रशासकीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रशासकीय हवाल सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे.

--------------

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचा सन 2002-2003, 2003-2004, 2004-2005 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात आले आहेत.

-----------

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा सन 2004-2005 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे.

----------

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादितचा (मुंबई) सन 2004-2005 चा पाचवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिकअहवाल सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे.

----------

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने बीड जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा (बीड) सन 1997-1998, 1998-1999 चा पहिला वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे.

----------

श्री. बाबा सिद्दीकी: सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा (अहमदनगर) सन 1994-1995, 1995-1996, 1996-1997,1997-1998, 1998-1999, 1999-2000, 2000-2001 चा चवथा, पाचवा, सहावा, सातवा, आठवा, नववा व दहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात आले आहेत.

----------

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सांगली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाचा (सांगली) सन 1993-1994 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे.

----------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळाचा ( मुंबई ) सन 1992-1993, 1993-1994 चा आठवा व नववा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

-----------------

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औरंगाबाद माथाडी व असरंक्षित कामगार मंडळाचा ( औरंगाबाद ) सन 1999-2000, 2000-2001, 2001-2002, 2002-2003 चा आठवा, नववा, दहावा व अकरावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

-----------------

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने जालना माथाडी व असरंक्षित कामगार मंडळाचा ( जालना ) सन 2001-2002, 2002-2003 चा तेरावा व चौदावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

--------------

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्यांकरिता या मंडळाचा सन 2000-2001, 2001-2002 चा विसावा व एकविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

--------------

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

## <u>औचित्याचे मुद्दे</u>

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मुंबई, ठाणे, कल्याणसह राज्यातील सर्व भागातील रेशनिंगच्या दुकानावर अत्यंत निकृष्ट दर्जाचा लालसर गहू जनतेला दिला जात आहे. जनावरे देखील हा गहू खाणार नाहीत इतका निकृष्ट दर्जाचा गहू दिला जात आहे. रेशनिंग दुकानावर अतिशय निकृष्ट दर्जाचा गहू वितरित केला जात असल्यामुळे जनतेचे आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. रेशनिंग दुकानावरुन हा गहू हद्दपार करण्यासाठी माता-भगिनींनी आंदोलने सुरु केली आहेत. सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली येथील रेशनिंग दुकानावर जो निकृष्ट दर्जाचा गहू दिला जातो त्याचा नमुना मी आपल्याला सादर करतो. ( गव्हाचा नमुना माननीय सभापतींकडे सादर करण्यात आला ) अशाप्रकारचा गहू माणसांनी खाणे योग्य आहे का असा प्रश्न मी जनतेच्या वतीने करीत आहे. तेव्हा याची त्वरित दखल घेऊन रेशनिंगवर दिल्या जाणाऱ्या गव्हाचे वितरण शासन त्वरित बंद करणार काय ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी नोंद घेतलेली आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, रेशनिंगवर दिल्या जाणाऱ्या गव्हाचे वितरण त्वरित बंद करण्यात येईल का ? याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी दिले पाहिजे.

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, ही बाब तपासून त्यानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अतिशय निकृष्ट दर्जाचा गहू राज्यातील स्वस्त धान्य दुकानात मिळत आहे.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी यासंदर्भात औचित्याचा मुद्दा मांडला आहे. याबाबतीत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. अत्यंत निकृष्ट दर्जाचा गहू स्वस्त धान्य दुकानांमध्ये मिळत असून तो बदलण्याची आवश्यकता आहे, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे याबाबतीत शासनाने निवेदन करावे, असे मी निदेश देत आहे.

श्री.बाबा सिध्दीकी : सभापती महोदय, ठीक आहे.

( सन्माननीय सदस्य श्री.वसंत चव्हाण हे जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना यासंदर्भात आणखी काही वेगळे सांगावयाचे असेल तर त्यांनी ते माझ्या दालनात येऊन सांगावे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

----

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी अत्यंत महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडत आहे. या राज्यातील संस्कृती उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. अशा पध्दतीचे लैंगिक शिक्षण आज राज्यातील शाळांमध्ये सुरु आहे.

सभापती महोदय, "राज्याच्या ग्रामीण व शहरी भागातील सर्व शाळांत हल्ली यौन शिक्षण कार्यक्रमांतर्गत अश्लील साहित्याची पुस्तके, पत्रके व तक्ते मोठया प्रमाणावर वाटली जात आहेत व गत शैक्षणिक वर्षापासून शालेय शिक्षण अभ्यासक्रमात या अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आलेला आहे. तथापि, शाळांमध्ये वाटण्यात आलेली ही पुस्तके, पत्रके व विद्यार्थ्यांना दाखविण्यात येणारे तक्ते इतके अश्लील आहेत की, त्यामुळे लहान वयातच विद्यार्थ्यांमधील कामुकता वाढीस लागून त्यांच्या मनावर अत्यंत अनिष्ट परिणाम होत आहेत. पाश्चात्य कुसंस्कारानी राज्यातील युवा पिढी

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

बरबाद होण्याचा भयंकर धोका निर्माण झाला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची राजवट असलेल्या केरळसारख्या राज्यासह गुजरात, मध्यप्रदेश या राज्यांनी अश्लिल साहित्याच्या वाटपावर बंदी आणून विद्यार्थ्यांना शिकविण्यात येणारे यौन शिक्षण बंद केलेले आहे.

आपल्या राज्यात मात्र ग्रामीण व शहरी भागातील शाळांमध्ये हे अश्लिल चाळे सुरु आहेत. अश्लिल चित्रे असलेले तक्ते विद्यार्थ्यांना दाखविले जात अहेत. त्यामुळे त्यांच्या मनावर अत्यंत वाईट परिणाम होत आहेत. लहान मुलांच्या मनावर पाश्चात्य कुसंस्कारांचे आघात होत असताना त्याची वेळीच दखल न घेणे हे एका भयावह संकटाला आमंत्रण देण्यासारखे आहे. मी याबाबत कालच माननीय मुख्यमंत्री महोदयांना लेखी पत्र पाठवून या प्रकरणी त्वरीत कारवाई करण्याबाबत विनंती केलेली आहे. माननीय सभापती महोदय, मी आपले व सभागृहाचे लक्ष एका महत्वाच्या व गंभीर बाबींकडे औचित्याच्या मुद्याद्वारे वेधण्याचा प्रयत्न करीत आहे."

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो औचित्याचा मुद्या उपस्थित केला, तो गंभीर आहे. माननीय शिक्षण मंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी याबाबतची नोंद घेऊन याबाबतची शासनाची भूमिका निवेदनाद्वारे स्पष्ट करावी.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, ठीक आहे.

------

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मुंबई विद्यापीठाचे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष सुरु आहे. परंतु विद्यापीठामध्ये जो कारभार चालला आहे तो चिंता करण्यासारखा व दु:खदायक आहे. त्यामुळे विद्यापीठातील प्राध्यापकांना त्याचा त्रास सोसावा लागत आहे.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील सुरु .....

आणि विद्यापीठांच्या निवडणुका रद्द झाल्या या बद्दल स्वत: माननीय राज्यपाल महोदयांनी जे मत व्यक्त केले आहे , ते मी आता आपणास वाचून दाखवितो. "विद्यापीठ कायदा आणि परिनियम यातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करुन निवडणूका घेणे व त्यामध्ये पारदर्शकता ठेवणे, हे पूर्णत: विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे" असे निरीक्षण कुलपतींनी नोदविले आहे.विद्यापीठ परिनियम 361 च्या उल्लंघनासंदर्भात जबाबदारी निश्चित करणेही आवश्यक आहे. या बाबींसाठी एक समिती कार्यरत होती. श्रीमती प्रतिमा उमरजी, विधी व न्याय विभागाच्या सचिव माजी प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली होती. या कमिटीचा अहवाल येत्या दोन महिन्यात सादर होणार आहे. माझी येथे अशी मागणी आहे की, हा अहवाल तातडीने सादर करावा व या अहवालानुसार जे लोक दोषी असतील त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी.

............

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, आमदार निवास मनोरा येथील भोजनालच्या संदर्भात या औचित्याच्या मुद्दयाद्वारे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो .सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. हेमंत पटेल यांनी टेलिफोन करुन रात्री साडे नऊ वाजता जेवणाची ऑर्डर दिली होती . परंतु जेवण न आल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री पटेल , मी आणि सर्वजण खाली भोजनालयात गेलो. तेथे गेल्यानंतर भोजनालयातील सुपरवायझरने जेवण संपले असून आपण दिलेली ऑर्डर आता देऊ शकत नाही , असे उत्तर दिले. आमदार निवास मनोरा येथील भोजनालय आमदारांसाठी आहे. त्या ठिकाणी बाहेरील माणसे येऊन जेवतात मात्र आमदारांना जेवण मिळत नाही. तसेच तेथे काम करणारे जे कर्मचारी आहेत त्या पैकी दोन कर्मचारी हे क्षयरोगग्रस्त आहेत, आणि काही कामगार देखील अन्य संसर्गजन्य रोगाने ग्रस्त आहेत अशी माहिती आहे. असे रोगाने ग्रस्त असलेले कर्मचारी जर तेथे काम करत असतील तर त्यामुळे आमदारांच्या जीवितास अपाय होण्याची शक्यता आहे. या बाबतीत आपण तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. या भोजनालयाच जो व्यवस्थापक आहे त्याचे कॉंट्रेक्ट त्वरित रद्द केले पाहिजे अशी माझी औचित्याच्या मुद्दयाद्वारे विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, या भोजनालयासाठी 6-7 टेंडर एकत्र मागविण्यात आले होते. त्या नंतर हे टेंडर कोणाला तरी बाहेरच्या माणसाला देण्यात आले होते.ही माहिती खरी आहे का याची आपण चौकशी करावी. तसेच आमदार निवासामध्ये कॅटरिंग कमिटीने भेट दिली होती. तेव्हा त्या ठिकाणी अत्यंत निकृष्ट पध्दतीचे भोजन दिले जाते असल्याचे आढळून आले दुषित पाण्यामुळे काविळीसारखे भयकर रोग होऊ शकतात. पिण्याचे पाणी हे विहिरीचे पाणी आहे की बाहेरचे पाणी आहे या बाबतीत आपण चौकशी करावी.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचा मुद्दा माझ्या लक्षात आलेला आहे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, मला काही गोष्टी सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाच्या आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी लक्षात आणून देऊ इच्छितो की, औचित्याच्या मुद्याबाबत लेखी सूचना आपण देणे आवश्यक आहे. आपण मांडत असलेल्या औचित्याच्या मुद्दयाबाबत कोणतीही लेखी सूचना दिलेली नाही तरीही हा विषय महत्वाचा असल्यामुळे मी आपणास येथे बोलण्याची विशेष परवानगी दिलेली होती. कृपया आपण खाली बसावे. या ठिकाणी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत . आमदार निवासातील निकृष्ठ भोजन व पाणी याबाबतीत मी स्वत: लक्ष देईन.

श्री पांडुरंग फंडकर : सभापती महोदय, परवाच्या वर्तमानपत्रामध्ये एक बातमी आलेली होती. आमदार निवासामध्ये काम करणारे जे कर्मचारी आहे त्यांना विविध संसर्गजन्य रोगांनी पछाडलेले आहे. या कर्मचाऱ्यापैकी साधारणपणे 70 टक्के जण लोक वेगवेगळया संसर्गजन्य रोगांनी ग्रस्त आहेत. याची दखल आपण घेतली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. रोझेकर ...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य, श्री.रमेश निकोसे आणि सन्माननीय सदस्य, श्री.केशवराव मानकर यांनी मनोरा येथील आमदार निवासाच्या दुर्दशेबाबतची वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिलेली आहे. मी स्वत: त्यात लक्ष घालतो. त्या ठिकाणच्या कर्मचा-यांची वैद्यकीय तपासणी निश्चितपणे होईल. जर संबंधित कर्मचा-यांना संसर्गजन्य रोग झाला असेल तर त्यांना तेथे काम करता येणार नाही. तसेच, निकृष्ट अन्न पदार्थाच्या बाबतीत लक्ष घालून सुधारणा कशी होईल, हे पाहण्यात येईल अन्यथा कंत्राटदाराला बदलणे गरजेचे असेल तर त्यादृष्टीने गांभीर्याने कारवाई होईल. तसेच पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत देखील चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईल.

-------------

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, मी आपल्याला धन्यवाद देते. गेल्या तीन दिवसांपासून हा प्रश्न मांडण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. परंतु, काही-ना-काही कारणामुळे औचित्याचे मुद्दे मांडण्याची संधी आम्हाला मिळत नव्हती.

सभापती महोदय, नाशिक जिल्हयातील मनमाड तालुक्यात नागापूर व क-हा या ठिकाणी 24 मार्च रोजी दरोडा पडला होता. 24 मार्चला नाशिक येथे दरोडा पडल्यानंतर येवला या ठिकाणी दरोडा पडला व या घटनेत एक ट्रक चालक मृत पावला. दरोडा पडलेल्या कुटुंबियांना मी स्वत: जाऊन भेटले आहे. या दरोडयातील आरोपींना ताबडतोब पकडले जावे व जखमी कुटुंबियांना त्वरित मदत मिळावी, अशी मागणी मी या सदनात केली होती. त्यानंतर 26 मार्च रोजी बारामती तालुक्यात दरोडा पडला, त्याआधी 23 मार्च रोजी सांगली जिल्हयातील जत या ठिकाणी दरोडा पडला. नंतर सोलापुरकडे जाणा-या हुतात्मा एक्सप्रेसवर दरोडा घालण्याचा प्रयत्न झाला. अशा पद्धतीने मनमाड, येवला, बारामती, सांगली, नगर या ठिकाणी एकामागोमाग एक दरोडे पडत आहेत. परंतु, यामधील आरोपी पकडले गेले नाहीत. शासनाने घोषणा केली की, दरोडा पडलेल्या परिवारातील जखमींच्या औषधोपचारासाठी मदत दिली जाईल. परंतु, अद्याप त्यांना मदत मिळालेली नाही. या सहा दरोडयातील आरोपींना पकडण्याच्या दृष्टीने कारवाई होत नसल्यामुळे लोकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे याबाबत उपाययोजना करण्याच्या दृष्टीने व जखमींना मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने ताबडतोब पावले उचलावीत, अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याव्दारे आपल्यामार्फत शासनाला करीत आहे.

..2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : हे सर्व प्रकार अत्यंत भयानक आहेत. गृह राज्यमंत्र्यांनी या मुद्याची नोंद घ्यावी.

श्री.सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

---------------

..3..........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : माननीय सदस्य, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, वि.प.स.यांनी "भिवंडी शहरातील कामतघरमधील गणेशनगर आणि पद्मानगरमधील गुनी प्रफुल चाळ या दोन ठिकाणी भिवंडीचे पोलीस उपायुक्त रविंद्र सेनगांवकर यांनी दिनांक 27/3/2007 रोजी छापा टाकून 15-20 हजार रुपयांना मुले विकणा-या महिलेला अटक करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, वि.प.स.यांनी "मुंबई शहर व उपनगरातील सर्व गृहनिर्माण संस्थांकडून इमारत कर रक्कमेचा वेळेवर ारणा होत असतानाही त्यांच्यावर सह महापालिका आयुक्त यांच्याकडून अतिरिक्त दंडाची रक्कम आकारल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "करकंब, ता.पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथील शासकीय धान्य गोदामाच्या अप्पर जिल्हाधिकारी यांनी दिनांक 12/9/2006 रोजी केलेल्या तपासणीत लाखो रुपये किमतीचा गहू व तांदूळ कमी आढळल्याचे व हजारो रुपये किमतीचा बारदाना गायब झाल्याचे निदर्शनास आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री सुरेश जेथलिया, डॉ.नीलम गो-हे, वि.प.स.यांनी "ठाणे येथील चारोटी नाक्यावर दमणवरुन पोलीस जीपमधूनच चोरटया दारुची वाहतूक करत असताना अशोक धवल या अधिका-यास दिनांक 28/3/2007 च्या सुमारास केलेली अटक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..4........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.............

यानंतर डॉ.नीलम गो-हे, वि.प.स.यांनी "दिनांक 28/3/2007 रोजी जळगाव येथील भगवाननगर भागात बहिणाबाई माध्यमिक विद्यालयातील काही मुलांना तयार उत्तरे दिल्या प्रकरणी मुख्य केंद्र संचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिपाई यांना केलेली अटक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री विनोद तावडे, गुरुमुख जगवानी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स.यांनी "सिंधुदूर्ग जिल्हयातील धान्य व शेगडी घोटाळयानंतर कोंबडी घोटाळा उघडकीस येणे यात प्रशासनातील अधिकारी व पोल्ट्रीधारक यांच्या संगनमताने खोटे पंचनामे व खोटया पावत्या बनवून प्रशासनाची सुमारे 85 लाख रुपयांची लूट केल्याचे लक्षात आल्याबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. ती नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि.प.स.यांनी "डोंबिवली येथील पाल पिज्यो (प्रिमियर) कंपनी सन 1998 पासून बंद असल्याने सुमारे 1800 कामगार बेरोजगार होणे"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. ती नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

--------------

यानंतर कुमारी जयश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वयेच्या निवेदनासंबंधी**

श्री.मधुकर चव्हाण : दिनांक 26 व 28 मार्च,2007 रोजी जी निवेदने सभागृहामध्ये चर्चेसाठी घेण्यात येणार होते ती केव्हा घेण्यात येणार आहेत ?

श्री.रामनाथ मोते : त्या निवेदनांमध्ये अतिशय महत्वाचे व गंभीर विषय होते.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :काल जे निवेदन घेण्यात येणार होते, ते आता केव्हा घेण्यात येणार आहे ?

**सभापती** : आज सकाळी राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या पाकिस्तानच्या दौ-यावरुन परतल्यानंतर मी सर्व कामकाजाची माहिती घेतली आहे. दिनांक 26 व 28 रोजी जी नियम 93 अन्वयेच्या ज्या सूचना होत्या त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. मी असे ठरविले आहे की, सदर सूचनांवरील निर्णय झाल्यावर दालनात नाकारावयाच्या त्या नाकारुन व ज्या सूचना मंजूर करावयाच्या आहेत त्या मंजूर करुन त्याची यादी सदनाकडे देतो म्हणजे सन्माननीय सदस्यांना सदर सूचनांवरील अपेक्षित उत्तरे वेळेवर प्राप्त होतील.

श्री.अनिल परब : मरोळ येथील पोलीस ठाण्यामधील कॉन्स्टेबल रविंद्र सावंत याने मानसिक तणावाखाली येऊन आत्महत्या केलेली होती याबबात मी एक नियम 93 अन्वये सूचना दिली होती. ती नाकारली आहे का ? तिचे काय झाले ?

**सभापती** : त्या सूचनेला मी दालनात अनुमती नाकारली आहे.

श्री.मधुकर चव्हाण : महोदय, अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु होऊन 15 दिवस झाले तरी अद्याप नियम 93 अन्वयेच्या सूचनेवर एकही निवेदन करण्यात आलेले नाही.

**सभापती** : आज निवेदने पाच येथे येतील उद्या वेगवेगळया विभागाची किमान 10 निवेदने या आठवडयामध्ये पूर्ण करण्यात येतील.

श्री.अरविंद सावंत : सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांचा मरोळ येथील पोलीस ठाण्याबाबतचा मुद्दा आता घेण्यात यावा तो अतिशय महत्वाचा व गंभीर आहे.

**सभापती** : उपरोक्त विषय सभागृहात चर्चेकरिता कोणत्या माध्यमातून मांडावयाचा त्याबाबत मी निर्णय घेईन व सदनाला अवगत करीन.

श्री.अरविंद सावंत : ठीक आहे.

-------------

CC -2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:इयत्ता दहावीच्या इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या लोअर मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये झालेल्या अनेक चुका

**मु.शी.**: इयत्ता दहावीच्या इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या लोअर मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये झालेल्या अनेक चुका याबाबत सर्वश्री.रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे व संजय केळकर,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री.रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे व संजय केळकर,वि.प.स.यांनी "इयत्ता दहावीच्या इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या लोअर मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये झालेल्या अनेक चुका "या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून,आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

C -3

श्री.रामनाथ मोते : दरवर्षीप्रमाणे एस.एस.सी.बोर्डाच्या कामकाजात जो काही गोंधळ होत आहे, त्याचाच हाही एक नमुना आहे. मध्यंतरी गणिताच्या पेपरच्या संदर्भात या सभागृहामध्ये एक विषय उपस्थित झाला होता त्यानुसार गणिताच्या पेपरमध्ये त्या विशिष्ट प्रश्नासाठी सर्व विद्यार्थ्यांना 15 गुण बहाल करावे लागले होते. या ठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये सेकंड ॲण्ड थर्ड लँग्वेज म्हणजे मराठीचा पेपर असतो. या विषयामध्ये झालेली चूक ही शासनाने मान्य केलेली आहे, की सदर गंभीर स्वरुपाची असून सदर चुकीच्या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न करणा-या विद्यार्थ्यांना चार गुण देण्यात येणार आहेत. दुस-या प्रश्नामध्ये जो एका गुणाचा उपप्रश्न आहे त्या उपप्रश्नालाही आधीच्या प्रश्नाप्रमाणे उत्तर देण्याचा प्रयत्न करणा-या विद्यार्थ्यांना एक गुण देणार का ? दुसरा माझा प्रश्न आहे की, मागच्या वेळेला संत तुकारामांच्या संदर्भात प्रश्नपत्रिकेमध्ये जी चूक झाली होती त्या अनुषंगाने त्या वेळच्या शासनाने पेपर सेटर्सच्या संदर्भात, प्रश्नपत्रिका तपासण्याच्या संदर्भात नवीन यंत्रणा निर्माण करु, अशा प्रकारचे सभागृहामध्ये आश्वासन दिलेले होते, अशा प्रकारची यंत्रणा शासनाने निर्माण केली आहे का ? नसल्यास, निर्माण करण्यात येणार आहे का ?

प्रा.वसंत पुरके : सन्माननीय सदस्यांनी उपप्रश्न क्रमांक 1 बाबत मुद्दा उपस्थित कला आहे. खरे म्हणजे प्रश्नपत्रिकेमध्ये झालेल्या शुध्दलेखनाच्या चुका हया खरोखरच गंभीर आहेत. काना,मात्रा,वेलांटी,स्वल्पविराम,हे योग्य ठिकाणी दिले गेलेच पाहिजेत. सदर प्रश्नपत्रिकेमध्ये "पृथ्वीवर" म्हटल्यानंतर "पूर्णविराम" द्यावयालाच पाहिजे होता. सदर उपप्रश्नाचा उत्तर देण्याचा प्रयत्न करणा-या विद्यार्थ्यांना एक गुण देण्याची शिफारस जरी समितीने केली नसली तरी तो एक गुण विद्यार्थ्यांना दिला जाईल.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके ........

अशा प्रकारच्या चुका होऊ नयेत म्हणून समिती गठित करण्याची आवश्यकता होती. समिती गठित करण्यात आली असली तरी काही सूक्ष्म चुका लक्षात आलेल्या नाहीत, यासंदर्भात दक्षता घेतली जाईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, प्रश्नपत्रिकेमध्ये चुकीचे प्रश्न छापले गेले आहेत. प्रिंटींग मिस्टेकमुळे अशा प्रकारे वारंवार विद्यार्थ्यांना गुण वाढवून दिले तर त्याचा विद्यार्थ्यांवर वाईट परिणाम होईल. पेपर छापणा-यांवर किंवा तपासणी करणा-या अधिका-यावर शासन कारवाई करणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, ही चूक अक्षम्य नाही. यासंदर्भात निश्चितपणे कारवाई केली जाईल.

श्री.कपित पाटील : सभापती महोदय, परीक्षा मंडळासंदर्भात सभागृहामध्ये तिस-यांदा प्रश्न उपस्थित झाला आहे. तीन प्रश्नपत्रिकांमध्ये चुका झालेल्या आहेत. जे चुकीचे प्रश्न छापलेले आहेत त्या प्रश्नाचे गुण विद्यार्थ्यांना मिळतील काय ? पाठ्य पुस्तकांमध्ये देखील प्रचंड चुका आहेत. परीक्षा मंडळ आणि अभ्यास मंडळाच्या दोन्ही अध्यक्षांवर तातडीने कारवाई करुन माननीय शिक्षण मंत्री त्यांचा राजीनामा घेतील काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मी चुकांचे समर्थन करणार नाही. चुका होऊ नयेत याची दखल घेतली जात आहे. कोटयावधी विद्यार्थी परीक्षेस बसतात. प्रश्नपत्रिकेमध्ये पूर्णविरामसारख्या चुका होणे अपेक्षित नाही. संबंधित अधिका-यांवर उचित कारवाई केली जाईल आणि विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, मुद्रण दोष असल्याचे सांगून टाळाटाळ करण्याचा प्रयत्न केला जातो. मुद्रक कोण आहे हे शोधून काढावे आणि समिती नेमून एका महिन्यात निकाल द्यावा.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, पेपर सेटींग करणारे शिक्षक दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल. पेपर बरोबर काढलेला असेल आणि मुद्रणालयाकडून चूक झ ाालेली असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



29-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) DD-2

**पृ.शी.**: नगर पंचायत समितीच्या सभापतींना मारहाण केल्याची घडलेली घटना.

**मु.शी.**: नगर पंचायत समितीच्या सभापतींना मारहाण केल्याची घडलेली घटना याबाबत डॉ.नीलम गो-हे, श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे व सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "नगर पंचायत समितीच्या सभापतींना मारहाण केल्याची घडलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-------

..3.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, नगर पंचायत समितीच्या सभापती सौ.नंदा शेंडगे यांच्यावर हल्ला करण्यात आला. सौ.नंदा शेंडगे यांच्या डोक्यावर नारळ फोडून त्यांना जखमी केले गेले. नियम 93 च्या सूचनेला दिलेल्या निवेदनाच्या लेखी उत्तरातील शेवटच्या परिच्छदामध्ये आरोपी बाळू शंकर शेळके हा आक्रमक स्वभावाचा असल्याने त्याला जिल्हाबंदी केली आहे, असे म्हटलेले आहे. निवेदनाच्या पहिल्या परिच्छदामध्ये असे म्हटलेले आहे की, "अकोळनेर गावात दोन-तीन दिवसापासून नळ योजनेचे पाणी सुटले नाही, अशी तक्रार आली होती." या परिच्छेदाचा आणि मारेक-याचा काय संबंध आहे ? मला असे वाटते की, नियम 93 च्या सूचनेला जे लेखी उत्तर दिलेले आहे, त्यामध्ये दुरुस्ती केली पाहिजे. श्री.बाळू शेळके यांच्या साथीदारांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली पाहिजे. पंचायत समितीच्या सभापतींना गावामध्ये प्रतिष्ठा आहे. गावामध्ये त्यांनी कामे करणे अपेक्षित आहे. सौ.नंदा शेंडगे या नगर पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सदस्य आहेत. शासनाने श्री.बाळू शेंडगे याच्यावर गुन्हा दाखल केला पाहिजे. संपूर्ण तालुक्यामध्ये सभा घेऊन सौ.नंदा शेंडगे यांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने तेथील पोलीस अधिका-यांनी आणि जिल्हाधिका-यांनी पुढाकार घेतला पाहिजे. पोलीस अधिकारी आणि जिल्हाधिकारी सौ.नंदा शेंडगे यांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने पुढाकार घेतील काय ? श्री.बाळू शेंडगे याच्या साथीदारांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जाईल काय ? तसेच, दुसरे जे शेंडगे कुटुंब राजकारणामध्ये प्रभावी आहे त्यांच्याशी आरोपीचे काही नाते आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आरोपी क्र.1 याला त्याच दिवशी अटक करण्यात आली आहे आणि त्याच्यावर कलम 151(3) अन्वये जिल्हाबंदीचा आदेश जारी करण्यात आला आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आरोपीवर कोणत्या कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, कलम 151(3) अन्वये त्यांना अटक करण्यात आली आहे.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे .....

श्रीमती नंदा शेंडगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नगर तालुका पोलीस ठाणे बाळू शंकर सोनवणे व त्याचे तीन साथीदार रामदास उर्फ राम सिताराम सोनवणे, बाळु उर्फ बाळासाहेब केशव शेळके व बाळु उर्फ बाळासाहेब यादव भोर यांच्याविरुध्द भा.दं.वि.सं. कलम 341, 353, 294, 323, 504, 506 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. चार आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. यानंतर हे चार आरोपी जामिनावर मुक्त झालेले आहेत. आरोपी बाळू शंकर शेळके हा आक्रमक स्वभावाचा असल्याने तो दि.17.3.2007 रोजी जामिनावर मुक्त होताच त्यास पुन्हा ताब्यात घेऊन प्रतिबंधक प्रस्ताव क्रमांक 2/07 प्रमाणे प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी अहमदनगर यांच्या कार्यालयात दिनांक 18.3.2007 रोजी सादर करुन 14 दिवस स्थानबध्द करण्याची विनंती करण्यात आली असताना न्यायालयाने त्यास दिनांक 25.3.2007 पर्यत जिल्हाबंदी केली आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आरोपीने सदर महिलेच्या डोक्यात नारळ फोडले आहे म्हणजे खुनाचा प्रयत्न केलेला आहे. गुन्हा नोंदविताना त्याचे Intension काय आहे हे पाहिले पाहिजे, याबबत पोलिसांनी भा.द.वि.307 कलमान्वये गुन्हा का नोंदविला नाही ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, गुन्हयाच्या स्वरुपानुसार कलम लावली जातात. या महिलेच्या डोक्यात नारळ मारल्यामुळे टेंगूळ आलेले आहे, त्यामुळे गुन्हा नोंदविताना पोलिसांनी 307 कलम लावले नाही.

**सभापती** : एका महिलेची पंचायत समितीच्या सभापतीपदी निवड झालेली आहे. निवडून आल्यानंतर ती ग्रामपंचायतीने आयोजित केलेल्या सत्काराकरिता जात असताना या महिलेच्या डोक्यात नारळ फोडण्याचे अमानुष कृत्य आरोपींनी केलेले आहे. आरोपीचा उद्देश या महिलेस फक्त जखमी करण्याचा नव्हता तर ठार मारण्याचा असावा, असे दिसत असल्यामुळे भा.दं.वि. 307 व 302 अन्वये गुन्हा नोंदविण्याचा फेरविचार केला पाहिजे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, कोणताही गुन्हा नोंदविताना त्या व्यक्तीस झालेल्या जमखेच्या स्वरुपावरुन गुन्हा नोंदविला जातो, या गुन्हयामध्येही जखमेच्या स्वरुपानुसार गुन्हा नोंदविलेला आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : या गुन्हयाची फेरचौकशी करण्यात यावी, याबाबतची गंभीरता डोळयासमोर ठेऊन मंत्री महोदयांनी योग्य ती कारवाई करण्याचे आदेश द्यावेत.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, निवडणुकीत गैरप्रकारबाबत चर्चा झालेली आहे. ही घटना नगर जिल्हयात घडलेली आहे. पंचायत समितीच्या सभापती पदावर शिवसेनेच्या श्रीमती नंदा शेंडगे यांची निवड झालेली आहे. ही महिला सभापती त्यांच्या कार्यकर्त्यांसह सत्कार समारंभास जात असताना त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी राजकीय द्वेषापोटी या महिलेच्या डोक्यात नारळ फोडला आहे. डोक्यात नारळ मारण्याचा उद्देश त्या महिलेस जीवे मारण्याचा होता, या प्रकरणामध्ये गुन्हा नोंदविताना जीवंत मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंदविलेला नाही. सभागृहामध्ये सन्माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ बसले आहेत, त्यांच्यावर जेव्हा हल्ला झाला होता तेव्हा जीवंत मारण्याचा गुन्हा नोंदविला होता.

यानंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या संपूर्ण घटनेची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात येईल आणि जी काही कलमे या संबंधात लावावयाची आहेत ती विधी तज्ज्ञांचा सल्ला घेऊन लावण्यात येतील.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, ही घटना अतिशय निंदनीय आहे. एखाद्या महिला सभापतीच्या डोक्यावर एखाद्या वस्तूने मारणे, हल्ला करणे हे कलम 324 खाली यावयास पाहिजे. माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ हे विरोधी पक्षनेता असताना त्यांच्या घरावर जो हल्ला झाला होता त्यामध्ये त्यांना स्वत:ला काहीही लागले नव्हते पण तरीही त्यांना जीवे मारण्यासाठी केलेला हल्ला होता असे समजून त्याबाबत कलम 307 लावण्यात आले होते. थोडक्यात ज्यामुळे मृत्यू येऊ शकतो अशा कोठल्याही ठिकाणी मारहाण करणे, हल्ला झाला तर अशा गुन्ह्याच्या बाबतीत कलम 307 लावले जाते. सभापती महोदय, आठ दिवसापूर्वीच एका सिनिअर इन्स्पेक्टरच्या डोक्यावर दगड लागला त्यावेळी त्याबाबत देखील 307 कलम लावले गेले होते. म्हणूनच या घटनेमध्ये देखील महिला सभापतीला जीवे मारण्याचा प्रयत्न म्हणूनच तो नारळ तिच्या डोक्यावर मारला गेला आहे आणि म्हणून त्याबाबत 307 कलमाखाली गुन्हा दाखल केला गेला पाहिजे, तसा तो आपण करणार का ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, आता या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी माझे नाव घेऊन माझ्यावर झालेल्या हल्ल्याचा संदर्भ दिलेला आहे. त्यासंबंधात मला या ठिकाणी अल्पसा खुलासा करावयाचा आहे. माझ्यावर झालेल्या हल्ल्याचा संदर्भ देत असे येथे सांगण्यात आले की, त्या घटनेमध्ये भुजबळ साहेबांना लागलेच नव्हते. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, त्यावेळी 100 लोक एकदम लाठ्याकाठ्या, सळया घेऊन, घराचे दरवाजे-खिडक्या तोडत घरामध्ये घुसून घरामध्ये मला शोधत असतील तर ते काय मला आरती ओवाळण्यासाठी आले होते काय ? एक नशीब समजले पाहिजे की, मी गृहमंत्री झाल्यानंतरही त्या प्रकरणाचा काहीही पाठपुरावा केला नाही. किमान आपण एवढे तरी लक्षात घ्यावे. माझ्यावर हल्ला करण्यास आलेले लोक काय तेव्हा माझ्याकडे जेवायला आले नव्हते. इतकेच मी आपल्याला सांगू इच्छितो.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, मी केवळ कलम 307 केव्हा कशासाठी लावले जाते हे सांगण्यासाठीच तो उल्लेख केलेला आहे.

....... एफएफ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आता या ठिकाणी माननीय मंत्री श्री.भुजबळ यांनी जो उल्लेख केला त्याबद्दल खुलासा करावयाचा आहे. या ठिकाणी उत्तर देताना मंत्री महोदयांनी हे लक्षात घ्यावे की, आमचा हा प्रश्न विचारण्याचा उद्देश काय आहे ? या घटनेतील आरोपी हा कोठल्या पक्षाचा कार्यकर्ता आहे हे आमच्या लेखी महत्त्वाचे नाही. तर अशा प्रकारे हल्ला करण्यामागे त्याचे इंटेन्शन काय होते, हेही त्याच्यावर कलम लावताना लक्षात घेणे आवश्यक आहे इतकेच आम्हाला सांगावयाचे आहे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्र्यांनी याबाबत उत्तर दिलेलेच आहे की, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन विधी तज्ज्ञांचा सल्ला घेऊन ही कलमे लावण्यात येतील.

**सभापती** : ठीक आहे. मी यानंतर पुढील निवेदन पुकारतो.

****

**नियम 93 खालील निवेदन क्रमांक 3 बाबत ....**

**सभापती** : नियम 93 खाली होणारे निवेदन क्रमांक 3 हे उद्या घेण्यात येईल.

****

**नियम 93 खालील निवेदन क्रमांक 4 बाबब ...**

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, नियम 93 खाली निवेदन (निवेदन क्रमांक 4) करण्यास संबंधित विभागाचे, वस्त्रोद्योग मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. सभापती महोदय, मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नसण्याचे प्रकार या अधिवेशनात वारंवार होत आहेत. आपण नसतानाही 4 वेळा असा प्रसंग आल्याने सभागृहाचे कामकाज तहकूब करावे लागले आहे.

**सभापती** : ठीक आहे. हे निवेदन उद्या घेण्यात येईल. आता या ठिकाणी माननीय शालेय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी वस्त्रोद्योग मंत्र्यांना सांगावे की, ज्या दिवशी सभागृहामध्ये निवेदन ठेवले जाते तेव्हा मंत्री वा राज्यमंत्री यांनी सभागृहात त्यावेळेस हजर असले पाहिजे.

प्रा. वसंत पुरके : ठीक आहे.

****

..... एफएफ 3 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मोखाडा (जि.ठाणे) ग्रामीण रूग्णालयातील भोजन ठेकेदारास शासनाकडून वेळेवर बिलांची रक्कम न मिळणे.

**मु.शी.** : मोखाडा (जि.ठाणे) ग्रामीण रूग्णालयातील भोजन ठेकेदारास शासनाकडून वेळेवर बिलांची रक्कम न मिळणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे (आरोग्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, डॉ.दीपक सावंत यांनी "मोखाडा (जि.ठाणे) ग्रामीण रूग्णालयातील भोजन ठेकेदारास शासनाकडून वेळेवर बिलांची रक्कम न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना आधीच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

( यानंतर श्री. सरफरे .... जीजी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, कुपोषित बालकांचे उदर भरण करणाऱ्या खानावळ चालकांना शासनाकडून वेळेवर पैसे न दिले गेल्यामुळे त्यांचे कुपोषण होण्याची वेळ आली आहे. शासनाने 2005-06 पासून त्यांचे पैसे दिले नाहीत. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, " ग्रामीण रुग्णालयातील आहार योजनेसाठी 2006-07 या वित्तीय वर्षाकरिता रु. 23 कोटी 10 लाख एवढा निधी प्राप्त झाला, हा निधी सहा मंडळामध्ये वाटण्यात आला". त्यांची बिले 2005-06 पासून बाकी आहेत. त्यांचा कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. प्रश्न असा आहे की, एकूण किती देयके बाकी आहेत? दुसरा प्रश्न असा आहे की, आपण एकंदर 2.15 लाख एवढी रक्कम दिली असे म्हटले आहे,आणि 5 लक्ष 20 हजार 246 देण्याचे बाकी आहेत. दोन्हींचा हिशेब केला तर ही रक्कम 7 लाख होते. आहार सुविधेसाठी रु. 86, 43,000 एवढी रक्कम सुधारीत अंदाजात प्रस्तावित करण्यात आली आहे. तेव्हा प्रश्न असा आहे की, त्यांचे नेमके बिल केव्हा देण्यात येईल? आणि त्यांची नेमकी किती रक्कम शिल्लक आहे? या कुपोषित बालकांचे नातेवाईक, पालक यांना आहार देण्याच्या दृष्टीने त्यांची देखील व्यवस्था केली आहे काय?

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मोखाडा ग्रामीण रुग्णालयाचे भोजन पुरवठादार यांचे 2005-06 चे एकूण देयक 3 लाख 89 हजार इतके होते. त्यापैकी मागील वर्षी 41 हजार रुपये देण्यात आले, यावर्षी 3 लाख 85 हजार रुपये देण्यात आले. त्यामध्ये 2 लाख 15 हजार रुपयांचे देयक दिले आहे. या देयकांची एकूण बेरीज केली तर ती 5 लाख 20 हजार इतकी होते. आजच्या तारखेपर्यंत जवळपास संपूर्ण थकित पैसे त्यांना देण्यात आले आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, थकित देयकाची संपूर्ण रक्कम दिली असेल तर आज आम्हाला 93 ची सूचना देण्याची वेळ कां यावी?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ही सूचना देण्यात आली त्यावेळी 5 लाख 20 हजार इतकी रक्कम पेंडींग होती. त्यानंतर ठाणे जिल्हयामध्ये एकूण 14 लाख 21 हजार रुपयांची देयके देण्यात आली. त्यामध्ये मोखाडयाच्या 5 लाख 20 हजाराच्या देयकाचा समावेश आहे. हे देयक पूर्णपणे देण्यात आले आहे. यावर्षी डिस्ट्रिक्ट हॉस्पिटल, सिव्हिल हॉस्पिटलमधील सर्व थकित देयके लक्षात घेऊन साडे 9 कोटींची तरतूद चालू वर्षीच्या अंदाजपत्रकात करण्यात आली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे...

आहे. त्यामुळे जेवढी पेंडींग देयके असतील ती देण्यात येतील. त्यामुळे सन 2007-08 मध्ये कोणतीही देयके शिल्लक रहाणार नाहीत एवढी तरतूद करण्यात आली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन 2005 पासून याकरिता तरतूद कां करण्यात आली नाही. त्याकरिता कोणते अधिकारी जबाबदार आहेत?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, प्रत्येक वर्षी पूरक मागणीमध्ये तरतूद करण्यासंबंधी वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येत होता. परंतु वित्त विभागाकडून त्याला मंजूरी मिळत नव्हती. या वर्षी आम्ही थकित असलेल्या सर्व देयकांच्या रकमा आणि या वर्षी करावी लागणारी एकूण तरतूद लक्षात घेऊन तेवढी मागणी वित्त विभागाकडे केली. वित्त विभागाने त्याला मंजूरी देऊन या वर्षी जवळपास 10 कोटींची तरतूद केली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नवी मुंबईमध्ये सिडकोमार्फत उप प्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी भूखंड न मिळणे

**मु.शी.**: नवी मुंबईमध्ये सिडकोमार्फत उप प्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी भूखंड न मिळणे यासंबंधी सर्वश्री अनिल परब, दीपक सावंत, श्रीमती डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री अरविंद सावंत, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, सय्यद पाशा पटेल, रामनाथ मोते, गुरुमुख जागवानी, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड..अनिल परब ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नवी मुंबईसाठी सन 2004 मध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु होणे, गेल्या अडीच वर्षात या कार्यालयात सुमारे 70,000 गाड्यांची नोंदणी होऊन जवळपास 160 कोटीचे उत्पन्न प्राप्त होणे, सरकारी तिजोरीत मोठ्या प्रमाणात भर टाकणाऱ्या उक्त कार्यालयास नवी मुंबईत स्वत:ची जागा नसणे, पुरेसे कर्मचारी व अधिकारी नसणे, सध्या या कार्यालयाची एपीएमसी मार्केट मध्ये असलेली जागा अत्यंत अडचणीची व गैरसोईची असणे, ड्रायव्हींग टेस्ट घेण्यासाठी मार्केटमधील जागा सकाळी 9 पर्यंतच उपलब्ध असणे, परिवहन कार्यालयाची शहराला गरज असूनही सिडकोने शहराचे नियोजन करताना अशा महत्वाच्या कार्यालयासाठी भूखंड राखून न ठेवणे, इतपर सिडकोने देऊ केलेल्या जागेसाठी सिडकोने अवास्तव किंमत लावल्याने त्यावर अद्याप निर्णय न होणे, परिणामी शासनाच्या विरोधात नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, ज्याप्रमाणे सिडको सामाजिक, सांस्कृतिक, शासकीय निमशासकीय संस्थांना सवलतीच्या दरात भूखंड उपलब्ध करुन देते, त्याच धर्तीवर या कार्यालयासाठी देखील भूखंड नाममात्र दरात उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने हस्तक्षेप करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनासंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

.... ....

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, नवी मुंबई येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाची परिस्थिती भयानक आहे. त्या ठिकाणी 70 हजार गाड्यांची नोंद होते, 160 कोटी रुपयाचे उत्पन्न आर.टी.ओ.ला मिळते. सध्या हे कार्यालय ऐ.पी.एम.सी. मार्केटमध्ये आहे. त्या ठिकाणी सकाळी 9-00 वाजता ड्राईव्ह टेस्ट घ्यावी लागते. क्राफर्ड मार्केटमध्ये जशी परिस्थिती असते तशी त्या ठिकाणची झालेली आहे. या कार्यालयात कर्मचारीही कमी आहेत. नवी मुंबईमध्ये सिडकोकडून आर.टी.ओ.साठी जागा मिळविण्याचा प्रयत्न केव्हापर्यन्त पूर्ण होणार आहे ? त्या ठिकाणचा स्टाफ भरण्याचा शासन प्रयत्न करणार आहे की नाही ? तेथील लोकांना सुविधा देण्यासाठी शासन काय प्रयत्न करत आहे ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, नुकतीच 10,232.25 स्क्वेअर मिटर जागा 100 रुपये हेक्टरप्रमाणे प्राप्त झालेली आहे. अकरा महिन्याचा डी.डी. त्वरित भरावयाचा आहे. त्याचबरोबर ड्राईव्ह टेस्टसाठी 10,499 स्क्वेअर मिटरची जागा नाममात्र दराने मिळालेली आहे. त्यामुळे आता जागेचा प्रश्न सुटलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : केव्हापर्यन्त आर.टी.ओ.चे कार्यालय नवीन जागेमध्ये स्थलांतरित करणार आहात ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : जागेसाठी ताबडतोबीने पैसे भरायचे आहेत ते भरण्यात येतील. त्या नवीन जागेमध्ये कार्यालय स्थलांतर करण्या अगोदर त्या ठिकाणी इमारतीचे बांधकाम करावे लागेल. त्यासाठी आर्थिक तरतूद करावी लागेल. ती आर्थिक तरतूद करून बांधकाम लवकर करण्याचा प्रयत्न केला जाईल. इमारतीचे बांधकाम तयार झाल्यानंतर त्या ठिकाणी आर.टी.ओ.चे कार्यालय स्थलांतरित करण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "नागरिकांची सर्व कामे उपलब्ध कर्मचारी व अधिकारी यांच्याकडून वेळेवर व मोटार वाहन नियमातील तरतुदीनुसार पार पाडण्यात येत आहे". याचा अर्थ त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांची गरज नाही. लक्षवेधी सूचनेमध्ये पुरेसे कर्मचारी, अधिकारी नसल्यामुळे जनतेची गैरसोय होते, असे म्हटलेले आहे. परंतु त्या ठिकाणी स्टाफ कमी असल्याचे शासन मान्य करत नाही. "वाहनांची नोंदणी करण्याचे काम नियमित चालू आहे", असे

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू....

म्हटलेले आहे. प्रत्यक्षात नागरिकांना विलंब होत आहे, त्यांची गैरसोय होत आहे. शेवटी या सगळया गोष्टीमधून शासनाला उत्पन्न मिळत आहे. म्हणून यासंबंधातील लोकांची गैरसोय दूर करणार आहात की नाही ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : आपल्याकडे 7 पदे रिक्त आहेत. पाच असिस्टंट इन्स्पेक्टर आहेत, ते ट्रेनिंग घेऊन आल्यानंतर त्या पदावर काम करतील. त्यानंतर दोन क्लार्कची पदे रिक्त होती ती भरण्याची कार्यवाही केलेली आहे. आर्थिक उपलब्धता झाल्यानंतर त्या ठिकाणी आर.टी.ओ.ची इमारत बांधण्याच्या दृष्टीने प्रयत्न होईल.

--

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**पृ. शी.** : रोजगार हमी योजनेची कामे सरू न झाल्यामुळे मजूर इतर जिल्ह्यामध्ये स्थलांतरीत होणे.

**मु. शी.** : रोजगार हमी योजनेची कामे सरू न झाल्यामुळे मजूर इतर जिल्ह्यामध्ये स्थलांतरीत होणे, यासंबंधी श्रीमती उषाताई दराडे, प्रा.फौजिया खान सर्वश्री वसंत पवार, राजेंद्र जैन, गुरुनाथ कुलकर्णी, जगन्नाथ शेवाळे, रणजितसिंह मोहिते-पाटील,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

श्री.जयंत प्र. पाटील : ही लक्षवेधी सूचना उपस्थित करणारे सन्माननीय सदस्य थोडयावेळापूर्वी सभागृहात उपस्थित होते. परंतु ते आता गैरहजर आहेत, हे बरोबर नाही.

**उपसभापती** : आपले म्हणणे बरोबर आहे परंतु लक्षवेधी सूचना उपस्थित करणारे सन्माननीय सदस्य उपस्थित नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना घेता येत नाही. यानंतर लक्षवेधी क्रमांक 3 घेण्यात येईल.

--

यानंतर श्री.बरवड .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अमरावती जिल्ह्यातील अंगणवाडयांना शालेय पोषण आहार योजनेचा लाभ न मिळणे

**मु. शी.** : अमरावती जिल्ह्यातील अंगणवाडयांना शालेय पोषण आहार योजनेचा लाभ न मिळणे यासंबंधी सर्वश्री गोविंदराव आदिक, संजय दत्त, राजन तेली, रमेश निकोसे, सुरेश देशमुख, प्रा. शरद पाटील, सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महिला व बालकल्याण मंत्र्यांचे मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अमरावती जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी वर्गाला बचत गटामार्फत 100 टक्के शालेय पोषण आहाराचा पुरवठा करण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी शालेय पोषण आहाराचा पुरवठा सुरु करण्यासाठी जातीने लक्ष देण्याची गरज असूनही शासनाने या अंगणवाड्यांच्या संदर्भात कोणतीही दखल न घेणे, राज्यातील आदिवासी भागात राबविल्या जाणाऱ्या महिला व बाल कल्याण विभागाच्या अंगणवाड्यांमार्फत बालकांसाठी या योजनेचा लाभ आदिवासींना मिळत नसल्याचे सिध्द होणे, या योजनेचा पाठपुरावा करुनही माहे मार्च, 2007 अखेरपर्यंत आदिवासींचा विकास कामाचा निधी योग्य रितीने वापरला जात नसल्याचे आढळून येणे, त्यामुळे राज्यातील आदिवासींमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची भूमिका."

श्री. धर्मरावबाबा आत्राम ( महिला व बालकल्याण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, अमरावती जिल्ह्यात शिजवलेल्या तयार आहाराचा पुरवठा करण्यासाठी आदिवासी प्रकल्पातील किती आदिवासी अंगणवाड्यांचा समावेश आहे ? एप्रिल, 2006 ते 25 मार्च, 2007 अखेर राज्यातील आदिवासी लाभधारकांसाठी राबविण्यात येणाऱ्या निरनिराळ्या योजनांसाठी किती रक्कम खर्च करण्यात आली आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, जवळजवळ 1992 अंगणवाड्या आहेत. त्यापैकी 1357 अंगणवाड्यांना आहार पुरविण्याचे काम महिला बचतगट तसेच महिला मंडळे यांच्याकडे दिलेले आहे. त्यांच्याकरिता वेगवेगळ्या योजना आहेत. त्यामध्ये खावटी कर्ज वाटपाची योजना आहे. त्या योजनेच्या माध्यमातून आदिवासी भागामध्ये काम करीत असतो आणि लाभार्थ्यांना लाभ देत असतो. जे कुपोषित असतील त्यांचे खावटी कर्ज माफ करुन पुन्हा त्यांना कर्ज देत असतो. धारणी प्रकल्पामध्ये 6007 लाभार्थ्यांना 1 कोटी 49 लाख रुपये रकमेचे वाटप केलेले आहे. त्यापैकी दारिद्रय रेषेखालील 4913 कुटुंबे, ग्रेड 3 ची 1036 कुटुंबे आणि ग्रेड 4 ची 58 कुटुंबे अशा 6007 लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. महिला व बालकल्याण समितीकरिता 5 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. अमरावती जिल्ह्यात अतिरिक्त नवीन अंगणवाड्या सुरु करण्याच्या दृष्टीने 2 कोटी 71 लाख रुपयांचे बजेट आदिवासी विकास विभागाने केलले आहे. अमरावती जिल्ह्यात रोख स्वरुपात वाटप करण्यासाठी 45 लाख रुपये आदिवासी विभागाने प्रकल्प अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. 1,04,73,954 रुपयांचे धान्य वाटप केलेले आहे. आदिवासी उपयोजनेमधून महिला व बालकल्याण विभागाला सन 2006-07 मध्ये 33 कोटी 13 लाख रुपयांचे बजेट दिलेले आहे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील एकूण 76,445 अंगणवाड्यांपैकी 51,712 एवढ्या म्हणजे 67.65 टक्के अंगणवाड्यांमध्ये बचतगट/महिला मंडळ यांचेमार्फत शिजवलेल्या तयार आहाराचा पुरवठा सुरु करण्यात आहे. उर्वरित अंगणवाड्यांना पोषण आहाराचा पुरवठा करण्याकरिता बचतगट किंवा महिला मंडळे अस्तित्वात नाहीत काय ? नसल्यास बचतगटांची संख्या वाढविण्याकरिता काही प्रयत्न केले गेले आहेत काय ? असल्यास काय प्रयत्न केले आहेत ?

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, ज्या राहिलेल्या अंगणवाड्या आहेत त्या ठिकाणी 31 मार्चपर्यंत कंझ्युमर्स फेडरेशनमार्फत पुरवठा सुरु आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये बचत गट आहेत. बचतगटाला हे काम देण्यामध्ये कोणतीही अडचण नाही. 31 मार्चनंतर अशा प्रकारचा कोणताही खाजगी पुरवठादार राहणार नाही. सर्व ठिकाणी बचतगट आणि महिला मंडळांना काम देणार आहोत. नवीन बचतगट तयार करावयाचा असेल तर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जे बचतगट येतील त्याप्रमाणे महिला व बालकल्याण अधिकाऱ्यांनी नोंदणी करण्याच्या कामाला लागावे असे सांगितले आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, महिला बचतगट सक्षम करण्यासाठी अंगणवाड्यांना खिचडी शिजवून देण्याचे काम महिला बचतगटांना देतो. ठाणे, अमरावती, सिंधुदुर्ग, कणकवली, धुळे या ठिकाणी जे महिला बचत गट मुलांना खिचडी शिजवून देतात त्यांना गेली चार महिने पैसे देण्यात आले नाही. हे पैसे केव्हा देण्यात येईल ?

. श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली त्याबाबत जरुर चौकशी करण्यात येईल आणि पैसे दिले नसतील तर ते ताबडतोबीने देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : अमरावती जिल्ह्यात बचत गट मिळत नाहीत या म्हणण्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. 1997-98 पासून बचत गटाची योजना सुरु झाली. त्यावेळी सर्वप्रथम अमरावती जिल्ह्यातच बचत गट सुरु झाले. बचत गट तीन प्रकारचे आहेत. जिल्हा परिषदेच्या कार्यक्रमांतर्गत असलेले बचत गट, बँकांनी केलेले बचत गट आणि महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत असलेले बचत गट, असे बचत गटाचे प्रकार आहेत. हे वेगवेगळे बचत गट एकत्र करुन तालुकास्तरावर बचत गटांचा एक महासंघ तयार केला तर सर्वांना कामे मिळतील. आता प्रत्येक बचत गट कामे मिळविण्यासाठी प्रयत्न करीत असून यामधून राजकीय स्वरुपाची स्पर्धा सुरु होईल की काय अशी परिस्थिती निर्माण होत आहे. तसेच अनेक ठिकाणी दुकानदारांनी, ज्यांचे व्हेस्टेड इंटरेस्ट आहेत अशांनी, त्यांच्या बायकांना पुढे करुन बचत गट केलेले आहेत. तेव्हा बचत गटाचे स्टॅण्डर्डायझेशन करणे आवश्यक आहे. बचत गटाची आर्थिक क्षमता काय आहे, तो कसे काम करतो ह्या गोष्टी पाहिल्या गेल्या पाहिजेत. तेव्हा त्यादृष्टीने शासन पावले टाकणार आहे काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : अमरावती जिल्ह्यामध्ये 135 बचत गट आहेत. ज्यांची आर्थिक स्थिती चांगली असेल आणि जे प्रथम पुढे येतील त्यांना अंगणवाडयांचे शालेय पोषण आहाराचे काम दिले जाते. शालेय पोषण आहाराचे काम खाजगी पुरवठादाराला न देता ते बचत गटांना द्यावे असे सुप्रीम कोर्टाने आदेश दिलेले आहेत. त्यानुसार 31 मार्च नंतर हे काम बचत गटांना देण्यात येईल. आर्थिक क्षमता पाहून आणि प्रायॉरिटीनुसार बचत गटांना काम दिले जाते.

श्री. भास्कर जाधव : खाजगी पुरवठादारांना काम न देण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिलेले आहेत. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्यांमागे इंधनासाठी 50 पैसे दिले जात होते. त्यावेळी पोषण आहार शिजवून देण्याचे काम करण्यास कोणीही पुढे येत नव्हते. परंतु काही महिलांनी सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून हे काम सुरु केले. आता अनुदान वाढल्यामुळे आणि चार पैसे मिळू लागल्यामुळे महिला गट हे काम करण्यासाठी पुढे येत आहेत. आता परिस्थिती अशी आहे की, शिक्षण समितीच्या सभापतीला तसेच ग्रामपंचायतीच्या सरपंचाला हे काम कोणत्या बचत गटाला द्यावयाचे हे ठरविण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे त्यांच्या फेव्हरमधील बचत गटांनाच हे काम देण्यात येईल. म्हणून ज्या महिलांनी आधीपासून हे काम केलेले आहे त्यांच्या बाबतीत शासनाचे धोरण काय राहाणार आहे ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम : जे लोक काम करीत आहेत त्यांना काढण्याची आवश्यकता नाही.

श्री. भास्करराव जाधव : या बचत गटांना काढण्याच्या बाबतीत शिक्षण समितीचा सभापती आणि ग्रामपंचायतीचा सरपंच निर्णय घेतो.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : ज्याचे काम व्यवस्थित नसेल आणि ज्यांची तक्रार असेल त्यांना काढण्यास अडचण नाही....

श्री. भास्कर जाधव : ज्या बचत गटाबाबत तक्रारी आहेत त्यांना काढण्याच्या बाबतीत माझे काही म्हणणे नाही. परंतु जेव्हा पोषण आहार शिजवून देण्याचे काम करण्यास कोणी पुढे येत नव्हते अशा वेळी काही महिलांनी हे काम केलेले आहे. आता शिक्षण समितीचे सभापती किंवा सरपंच यांना कोणत्या बचत गटाला काम द्यावयाचे हे ठरविण्याचे अधिकार दिलेले आहेत. तेव्हा ज्या महिलांनी सुरुवातीपासून हे काम केलेले आहे त्यांच्याबाबतीत शासनाचे धोरण काय राहाणार आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : जे गट सक्षम आहेत त्यांना काम द्यावयाचे असे शासनाचे धोरण आहे. सक्षम गट कोणता हे महिला व बाल कल्याण समितीमध्ये ठरविले जाते.

---

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**विशेष उल्लेख**</u>

**पृ.शी.**: जल साक्षरता वाढविणे.
**मु.शी.**: जल साक्षरता वाढविणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"संपूर्ण जगात आज 22 मार्च रोजी जागतिक जलदिन साजरा होत आहे. मुंबई शहरातील वाढती लोकसंख्या पाहता मुंबई शहराकरिता पाण्याचे नियोजन करणे तेवढेच आवश्यक आहे. मुंबईतील पाण्याच्या विहिरी, तलाव, बोअरवेल, तळी इत्यादी नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतांचे पुनरुज्जीवन करुन त्या पाण्याचा वापर पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त अन्य कामांसाठी करणे आवश्यक आहे. तसेच राज्यात शेतीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याचे नियोजन होणे तितकेच गरजेचे आहे. राज्यातील कितीतरी पाणीपुरवठा योजना अर्धवट अवस्थेत असून त्याकरिता निधीची उपलब्धता होत नाही. यामुळे शेतकऱ्यांना पाण्याअभावी शेती करणे अशक्य होते व दुष्काळाला सामोरे जावे लागते. याची परिणती शेतकऱ्यांच्या आत्महत्येत होते. पाण्याला "जीवन" असे म्हटले. हे जीवन वाचविण्यासाठी तसेच त्याचे नियोजन करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आजच्या "जागतिक जलदिनी" या दिवशी शासनाने याबाबत ठोस पावले उचलण्यासाठी निर्णय घेण्याची गरज आहे. याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी."

सभापती महोदय, 22 मार्च हा खरे तर जागतिक स्तरावर जलदिन म्हणून साजरा होत असतो. जलदिन साजरा होत असताना 22 मार्च रोजी अर्थसंकल्प सादर होणार असल्यामुळे हा विशेष उल्लेख येऊ शकला नाही. या जलदिनाचे वैशिष्ट्य म्हणजे लोकांमध्ये जल साक्षरता निर्माण करणे. पाण्याची टंचाई असताना वाढीव पाणी मिळाले पाहिजे अशी मागणी आपण सातत्याने करीत असतो. परंतु प्रत्यक्षात त्या पाण्याचा वापर चांगल्याप्रकारे कसा होईल? विशेषत: नळ चोरीला जाणे, बोअरवेल असतील पण पंप नादुरुस्त असणे, पाणी वाया जाणे, पाण्याची चोरी होणे या संदर्भात जल साक्षरता अत्यंत महत्वाची आहे. मुंबई महानगरपालिकेच्या महापौर आणि जल



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे..........

विभागाचे विशेष कार्यकारी अधिकारी श्री.तलत शहा यांनी या संदर्भात जे सांगितले ते मी विधिमंडळामध्ये मांडत आहे. 1992 सालापासून आखलेल्या काही योजना, गारगाई व पिंजारपाणी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाकडे मदत मागितली. महाराष्ट्र शासनाने मदत दिली नसल्यामुळे परवानगी कधी देणार? या योजनेचा अभ्यास व अहवाल तयार झाला असला तरी याबद्दल अनिर्णित अवस्था महाराष्ट्र शासनाकडे आहे. म्हणून वेगवेगळया प्रतिकूल परिस्थितीत देखील मुंबई महानगरपालिका लोकांना पाणी देण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत असली तरी मुंबईच्या आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणात पाण्याची टंचाई जाणवते. म्हणून विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने प्राधान्य द्यावे. त्याचबरोबर या जलदिनाच्या निमित्ताने ग्रामीण व शहरी भागामध्ये जल साक्षरतेच्या संदर्भात जास्तीत जास्त जागृती निर्माण केली पाहिजे अशा प्रकारे मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक-4 बाबत**

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, आजच्या कामकामपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक-4 संबंधी सन्माननीय वनमंत्री यांच्याशी माझे सकाळी बोलणे झाले आहे. हा विषय महसूल व वन या दोन विभागाशी संबंधित आहे. अद्याप निवेदन आलेले नाही असे वनमंत्र्यांनी मला सांगितले. ही लक्षवेधी सूचना पुन्हा ज्यावेळी चर्चेला घेण्यात येईल त्यावेळी वन विभागाशी संबंधित उत्तर देण्याची वनमंत्र्यांनी तयारी दर्शविलेली आहे. महसूल विभागाशी संबंधित मुद्यांबाबत मी वेगळी लक्षवेधी सूचना दिलेली आहे. ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात यावी आणि वन विभागाशी संबंधित उत्तर शासनाकडून मागविण्याचे निदेश द्यावेत.

**उपसभापती** : ठीक आहे. लक्षवेधी सूचना क्रमांक-4 पुढे ढकलण्यात येत आहे.

-----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) येथील तिलारी खो-यातील बुडित क्षेत्राशेजारी अवैधपणे अफू व गांजाचे उत्पादन सुरु असणे.

**मु.शी.**: दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) येथील तिलारी खो-यातील बुडित क्षेत्राशेजारी अवैधपणे अफू व गांजाचे उत्पादन सुरु असणेबाबत श्री.परशुराम उपरकर वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग येथील तिलारी खोऱ्यातील बुडित क्षेत्राला लागूनच असलेल्या तब्बल 1400 एकराच्या जमिनीत मोठया प्रमाणात सुरु असलेली गांजा, अफूची लागवड, सदरहू जमीन ही एका बड्या राजकीय नेत्याची असल्याचे बोलले जाणे, सदरहू भागात घनदाट जंगल, पाण्याचा प्रचंड साठा, सुपीक प्रदेश व सहजासहजी कुणी पोहोचण्याची शक्यताच नसल्याने स्थानिकांना हाताशी धरुन या दुर्गम क्षेत्रात गांजा, अफूचे उत्पादन करुन त्याची तस्करी गोवा, केरळ व कर्नाटकात करण्यात येणे, गांजा व अफूचे सर्व व्यवहार हे त्यांच्या एजन्सीमार्फत करण्यात येणे, याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विशेष उल्लेखाची सूचना मी देत आहे."

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग तालुक्यातील तिलारी खोऱ्यात बुडित क्षेत्राला लागून 1400 एकर जमिनीमध्ये गांजा, अफूची लागवड केली जात आहे. बड्या राजकीय नेत्याच्या माध्यमातून ती जमीन खरेदी करण्याचे काम झाले आहे. हा राजकीय नेता कोण आहे? बड्या राजकीय नेत्याने खरेदी केलेल्या जमिनीची गावामध्ये आणि शहरामध्ये चर्चा सुरु आहे. त्या ठिकाणी एक विशिष्ट नेता जमीन खरेदी करतो, काही जमिनदारांशी करार केले, ते कोणाच्या माध्यमातून केले आहेत? अफू व गांजाचे उत्पादन सुरु असल्याचे कळल्यावरुन पोलीस तपासासाठी गेले असताना त्या ठिकाणी अफू व गांजासाठी पाणी वापर करण्यासाठी पाईपलाईन , एक झोपडी असल्याचे आढळले व अफूचा साठा पोलिसांना सापडला. पोलिसांनी गुन्हा नोंदविण्याची जी कारवाई सुरु केली होती ती कारवाई थांबली आहे. ती कोणाच्या आदेशाने? कोणाच्या दबावाखाली थांबली आहे? या संदर्भात शासनाने सभागृहाला माहिती द्यावी अशी विनंती करतो.

---------

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आशिष बेके व शलाका बेके या बहिणभावांनी फिलिपाईन्स जवळ सागरतळात पाण्याखाली 50 मिनिटे रहाण्याचा जागतिक विक्रम केल्याबाबत.

**मु. शी.** : आशिष बेके व शलाका बेके या बहिणभावांनी फिलिपाईन्स जवळ सागरतळात पाण्याखाली 50 मिनिटे रहाण्याचा जागतिक विक्रम केल्याबाबत श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी एक विशेष उल्लेखाची सूचनाा दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

फिलीपाईन्स जवळ 198 फूट खोल सागरतळात उडी मारुन 50 मिनिटे पाण्याखाली राहण्याचा जागतिक विक्रम शलाका बेके-मुंडक व श्री. आशिष बेके या बहिणभावांनी दिनांक 23 जानेवारी, 2007 रोजी जागतिक विक्रम करुन या मराठी युवकाने महाराष्ट्राचे नाव उज्वल केले आहे. फिलीपाईन्सजवळ 198 फूट खोल सागरतळ गाठणारा पहिला भारतीय व जगातील दहावा क्रमांक आशिष बेके यांनी मिळविल्याने अशा धाडशी युवकाचा शासनाने यथोचित गौरव करण्याबाबत शासने तात्काळ निवेदन करावे.

सभापती महोदय, मला आनंद आणि अभिमान वाटतो की, मुंबईतील आणि महाराष्ट्रातील आपली दोन मुले म्हणजे आशिष बेके तसेच त्याची बहीण कु. शलाका बेके मुंडक या दोघांनी फिलिपाईन्स बेटाजवळ स्कूबा डायव्हींग करुन जागतिक दर्जाचे प्राविण्य मिळविलेले आहे. ही दोन्ही भांवडे मुलुंड मधील असून त्यांनी फिलिपाईन्स जवळ महायुध्दात जे फिफ्थ टँक बुडाले होते त्यांना स्पर्श करण्याच्या जागतिक स्पर्धेत भाग घेऊन समुद्रात 198 फूट खोल जाऊन टँकला स्पर्श केलेला आहे. आतापर्यंत 9 युवक फिफ्थ टँकला स्पर्श करण्यात यशस्वी झालेले असून आशिष बेके हा युवक हा 10 वा तरुण आहे. तसेच शलाका बेके या मुलीने 196 फूट खोल जाऊन तीन फिफ्थ टँकला स्पर्श केलेला आहे. जगातील ही पाचवी तरुणी असून या बेके भावंडांचे मी विशेष उल्लेखाच्या निमित्ताने अभिनंदन करतो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

या विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या संदर्भात मी महाराष्ट्र शासनाचे लक्ष आकर्षित करु इच्छितो की, या दोन्ही मुलांचा शासनाने गौरव करावा, त्यांना शिवछत्रपती पुरस्कार द्यावा. या मुंबईतील मुलांनी वेगळया क्षेत्रात विशेष विक्रम केलेला आहे. संपूर्ण भारतात ही दोन्ही मुले पहिली आलेली आहेत. या मुलांमुळे नवीन मुलांचे क्षितीज ऊचावणार आहे, नवीन दालन उघडणार आहे. त्यामुळे शासनाने या मुलांचे यथोचित गौरव करावा अशी मी विनंती करतो.

-------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अलिबाग तालुक्यातील रायगड जिल्हा उद्योग केंद्राच्या इमारतीची झालेली दुरवस्था.

**मु. शी.** : अलिबाग तालुक्यातील रायगड जिल्हा उद्योग केंद्राच्या इमारतीच्या झालेल्या दूरावस्थेबाबत श्री.जयंत प्र.पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी एक विशेष उल्लेखाची सूचनाा दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र.पाटील ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"शासनाच्या विविध योजना लाभार्थीपर्यंत पोचविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या अलिबागच्या रायगड जिल्हा उद्योग केंद्राच्या इमारतीची खूपच दूरावस्था झालेली असून ही इमारत शेवटची घटका मोजत आहे. राज्यातील प्रत्येक जिल्हयात एक जिल्हा उद्योग केंद्र असावे, अशी केंद्र सरकारची योजना होती. त्यानुसार अलिबाग शहरातील रायगड बाजारासमोरची 4 हजार स्क्वेअर मीटर जागा सरकारने अलिबाग नगरपालिकेकडून 7 लाखाला खरेदी केली होती. त्यांनंतर त्या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने 1971 मध्ये जिल्हा उद्योग केंद्राच्या इमारतीची उभारणी केली.

सध्या या इमारतीत जिल्हा उद्योग केंद्रासह महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, खादी ग्रामोद्योग केंद्र, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र आणि मिटकॉन विभाग कार्यरत आहेत. सुशिक्षित बेरोजगारांसाठी बीज भांडवल, अर्थसाहय योजना, उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना आणि जिल्हा पातळीवरील लघु उद्योजकांना पुरस्कार आदी योजना जिल्हा उद्योग केंद्रातर्फे राबविल्या जात आहेत.

केंद्राच्या इमारतीची झालेली दूरावस्था पाहता विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी जीव मुठीत घेऊन आपापली सेवा बजावित आहेत. केंद्राच्या इमारतीच्या मुख्य लोखंडी दाराची मोडतोड झालेली आहे. इमारतीच्या आत प्रवेश करताच इमारतीमधील ठिकठिकाणी छतातून लोखंडी सळया बाहेर डोकावतात.

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.......

या इमारतीची दुरुस्ती व्हावी यासाठी सन 2000 मध्ये 7.13 हजारांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यावेळी इमारतीची दुरुस्ती न झाल्याने त्यानंतर बांधकाम साहित्याच्या दरात वाढ झाली आणि हे अंदाजपत्रक 9 लाख 50 हजारापर्यंत गेले आहे. इमारतीच्या तात्पुरत्या दुरुस्तीसाठी येणारा मोठा खर्च लक्षात घेंता सध्याची इमारत पाडून त्या जागी नवीन इमारत बांधण्याचा प्रस्ताव शासनाने मान्य करावा यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

----------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नाशिकमधील यशवंत व्यायामशाळेच्या जमिनीचा भाडेपट्टा करार वाढवून मिळणे

**मु. शी.** : नाशिकमधील यशवंत व्यायामशाळेच्या जमिनीचा भाडेपट्टा करार वाढवून मिळणे याबाबत श्री. प्रतापराव सोनवणे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.प्रतापराव सोनवणे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.प्रतापराव सोनवणे ( नाशिक विभाग पदवीधर ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, नाशिकचे वैभव असलेली "यशवंत व्यायामशाळा" 1 मार्च 1917 रोजी स्थापन झाली आहे. गेली 90 वर्षे अखंडपणे व्यायाम व क्रीडाक्षेत्रात कार्य करणारी "श्री यशवंत व्यायामशाळा" ही केवळ नाशिकमधील नव्हे तर महाराष्ट्रातील एक नामवंत व अग्रगण्य अशी व्यायामशाळा आहे.

सभापती महोदय, यशवंत व्यायामशाळा ही नाशिकचे वैभव आहे. नाशिकचा इतिहास सांगणारी संस्था आहे. वेगवेगळे व्यायाप्रकार, योगासने त्याचप्रमाणे विविध खेळ सदर शाळेमार्फत घेतले जातात. व्यायाम व क्रीडा प्रकारांचा लाभ रोज अंदाजे 500 स्त्री-पुरुष व अनेक बालगोपाळ, व्यायामप्रेमी घेतात. संस्थेनेसुध्दा लाखो रुपये खर्च करुन, चांगली इमारत बांधून आधुनिक सुविधा पुरविल्या आहेत.

सदर व्यायामशाळेस भाडेपट्टाकराराची मुदत यापूर्वी वेळोवेळी शासनाने वाढवून दिली आहे. मात्र संस्थेने वारंवार विनंती करुनही जुलै 1992 पासून शासनाने भाडेपट्टाकरारास मुदतवाढ दिलेली नाही. आता तर सदर व्यायामशाळेची जागा ही शासन जमा करण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत अशी माहिती मिळते आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रतापराव सोनवणे........

या बातमीमुळे क्रीडाक्षेत्रात मोठी खळबळ उडालेली असून मोठा जनक्षोभ तयार झाला आहे शासनाचा हा निर्णय हाणून पाडण्यासाठी आंदोलनाचा व प्रसंगी रस्त्यावर येण्याचा इशारा अनेक नागरिकांनी, क्रीडाप्रेमींनी दिला आहे.

"राष्ट्राच्या रक्षणाला व्यायाममंत्र घ्यावा" असे ब्रीद वाक्य ज्या संस्थेचे आहे, समाजाच्या आणि राष्ट्राच्या सेवेसाठी बलवान, निरोगी स्वाभिमानी व शूर विद्यार्थी, तरुणवर्ग, महिला तयार करणे हा ज्या संस्थेचा हेतू आहे. अशा संस्थेच्या बाबतीत शासनाने अशी काही भूमिका घेणे अत्यंत धक्कादायक व क्लेषकारक आहे.

तेव्हा शासनाने सदर जागा ताब्यात घेण्याबाबत काही निर्णय घेतला असेल तर तो त्वरित रद्द करावा. तसेच संस्थेचा भाडेपट्टा कराराची मुदत त्वरित वाढवून द्यावी आणि जनतेचा, नागरिकांचा दुवा घ्यावा अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मागणी करतो आहे.

--------------

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आमच्या अगोदरच्या विशेष उल्लेख सूचनांचे काय झाले ? आपण आम्हाला सांगितले होते की, तुम्हास नंतर संधी देण्यात येईल.

**उपसभापती** : आज विशेष उल्लेखाच्या ज्या सूचना आल्या होत्या त्या मांडण्याची मी परवानगी दिलेली आहे. अगोदरच्या राहिलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना मांडण्याची संधी उद्या देण्यात येईल.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.00 वाजता पुन: भरेल

( दुपारी 2.17 ते 3.00 पर्यंत मध्यंतर )

यानंतर कु.गायकवाड.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी : माननीय सभापती)**

**<u>सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसण्याबाबत.</u>**

श्रीमती नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

**सभापती** : मी सभागृहाचे कामकाज दहा मिनिटाकरीता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 3.00 वाजता 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

यानंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी : माननीय सभापती)**

**शासकीय विधेयकाबाबत**

**सभापती** : कार्यक्रम पत्रिकेत दर्शविण्यात आलेले वि.स.वि.क्रमांक 16-महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक विधानसभेकडून संमत होऊन आल्यानंतर चर्चेला घेऊ. आता आपण वि.स.वि.क्रमांक 9-महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व निनियमन) (सुधारणा) विधेयक चर्चेला घेऊ.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन विधेयकावर सभागृहात 2/4 तास चर्चा होईल. विरोधी पक्षाने नियम 260 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. हा प्रस्ताव देखील महत्वाचा आहे. जर विधेयक अगोदर चर्चेला घेतले तर प्रस्तावावरील चर्चेला वेळ उरणार नाही. त्यामुळे शासकीय विधेयके नंतर चर्चेला घ्यावीत, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : यामधून मी मार्ग काढण्याचे ठरविले आहे. आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर शासकीय विधेयके-विधानसभेने संमत केल्याप्रमाणे-विचार, खंडश: विचार व संमत करणे यामध्ये तीन विधेयके दर्शविण्यात आली आहेत. पैकी वि.स.वि.क्रमांक 9-महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन विधेयक हे आता चर्चेला घेऊ व उर्वरित दोन विधेयके नंतर घेऊ.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विरोधी पक्षाने जो प्रस्ताव दिला आहे तो मराठी भाषेच्या वापरासंबंधीचा अतिशय महत्वाचा प्रस्ताव आहे. त्यामुळे या प्रस्तावाला न्याय देण्यासाठी विधेयके नंतर चर्चेला घ्यावीत, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : या प्रस्तावाला न्याय देण्याच्या उद्देशानेच मी हा मध्यम मार्ग काढला होता.

श्री.हर्षवर्धन पाटील (पणन मंत्री) : सभापती महोदय, पणन विभागाचे वि.स.वि.क्रमांक 9 कार्यक्रम पत्रिकेत दाखविण्यात आले आहे. या विधेयकान्वये छोटी दुरुस्ती करण्यात येत आहे. कृषि उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक यापूर्वी जिल्हाधिका-यांमार्फत घेण्यात येत होती, आता ती सहकार विभागामार्फत घेण्यात येईल, एवढी दुरुस्ती या कायद्यामध्ये करण्यात येत आहे. 1 एप्रिल,2007 पासून कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम आपण सुरु करीत

..2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.........

आहोत. विधानसभेने हे विधेयक मंजूर केलेले आहे. आज जर हे विधेयक विधानपरिषदेने संमत केले तर आपण 1 एप्रिल 2007 पासून निवडणूक कार्यक्रमाची अंमलबजावणी करु शकतो. म्हणून सभागृहाला माझी विनंती आहे की, सदर विधेयक आता चर्चेला घ्यावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विधेयकावर 2/3 तास चर्चा होईल व त्यामुळे विरोधी पक्षाने दिलेल्या प्रस्तावाला वेळ उरणार नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांकडून अशी मागणी करण्यात आली आहे की, सोमवार, दिनांक 2 एप्रिल 2007 रोजी जिल्हा परिषदांच्या सभापतींची निवडणूक असल्यामुळे त्या दिवशी सभागृहाचे कामकाज ठेवू नये. आज दुपारी कामकाज सल्लागार समितीची बैठक आहे. राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक बराच काळ होऊ शकलेली नाही व त्या संदर्भात दुरुस्ती आणलेली आहे. 5 कोटी रुपयांच्या आत ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे उत्पन्न आहे त्यांच्या निवडणुका सहकार खात्यामार्फत व 5 कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असणा-या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुका जिल्हाधिका-यांमार्फत घेण्यात याव्यात, अशा प्रकारची ही दुरुस्ती आहे. ही सर्व परिस्थिती लक्षात धेऊन माझी सदनाला विनंती आहे की, या विधेयकावर सभागृहात चर्चा सुरु करावी.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या विधेयकावर सन्माननीय सदस्यांना सविस्तर बोलावयाचे आहे...

**सभापती** : सन्माननीय सदस्य, श्री.श्रीकांत जोशी यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या विषयीच्या भावना व्यक्त केल्या आहेत. मी आपल्याला परवानगी दिलेली नाही.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक 1-मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी विनियमन विधेयक देखील अतिशय महत्वाचे आहे. त्यामुळे या विधेयकावर देखील आज चर्चा घेतली तर बरे होईल. या विधेयकान्वये छोटी दुरुस्ती आणलेली आहे. या विधेयकाची तातडी लक्षात घेऊन, आजच या विधेयकावर चर्चा घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय मंत्री महोदय श्री.हर्षवर्धन पाटील एका वेळी एकाच विधेयकाबद्दल बोला.

श्री.मधुकर सरपोतदार : महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्वाचा असा मराठीच्या वापराविषयीचा प्रस्ताव आम्ही येथे चर्चेसाठी आणला आहे, आमची एक छोटीशी विनंती आहे की, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवरील सर्व विधेयके पुढे ढकलण्यात येऊन सदर प्रस्ताव चर्चेसाठी घेण्यात यावा. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून व महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन आज 60 वर्ष झाली तरीदेखील मराठी भाषेला न्याय मिळालेला नाही.

**सभापती** : मी दोन्ही बाजूच्या सदस्यांची मते अजमावलेली आहेत. आजचे जे शासकीय कामकाज आहे, त्यामध्ये जे महाराष्ट्र विनियोजन विधेयक आहे, ते ज्यावेळी विधानसभेकडून येथे येईल, त्या वेळी ते या सभागृहात चर्चेला घेण्यात येईल. या व्यतिरिक्त महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन ( विकास व विनियमन ) ( सुधारणा ) विधेयकावर या सभागृहात चर्चा घेण्यात येईल, त्यानंतर सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जो म.वि.प.नियम 260 अन्वये जो प्रस्ताव सभागृहात चर्चेकरिता आणलेला आहे तो घेण्यात येईल व त्यानंतरची दोन्हीही विधेयके आज चर्चेसाठी घेण्यात येणार नाहीत.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कृषि उत्पन्न पणन ( विकास व विनियमन ) ( सुधारणा ) विधेयक.

L. A. BILL NO. IX OF 2007.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING ( DEVELOPMENT AND REGULATION ) ACT,1963.)

श्री.जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार,पणन,वस्त्रोद्योग,व्यसनमुक्ती कार्य राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय,विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 9, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन ( विकास व विनियमन ) अधिनियम,1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : महोदय,मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 9, सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 9 महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन ( विकास व विनियमन ) अधिनियम,1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

श्री.मधुकर सरपोतदार : महोदय, अशाच पध्दतीने सभागृहाचे कामकाज चालवायचे का ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : यापूर्वी राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूका जिल्हाधिका-यांमार्फत होत होत्या. जिल्हाधिका-यांकडे वाढलेला कामाचा ताण लक्षात घेता......

( गोंधळ )

श्री.मधुकर सरपोतदार : सदर विधेयक आता चर्चेला घेण्यास आमचा विरोध यासाठी आहे की, या सदनामध्ये या विधेयकाच्या निमित्ताने एखादा कायदा पास होत असतांना त्या कायद्यावर काळजीपूर्वक साधकबाधक अशा प्रकारची चर्चा झाली पाहिजे आणि त्यामध्ये काही उणीवा,सूचना,सुधारणा असतील तर त्या आम्हाला सांगता यावयाला पाहिजे. लोकांनाही त्यामध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली पाहिजे. यापूर्वी या सभागृहामध्ये अर्थसंकल्पावरील सात दिवसांची

PP -3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





श्री.मधुकर सरपोतदार.......

चर्चा एका दिवसात संपविण्यात यावी, अशा प्रकारचा प्रस्ताव आणला जातो, याचा अर्थ काय ? हे लोकशाहीचे राज्य आहे का ? अशाच प्रकारे कामे रेटून न्यावयाची ही कोणती पध्दत आहे ? आपला जर आग्रह असेल तर आपण असेच करावे, आमच्यातील कोणीही यावर काहीही बोलणार नाही.

**सभापती** : आपला विधेयकावर वा अन्य कोणत्याही गोष्टींवर बोलण्याचा जो अधिकार आहे त्यावर कोणालाही बंधन घालता येणार नाही.

श्री.दिवाकर रावते : महोदय, आपण दोन्ही बाजूच्या सदस्यांचा आदर करुन आजच्या कामकाजाच्या संदर्भात जे निदेश दिले, त्याबद्दल मी धन्यवाद देतो. आपण ज्या वेळेला सांगितले की, आज फक्त एक विधेयक चर्चेकरिता घेण्यात येईल, त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी असे गृहित धरले की, विधेयक मांडल्यानंतर थोडेसे काहीतरी बोलावयाचे आणि मोकळे व्हावयाचे, सदर विधेयक मांडतांना ते विधेयक कशासाठी आणले आहे ? त्याचा उद्देश व हेतू काय आहे ? हे काहीही सांगितले नाही. ही जी सरकारची प्रवृत्ती आहे, ती अत्यंत खेदजनक आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सन्माननीय हर्षवर्धन पाटील यांनी सुरुवातीलाच सदर बिलाचा हेतू व उद्देश या सभागृहासमोर स्पष्ट केला होता की, ज्या कृषि उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्न पाच कोटीच्या वर असेल त्यांच्या निवडणुका जिल्हाधिका-यांकडून होतील आणि जिल्हाधिका-यांकडे कामाचा ताण असल्यामुळे या निवडणुका सहकार खात्याच्या अधिका-यांचीच मदत घेऊन घेतल्या जातात. ज्या कृषि उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्न पाच कोटी रुपयांच्या वर असेल त्या समित्यांच्याच निवडणुका जिल्हाधिका-यांमार्फत घेतल्या जातील, उर्वरित ज्या बाजार समित्यांचे उत्पन्न पाच कोटीच्या खाली असेल त्यांच्या निवडणुका सहकार खात्याच्या डी.डी.आर.यांच्याकडून घेतल्या जातील. जिल्हाधिका-यांवर येणारा कामाचा ताण कमी करता यावा, हाच या विधेयकाचा एकमेव उद्देश व हेतू आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.भास्कर जाधव)**

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे. ग्रामीण भागाच्या अर्थव्यवस्थेचा अत्यंत महत्वाचा गाभा असलेले हे विधेयक आहे. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन अधिनियम 1963 अन्वये जे विधेयक मांडण्यात आले आहे ते खरे म्हणजे महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेतील सहकाराचा सत्यानाश करुन संपूर्ण देश मल्टी नॅशनल कंपनीच्या ताब्यात देण्याच्या दृष्टीकोनातून उचललेले पाऊल आहे. आज आपण कृषि उत्पन्न बाजार समित्या मोडकळीस काढत आहोत. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये आय.ए.एस. अधिकारी अडकू नयेत म्हणून त्यांना बाजूला करुन डी.डी.आर. नावाच्या सर्व सामान्य माणसाच्या हातात अधिकार देऊन कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे कंबरडे मोडण्याचे, रिलायन्सचे मॉल्स वेगवेगळया ठिकाणी उभे करण्याचे आणि मार्केट कमिटीमध्ये धिंगाणा घालण्याचा प्रयत्न केले जात आहेत. आज निवडणुकीचे अधिकार जिल्हाधिका-यांकडे असतांना सुध्दा आर्थिक दुर्बल घटकातून निवडणुकीसाठी उभे राहिलेले जे सभासद असतात त्यांच्या तीन-तीन मजली बिल्डींग असतात. त्याच्या विरुध्दचे ऑब्जेक्शन कलेक्टर तेथे असतांना सुध्दा मार्गी लागत नाहीत. या विधेयकामध्ये अत्यंत गंभीर मुद्दे दडलेले आहेत. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. जिल्हाधिकारी हे आय.ए.एस. अधिकारी असतात. त्यांना महत्वाचे स्थान असते. शिवाय निवडणुका घेणे ही ज्युडिशिअरी प्रोसेस आहे. निवडणुकांना महाराष्ट्रामध्ये वेगळे वैशिष्टय राहिलेले आहे. जिल्हाधिका-यांना जाणीवपूर्वक कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकीचे अधिकार दिलेले आहेत. डी.डी.आर.ची बदली करण्याचे अधिकार सरकारला आहेत, त्यांच्यावर कारवाई करण्याचे अधिकार सरकारला आहेत, त्यांना घरी पाठविण्याचे अधिकार सहकार मंत्र्यांना आहेत. डी.डी.आर. च्या ताब्यामध्ये जर निवडणुकीचे अधिकार दिले तर सहकार चळवळ आणि महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्था मोडीत काढावयास निघालो आहोत, अशा प्रकारचा संदेश आपण या विधेयकाच्या माध्यमातून देत आहोत, असा सर्वांचा समज होईल. या विधेयकाला विरोध करण्यासाठी मी उभा आहे. या विधेयकातील महत्वाचे धोके आपण समजून घेऊ शकता काय ? म्हणून आम्ही माननीय सहकार राज्यमंत्र्यांना प्रश्न विचारला की, महाराष्ट्रातील किती कृषि उत्पन्न बाजार समित्या 5 कोटी पेक्षा जास्त उत्पन्न गोळा करतात ? 286 कृषि उत्पन्न बाजार समित्यांपैकी 3-4 कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे उत्पन्न 5

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम कु.खर्चे ........ 15:15

श्री.श्रीकांत जोशी ........

कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे त्यांची नावे माननीय सहकार राज्यमंत्र्यांनी सांगितली. हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांची नावे माननीय सहकार राज्यमंत्र्यांनी सांगितली. त्यांनी चार कृषि उत्पन्न बाजार समित्यांची नावे सांगितली असली तरी त्या 10 पेक्षा जास्त नाहीत. म्हणजे 280 कृषि उत्पन्न बाजार समित्यांवर वरवंटा फिरणार आहे. सरकार यातून पळ काढत आहे आणि डी.डी.आर.च्या हातात निवडणुकीचे अधिकार देत आहे. मल्टी नॅशनल कंपनीच्या हातामध्ये निवडणुकीचे अधिकार आपण देत आहोत, अशी परिस्थिती आहे. सभापती महोदय, सध्या ज्या पद्धतीने निवडणुका होतात त्यावर प्रशासक नेमला जातो. आजच आपण प्रश्नोत्तराच्या तासामध्ये बघितले की, मंठा कृषि उत्पन्न बाजार समितीचे प्लॉट मनमानी पद्धतीने वाटले. शेवटी लोकांना न्यायालयामध्ये जाऊन न्याय घ्यावा लागला. सभापती महोदय, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शेतक-यांनी आपला माल कोठे विकावयाचा ? कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा विकास करण्याची प्राथमिक जबाबदारी शासनाची आहे. कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने त्यामध्ये गुंतवणूक करुन निवडणुका व्यवस्थित होतील आणि वेळेत होतील आणि त्या निवडणुकांमध्ये पारदर्शक कशा होतील याची काळजी घेण्याची आवश्यकता असतांना उलटया दिशेने पाऊल उचलले जात आहे. 5 कोटी पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या म्हणजे महाराष्ट्रातील 280 कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकांचे अधिकार डी.डी.आर.ला देण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातील कृषि उत्पन्न बाजार समित्या मजबूत करणे, तेथे इन्फ्रास्ट्रक्चर देणे, तेथे उत्पन्न जरी कमी झाले तरी मोठया प्रमाणावर उलढाल होणे आजच्या काळात गरजेचे आहे. सभापती महोदय, तालुका स्तरावर रिलायन्स कंपनीचे अधिकारी जागा शोधत आहेत. परवा रिलायन्स कंपनीचे अधिकारी पैठणमधील बिडकीन गावामध्ये जागा शोधत होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.गागरे .........

श्री.श्रीकांत जोशी .....

रिलायन्स कंपनीला 35 एकराची जागा हवी आहे. अशा प्रकारामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला आव्हान निर्माण झालेले आहे. रिलायन्स सारख्या कंपन्या ग्रामीण भागातील शेतीमालाची खरेदी करुन मोठया शहराजवळील बिडकीन गावासारख्या ठिकाणी साठवून ठेवणार आहेत. त्याच बरोबर पंजाबसारख्या राज्यात किंवा महाराष्ट्रात स्वस्त माल खरेदी विक्रीसाठी मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणी स्टोअरेज करणार आहे. या पुढील काळात भारतभर फळे, भाजीपाला विमानाद्वारे वाहतूक करुन त्याचे वाटप करण्याचा या कंपन्यांचा हेतू आहे. रिलायन्स किंवा मल्टीनॅशनल कंपन्या महाराष्ट्रातील खेडयापाडयात फिरत आहेत. शहर व तालुक्यापर्यत मोठमोठे मॉल्स उभारत आहेत. भारत देश अशा मोठया उद्योगपतींच्या हातात द्यावयाचा का ? हा देश सर्वसामान्यांचा राहणार आहे की नाही ? असा महत्वाचा प्रश्न मी विचारत आहे. पूर्वी इस्ट इंडिया कंपनीने आपला देश ताब्यात धेतला होता. आता सर्व मल्टीनॅशनल कंपन्या व मोठमोठे उद्योग देश ताब्यात घेत आहेत. त्यांच्या हातात देश जाणार असेल तर, या देशातील सामान्य शेतकरी कशा पध्दतीने जगेल हा महत्वाचा प्रश्न आहे. हे सर्व रोखण्यासाठी योग्य वेळी पावले उचलणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, कलेक्टरकडून या निवडणुका काढून घेऊन त्या डी.डी.आर. च्या ताब्यात देण्याबाबत विधेयकामध्ये दुरुस्ती प्रस्तावित केलेली आहे. डी.डी.आर.कडे निवडणुका आल्यानंतर हळूहळू त्या निवडणुकीत रिंग करुन, त्यात पाहिजे ती माणसे घुसविली जातील. नवीन कृषी उत्पन्न बाजार समितीचे अधिकार तालुका स्तरावरील कृषी उत्पन्न बाजार समितीला देण्यात येत आहेत. कृषी उत्पन्न बाजार समितीबाबत डी.डी.आर.ने एकदा ठरविले की, तेथील निवडणुकीचा विषयच संपेल. एखाद्या डी.डी.आर. ला बदली करुन आणले, आणि कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुका त्याने मॅनेज केल्या तर तेथे पाहिजे त्याची सत्ता येऊ शकते. निवडणूक पूर्व काम करताना मतदार यादी करावी लागते. आर्थिक दुर्बल घटक, मागासवर्गीय, राखीव, महिला या सर्व घटकांसाठी वेगवेगळे गट व याद्या असतात. निवडणूकीत फॉर्म ॲक्सेप्टन्स, रिजेक्शन, ऑब्जेक्शनची प्रोसीजर असते. अंतिम मतदार यादी तयार करताना मागील थकबाकी, विविध



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.....

कार्यकारी सोसायटयांची थकबाकी या सर्व गोष्टीचा विचार केला जातो. सध्या सहकार क्षेत्राचे आपण अवलोकन आपण केले तर असे लक्षात येईल की, या क्षेत्रात भंयकर गोंधळ निर्माण झालेला आहे. सहकार क्षेत्राची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. मागील पाच वर्षात साखर कारखाने किंवा इतर सहकार क्षेत्रात कोणतेही चांगले काम केल्याचे दिसले नाही. सहकार क्षेत्राची दिवसेंदिवस अधोगती होत चालली आहे. सध्या ऊस गाळपाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. ऊसाच्या प्रश्नाच्या बाबतीत दिनांक 31.3.2007 रोजी बैठक घेण्यात येईल असे सहकारमंत्री डॉ.पंतगराव कदम यांनी सांगितले. मी मंत्री महोदयांना वेळोवेळी विनंती केली होती की, प्रत्येक गावनिहाय ॲग्रीकल्चर प्रॉडक्टचा डाटा सबमीट करा, परंतु त्यांनी अद्यापही त्यांना डाटा सबमीट केलेला नाही, हा डाटा लवकर सबमीट केला तर मी त्यांचा आभारी राहीन. खरीप हंगामाच्या मिटींगमध्ये मी ॲग्रीकल्चर विभागाच्या कामाबाबत बऱ्याच वेळा माननीय मुख्यमंत्र्यांना विचारले होते, त्यावेळी माननीय मंत्री महोदयही उपस्थित होते. मी बोलताना त्यांना असे वाटत होते की, हे आमच्यावर रागवत आहेत. परंतु माझे म्हणणे आहे की, 16 महिन्यापासून ऊस उभा आहे, तुम्ही कसे नियोजन करणार आहात ? आता दिनांक 31.3.2007 रोजी बैठक घेऊन सहकारमंत्री डॉ.पतंगराव कदम हे नियोजन करणार आहेत असे समजले. 200 कि.मी. अंतरावरुन ऊस इकडून तिकडे नेला जाणार आहे, ट्रान्सपोर्टसाठी सबसिडी दिली जाणार आहे. परंतु कधी देणार ? कोणाच्या हस्ते देणार ? शेतकऱ्यांनी गळफास घेतल्यानंतर काय देणार ? हा प्रश्न आहे. ट्रान्सपोर्ट सबसिडीची बातमी ऐकल्यानंतर मराठवाडयातील गंगाखेड भागातील आणि गोदावरी नदीच्या काठावरील शेतकऱ्यांचे ऊस धडाधड नगर जिल्हयातील साखर कारखान्याकडे गाळपासाठी निघाले आहेत. कारण त्यांना ट्रान्सर्पोट सबसिडी मिळणार आहे. ऊसाचा 200 कि.मी. चा प्रवास घडवून आणून 900 रुपये ट्रान्सर्पोटमध्ये घालण्यासाठी शासन चालले आहे. सध्या शेतकरी स्वत:च्या हाताने ऊस कापतात, स्वत:च्या हाताने ट्रक भरतात आणि जो कारखाना ऊस घेईल त्याकडे निघाले आहेत. ज्या कारखान्याकडे लवकर गाळप करता येईल अशा ठिकाणी ऊस दिला जात आहे, ग्रामीण अर्थव्यवस्थेची अशी दुरावस्था होत आहे. यावरुन असे दिसून येते की, सहकार खाते

.....3



PNG/ KGS/ MAP/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.....

अत्यंत गंभीर परिस्थितीत आहे. सहकार खात्यास स्वत:चीच कामे उरकत नसताना आणि आता सहकार खात्याकडे 280 कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीचे संचलन देण्याचा जावईशोध सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना सापडला. सभागृहात बिल सबमीट करुन ते निघून गेले आणि आता लवकरात लवकर बिल मंजूर करण्यासाठी मागे लागले आहेत. सभापती महोदय, मला समजले नाही की, या मागे कोणते लॉजिक वापरले जात आहे. मंत्री महोदयांचे म्हणणे आहे की, जिल्हाधिकाऱ्यांना वेळ नसतो त्यामुळे डी.डी.आर.कडे निवडणुका देण्यात येत आहे. माझे म्हणणे आहे एका जिल्हाधिकाऱ्याकडे फार तर 5, 7 ते 10 मार्केट कमिटया असतात, प्रत्येक जिल्हयामध्ये 7-8 तालुके असतात. जिल्हयामध्ये जिल्हाधिकारी नसेल तर अतिरिक्त जिल्हाधिकारी असतो. अतिरिक्त जिल्हाधिकारी नसेल तर विभागीय आयुक्तांकडे 2-3 कलेक्टर दर्जाचे अधिकारी असतात. ते नसतील तर कामाचे विकेंद्रीकरण करुन अधिकारी डेप्युट केले जाऊ शकतात. नको वाटणारे आय.ए.एस. अधिकारी विविध महामंडळावर चिकटून दिलेले असतात. त्यांना तात्पुरते डेप्युट करता येते, निवडणुकीतील प्रोसीजरपुरते त्यांना बोलावू शकता, डेप्युटी कलेक्टरांना पॉवर डेलीगेट करता येतात.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 15:35

श्री. श्रीकांत जोशी .....

आणि मग त्या दृष्टीकोनातून पाहिल्यास महसूल विभागाकडे निवडणुका घेण्याचा वर्षानुवर्षांचा अनुभव आहे. त्यात मग मतदार याद्या नीट झालेल्या आहेत की नाही, त्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत की नाही ? हे पाहिले जाते. नाही तर ते वर्तमानपत्र घरात, मतदार यादी देखील घरात आणि केवळ 'छापले' म्हणून नुसते जाहीर केले आणि नंतर ती निवडणूक देखील गुंडाळून टाकली. अशा पद्धतीची परिस्थिती होऊ लागली तर या निवडणुका खऱ्या अर्थाने बोगस ठरतील आणि मग एखादा धनिक त्या संपूर्ण बाजार समितीचा ताबा घेऊ शकतो. म्हणून मला सांगावयाचे आहे की, यामध्ये महसूल म्हणजे गव्हर्नन्स हा या पद्धतीने सोडून देऊ लागलो तर पुढील काळात फार मोठी चिंताजनक परिस्थिती निर्माण होणार आहे. यातून परिणाम असा होणार आहे की, तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती सध्याच स्प्रेडमध्ये आहे, खूप मोठ्या प्रमाणावर आपण मागे पडतो आहोत. आपली खऱ्या अर्थाने देश म्हणून बघत असताना जी रूरल ग्रोथ सेंटर्स आहेत, आज एखाद्या जिल्हा परिषद ग्रोथ सेंटरला आपण गेलात तर आठवडी बाजारामध्ये 40-50 लाख, कोटी, दोन कोटी, तर काही ठिकाणी 5 कोटीची देखील उलाढाल होते. माननीय सहकार राज्यमंत्र्यांच्याकडे जवळा बाजार असेल किंवा अजून मी 10 गावांची नावे सांगू शकतो, हिंगोली जिल्ह्यातील व तालुक्यातील, की तेथील आठवडी बाजार प्रचंड फुललेले असतात. आज त्या दृष्टीकोनातून तेथे कृषी उत्पन्न बाजार समितीचे एखादे सेंटर एस्टाब्लिश करून, शासनाची इक्विटी टाकून, इन्फ्रास्ट्रक्चर उभे करून तेथील रूरल मार्केट ग्रोथ सेंटर विकसित करणे ही काळाची गरज आहे. सभापती महोदय, हे न करता आता हे सारे कोणाच्या ताब्यात आपण देणार आहात ? सरकारी अधिकाऱ्यांच्या हाती देणार आहात का ? आपण लोकशाही पद्धत मानतो आहोत आणि असे असेल तर सरकारी अधिकाऱ्यांच्या ताब्यात हे सारे आपण देऊ शकत नाही. म्हणजेच तेथे लोकनियुक्त प्रशासन आले पाहिजे आणि लोकनियुक्त प्रशासन तेथे आणावयाचे असेल तर निवडणुका घेऊनच ते तेथे येऊ शकते. तसे असेल तर मग या निवडणुकांचे संचालन कोणी करायचे ? आपण कल्पना करा की, नांदेडचा डीडीआर आहे आणि त्याने माहूर येथील छोटीशी कृषी उत्पन्न बाजार समिती असेल तर त्या समितीची निवडणूक कशी झाली असेल हे आता आपल्या या करणीमुळे जिल्हाधिकारी पाहू शकणार नाही. आणि ते सारे आपला डीडीआर बघणार आहे आणि तो नीट करणार आहे, हे स्वप्न आपल्याला कशामुळे पडले ? या आपल्या डीडीआरना

....... एसएस 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

आपण त्या दृष्टीने प्रशिक्षण दिलेले आहे काय ? सभापती महोदय, आज डीडीआर कार्यालयात गेलो आणि त्या डीडीआरला कोठल्याही चार प्रश्नांची माहिती विचारली तर तो म्हणतो हे आमच्या कायद्यात नाही. मी त्यांना विचारले की, तुमच्याकडे सहकारी साखर कारखाने किती आहेत ? सगळ्या सहकारी कारखान्यांच्या सगळ्या भागधारकाचे ऊसाचे उत्पादन जास्त आहे त्यामुळे जर त्यांचा ऊस आपण नेऊ शकलो नाही तर त्या ऊसाचा विमा काढता येतो का ? त्या साध्या प्रश्नाची माहिती तो देऊ शकला नाही. उलट त्याने सांगितले की, आमदार साहेब आम्ही सहकारी साखर कारखान्यांच्या भागधारकांची यादी तुम्हाला देऊ शकत नाही. तुम्ही सभासद असता तर आम्ही जरूर देऊ शकलो असतो. आज मराठवाड्यामध्ये केवळ सहकारी साखर कारखान्यांच्या भागधारकांची यादी मागणारी शेकडो प्रकरणे पेंडींग आहेत, सभासद होण्यासाठी शेकडो प्रकरणे पेंडींग आहेत. कर्जाची तर इतकी वाईट परिस्थित्ी आहे की, परवा एका शेतकऱ्याने हायकोर्टात रिट पिटीशन दाखल केलेले आहे. विविध कार्यकारी सोसायटीमध्ये कर्ज घेतल्यास जितके मुद्दल आहे त्यापेक्षा जास्त व्याज घेतले जाऊ नये असे म्हणत असताना देखील 10-10 पट व्याज वसूल झालेले आहे त्या विषयी कोठल्याही सहकारी बँका वा डीडीआर सूचना करावयास तयार नाहीत. एका बाजूला आपले सहकार खाते महसूल खात्यापेक्षाही अडचणीमध्ये असताना, कामाच्या ओझ्याखाली दबलेले असताना, त्यांच्याकडे निवडणुका घेण्याचे काम सोपवून आपण अधिक अडचणीमध्ये आणण्याचे काम का करीत आहात ? तेव्हा त्या गोष्टीला माझा बेसिक विरोध यासाठी आहे की, यातील अमलबजावणी यंत्रणा म्हणून जर आपले सहकार खाते आहे, रोजचे सगळे कारभार जर आपले सहकार खाते बघणार असेल तर निस्पृहपणे तेच डीडीआर निवडणुका घेणार या आपल्या म्हणण्याला काय अर्थ वा लॉजिक आहे हे मला समजत नाही, ते आपण मला समजावून सांगावे. त्यामुळे ज्याला रोजचे काम करावयाचे आहे, ज्याला रोजचा संसार करावयाचा आहे, त्यामध्ये झ ाालेले त्याचे एकमेकांचे उणेदुणे, त्यातून आलेला संबंधातील बरे-वाईटपणा यातून निवडणूक घेणारा अधिकारी देखील तोच असेल तर तो सांगेल की, तू जास्त आगाऊपणा करीत असशील तर पुढील निवडणुकीमध्ये तुला मी डिस्क्वालिफायच करून दाखवितो. सभापती महोदय, असे झाल्यास अपिलिंग ॲथॉरिटीकडे प्रत्येकजण जाऊच शकत नाही. आपण कोर्टाचे काम वाढविण्यास निघालो आहोत का ? म्हणून मला वाटते की, यामध्ये कलेक्टरचे अधिकार जे आपण

....... एसएस 3 ...



KBS/ KGS/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 15:35

कमी करावयास निघाला आहात तर तसे करण्यात काही अर्थ नाही, त्याची काही गरज नाही. उलट हा कारभार अधिक पारदर्शक व्हायला पाहिजे. सहा महिने अगोदरच सगळ्या याद्या पूर्ण प्रकाशित झाल्या पाहिजेत. टाईम बाऊंड पद्धतीने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुका या एका विशिष्ट वेळेमध्ये झाल्या पाहिजेत आणि त्याचेही एक वेळापत्रक ठरले पाहिजे आणि त्या वेळापत्रकानुसार कलेक्टर, डेप्युटी कलेक्टर आणि तहसिलदार यांनी व्यवस्थितरित्या मतदार याद्या तयार करून, ज्यावेळेस शेतकऱ्यांचे कामाचे दिवस नसतात त्या काळात प्रकाशित करून, त्याबाबतीतल हरकती कागदोपत्री घेऊन जिल्ह्यात एकाच वेळेस कार्यक्रम लावून, ज्या पद्धतीने आपण ग्रामपंचायतीच्या, जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचा कार्यक्रम पार पाडतो तशाच पद्धतीने महसूल खात्याने याचा एक टाईम बाऊंड कार्यक्रम आखला पाहिजे. कारण पुढील काळातील महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचे जीवन हे खऱ्या अर्थाने शेवटी ॲग्रीकल्चर ट्रेडवर अवलंबून राहणार आहे. आज आपण किती बाबतीत ॲग्रीकल्चर ट्रेड च्या निर्यातीमध्ये पुढे आहोत ? आपण साखर निर्यात करू शकलो नाही, त्याला केंद्र सरकार जबाबदार आहे. आपण कॉटन निर्यात करू शकलो नाही, कारण काय ते माहिती नाही. पण आपल्याकडे आपण कॉटन प्रोसेसिंग झोनच तयार केलेले नाहीत. आज गुजरात राज्य कापूस निर्यातीमध्ये पुढे गेले आहे. आपल्याकडूनच कापूस घेऊन आपल्या कापसाचे कापड तयार करून गुजरातने महाराष्ट्राची माती केली आहे. आपण मार्केट कमिट्यांकडे आणि ॲग्रीकल्चर ट्रेडकडे दुर्लक्ष केल्यामुळे आपल्यापेक्षा पाच पटीने गुजरात राज्य पुढे चालले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. किल्लेदार .... टीटी ...1

श्री.श्रीकांत जोशी (पुढे सुरू.....

आपल्या शेजारच्या राज्याचे मुख्यमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांना जातीयवादी म्हणून आपण रात्रंदिवस शिव्या देतो. तेच श्री. नरेंद्र मोदी हे आपल्यापेक्षा पुढे निघून गेलेले आहेत.. महाराष्ट्रामधील कापसाचे प्रोसेसिंग करण्याची जबाबदारी गुजरात राज्याने उचललेली आहे. गुजरातमधील जिनिंग मिल्सनी महाराष्ट्रातील कापूस घ्यावयाचा नाही असे ठरविलें तर महाराष्ट्रामध्ये कापूस ठेवायला जागा राहणार नाही इतकी भयानक परिस्थिती निर्माण होईल. ती परिस्थिती आता देखील आहे.

सभापती महोदय, जसे ऊस आणि कापसाबाबत सांगितीले त्याप्रमाणे मराठवाड्यामधील केशर आंबा युरोपमध्ये जाणार म्हणून 18 कोटीची घोषणा झालेली होती. परंतु त्यासंदर्भाने काही झाले नाही. हे 18 कोटी रुपये कोठे खर्च झाले याचा पत्ता लागला नाही. औरंगाबादला शीतगृह काढणार असे सांगितले गेले. ते शीतगृह जालन्याला नेले. परंतु ते शीतगृह बंद पडले. ॲग्रो ट्रेड कोठे आहे ? ॲग्रो ट्रेडचा, एक्स्पोर्टचा पूर्ण सत्यानाश करून टाकलेला आहे. माझा या सगळ्या प्रश्नाकडे पहाण्याचा दृष्टीकोन असा आहे की, मराठवाड्यातील साडे आठ हजार गावे असतील तर त्यामधील आठ हजार गावे कृषी निर्मिती करण्यास सक्षम असलेली आहेत तसेच एक्सपर्ट क्वॉलिटी प्रोड्युस करण्याचे काम जवळपास तीन ते साडे तीन हजार खेड्यांमध्ये होते. शेती तज्ञांनी अशा 150 कमोडीटीज काढलेल्या आहेत की ज्या आपणास एक्स्पोर्ट करता येतात. त्यासाठी लागणारे कोणत्याही पध्दतीचे इन्फ्रॉस्ट्रक्चर नाही. त्याचे ट्रेड सेंटर्स नाहीत. त्याच्या साठवणुकीची व्यवस्था नाही, त्याची प्रोसेस करता येत नाही. ते विकता येत नाही अशी वाईट परिस्थिती निर्माण झालेली आहे. हे कोणाकडून होणे अपेक्षित आहे ? हे कोण करणार आहे ? हे सांगावे. आपली अशी अपेक्षा आहे काय की, मल्टी नॅशनल कंपन्यांनी यामध्ये यावे आणि महाराष्ट्रातील मध्यमवर्गीयांनी त्यांच्याकडे वेठबिगार म्हणून काम करावे ? कृषी मंत्री आणि सहकार मंत्री महोदयांना अशी अपेक्षा आहे काय की, कृषी उत्पन्न बाजार समिती मल्टी नॅशनल कंपनीकडे द्यावी आणि त्यामध्ये या ठिकाणच्या लोकांनी चपराशी म्हणून काम करावे ? आपल्याकडील कोणी उद्योजक बनू होऊ नये अशी अपेक्षा आहे काय ? आज कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये निवडून आलेले संचालक हे एका दृष्टीने उद्योजकच असतात. ते स्वत:चा ट्रेड वाढवतात. ते स्वत:

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (पुढे सुरु...

शेतकऱ्यांचे हित जपतात. त्यांना अधिक मजबूत करणे, त्यांना टेक्नॉलॉजीचे ज्ञान देणे, त्यांना इक्वीटी देणे, त्यांना इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करून देणे, त्यांच्यामध्ये लोकशाही रुजविणे ही काळाची गरज आहे. कंपल्शन आहे म्हणून लोकशाही स्वीकारलेली नाही तर राज्य पध्दती म्हणून ती स्वीकारलेली आहे. मी एक गंभीर बाब आपल्या निदर्शनास आणून देतो की, निवडणुकीच्या प्रोसेसमध्ये मूलभूत बदल करण्याची गरज आहे. आपण उपनिबंधकाला एवढा मोठा अधिकार देत आहात याचा सखोल विचार करावा. 5 कोटीपर्यन्तचा टर्न ओव्हर जिथे असेल त्या ठिकाणच्या निवडणुकीचे काम कलेक्टरकडे सोपविणार आणि बाकी मोकळे रान मल्टी नॅशनल कंपन्यांसाठी सोडून देणार आहात काय ? या संदर्भात खंत आहे, तीव्र ऑब्जेक्शन आहे. डीडीआर ही निवडणूक पार पाडू शकणार नाहीत. डीडीआर यांच्याकडे इतके प्रचंड काम आहे की, ते ही निवडणूक पार पाडू शकणार नाहीत. राज्यामध्ये चारच डीडीआर हे चांगले आहेत, अशा पध्दतीची माहिती मिळालेली आहे. सहकार खात्यातील उपनिबंधाकडे, तालुका रजिस्ट्रारकडेही यामधील काही अधिकार दिलेले आहेत. तालुका रजिस्ट्रार यांच्या कथा, कहाण्या या ठिकाणी सांगण्यासारख्या नाहीत. त्यांचा आमच्याशी रोजच संबंध येतो, त्यामुळे ते व्यवहार कसे करतात हे आम्हाला चांगलेच ठाऊक आहे. तेथे त्यांचा सहकार्याचे लॉजिक नसते, तो त्यांचा व्यवहारच असतो. तो शास्त्रशुध्द व्यवहार असतो. त्यांचे पाकीट ठरलेले असते. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना चलन देण्यासाठी आणि टोकन देण्यासाठी पैसे धेतले जातात. शेतकऱ्यांच्या गाडयांच्याबाबतीत टोकन देण्यासाठी रजिस्ट्रारच्या ऑफीसमधील लोक पैसे घेतात, त्यांना निवडणुकीमध्ये फॉर्म भरून घेण्यासाठी सुध्दा पैसे द्यावे लागतील तसेच फॉर्म विड्रॉ करण्यासाठी, रिजेक्शनसाठी वेगळे पैसे द्यावे लागतील,ऑब्जेक्शनसाठी वेगळे पैसे द्यावे लागतील. सहकार मंत्री महोदयांनी यासंबंधीचा वेगळा रेट चार्टच लावून टाकावा, असे मला वाटते. त्यांच्याकडून स्वच्छपणे निवडणूक प्रक्रिया होण्याबाबत काय अपेक्षा करायची ? शेतकऱ्यांकडून टोकन द्यायलासुध्दा ते पैसे घेतात. आता ते निवडणुकीमध्ये डायरक्टरच्या पदासाठीसुध्दा उभे रहातील. आता तर त्यांच्याकडे अधिकार आल्यामुळे त्यांना मनमानी करायचा अधिकार मिळालेला आहे. तेव्हा या बिलाचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे...

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

ते परमनंट मंत्री आहेत. त्यांची काही अडचण नाही. परंतु या महाराष्ट्रात लोकशाही मूल्यांची अडचण व्हावयास लागली आहे. आपण लोकशाहीचा खून करीत आहोत. मग आपण लोकशाहीतून देश प्रगल्भ करण्याच्या गप्पा कशा मारणार ? आपल्याकडे भरपूर टॅलेंट आहे. मोठमोठे लोक आहेत. महाराष्ट्र सरकार चालविण्यासाठी घेण्यास सुध्दा ते तयार आहेत. आपले अधिकार त्यांना द्यावयाचे काय ? मी या ठिकाणी गंभीरपणे सांगू इच्छितो. लोकशाही प्रगल्भ करावयाची असेल तर निवडणुका पारदर्शक आणि व्यवस्थितपणे पार पाडण्याची आपली जबाबदारी आहे. त्याला थोडा वेळ लागेल, थोडा त्रास होईल, परंतु या निवडणुका घेणारा अधिकारी पहिल्यांदा निस्पृह असला पाहिजे. तो अधिकारी त्या खात्याचा असता कामा नये. सहकार खात्याच्या निवडणुका सहकार खात्यातील अधिकाऱ्यांनी घेणे हे अत्यंत अडचणीचे आहे. मी आपल्याला औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समितीचे उदाहरण देतो. त्या ठिकाणी अत्यंत वाईट परिस्थिती आहे. औरंगाबाद हे एवढे मोठे विभागीय केंद्र आहे. त्या ठिकाणच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अतिक्रमण झाले. त्याबाबत प्रकरण कोर्टात गेले. काही लोक सुप्रीम कोर्टातून केस मागे घ्यावी असे म्हणत होते तर काही लोक केस मागे घेऊ नका म्हणून भांडत होते. त्या ठिकाणी 280 एकर जागेपैकी 100 एकर जागेवर लोकांनी अतिक्रमण केले आहे. त्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये रस्ता नाही. त्यांच्या निवडणुका घेण्यास असिस्टंट रजिस्ट्रार आणि डी.डी.आर. यांना सांगितले तर दहा वर्षानतर त्या ठिकाणी झ ोपड्या तयार होऊन कृषी उत्पन्न बाजार समितीचे रुपांतर हाऊसिंगमध्ये झाल्याशिवाय राहणार नाही. त्यापेक्षा जिल्हाधिकाऱ्यांकडे परिस्थिती बरी आहे. हे सांगत असताना एक एक कृषी उत्पन्न बाजार समिती माझ्या नजरेसमोर येते. लातूरला अप्रतिम कृषी उत्पन्न बाजार समिती आहे. त्या ठिकाणी गूळ मार्केट आहे. शेकडो कोटी रुपयांचा गूळ तेथून एक्स्पोर्ट होतो. गूळ, ऑईल सीड आणि सोयाबीन याबाबत प्रचंड उलाढाल लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये होते. मध्यप्रदेश, छत्तीसगड इथपासून सौदे करणारी ती कृषी उत्पन्न बाजार समिती आहे. त्या ठिकाणी असिस्टंट रजिस्ट्रार आणि डी.डी.आर. यांच्याकडे निवडणुका घेण्याचे काम दिले आणि जर सहकार मंत्री पश्चिम महाराष्ट्रातील असतील तर मग विषयच संपला. आताही माननीय मंत्रिमहोदय

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. श्रीकांत जोशी .....

पश्चिम महाराष्ट्रातीलच आहेत. सभापती महोदय, लातूर आणि जालना येथील कृषी उत्पन्न बाजार समित्या सोडल्या तर मराठवाड्यात एकही कृषी उत्पन्न बाजार समिती विकसित झालेली नाही. औरंगाबादच्या कृषी उत्पन्न बाजार समितीची परिस्थिती खराब आहे. बीड येथे रस्त्यावर बाजार भरतो. मराठवाड्यातील 90 टक्के बाजार रस्त्यावर भरतात. त्या ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समितीचा काहीही कंट्रोल नाही. हे क्षेत्र जर विकलांग झाले, करप्ट झाले तर आणखी अडचणी निर्माण होतील. त्यापेक्षा जिल्हाधिकारी कार्यालय चांगले काम करते. त्यांच्याकडे संगणकीकरण करावे. या निवडणुकीसाठी त्यांना थोडे मॅनपॉवर लागेल ते द्यावे. नाही तरी आपण निवडणुकांसाठी शिक्षकांचा वापर करतो. सगळे शिक्षक त्याच कामात असतात. 90 टक्के शिक्षकांना निवडणुकीचे काम करावे लागते. अधूनमधून त्यांना शिकविण्यासाठी जावे लागते. त्यांना डी.डी.आर.च्या हाताखाली निवडणुकीचे काम करावे लागेल. जिल्हाधिकाऱ्यांकडे त्यांना थोडे कमी काम करावे लागते परंतु डी.डी.आर.च्या हाताखाली त्यांना जास्त काम करावे लागेल. असे मोठे संकट यामध्ये येऊ शकते. माझी शासनाला विनंती आहे की, इतक्या घाईगडबडीने बिल आणू नये. शांतपणे हे बिल आणावे. हे बिल शासनाने मागे घ्यावे. याबाबतीत पूर्णपणे विचार करुन बिल आणावे. शेवटी निवडणूक ही एक मोठी प्रक्रिया आहे. त्यामधून जनतेवर आपण संस्कार करीत असतो. त्यांच्याकडे आपण केवळ मत मागत नसतो. आम्ही आणि आपण निवडून आलेलो आहोत. मी विधान परिषदेचा सदस्य असलो तरी मला 40 हजार पदवीधरांनी मते दिली. त्यासाठी त्यांच्या किती मिनतवाऱ्या कराव्या लागतात हे मला माहीत आहे. लोकप्रतिनिधी होणे हा सुध्दा मोठा संस्कार आहे. त्याचा आपण पोरखेळ करु नका. त्याचे वाटोळे करु नका. त्याची चेष्टा करु नका. मार्केट कमिटी असली तरी त्याची चेष्टा करु नका. हे चुकीचे बिल शासनाने मागे घ्यावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांची केलेली स्थापना

**मु.शी.**: संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांची केलेली स्थापना यासंबंधी मानानीय वन मंत्र्यांचे निवेदन

श्री. बबनराव पाचपुते (वन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माननीय वनमंत्र्यांनी आता संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या स्थापने संबंधीचे निवेदन केले. प्रश्न असा आहे की, या वन खात्याचे जे पूर्वाधिकारी मंत्री महोदय होते त्यांना कोर्टाचा अवमान केल्याबद्दल तुरुंगात जावे लागले. कोर्टाचे निर्देश न पाळता आरा मशिन्स या भागात चालू असून माननीय मंत्री महोदयांच्याही ते निदर्शनास आलेले आहे. माननीय मंत्री महोदयांना कोर्टाने नोटीस देखील दिलेली आहे. आताच्या माननीय मंत्री महोदयांवर तीच पाळी येणार आहे काय ? म्हणून वस्तुस्थिती काय आहे हे समजण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी त्यासंदर्भात निवेदन करावे. या आरा गिरण्यांच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय तुरुंगात गेले तर आम्ही जनतेला कसे तोंड दाखवणार ?

श्री. बबनराव पाचपुते : आरा गिरण्यांच्या संदर्भात मी मंत्री झाल्यानंतर पहिल्याच आठवड्यात एक पत्रक काढून ते सर्व अधिका-यांना दिलेले आहे. आतापर्यन्त अशी 16-17 पत्रके दिलेली आहेत. प्रत्यक्ष काय परिस्थिती आहे हे प्रत्येक महिन्याच्या मिटींगमध्ये जाणून घेतलेले आहे. याबाबतीत दोन वेळा वेगळे टास्क फोर्स निर्माण करुन चौकशी केलेली आहे. वीज कनेक्शन तोडण्याचीही कारवाई केलेली आहे. अनधिकृत गिरण्या थांबविण्यात आलेल्या आहेत. याबाबतीत सुप्रीम कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट टाखल करण्यात येणार आहे.

श्री. विनोद तावडे : वन्य प्राण्यांकडून पिकाचे, फळ बागांचे नुकसान होते. कोकणामध्ये माकडांपासूनही मोठ्या प्रमाणावर उपद्रव होतो. तेव्हा वन्य प्राण्यांमध्ये माकडाचाही समावेश व्हावा जेणे करुन कोकणातील शेतक-यांना नुकसान भरपाई मिळू शकेल, यासंदर्भात तीन दिवसात निवेदन करण्याचे निदेश माननीय सभापतींनी दिले होते. आता 7 दिवस झाले तरी निवेदन केलेले नाही. हे निवेदन मंत्री महोदय केव्हा करतील ?

श्री. बबनराव पाचपुते : यासंदर्भात निवेदन करण्याचे निदेश दिलेले नव्हते तर लोकप्रतिनिधीं समवेत एक बैठक घ्यावी असे सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे आपण बैठक घेऊन चर्चा करु. नुकसान करणारे जे वन्यजीव आहेत त्यामध्ये माकडाचा समावेश करावा यासंबंधी दिनांक 4.4.2007 रोजी बैठक आयोजित केलेली आहे. त्या बैठकीला सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी देखील उपस्थित रहावे.

==3==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : माकडाच्या संदर्भात ग्रामपंचायतीला सक्युर्लर पाठविलेले आहे. ते सर्क्युलर आपण पटलावर ठेवणार आहात काय ?

श्री. बबनराव पाचपुते : तेही सर्क्युलर पटलावर ठेवले जाईल.

--

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक.

**मु.शी.**: L.A.BILL No.IX OF 2007.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING &DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.)

(चर्चा पुढे सुरु.........

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक-9 यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार काढून ते डीडीआरला देण्याच्या उद्देशाने हे बिल सभागृहासमोर सादर करण्यात आले आहे. अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले किंवा डीडीआरला दिले तरी त्याने काही फरक पडणार नाही. मुख्य गाभा आहे तो मी मांडणार आहे. मी कृषि उत्पन्न बाजार समितीचा सभापती असून कृषि उत्पन्न बाजार समिती संघाचा संचालक देखील आहे. शासनाने हे बिल आणण्याची आवश्यकता नव्हती. परंतु या संबंधात जो निर्णय घेतला आहे तो कसा योग्य आहे याचा निर्वाळा या सभागृहाने केला पाहिजे यादृष्टीने हे बिल सभागृहापुढे आलेले आहे. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मतदार यादीची पक्रिया जी आहे त्यामध्ये मतदार यादीमध्ये व्यापारी, अडते आणि हमाल यांची मतदार यादी कृषि उत्पन्न बाजार समिती डीडीआरकडे देत असते. सेवा सहकारी सोसायटया सुध्दा त्यांची मतदार यादी डीडीआरकडे देत असतात. फक्त ग्रामपंचायतीची मतदार यादी तालुक्यातून पंचायत समितीमार्फत मागविली जाते. मतदारसंघाचे प्रारुप डीडीआर निश्चित करतो.

सभापती महोदय, शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार दिले. तेच अधिकार कायम ठेवले तरी चालेल. जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार असला तरी चालेल. नि:पक्षपातीपणे निवडणुका होऊ शकतात. जिल्हाधिकारी हे अधिकार एस.डी.ओ.ला देतो. एस.डी.ओ. त्याचे अधिकार तहसीलदाराला देतो. तहसीलदार त्याचे अधिकार नायब तहसीलदाराला देतो. तहसील कार्यालयामध्ये एक लिपीक व शिपाई देखील कार्यरत असतो. या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांचा पगार शासनाकडून दिला जातो. परंतु या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्याचा खर्च बाजार समित्यांकडून वसूल केला जातो. खऱ्या अर्थाने बिलामध्ये सुधारणा केली पाहिजे.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ 15:55

श्री.केशवराव मानकर..........

जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार असले पाहिजेत. सरकारकडून वेतन व भत्ते मिळत असल्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समितीकडून पेमेंट देण्याची गरज नाही. अवांतर खर्च कृषि उत्पन्न बाजार समित्यांवर लादला जातो. डीडीआरला अधिकार द्यावेत किंवा देऊ नयेत, यामुळे काही फरक पडत नाही. जे काम जिल्हाधिकारी करणार आहेत तेच काम डीडीआरकडून केले जाणार आहे. कृषि उत्पन्न व बाजार समितीकडून वेतन व भत्त्याचा खर्च वसूल केला जातो त्याला आमचा विरोध आहे. हे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडेच असावेत. डीडीआर हे जिल्हाधिकाऱ्यांना सहाय्य करतात. या दोघांमध्ये समन्वय असतो. या बिलामध्ये जी दुरुस्ती आणली आहे ती खऱ्या अर्थाने खर्चामध्ये बचत व्हावी या दृष्टीने आहे. परंतु तो हेतू साध्य होत नाही. पृ.क्र.3 वर पोटकलम 1 (ब) मध्ये म्हटले आहे की, "मतदार यादी तयार करण्याच्या आणि निवडणुकांचे कामकाज चालविण्याच्या प्रयोजनासाठी, प्रत्येक बाजार समिती, कोणत्याही वर्षामध्ये या अधिनियमान्वये फीच्या रुपाने मिळालेल्या सर्व रकमांच्या पाच टक्के किंवा दरसाल दहा हजार रुपये, यापैकी जी कमी असेल तेवढ्या रकमेचा निवडणूक निधी स्थापन करील."

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक-10 वर निवडणूक निधीबाबत कलम 14अ (1) मध्ये म्हटले आहे की, "फीच्या रुपाने मिळालेल्या सर्व रकमांच्या दोन टक्के किंवा दरसाल दहा हजार रुपये, यापैकी जी कमी असेल त्या रकमेचा मिळून होईल असा निवडणूक निधी स्थापन करील."

सभापती महोदय, वरील दोन्ही ठिकाणी जी तफावत आहे ती मंत्रीमहोदयांनी दुरुस्तीच्या माध्यमातून दूर केली पाहिजे. एका ठिकाणी 2 टक्के व दुसऱ्या ठिकाणी 5 टक्के असा उल्लेख केला आहे. आकडेवारी एकच असली पाहिजे. यामध्ये सुधारणा झाली पाहिजे. निवडणुका डीडीआरकडून घेतल्या गेल्या पाहिजेत असे आपण म्हणतो. मी शासनाला विनंती करतो की, शासनाने या संदर्भात निवेदन करावे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर.......

डीडीआरच्या खाली काम करणारा उपनिंबधक, त्याच्या खाली काम करणारा क्लार्क, त्याच्या खाली काम करणारा शिपाई आहे, त्यांच्या ज्या जागा रिक्त आहेत त्या जागा आपण कधी भरणार आहात? त्या ठिकाणी कर्मचारीच नाही तर डीडीआर निवडणूक कशी काय घेणार ? म्हणून यासंदर्भात माझी विनंती आहे की, हे बिल या ठिकाणी आणीत असतांना या बिलाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा विचार झालेला दिसत नाही. डीडीआरच्या ऑफिसमध्ये सहाय्यक उपनिबंधकाच्या ऑफिसमध्ये खर्चायला पैसे नाहीत त्यामुळे ते बाजार समितीला लुटत आहेत. बाजार समितीला लुटण्याचे, शेतक-यांना लुटण्याचेच काम डीडीआरचे कार्यालय करीत आहे. असाच प्रकार पुढेही चालू राहिला तर गरीब शेतक-याला कोणताही न्याय मिळणार नाही. या विषयाच्या संदर्भात आम्ही वारंवार आवाज उठवितो, यामध्ये शेतक-यांचे पैसे व्यर्थ खर्च होत आहे. यामध्ये ख-या अर्थाने बाजार समितीची, शेतक-यांची लूट होत आहे. यामधून शेतक-याचे कोणतेही भले होणार नाही. या बिलामुळे केवळ राजकीय लोकांना प्रोटेक्शन मिळणार आहे. डीडीआर ऑफिसला शासनाकडून वेतन आणि भत्ते मिळत असतात. त्यामुळे या बिलाच्या संदर्भात निश्चितपणे विचार व्हावा अशी विनंती आहे. या ठिकाणी हे जे विधेयक आणले आहे ते परत घ्यावे अशी मी शासनाला विनंती करतो.

-----------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) सभापती महोदय, पार पडलेल्या दोन निवडणुकांमध्ये निश्चित फरक काय असतो हे माननीय मंत्रीमहोदयांना सांगण्याची आवश्यकता नाही. आतापर्यंत जिल्हाधिकारी निवडणूक यंत्रणेचे प्रमुख असायचे. आता हे सर्व काम डीडीआरकडे जाणार आहे. डीडीआर आणि त्याच्या सहका-याचे नाते माननीय मंत्रीमहोदयांना मी सांगावे असे मला वाटत नाही. डीडीआरवर दबाव येऊ शकतो परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारचा दबाव सहन करीत नाही. आजच्या वर्तमानपत्रात तसेच टी.व्ही.वर बातमी आलेली आहे की, एका बाजार समितीला धमकी देण्यात आलेली आहे. शेतक-यांनी असे म्हटले आहे की, या बाजार समितीमध्ये शेतक-यांना न्याय मिळाला नाही तर ते बाहेरच्या व्यापा-यांना आणून माल विकतील. शेतक-याना आपला माल कोणालाही विकण्याची मुभा आहे, हे बहुधा शेतक-यांना माहिती नाही. शासनाने केलेला कायदा अद्यापपर्यंत शेतक-यांपर्यंत गेलेला दिसत नाही असा त्याचा अर्थ होतो. शेतकरी आपला माल कोठेही विकू शकतात. केंद्रसरकारने यासंदर्भात कायदा केला असल्यामुळे आपण हा कायदा केलेला आहे. आता मतदार याद्या तयार करण्याचे कामही डीडीआर करणार आहे. मतदार याद्यांचे काम डीडीआरकडे दिल्यामुळे त्या ठिकाणी जे प्रभावी असतील ते मतदार याद्यात आपली नावे टाकतील, नियमांच्या बाहेर जाऊन काम करतील आणि निवडणुका जिंकतील अशी भिती वाटते. यामुळे छोटया छोटया बाजार समित्यांमध्ये अराजकता निर्माण होईल अशी मला भिती वाटते. याचा अर्थ "बळी तो कान पिळी" तसेच "ज्याच्या हाती ससा, तो पारधी" असे होईल. जिल्हाधिकारी कोणत्याही परिस्थितीत नियमाला डावलत नाही. आपणच निवडणुकीमध्ये जिल्हाधिका-यांवर दबाव आणला होता परंतु ते दबावाला बळी पडले नाहीत. निवडणूक मतदार यादीच्या संदर्भात जिल्हाधिका-यांवर दबाव आणला गेला तेव्हा त्या जिल्हाधिका-याने ठणकावून सांगितले की, तो तुमचा अधिकार नाही. एका मंत्र्याने सांगितलेल्या बाजार समित्या रद्द करुन याद्या तयार करा. संचालक मंडळाने याद्या पाठविल्या होत्या परंतु जिल्हाधिका-यांनी त्या नाकारल्या. ते अधिकार तुम्हाला नाहीत असे त्यांना सांगितले. सभापती महोदय, जिल्हाधिकारी हुशार असल्यामुळे,कामकाजाचे ज्ञान असल्यामुळे व कर्तव्यनिष्ठ असल्यामुळे त्यांनी नियम डावलून काम केले नाही, दबावाला बळी पडले नाही. सहकाराचे राजकारण काय असते ते माननीय मंत्रीमहोदयांना सर्व माहिती आहे. यातून काही गोंधळ निर्माण होणार नाही यासंदर्भातील काळजी आपण कशी घेणार आहात?

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.............

जर अनियमितता झाली तर डीडीआरवर कोण कारवाई करणार ? कलेक्टरवर कारवाई करण्यास वाव नसतो किंबहुना कलेक्टर कारवाई करण्यास वावच देत नाही.

आज महाराष्ट्रामध्ये सहकार क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार झाल्याच्या अनेक गोष्टी उघडकीस आलेल्या आहेत, पण त्यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. जालना जिल्ह्यातील एक सहकार सम्राट यांनी जवळपास 36 हजार कोटी रुपयांचा अपहार केल्याचे उच्च न्यायालयात सिध्द झाले. परंतु आजपर्यंत त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. त्यांना सजा सुनावल्यानंतर त्यांनी त्यावर स्टे घेतला आणि त्यांचे सरकार आल्यावर त्यांच्यावरील केस काढून घेण्यात आली. परभणी जिल्ह्यात तर मौजमजा सुरु आहे. मंत्रीपद भूषविणाऱ्या एका मंत्र्याने 5 कोटी 36 लाख इतक्या रकमेचा अपहार केला. परंतु त्यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. हे रेकॉर्डवर आलेले आहे.. त्यांच्यावर एफआयआर दाखल झाला, पण त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करता त्यांना मौजमजेसाठी सोडून दिलेले आहे. ते खासदार झाले, मंत्री झाले. असा जर सहकाराचा कारभार असेल तर सर्वसामान्य लोकांचे काय होणार ? सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी अतिशय तळमळीने त्यांचे विचार येथे व्यक्त केले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे हे अधिकार कलेक्टरकडेच दिले पाहिजे, डीडीआरकडे हे अधिकार देऊ नयेत. निवडणूक यंत्रणेसाठी फार मोठी रक्कम लागते. 10-15 मतदारांसाठी सुध्दा बुथ उभे करावे लागते. त्याशिवाय इतर खर्च येतो. तेव्हा हे सर्व कसे करणार आहात ? निवडणूक यंत्रणा कशा पध्दतीने राबविणार आहात ? त्यासाठी नियमावली तयार करण्यात आली आहे काय ? यासंबंधीची माहिती मंत्रिमहोदयांनी त्यांच्या भाषणात सांगावयास पाहिजे होती, ती त्यांनी आम्हाला सांगितलेली नाही. या विधेयकावर खूप बोलण्यासारखे आहे. तेव्हा अगदी नि:पक्षपातीपणे कोणावरही अन्याय होऊ न देता, कोणत्याही गटातटाशी तडजोड न करता नियम बनविले पाहिजेत. या नियमांचे पालन झाले नाही तर विभागामार्फत कोणती शास्ती होणार आहे हा सर्वात महत्वाचा मुद्दा आहे. आता सरकारने हे विधेयक आणलले आहे आणि त्यांना ते मंजूर करुन घ्यावयाचे आहे. तेव्हा एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

---------------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा ) : सभापती महोदय, याठिकाणी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन ( विकास व विनियमन ) (सुधारणा ) विधेयक 2007 मांडण्यात आलेले आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कृषि उत्पन्न बाजार समिती कायदा आणि सहकार कायदा यामध्ये बदल केला आहे. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कायद्यामध्ये अनेक त्रुटी आहेत. त्या कायद्याचे दोन-दोन अर्थ निघतात. याठिकाणी जे विधेयक आणलेले आहे त्याचे मी समर्थन करतो. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी अतिशय तळमळीने त्यांचे विचार मांडले. त्यांनी बाजार समितीमध्ये काम केलेले असल्यामुळे त्यांना यासंबंधीची चांगली माहिती आहे.

सभापती महोदय, सहकार कायद्यामध्ये असे म्हटलेले आहे की, ज्या संस्थेची कुवत किती आहे त्याप्रमाणे निवडणूक ठरविली जाते. काही निवडणुका संस्था घेतात, अे.आर. घेतात, डीडीआर घेतात, तर काही निवडणुका या कलेक्टर घेतात. ज्या संस्थेचे उत्पन्न 25 लाखाच्यावर आहे त्या संस्थांच्या निवडणुकांबाबतची तरतूद सहकार कायद्यामध्ये केलेली आहे ही स्वागतार्ह बाब आहे. आज निवडणुकीची जाहिरात वर्तमानपत्रात द्यावयाची असेल तर त्यासाठी दहा हजार रुपये खर्च येतो. सन 2006 मध्ये मुंबई कृषि बाजार समितीची यादी झाली. ही यादी काढताना शासनाने आदेश काढले की, सन 2003 च्या अगोदर जे संचालक होते त्यांची यादी तयार करा.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SSP/ KTG/ SBT/ पूर्वी श्री.अजित... 16:10

श्री.जयंत प्र. पाटील...

त्यानंतर सन 2004, 2005, 2006 साली निवडणुका झाल्या. त्यांचा समावेश नाही. तीन वर्षानंतर ज्यांचे संचालक पद गेले, त्यांच्या नावाचा समावेश करण्याचे आदेश शासनाने काढले. त्यासाठी आम्हाला हायकोर्टात जावे लागले. त्यानंतर कोर्टाने शासनाने आदेश दिले. सन्माननीय सदस्य श्री.मानकर हे बरोबर बोलले. त्यांची बाजार समिती छोटी आहे. प्रत्यक्षात याबाबतीतील खर्च हा बाजार समितीवर पडून पर्यायाने त्याची झळ शेतकऱ्यांना बसते. त्यामुळे असे आदेश शासनाने काढू नये, असे मला वाटते. तसेच, या कायद्यातून दोन-दोन अर्थ निघत असून या कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित होईल की नाही, याबाबत शंका आहे. हा कायदा महाराष्ट्रापुरता मर्यादित आहे, असे मला वाटते. या बिलाचा मी जास्त अभ्यास केलेला नाही. त्यामुळे याबाबतची जास्त माहिती मला नाही. माननीय सभापती महोदय, आपल्या जिल्हयामध्ये एकच बाजार समिती आहे. त्यामुळे बाजार समितीतील शेतकऱ्यांचे दु:ख काय असते, त्याची जाण आपल्याला नसावी, असे मला वाटते. त्यामुळे आपण या बिलाचा अभ्यासही केला नसेल.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी विचारु इच्छितो की, आपण माझ्याबद्दल का बोलत आहात ? आपण माझ्याबाबतीत असे बोलू शकत नाही. मी आपल्याला काहीही बोललो नाही वा आपल्या भाषणामध्ये अडथळाही आणलेला नाही.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी माझे शब्द मागे घेतो. आपल्या रत्नागिरी जिल्हयामध्ये एकच बाजार समिती आहे, असे मला म्हणावयाचे होते. व्यक्तिगत मला आपल्याला बोलायचे नव्हते. कोकणामध्ये फारच कमी बाजार समित्या आहेत. रायगड जिल्हयामध्ये 10-12 बाजार समित्या आहेत, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये एकच बाजार समिती आहे, रत्नागिरी जिल्हयामध्ये एकच बाजार समिती आहे, ठाणे जिल्हयामध्ये 3 बाजार समित्या आहेत. परंतु मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यांमध्ये 2-2 बाजार समित्या आहेत. अशाप्रकारचे शासनाचे धोरण बरोबर नाही, असे मला वाटते. राज्यातील प्रत्येक तालुक्यांमध्ये एक तरी बाजार समिती असली पाहिजे. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा यासाठी बाजार समित्या स्थापन करण्यात येतात. त्यादृष्टीने शासनाने आपले धोरण ठरविले पाहिजे, असे मला वाटते. त्यामुळे प्रत्येक तालुक्यांमध्ये एक तरी बाजार समिती असण्याच्या दृष्टीने शासनाने धोरण आखले पाहिजे. तसेच, त्या बाजार समित्या सक्षम करण्याच्या दृष्टीने, सर्व बाजार समित्यांना स्वत:ची इमारत व मार्केट यार्ड असणे

..2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील...

गरजेचे असून याबाबतीत शासनाने धोरण ठरवावे. काही बाजार समित्या तर, गेल्या 25-25 वर्षापासून अस्तित्वात असून त्यांना अजूनही स्वत:च्या मालकीची जागा उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे याबाबतीत शासनाने आपले धोरण ठरविले पाहिजे, असे मला वाटते. आपण हा नवीन कायदा करीत आहात, तो निश्चितपणे स्वागतार्ह आहे. यामध्ये डीडीआर हा नाममात्र असणार आहे. निवडणूक ही संस्थाच घेणार आहे. त्यावर नियंत्रण फक्त डीडीआरचे राहणार आहे. त्यामुळे या नवीन कायद्याचे मी स्वागत करतो. तसेच, मुंबई बाजार समित्यामध्ये जे रिझर्व्हेशनचे प्रतिनिधीत्व आहे त्याप्रमाणे ते जिल्हावाईज करावे. आज मुंबई बाजार समित्यांमध्ये ठराविक लोकांचीच मक्तेदारी आहे. मुंबई बाजार समितीचे व्यवहार व उलाढाल पाहता, त्या ठिकाणी शेतकऱ्यांचे प्रतिनिधी असण्याची आवश्यकता आहे.

नंतर कु.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KTG/ SBT/ पूर्वी श्री. पुरी 16.15

श्री. जयंत प्र.पाटील सुरु ...

जिल्हावार प्रतिनिधी कसे करता येईल याच्यासाठी कायद्यामध्ये बदल आपण केला पाहिजे अशी माझी मागणी आहे. कारण त्या ठिकाणी विभागवार पध्दत असल्यामुळे ठराविक लोकांची मक्तेदारी झालेली आहे. मुंबई बाजार समितीच्या सर्व सभासदांना मतदानाचा अधिकार असला पाहिजे. ज्या प्रमाणे व्यवहार होतात त्यामध्ये शेतकऱ्यांचे प्रतिनिधी दिसत नाही. त्यामुळे जिल्हावार प्रतिनिधी मिळविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. बाजार समितीच्या सर्व सभासदांना बाजार समितीमध्ये मतदानाचा अधिकार असला पाहिजे. या बाजार समितीमध्ये फक्त सहकारी संस्थामधील संचालकांना मतदानाचा अधिकार आहे. यामध्ये बदल झाला पाहिजे. व्यापारी क्षेत्रामधील, ग्रामपंचायत मतदारसंघामधील व सहकारी क्षेत्रातील सोसायटयामधील जे सभासद आहेत त्यांना सुध्दा मतदानाचा अधिकार मिळाला पहिजे. यामुळे समाजातील सर्व घटकांचे प्रतिनिधित्व या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये होईल. या दृष्टीकोनातून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कायद्यामध्ये बदल केला पाहिजे अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द येथे संपवतो.

जय हिंद जय महाराष्ट्र !

............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



29-03-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3A-2

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी येथे ज्या पध्दतीने हा विषय मांडला आहे ते ऐकल्यावर मी अतिशय गंभीर झालो. सहकार क्षेत्रातील लोकांची व्यवहार करण्याची पध्दत आम्ही पाहिली आहे. त्यातील किती लोक गडगंज श्रीमंत झालेले आहेत ,त्यातील किती लोक निवडणुकीत उभे राहिले आहेत.सन्माननीय सदस्य श्री. मानकर यांनी रिलायन्स संदर्भात उल्लेख केलेला आहे. त्यातील कलम पाहिल्यानंतर त्या संदर्भात त्यांनी जी भीती व्यक्त केली आहे ती साधार आहे.जिल्हयाधिकाऱ्यांवर जबाबदारी सतत वाढत आहे, निवडणुकांचा खर्च वाढत आहे म्हणून कायद्यात हा बदल करण्यात येत आहे. जिल्हाधिकाऱ्यांवर किती जबाबदारी येणार आहे ? महाराष्ट्रात 5 कोटी पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या किती कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत हे आपण पाहिले तर त्यांची संख्या साधारण 200च्या घरात जाईल. एका कृषी उत्पन्न बाजार समितीचा निवडणुकीचा खर्च साधारण 50 हजार रुपये येत असेल तर ,200 कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकांसाठी साधारण 1 कोटी रुपये खर्च येईल. आपले शासन एवढे गरीब आहे का की ते या निवडणुकांचा 1 कोटीचा खर्च करु शकत नाही ? आपण येथे खर्च झेपणार नाही अशी केवळ पळवाट काढीत आहात. सभापती महोदय, या संदर्भात जे कलम आहे, त्या अनुषंगाने हा 1 कोटी रुपयांचा खर्च शासनाने उचलावा, अशी मी विनंती करतो.

कलम 14 अ मध्ये म्हंटल्याप्रमाणे , अशा निवडणुकांसाठी त्यांनी केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यास बाजार समितीने कसूर केल्यास निवडणुकांच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत अशा बाजार समित्या उक्त कालावधित समाप्त झाल्या नंतर विसर्जित करण्यात येतील. याबाबतीत मला असे म्हणावयाचे आहे की, त्यांना निवडणुकीचा खर्च झेपणार नाही. माझी अशी सूचना आहे की, निवडणुकीचा खर्च शासनाने सहन करावा. महात्मा गांधी यांनी खेडयाकडे चला असा संदेश दिलेला होता. सर्वसामान्य माणूस खेडयाकडे गेला नाही, परंतु रिलायंस खेडयाकडे चालला आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यांची काय ससेहोलपट होत आहे याचे उदाहरण श्री शरद पवार यांनी दिलेलेच आहे. रिलायन्स या कंपनीने घोषित केले होते की, आम्ही शेतकऱ्यांच्या ऊसाला 1900 रुपये या पेक्षा जास्त भाव देऊ.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....

त्यावेळी शेतकऱ्यांना ही योजना चांगली वाटली होती. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी सांगितले की, असे घडावयास नको, यामुळे सहकारी चळवळ उद्धस्त होईल व सर्वसामान्य माणसाला कोणताही आधार मिळणार नाही. ही वस्तुस्थिती आहे. या मताशी मी देखील सहमत आहे. रिलायन्स या कंपनीची तशीच स्ट्रेटेजी आहे. सुरुवातीला कोणतीही वस्तू स्वस्त द्यावयाची, अधिक ग्राहक मिळवावयाचे व प्रतिस्पर्धी उध्वस्त झाल्यानंतर आपली मोनोपॉली तयार करावयाची.

यानंतर श्री. रोझेकर...

।

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.........

एकदा मोनोपॉली तयार झाली की, भाव वाढवायचे, मोनोपॉली तयार झालेली असल्यामुळे त्यांच्याकडूनच माल घेणे क्रमप्राप्त होते, ही व्यापारातील स्ट्रॅटेजी आहे. सुरुवातीला ऊसाला इतरांपेक्षा जास्त भाव देतील, त्यामुळे बाकीचे साखर कारखाने उद्ध्वस्त होतील, ते उद्ध्वस्त झाले की, मग कमी भाव दिला तरी शेतक-यांना ऊस द्यावा लागेल, ही रिलायन्सची स्ट्रॅटेजी माननीय श्री.शरद पवार साहेबांनी ओळखली होती, पण आपल्या सरकारला कळली नाही, म्हणून त्यांनी अशा प्रकारचे विधेयक आज सभागृहासमोर आणले आहे. रिलायन्स केवळ मोठमोठे उद्योग काढते आहे, असे नाही तर ही कंपनी आता रिटेल उद्योगामध्ये देखील उतरली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य, श्री.श्रीकांत जोशी यांनी या विधेयकाबाबत जी साधार भिती व्यक्त केली आहे, ती खरी आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य, श्री.जयंत प्र.पाटील यांनी ज्या सुधारणा या विधेयकाला सुचविल्या आहेत त्यांचाही विचार करणे गरजेचे आहे. 1 एप्रिलला निवडणुका झाल्या नाहीत तर आभाळ कोसळेल, अशी परिस्थिती नाही. यावर्षी शासनाच्या खर्चातून निवडणुका घ्या, जो काही एक कोटी रुपये खर्च येईल, तो शासनाने द्यावा, पण हे विधेयक मागे घ्यावे. कारण, जिल्हा उपनिबंधक कारभार करणार, ते राजे आणि त्यांच्या कारभाराबाबतच्या तक्रारी पुन्हा त्यांच्याच विभागाकडे करायच्या, अशा उलटसुलट बाबी या विधेयकात आहेत, हे सर्व मॅनेज होण्यासारखे आहे. कारण, मतदारांची यादी तेच तयार करणार, निवडणुका तेच घेणार, अपीलही त्यांच्याकडेच करायचे आहे. एकदा निवडणूक झाली की, 5 वर्षे अपीलाचा निर्णय होणार नाही. ही सर्व पद्धत बंद करावी, असे वाटत असेल तर हे विधेयक मागे घ्यावे, अशी विनंती मी या निमित्ताने करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

----------------

..2.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुका जिल्हाधिका-यांऐवजी सहकार विभागामार्फत घ्याव्यात, अशा प्रकारची सुधारणा या विधेयकान्वये आणण्यात आली आहे. या विधेयकावर सभागृहातील सन्माननीय सदस्य, सर्वश्री श्रीकांत जोशी, केशवराव मानकर, दिवाकर रावते, जयंत प्र.पाटील, अरविंद सावंत यांनी आपली मते या ठिकाणी मांडली. या सर्व सभासदांचे मी आभार मानतो.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी रिलायन्स, ऊस, कापूस असे विविध विषय या निमित्ताने मांडले. या विधेयकाचा विषय साधा आणि सरळ आहे. जी शंका सन्माननीय सदस्यांनी सहकार खात्याबाबत व्यक्त केली आहे, ती घेण्याचे कारण नाही. याच सहकार खात्यामुळे एका साखर कारखान्याचे 181 कारखाने झाले आहेत. खरेदी विक्री संघ, कृषि उत्पन्न बाजार समित्या, विविध सहकारी सोसायटया, बँका, पतसंस्था यांचे नियमन सहकार खात्यामार्फतच होत असते. तसेच, यामधील अनेक संस्थाच्या निवडणुका या सहकार खात्यामार्फतच घेण्यात येतात. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जी शंका व्यक्त केली आहे, ती योग्य वाटत नाही. जिल्हाधिका-यांकडील कामाचा बोजा वाढत चालला आहे. सहकारी संस्था कायद्यातील कलम 73 (ग) विवक्षित सहकारी संस्थां या तरतुदीअन्वये खरेदी-विक्री संघ, सूत गिरण्या, जिल्हा बँका या संस्थांच्या निवडणुका जिल्हाधिका-यांमार्फत होत असतात. दुसरे कारण असे आहे की, जिल्हाधिका-यांमार्फत निवडणुका होतात त्यामुळे निवडणूक खर्च जास्त होतो, अशा तक्रारी अनेक संस्थांनी शासनाकडे केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य, श्री.अरविंद सावंत यांनी अशी सूचना केली की, हा सर्व निवडणूक खर्च शासनाने करावा. आज कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकीचा खर्च शासनाने करण्याचा निर्णय घेतला तर राज्यातील इतर सर्व सहकारी संस्थांचीही तशीच मागणी शासनाकडे येईल. कृषि उत्पन्न बाजार समित्या आपल्या निवडणुकीचा खर्च स्वत: करतात, पर्यायाने हा खर्च शेतक-यांकडून घ्यावा लागतो. हा शेतक-यांचा पैसा वाचावा म्हणून जिल्हाधिका-यांऐवजी सहकार विभागाकडून या निवडणुका घेण्याचे शासनाने ठरविले आहे. सभापती महोदय, मतदार यादी तयार करण्याबाबतचा मुद्दा देखील सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला. कृषि उत्पन्न बाजार समित्यांवर सेवा सोसायटयांचे प्रतिनिधी असतात, सेवा सोसायटयांची यादी सहकार विभागामार्फतच जिल्हाधिका-यांना पुरविण्यात येत असते.

.3......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर.........

ग्रामपंचायतीला देखील यावर प्रतिनिधत्व असते. ग्रामपंचायतीतील मतदार यादी पंचायत समितीमार्फत येत असते. अडते, हमाल, मापाडी यांची मतदार यादी कृषि उत्पन्न बाजार समितीकडून येत असते. त्यामुळे यादी तयार करण्याच्या संदर्भात शंका घेण्याची गरज नाही.

सभापती महोदय, निवडणुकीसंदर्भातील अपील जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे करावयाचे आहे. अपीलावरील निर्णय देण्यासाठी विशिष्ट कालमर्यादा घालून देण्यात येईल. निवडणुकीमधील पारदर्शकता जी सन्माननीय सदस्यांना अभिप्रेत आहे, ती सहकार विभागाकडून पाळली जाईल. एखादा अधिकारी चुकला तर त्याबाबत निवडणूक आयोगाचे जसे नियम असतात त्याप्रमाणे कारवाई करण्याची तरतूद नियमात करण्यात येईल.

यानंतर कुमारी जयश्री.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर....

या यादीमध्ये फार घोळ होत नाही. मधल्या काळामध्ये न्यायालयीन प्रकरणांमुळे एक - दोन वर्षांपासून निवडणूका झालेल्या नव्हत्या. आताच जिल्हापरिषदेच्या निवडणूका झाल्या. या सर्व निवडणूकांचा प्रशासनवार ताण येतो. आपल्या सगळया सार्वत्रिक निवडणूका प्रशासनाकडून घेतल्या जातात म्हणून जिल्हाधिका-यांवर येणारा ताण कमी होण्याचा व संस्थेचा निवडणूकीचा खर्च कमी झाला पाहिजे हे दोनच या विधेयकाचे उद्देश आहेत. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी साहेबांनी मल्टिनॅशनल कंपनीच्या हातात मार्केटिंग कमिटया जातील, अशी भिती व्यक्त केली, परंतु मार्केटिंग कमिटीचा एकमेव सदस्य हा शेतकरीच असतो त्यामुळे शेतकरीच निवडणूक लढवू शकतो. एका बाजूला आपण मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारतो आणि दुस-या बाजूला मार्केटिंग कमिटयांमध्ये मल्टिनॅशनल कंपनींचा हस्तक्षेप होण्याची आपणाला भिती वाटते. माझी खात्री आहे की, या बाजार समित्यांमध्ये कुठल्याही मल्टिनॅशनल कंपनीचा हस्तक्षेप होऊ शकत नाही.

श्री. श्रीकांत जोशी : व्यापार व व्यापारी दोघेही एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी शिफ्ट होऊ शकतात.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : रिलायन्स व तत्सम अनेक कंपन्यांनी पाच - दहा हजार खेडेगावांचा सर्व्हे करुन रिटेल आऊटलेट काढावयाला सुरुवात केलेली आहे. निवडणूका या पारदर्शीपणानेच झाल्या पाहिजेत, याबद्दल माझेही दुमत नाही. त्याबाबतची सर्व काळजी संपूर्ण बिलामध्ये घेतली जाईल, याची मी खात्री देतो. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या टोकनच्या बाबतीत आपण काहीतरी बोलला होतात, त्याबद्दल मला असे सांगावयाचे आहे की, ज्यावेळी कापसाची आवक जास्त येते, त्यावेळी आपण सर्व तहसिलदारांना टोकन कंपल्सरी करतो. त्यासंदर्भातील ज्या ज्या तक्रारी आलेल्या आहेत, त्यावर कारवाई देखील केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.मानकर साहेबांनी सुरुवातीच्या वाक्यामध्ये विधेयकाचे समर्थन केले ते त्यांचे वाक्य मला आवडले पण त्यांनी नंतर काही तांत्रिक अडचणींमुळे आपले मत फिरविले. सन्माननीय सदस्य श्री.मानकर साहेबही कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती होते त्यांना कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांमध्ये काय अडचणी असतात हे माहित आहे.

श्री.केशवराव मानकर : मी आताही कृषि उत्पन्न बाजार समितीवर आहे.

3C -2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सन्माननीय सदस्य श्री. मानकर साहेब आपण मनात एक आणि ओठावर दुसरे अशा प्रकारे मनातून आपण या बिलाच्या सोबतच आहात, त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. सहकार खात्यामधील रिक्त पदांबाबतही मुद्दा मांडला गेला होता, त्याबद्दल मला असे सांगावयाचे आहे की, सहकार खात्यातील अनेक रिक्त पदे भरण्याकरिता जाहिराती देण्यात आलेल्या असून, ती पदे भरण्याबाबत कार्यवाही देखील चालू झालेली आहे. लवकरात लवकर सर्व रिक्त जागा भरण्यात येतील. त्यामुळे निवडणूकीसाठी स्टाफची अडचण यापुढे भासणार नाही. मला असे वाटते की, सर्व सन्माननीय सदस्यांच्या भाषणाला मी आता समर्पक असे उत्तर दिलेले आहे, आणि मला खात्री आहे की, माझ्या या उत्तरामार्फत सर्वांचे समाधान झाले असेल. सदर विधेयक या सभागृहामध्ये एकमताने संमत करण्यात यावे, अशी मी या ठिकाणी विनंती करतो.

श्री.सुरेश जेथलिया : कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे सभापती किंवा उपसभापती व्यापारी हा होऊ शकतात का ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : कृषि उत्पन्न बाजार समिती ही संपूर्णत: शेतक-यांची व शेतक-यांसाठीच असते त्यामुळे या समितीवर सभापती किंवा उपसभापती देखील शेतकरीच होऊ शकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश:विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 7 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : महोदय,मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 9 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 9 संमत झाले आहे.

----------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात सर्वच ठिकाणी मराठीची गळचेपी होत असल्यामुळे मराठी भाषेचा वापर अनिवार्य करणे.

**मु.शी.**: राज्यात सर्वच ठिकाणी मराठीची गळचेपी होत असल्यामुळे मराठी भाषेचा वापर अनिवार्य करणे याबाबत सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री.मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, संजय केळकर, डॉ.नीलम गो-हे, सर्वश्री रामनाथ मोते, श्रीकांत जोशी, वि.प.स. यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव.

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"सन 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर आज 46 वर्षानंतरही राज्यातील सर्व शासकीय वा निमशासकीय कार्यालयात मराठीचा वापर पूर्णपणे न करणे, शासकीय आणि केंद्र शासकीय कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या नावांचे फलक मराठीत नसणे, शासकीय कार्यालयातील अधिकाऱ्यांचे शेरे मराठीत नसणे, दुकानांचे फलक मराठीत नसणे, न्यायालयीन कामकाजातही मराठीचा वापर न होणे, बँका, पतपेढ्या, सहकारी बँका, इत्यादी ठिकाणी अजूनही मराठीऐवजी इंग्रजी भाषेतील पावत्या व धनादेशांचा वापर होणे, आय.सी.एस.सी./ सी.बी.एस.सी. / इंटरनॅशनल स्कूलमुळे मराठी माध्यमाच्या शाळा बंद करुन वरील शाळांसाठी शासनाकडे परवानगीसाठी सतत होणारी मागणी आणि याला शासनाची मूक संमती असणे, इंग्रजी माध्यमाच्या शाळातून मराठीचा विषय सक्तीचा करण्याबाबत होत असलेली हेळसांड, शासकीय शाळा व महाविद्यालये यांच्या कार्यालयात देखील मराठीचा वापर कमी होणे, विक्रीच्या सर्व छापील मजकूरात तसेच विक्रीसाठी असलेल्या सर्व औषधांसाठीच्या सूचना सूचीमध्ये मराठीचा वापर अनिवार्य करण्याची आवश्यकता असतांना त्याबाबत काहीच कार्यवाही न होणे, रेल्वे/केंद्रीय कार्यालयातील सूचना फलकावर मराठीचा वापर अनिवार्य करण्याची आवश्यकता असतांना त्याकडे दुर्लक्ष करणे, अशाप्रकारे सर्वच ठिकाणी मराठीची गळचेपी होत असल्यामुळे राज्याची मराठी अस्मिताच धोक्यात येणे, त्यामुळे याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

..2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KTG/ SBT/ प्रथम कु.खर्चे ....... 16:30

श्री.दिवाकर रावते.........

सभापती महोदय, मी अत्यंत खेदाने आणि दु:खीत अंत:करणाने या प्रस्तावावर बोलण्याकरिता उभा आहे. खेद आणि दु:ख याकरिता की, या विषयावर आम्हाला संविधानिक चर्चा उपस्थित करावी लागत आहे. घटनेने दिलेल्या अधिकारामध्ये परप्रांतीय या राज्यात येतात. त्यांना आपण अडवू शकत नाही, असे ज्यावेळी सांगितले जाते त्यावेळी भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर घटनेने दिलेल्या अधिकारांची पायमल्ली करुन, प्रशासनामध्ये परप्रांतीय अधिका-यांना शरण जाऊन, राज्यकर्ते राज्यभाषेचा, मातृभाषेचा, लोकभाषेचा अवमान मुक सम्मतीने पाहत असतात, त्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या 50 वर्षानंतर सुध्दा नाइलाजाने आणि अत्यंत खेदाने आम्हाला मराठी भाषेसाठी सभागृहात आक्रंदन करावे लागत आहे. सभापती महोदय, आपणही माझ्या भावनेशी सहमत व्हाल आणि सत्ताधारी पक्षाचे सदस्य सुध्दा माझ्या भावनेशी सहमत होतील. ही अगतिकता का आली, हे सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे. सभापती महोदय, ही चर्चा घाईघाईमध्ये संपविण्याचा विचार करु नये, अशी माझी आपल्याला विनंती आहे. आज महाराष्ट्र राज्य स्थापन झ ााल्याला 46 वर्षे झाल्यानंतरही मराठीचा वापर करण्याबाबत प्रस्ताव आणण्याची पाळी येत असेल, मराठी ही राज्यभाषा आहे काय ? असा प्रश्न विचारण्यासाठी सन्माननीय सदस्यांना सभागृहामध्ये उभे रहावे लागत असेल, पूर्वीच्या सन्माननीय सदस्यांनी मराठीचा वापर अनिवार्य करण्याची आवश्यकतेबाबत या सभागृहात चर्चा घडवून आणली होती.

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, मराठी भाषेची होणारी गळचेपी, अत्याचाराबद्दल व तिला तिरस्काराने वागवत असल्याबद्दल मुक्तकंठाने या प्रस्तावावर पुरेसा वेळ बोलण्याची मला व सर्व संबंधित सन्माननीय सदस्यांना मुभा देण्यात यावी अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, आपण भाषण करताना मी आपणास थांबविणार नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्या हातामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली भारताची घटना आहे त्यांचा या सदनामध्ये सतत नामोल्लेख होतो. या घटनेच्या संविधानामध्ये संघराज्याची भाषा म्हणजे राजभाषा कोणती असावी याबाबत 343 (3) नुसार या देशाच्या भाषेसंबंधी उल्लेख केलेला आहे तो अत्यंत महत्वाचा व मोलाचा आहे. तो असा की,." या अनुच्छेदात काहीही असले तरी, संसदेला कायद्याद्वारे उक्त पंधरा वर्षाच्या कालावधीनंतर, त्या कायद्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा प्रयोजनांसाठी इंग्रजी भाषेचा किंवा अंकाच्या देवनागरी रुपाचा वापर करण्याकरिता उपबंध करता येईल". म्हणजे 15 वर्षाचा स्पेसिफिक कालावधी दिलेला आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर 15 वर्षे इंग्रजांनी व इंग्रजीने रहावे अशा त्यांच्या सोयीसाठी घटनेमध्ये ही टीप्पणी टाकली आहे. त्यानंतर 344(ख) मध्ये असे म्हटले आहे की, "संघराज्याच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शासकीय प्रयोजनांकरिता इंग्रजी भाषेचा वापर करण्यावर निर्बंध घालण्यात यावेत" अशा प्रकारची सांविधानिक तरतूद घटनेत केलेली आहे.

सभापती महोदय, प्रादेशिक भाषा का असावी याबाबत घटनेच्या कलम 345 व 346 मध्ये म्हटले आहे की, अनुच्छेद 346 व 347 यांच्या तरतूदींच्या अधीनतेने, राज्याच्या विधानमंडळाला राज्यामध्ये वापरात असलेल्या कोणत्याही एका किंवा अधिक भाषांचा किंवा हिंदीचा त्या राज्याच्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही शासकीय प्रयोजनाकरिता वापरावयाची किंवा वापरावयाच्या भाषा म्हणून कायद्याद्वारे अंगीकार करता येईल. परंतु राज्य विधानमंडळ कायद्याद्वारे अन्यथा तरतूद करीपर्यंत, त्या राज्यात या संविधानाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी ज्या शासकीय प्रयोजनांकरिता इंग्रजी भाषा वापरली जात होती त्यांच्याकरिता तिचा वापर चालू राहील." याचा अर्थ 15 वर्षापर्यंत त्या भाषेचा वापर चालू राहिल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ KTG/

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, दोन राज्यामध्ये भाषेचा संपर्क कसा असावा ते मी पुढे सांगत आहे. "संघ राज्यात शासकीय प्रयोजनांकरिता वापरण्यासाठी त्या त्या काळी प्राधिकृत झालेली भाषा ही राज्याराज्यांमधील आणि एखादे राज्य व संघराज्य यांच्यामधील व्यवहाराची राजभाषा असेल परंतु जर दोन किंवा अधिक राज्यांनी हिंदी भाषा ही अशा राज्यांमधील व्यवहाराची राजभाषा असावी असे एकमताने ठरविले तर, ती भाषा अशा व्यवहारासाठी वापरता येईल". हिंदी भाषिक राज्यांसाठी खासकरुन हे कलम टाकलेले आहे. परंतु याचा अर्थ असा की, दोन राज्ये ठरवतील ती त्यांची भाषा असेल याप्रमाणे महाराष्ट्र राज्याची मराठी भाषा असली पाहिजे.

सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, दिनांक 1 नोव्हेंबर, 1956 रोजी द्विभाषिक महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आली. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून कै.यशवंतराव चव्हाण यांनी सुत्रे हातात घेतली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा इतिहास सांगत बसण्याची ही जागा नाही व वेळही नाही. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली व नवीन राज्य अस्तित्वात आले. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर 1963 साली महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेने ठराव केला आहे की, महाराष्ट्राची राजभाषा ही मराठी असेल त्यापूर्वी ती अंमलात येत नव्हती. मी अत्यंत सन्मानाने व अभिमानाने आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की......

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

**सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री. रामनाथ मोते**

त्यावेळेस श्री. ना.ह.राजहंस या सदस्यांनी एक अशासकीय विधेयक या सभागृहात आणले होते. या महाराष्ट्र राज्यामध्ये राजभाषा म्हणून मराठी असल्याने मराठीतून सर्व कारभार करण्याचा आग्रह धरावा यासाठी हे विधेयक होते. सभापती महोदय, हे विधेयक त्यांनी 1968 साली णिले होते. म्हणजे 1960 साली मराठी भाषिकांचे राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यानंतर 1963 साली या राज्याची राजभाषा मराठी असावी म्हणून विधानसभेमध्ये एक ठराव संमत झाला होता. पण प्रत्यक्षात त्याप्रमाणे मराठीतून कारभार होत नाही म्हणून शेवटी 1968 साली मी आज जसा या सभागृहामध्ये उभा आहे त्याप्रमाणे तत्कालीन सदस्य श्री.राजहंस यांनी, राज्याची कारभाराची भाषा मराठी असावी म्हणून एक अशासकीय विधेयक आणून त्यावर बोलण्यासाठी उभे होते. हे विधेयक आणताना त्यांनी आणि अन्य सदस्यांनी मराठीतूनच आपले विचार सभागृहामध्ये मांडले होते मात्र त्यावर उत्तर देताना संबंधित मंत्र्यांनी खरे तर मराठीतूनच उत्तर द्यायला पाहिजे होते पण ते त्यावेळी इंग्रजीतून बोलले. त्यावेळेस सदनामध्ये आक्रोश काय होता की, सरकार त्यावेळेस इंग्रजी सोडायला तयार नाहीत. सभापती महोदय, त्या विधेयकामध्ये ज्या भावना व्यक्त झाल्या होत्या त्या महत्त्वाच्या आहेत. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्वसामान्यांपासून गरीबांपर्यंत बोलायचे असेल तर सामान्यत: मातृभाषेतून बोलले पाहिजे हे तत्त्व सर्वांनी, अगदी घटनेनेदेखील मान्य केलेले आहे. त्यानंतर त्यांनी यामध्ये म्हटले आहे की, 15 ऑगस्ट 1968 पासून तरी हा नियम अमलात यावा आणि त्यासाठी त्यांनी तेव्हा अशासकीय विधेयक आणले होते. पण लज्जास्पद गोष्ट ही की, मराठी भाषिकांचे राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याची निर्मिती 1960 मध्ये झाल्यापासून याबाबतीत अनेक आदेश सरकारकडून काढण्यात आले पण ते सारे कागदावरच राहिले, प्रत्यक्षात, व्यवहारात ते केव्हाही उतरले नाहीत आणि म्हणूनच एका सदस्याला 1968 साली त्यासाठी अशासकीय विधेयक येथे आणावे लागले. त्यावेळी श्री.सोनी म्हणून सदस्य होते त्यांनी याबाबत म्हटले आहे. आता येथे महात्मा गांधीजींचे नाव निघत नाही. ते केवळ मुन्नाभाईच घेतो. आता येथे केवळ शाहू, फुले आणि आंबेडकर हीच नावे घेतली जातात. सभापती महोदय, त्या विधेयकावर बोलताना असे सांगितले होते की, 1920 साली महात्मा गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेसने जो ठराव पास केला तोअसा होता की, वकिलांनी आपली वकीली सोडली पाहिजे, शाळा

....... 3एफ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

मास्तरांनी शाळा बंद पाडल्या पाहिजेत तसेच महात्मा गांधीनी हिंदुस्थानमध्ये भाषणे देण्यास सुरूवात केली. वस्तुत: महात्मा गांधी हे उत्तम बॅरिस्टर होते. त्यांचे इंग्रजी चांगले होते आणि त्यांची वकिली देखील चांगली चालत होती. ते ब्रीफकेस बॅरिस्टर नव्हते. त्यांना इंग्रजी भाषेचा अभिमान हाता आणि त्यांच्या इंग्रजीबद्दल इंग्रजांनी देखील स्तुती केली होती. परंतु जेव्हा हिंदुस्थानमध्ये त्यांनी स्वदेशीची, स्वातंत्र्याची चळवळ सुरू केली त्यावेळी त्यांनी सांगितले की, आपण सर्वांनी इंग्रजी भाषेचा त्याग केला पाहिजे आणि हिंदुस्थानी भाषेत, हिंदीमध्ये बोलले पाहिजे. सभापती महोदय, हा राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा संदेश आहे. म्हणून आपली भारतीय घटना तयार होऊन 18 वर्षांचा कालावधी लोटला तरी घटनेमध्ये राज्यामध्ये राज्यभाषेमध्ये कारभार होत नव्हता व आज देखील होत नाही. त्यामुळेच अशा प्रकारच्या विधेयकावर विधीमंडळामध्ये चर्चा चालली आहे. सभापती महोदय, 1968 मध्ये श्री.राजहंस यांनी अशासकीय विधेयक आणल्यानंतरही आजवर त्याप्रमाणे कोठलीही कृती झाली नाही म्हणूनच दुर्दैवाने आज मला त्याच कारणासाठी येथे उभे रहावे लागते आहे. या राज्याचे दुर्दैव किती आहे पहा, राज्याची राज्यभाषा कोणती आहे हे मान्य केल्यानंतरही ती मानली जात नाही, त्यासाठी अशासकीय ठराव आला तरीही ज्यांनी ते मानले तेच ते स्वीकारीत नाहीत आणि म्हणून मग मराठीचा वसा घेऊन आम्ही सर्व शिवसैनिक म्हणून उभे राहतो. सभापती महोदय, मला येथे हेही सांगितले पाहिजे की, यापूर्वी श्री. मनोहर जोशी यांना देखील येथे सदस्य म्हणून असताना अशाच प्रकारचे अशासकीय विधेयक आणावे लागले होते. सन 1991 चे वि.स.वि.क्रमांक 10 हे श्री.मनोहर जोशी यांनी अशासकीय विधेयकाच्या स्वरूपात आणले होते. ...

( यानंतर श्री. किल्लेदार ....3जी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू..

ही किती दुर्दशा आहे ? युतीचे राज्य आले. 1991 साली श्री.मनोहर जोशी यांनी विधेयक मांडले त्यामुळे राज्याच्या मराठी भाषेला वेगाने ताकद मिळाली. सन 1967 साली एका सदस्यांनी मराठी भाषेचा आग्रह धरला, त्यांचे कोणी ऐकले नाही. माननीय श्री.मनोहर जोशी हे प्राध्यापक असल्यामुळे त्यांची मराठी भाषा चांगली आहे. त्यांनी या संदर्भात केलेले भाषण मी वाचून दाखवितो. "या सभागृहातील विधेयक थोडक्यात सांगू शकेन. अतिशय महत्वाचे विधेयक आहे. हे विधेयक मांडण्याचा उद्देश अतिशय स्पष्ट आहे. विधानसभा आणि विधानपरिषदेची अधिकृत भाषा मराठीमध्ये असूनसुध्दा सभागृहामध्ये येणारी विधेयके, अध्यादेश मराठीमध्ये नसतात, अशाप्रकारची तक्रार मी करत आलेलो आहे. अध्यादेश आणि विधेयके मराठीमध्ये नसावीत त्याचे कारण या सभागृहामध्ये कामकाजाच्या संबंधात तांत्रिक अडचण आहे, असे मला सांगण्यात आले. तांत्रिक अडचण दूर व्हावी या दृष्टीकोनातून केवळ मी हे विधेयक मांडलेंले आहे." माननीय श्री. मनोहर जोशी साहेबांनी मराठीमधून विधेयक आणण्याचा आग्रह धरल्यानंतर त्यांना तांत्रिक अडचण सांगण्यात आली. परंतु सदनामध्ये तरी मराठी भाषेचा वापर करावा. राज्याची मराठी भाषा होईल तेव्हा होईल. या विषयाच्या मेरिटमध्ये जाण्यापूर्वी मला काही सांगावयाचे आहे. अशाप्रकारचे विधेयक 1968 साली आणले होते, त्यानंतर 1991 साली विधेयक आणले तरी त्या संदर्भाने काही हालचाल झालेली नाही. या संदर्भाने मी मागोवा घेतला. याच संदर्भाने दिनांक 16 मार्च 2007 रोजी श्री. सुकृत खांडेकर यांनी "महाराष्ट्र टाईम्स"मध्ये एक स्तंभ लिहिलेला आहे तो वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत खात्यांचे प्रस्ताव हिंदी व इंग्रजीत मांडले जातात, तसेच महाराष्ट्रात मंत्रिमंडळासमोर मराठीप्रमाणे इंग्रजीतही प्रस्ताव यावेत, असे राज्यातील काही अमराठी आयएएस अधिकाऱ्यांना आता वाटू लागले आहे. राज्याचे माजी अतिरिक्त मुख्य सचिव नवीनकुमार यांनी आयएएस अधिकाऱ्यांच्या संघटनेच्या "हार्मनी" या वार्तापत्रात इंग्रजी प्रस्तावाची वकिली केली आहे. नवीनकुमार अधिकारी म्हणून केंद्र आणि राज्यात मंत्रिमंडळ बैठकांना हजर राहिले आहेत, दोन्ही बैठकांची तुलना करताना त्यांनी इंग्रजीचा आग्रह धरला आहे." त्यानंतर "महाराष्ट्र टाईम्स"ने 17 मार्च 2007 रोजी एक अग्रलेख लिहिलेला आहे. त्यामधील काही भाग मी वाचून दाखवितो. "नवीनकुमार यांच्या म्हणण्यानुसार केंद्राप्रमाणे महाराष्ट्रातही कॅबिनेट नोट्स इंग्रजीत काढण्यात याव्यात. मराठीतील नोट्सचे भाषांतर करणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ KTG/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु.....

कठीण होते हे त्याचे कारण आहे. महाराष्ट्र केडरमध्ये 1969 पासून नोकरी केल्यानंतरही मराठी समजण्यास त्यांना त्रास होत होता, तर त्यांची इतकी पदोन्नती कशी झाली,याची चौकशी व्हायला हवी. सनदी अधिकाऱ्यांनी ज्या राज्याच्या केडरमध्ये नेमणूक हाईल, तेथील भाषा अवगत करणे बंधनकारक असते. त्यामुळे भाषा समजत नाही,ही सबब लंगडी आणि फसवी आहे. राज्याच्या स्थापनेपासून इथे अनेक अमराठी सनदी अधिकारी झाले. मुख्य सचिवाच्या पदावरही अनेक अमराठी अधिकारी होते. पण कुणी मराठीच्या अज्ञानाबद्दल तक्रार केल्याचे ऐकिवात नाही.", असे म्हटलेले आहे. राज्याची प्रशासकीय भाषा मराठी आहे. मराठी भाषा बोलण्यास लाज वाटत असेल तर त्यांनी येथून चालते व्हावे, त्यांनी आपली अक्कल इतर राज्यामध्ये पाजळावी, असा अभिप्राय मी या ठिकाणी नोंदवत आहे. मी एका मंत्री महोदयांना सदनामध्ये एवढेच म्हणालो की, तुम्ही मराठीमध्ये बोला. त्यावर त्यांनी आपले अंग हलवत "मै राष्ट्र भाषा में बोल रहा हूँ" असे सांगितले. सदनाची, या राज्याची मातृभाषा मराठी असताना, त्याच्या विरोधी जाण्याचा मनोदय कोणाचा असू शकत नाही.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

मी अत्यंत खेदाने येथे नमूद करतो. मी एक पत्र आपल्याकडे पाठविलेले आहे. त्या पत्राला आपल्याकडून उत्तर आलेले नाही. तो माझ्यातील आणि आपल्यातील व्यवहार, सदस्य आणि सभापती यांच्यातील व्यवहार असल्यामुळे ते प्रकाशित करावे असे नाही. कारण ती आपल्या दृष्टीने महत्वाची बाब असते. पण आपण त्या आसनावरुन निर्देश दिले की, ते राष्ट्रभाषेत बोलत आहेत, या सदनामध्ये त्यांच्या भाषेत बोलण्याचा त्यांना अधिकार आहे. माझ्या मायमराठीला पार्श्वभागावर सदनाच्या माननीय सभापतींकडून एवढी जबरदस्त मिळत असेल तर तिने कोणाकडे रडावयाचे ? मला मुद्दाम या ठिकाणी सांगावयाचे आहे की, हिंदी ही राष्ट्रभाषा नाही. हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा दिलेला नाही. हिंदी भाषेला कोठेही राष्ट्रभाषा म्हणून मान्यता नाही. ती भाषा सर्व राज्यांकरिता सहकार्याची भाषा असून सुध्दा सर्व राज्यांनी ती भाषा स्वीकारलेली नाही. तरीही मी नम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना हे कळले होते. हा इतिहास ऐकण्यासारखा आहे. माझ्या भाषेवर अन्याय करीत असताना, इतर भाषेचा माजमिरास जरुर लढवावा. भाषा हे समृध्दीचे साधन आहे. मला दहा भाषा येत असतील तर ती माझ्या जीवनातील समृध्दी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदी भाषेला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता का दिली नाही ? पुण्यातील "सकाळ" दैनिकामध्ये "वाचकांचा पत्र व्यवहार" या सदरामध्ये आलेले एक पत्र आहे. ते पत्र साधारणत: मार्च 2006 मध्ये आलेले आहे. ऑगस्ट, 2006 मध्ये विंग कमांडर वसंत नारायण देशमुख यांनी हे वृत्तपत्रातील कात्रण पाठवले होते. त्या पत्रात असे म्हटले आहे की, "हिंदी भाषेसंबंधी 12 नोव्हेंबरचे पत्र वाचले. वस्तुस्थिती अशी आहे की, स्वातंत्र्यानंतर घटना समितीचे काम चालू असताना प्रारुप समितीचे अध्यक्ष व केंद्रीय कायदा मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वत: स्वतंत्र भारताची राष्ट्रभाषा संस्कृत असावी असा ठराव घटना समितीपुढे ठेवला होता. घटना समितीचा सप्टेंबर, 1949 चा ठराव क्रमांक 310/ अ-1 आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना असे वाटत होते की, या देशाची राष्ट्रभाषा संस्कृत असावी. त्या ठरावास श्री. बाळकृष्ण, श्री. बी. व्ही. केसकर, नासिरुद्दीन अहमद, डॉ. हृदयनाथ कुंझरु , डॉ. काटजू प्रभुती व अन्यही अनेक राज्यांतील मान्यवरांचा पाठिंबा होता. तेव्हा तत्कालीन पंतप्रधान श्री. पंडित



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. दिवाकर रावते .....

जवाहरलाल नेहरु अत्यंत संतप्त व अस्वस्थ झाले. अखेर नेहरुंनी पक्षनेता म्हणून डॉ. आंबेडकरांवर विलक्षण दबाव आणून त्यांना आपला संस्कृत राष्ट्रभाषेचा ठराव मागे घ्यावयास लावला. पण डॉ. आंबेडकरांनी प्रारुप समितीचे अध्यक्ष या नात्याने घटनेत हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा देण्याऐवजी कलम 343 मध्ये ऑफिशियल लँग्वेज ऑफ दि युनियन असा दर्जा दिला. त्यांनी हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा दिला नाही. घटनेत राष्ट्रभाषा हा शब्द नाही. दुखावलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तो शब्द सुध्दा घटनेमध्ये येऊ दिला नाही हे आपण समजून घ्यावे. अशा प्रकारे घटनेमध्ये भाषेच्या संदर्भात अतिशय जाणीवपूर्वक बारकाईने पाहिले गेले. घटनेने कोणत्या भाषेला मान्यता दिलेली आहे ? इंग्रजीचा टेंभा मिरवणाऱ्या सगळ्या आय.ए.एस. अधिकाऱ्यांना मी सांगू इच्छितो की, आपण माझ्या भारत भूमीमध्ये जगत आहात. आपण स्वतंत्र भारत भूमीचे आहात. आपण कोणत्याही प्रांताचे असाल पण त्या मातीबद्दल आपल्याला सुगंध वाटतो की नाही ? आपण घटना वाचता की नाही ? घटनेच्या आठव्या सूचीमध्ये या देशामध्ये ज्या भाषांना मान्यता दिलेली आहे त्या भाषांची नावे दिलेली आहेत. त्यामध्ये आसामी, बंगाली, गुजराथी, हिंदी, कन्नड, काश्मिरी, कोकणी, मणीपुरी, मल्याळम, मराठी, नेपाळी, उडिया, पंजाबी, संस्कृत, सिंधी, तामिळ, तेलगु आणि उर्दू या भाषांचा उल्लेख केलेला आहे. आपल्या घटनेमध्ये इंग्रजीला कोठेही स्थान नाही. या देशाची भाषा इंग्रजी नाही. इंग्रजीला घटनेमध्ये स्थान नाही. परंतु इंग्रजांकडून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इंग्रजाळलेली प्रशासकीय यंत्रणा होती म्हणून 15 वर्षेपर्यंत ती भाषा वापरता येईल, त्या नंतर त्या भाषेला तडीपार करा अशी घटनेमध्ये नोंद आहे. पण आज आमच्या भाषेला तडीपार करण्यासाठी निघालेल्या श्री. नवीनकुमार यांना पाहिल्यानंतर रक्त उसळून येते. या मातीच्या अंकुरातून जी मराठी अस्मिता, जो जो माणूस जन्माला आला असेल त्यांनी श्री. नवीनकुमार यांना धडा शिकवला पाहिजे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते ....)

2007 या वर्षातील मार्च महिन्यामध्ये अधिवेशन सुरु असताना नवीन कुमार यांनी असे तारे तोडावेत काय ? हा अधिकारी, इंग्रजी भाषा पाहिजे असे कसे काय म्हणतो ? या आमच्या भूमीत राहाणारा, आमचे मीठ खाणारा, आमच्या मातीत जगणारा, घटनेची पायमल्ली करणारा हा अधिकारी निवृत्त झाला, अन्यथा त्याचा बंदोबस्त करणे भाग आहे, असे मला बोलावे लागले असते. मी मराठी बोलतो कारण आपली राजभाषा मराठी आहे. घटनेप्रमाणे प्रादेशिक भाषा, संपर्काची भाषा आणि फॉरीन लँग्वेज अशी त्री-भाषासुत्री आहे. सभापती महोदय, मराठी भाषा अनिवार्य असणा-या आस्थापना कोणकोणत्या आहेत हे मी आपणास सांगतो. 1) सर्व राष्ट्रीयीकृत अधिकोष,(इंग्रजीत बँका), 2) सर्व शैक्षणिक संस्था, 3) जीवनावश्यक वस्तुंचे उत्पादक व वितरक, (सरकारी व खाजगी), 4) अन्न व औषध उत्पादक (देवनागरी लिपी वापरणे विषयी) सभापती महोदय, आपण पहातो की, औषधांच्या वेष्टनावर 8-10 भाषांमध्ये माहिती दिलेली असते. ती माहिती फक्त मराठीमध्ये नसते. आपण डोके दुखले की, डोक्याला बाम लावतो परंतु ही डोकेदु:खी निर्माण करणा-यांच्या बाबतीत मात्र आपण काहीच कारवाई करीत नाही. सभापती महोदय, मराठी वापर अनिवार्य असणा-या आस्थापनांची मी माहिती देत आहे. 5) केंद्र शासनाची सर्व खाती, विभाग, उपक्रम, मंडळे, महामंडळे, आस्थापना, 6) राज्य शासनाची सर्व खाती, विभाग, उपक्रम, मंडळे, महामंडळे, आस्थापना तसेच जनतेचा संपर्क दैनंदिन स्वरुपात येणारी विवक्षित कार्यालये उदा :- 7) सरव्यवस्थापक, मध्य रेल्वे, छत्रपती शिवाजी स्थानक, मुंबई, 8) सरव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, चर्चगेट स्थानक, मुंबई, 9) महानगर टेलिफोन निगम मर्यादित, प्रभादेवी, मुंबई, 10) राज्य परिवहन मंडळ, मुंबई सेंट्रल, मुंबई, 11) बृहन्मुंबई महानगरपालिका मुंबई, 12) भारत पेट्रोलिअम, हिंदुस्थान पेट्रोलिअम, इंडियन ऑईल, मुंबई, 13) मुंबई परिवहन सेवा (बेस्ट), 14) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण, पारेषण, निर्मिती, धारक कंपनी, प्रकाशगड वांद्रे (पूर्व) मुंबई, 15) भारत संचार निगम मर्यादित, मुंबई, 16) आकाशवाणी केंद्र, मुंबई. 17) नौदल व संरक्षण खाते कार्यालये, 18) भारतीय नौकानयन महामंडळ, मुंबई 19) भारतीय समभाग विनियम मंडळ (सेबी) मित्तल इमारत, नरिमन पॉईंट, मुंबई, 20) उद्योग निबंधक कार्यालय, केंद्र सरकार (रजिस्ट्रार ऑफ कंपनीज), मुंबई, 21) भारतीय मध्यवर्ती अधिकोष (भारतीय रिझर्व्ह बँक) मुंबई, 22) महाराष्ट्र

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते ...)

राज्य रस्ते विकास महामंडळ, नेपिअन सी मार्ग, मुंबई. सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेमध्ये देखील मराठीचा वापर होत नाही. ही जी यादी आता मी वाचून दाखविली त्या ठिकाणी कायद्याची अंमलबजावणी कोणी करायची ? सभापती महोदय, प्राधान्याने मराठी वापरण्याच्या बाबी कोणकोणत्या आहेत हे मी आपणास सांगतो. 1)जनतेच्या/कर्मचा-यांच्या संबंधातील सर्व प्रकारचे अर्ज पावत्या, छापील नमुने, सूचना फलक, स्थळनिर्देश पाट्या, विभाग अधिकारी पद निर्देश पाट्या, मराठी वृत्तपत्रातील जाहिराती, जाहिरात फलक, दूरध्वनी, भ्रमणध्वनी जोडणी अर्ज, देयके, पावत्या, पत्रव्यवहार, 2)वीजजोड अर्ज, देयके, पावत्या, पत्रव्यवहार, दूरध्वनी, भ्रमणध्वनीवरील ध्वनिमुद्रित संदेश, शासकीय ग्राहक सेवा केंद्रातील संभाषण, 3) रेलविभाग आरक्षण मागणी अर्ज, प्रवासिका, प्रवासी याद्या, स्थानकांची नावे, स्थानक, फलाटावरील सर्व पाट्या, सूचना, फलक, दंड पावत्या इत्यादी 4) महापालिका, नगरपालिका, स्थानिक प्राधिकरणे यातील सर्व अर्ज, पावत्या, देयके (घरपट्टी,पाणीपट्टी), योजनांची नांवे इ. 5) सर्व आस्थापनांमधील निविदा सूचना, निवदा 6) कागदपत्रे अहवाल, टिपण्या, शेरे, स्वाक्ष-या, देयके, धनादेशांवरील मजकूर, सर्व छापील मजकूर. या सर्व बाबीत महाराष्ट्र राज्याच्या राजभाषा अधिनियम 1964 नुसार देवनागरी लिपीतील मराठी भाषा राज्य शासनाच्या अधिकृत वर्णमालेतील मराठी अक्षरे/अक्षरावली/भाषा संचालनालयाच्या पारिभाषिक कोशातील मराठी शब्द व अधिकृत शब्दावलीतील एक ते शून्य अंक यांच्यासह राज्याची राजभाषा वापरणे याबाबत निर्देश दिलेले आहेत. हे निर्देश अमलात यावेत यासाठी मी ही यादी या ठिकाणी नमूद केलेली आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्र राज्याची राजभाषा "मराठी" घोषित करण्यात आली.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

दिनांक 9 मार्च, 1965 च्या आदेशान्वये महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, 1964 जारी करण्यात आला. दिनांक 3 मे, 1966 च्या अधिसूचनेद्वारे काही वर्जित प्रयोजने वगळता शासनाचा सर्व कारभार मराठीतून व्हावा असे आदेश देण्यात आले. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर शासन व्यवहारामध्ये मराठीचा वापर जास्तीत जास्त प्रमाणात व्हावा म्हणून शासन सतत प्रयत्नशील आहे. यासाठी शासनाने वेळोवेळी आदेश काढले असून सर्व कार्यालयातील कारभार मराठीतून व्हावा म्हणून प्रयत्न केले आहेत.

सभापती महोदय, अंमलबजावणीची ऐशीतैशी कशी होते यासाठी मी आदेश वाचून दाखवितो. मघाशी वाचून दाखविली ती केंद्राची यादी होती. केंद्र सरकारने सर्व राज्यांना अशी विनंती केली की, सर्व राज्यानी 1979 हे वर्ष राजभाषा वर्ष म्हणून साजरे करावे. त्यादृष्टीने हे शासन हे वर्ष राजभाषा वर्ष म्हणून साजरे करीत आहे. यासाठी माननीय शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन झाली असून त्या समितीच्या आदेशान्वये हे वर्ष राजभाषा वर्ष साजरे केले जात आहे. या वर्षात शासकीय कामकाज 60 टक्के मराठीतून व्हावे असे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. 1979 सालीतील हे परिपत्रक आहे यात 1985 अखेर 100 टक्के कामकाज मराठीतून व्हावे असे उद्दिष्ट ठरविले आहे. शासनाने मराठीचा वापर करण्याबाबतचे आदेश काढले 1964 साली. त्यानंतर 1979 साली केंद्र सरकारच्या आदेशान्वये सर्व देशामध्ये राजभाषा वर्ष साजरे करण्याचे आदेश काढण्यात आले. त्यावेळी 60 टक्के कारभार मराठीतून व्हावा असे आदेश काढले. 1985 साली 100 टक्के कारभार मराठीतून व्हावा असे ठरविण्यात आले. या मुद्यावर शासनाने विचार केला असून असे ठरविले आहे की, शासन अंगिकृत व्यवसायांनीही त्यांचा जनतेशी घनिष्ठ संबंध येत असल्याने कारभारात मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे. या पत्राद्वारे सर्व शासन अंगिकृत व्यवसायांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी वर्जित प्रयोजनाव्यतिरिक्त सर्व काम मराठीतून करावे. यासंबंधीचे परिपत्रक क्र.मभावा 1079/28, दिनांक 23 जुलै, 1979.

सभापती महोदय, मला हे कळत नाही, या सभागृहात महत्वाच्या विषयावर चर्चा चालू आहे. ही चर्चा कोणत्या विभागाच्या अंतर्गत येते? चर्चेला उत्तर कोण देणार आहे? या चर्चेचा संबंध कोणत्या विभागाशी येतो हे स्पष्ट झालेले नाही. सभागृहामध्ये राज्यपालांच्या अभिभाषणावरील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

चर्चा किंवा इतर प्रस्तावावरील चर्चा होत असताना मंत्रीमहोदयांकडून मुद्यांची नोंद करण्यात येत असते. किमान संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. एवढा तरी आदर करावा. मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित नसतील तर ही चर्चा येथे थांबवावी.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मंत्रिमंडळाची बैठक सुरु असल्यामुळे माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री त्या बैठकीच्या कामकाजामध्ये व्यस्त आहेत.

श्री.दिवाकर रावते : या विषयाचा संबंध कोणत्या मंत्री महोदयांशी आहे?

श्री.राजेश टोपे : सामान्य प्रशासन विभागाचा राज्यमंत्री म्हणून मी मुद्यांची नोंद घेत आहे. परंतु चर्चेला उत्तर माननीय मुख्यमंत्री महोदय देणार आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काय सरकारची अवस्था आहे? राजभाषेच्या प्रश्नावर विधानपरिषदेत चर्चा होत असताना मराठी भाषेचा अभिमान असणारे काँग्रेसवासी किंवा राष्ट्रवादी पक्षाच्या सदस्यांनी सभागृहात उपस्थित असणे आवश्यक होते.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे अप्रतिम भाषण सुरु आहे. अतिशय उत्तम प्रकारे मुद्यांची ते मांडणी करीत आहेत. त्यांना भाषणासाठी भरपूर वेळ मिळावा अशी आमचीही इच्छा आहे. परंतु विनियोजन विधेयक विधानसभेत मंजूर होऊन आलेले आहे. सभागृहाची मान्यता असेल तर विनियोजन विधेयक अगोदर मंजूर करुन घ्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शासन परिपत्रक क्र.ओएफएल 1063/एम यामध्ये काय म्हटले आहे ती मी वाचून दाखवितो. मला खात्री होती, सभागृहात कोणी उपस्थित नसले तरी सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार हे उपस्थित असतीलच. मी त्यांना धन्यवाद देतो. या सभागृहाच्या संस्कृतीचा चेहरा म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार हे आहेत.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

शासन परिपत्रक क्रमांक ओएफएल/1063-एम/ दिनांक 20 नोव्हेंबर, 1963 व शासकीय ज्ञापन क्रमांक मभावा/1964-म, दिनांक 21एप्रिल, 1964 या परिपत्रकात मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषेचा उपयोग करण्यात आलेला आहे.

कार्यालय सूचनेतील परिच्छेद 1 मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, अधिसूचना काढल्यानंतर ज्या कामाकरिता मराठीचा वापर करण्याची तरतूद कायद्याने केलेली आहे त्याबाबत मराठी व्यतिरिक्त इतर कोणत्याही भाषेचा वापर करण्यास कर्मचा-यांना मोकळिक राहणार नाही.

सभापती महोदय, आपला एक अधिकारी तुमच्या कानामागे वाजवून गेलेला आहे. ही जी घटना आहे ती सुध्दा आताच म्हणजे सन 2007 मध्येच घडलेली आहे. ज्यांनी महाराष्ट्राचे मीठ खाल्ले तेच मराठीवर अत्याचार करीत आहेत. त्यामुळे अशांना तुम्ही आता तरी आवरले पाहिजे काहीही करुन त्यांना आवरा, त्यांचे ब्लॉक खाली करा. अधिवेशन चालू असतांना तो मराठीची ऐशी की तैशी करतो. त्यामुळे हे प्रकार आता तरी आवरा. घटनेने जे अधिकार दिलेले आहेत ते तरी तुम्ही वापरा.

सभापती महोदय, परिच्छेद क्रमांक 2 मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, कर्मचा-त्यांना टिपा व मसुदे लिहीत असतांना मराठीतील वाक्प्रचार सहजासहजी डोळयासमोर येत नसावे व त्यामुळे मराठी लिहितांना त्यांना बहुदा अडचण भासत असावी. ही अडचण नाहीशी करण्याच्या दृष्टीने शासनाने जवळ जवळ 4.500 ते 5000 नित्यातल्या वाक्यप्रयोगांचा संग्रह ( इंग्रजी व त्यासोबत मराठी पर्याय देऊन ) पुस्तक रुपाने आता प्रसिध्द केला आहे. शासनातील प्रत्येक कर्मचा-याला याची प्रत देण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. या पुस्तकाच्या आणि भाषा विभागातर्फे यापूर्वी प्रकाशित झालेल्या पदनाम कोषाच्या सहाय्याने लहान टिपा किंवा पत्रे मराठीतून लिहिण्यास अडचण पडू नये.

सभापती महोदय, परिच्छेद 3 मध्ये म्हटले आहे की, " काही सचिवालयीन विभाग व अन्य कार्यालये लहान सहान मसुदे देखील त्यांच्या मराठीतून अनुवाद करुन देण्याकरिता भाषा विभागाकडे पाठवित असल्याचे या विभागाच्या निदर्शनास आले आहे. भाषा विभागात तांत्रिक व विधी विषयक सामुग्रीचा अनुवाद करण्याची व्यवस्था केलेली आहे. परंतु नित्याच्या व्यवहारातील

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

टिपा किंवा मसुदे यांचा अनुवाद करण्यासाठी वेगळी व्यवस्था नाही. तेव्हा यापुढे कर्मचा-यांनी टिपा व मसुदे मराठीतून लिहिण्याचा सराव व अभ्यास करणे उचित ठरेल. या दृष्टीने सचिवालयातील किंवा इतर कार्यालयातील प्रत्येक टिप्पणीबाबत संबंधितांनी आठवड्यातून कमीतकमी 10 फाईलींवर मराठीतून टिपा लिहाव्यात, अशी एक व्यवहार्य सूचना करता येईल.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी उपसभापती )**

श्री.दिवाकर रावते........

पारिभाषिक शब्द किंवा वाक्प्रयोग यांच्या संबंधात काही अडचण भासल्यास भाषा संचालनालयाकडे त्यासंबंधी विचारणा करावी. दरम्यान ते शब्द वा वाक्प्रचार देवनागरीमध्ये लिहिण्यास हरकत नाही. त्या त्या विभागातील अधीक्षकाने त्याच्या हाताखालील सहायक आठवड्यातून कमीतकमी दहा फाईलींवर मराठीतून टीपा लिहितात किंवा नाही याविषयी आपल्याजवळ माहिती ठेवावी. म्हणजे मराठीतून व्यवहार होतो की नाही याची गांभीर्याने नोंद घेतलेली आहे.

4. काही विभागांनी मराठीतून लिहिलेल्या टीपांवरुन असे दिसून आलेले आहे की, स्वतःच्या इच्छेनुरुप पदनामे बनवून त्यांनी त्यांचा वापर केलेला आहे. उदाहरणार्थ स्पेशल सेक्रेटरीला खास सचिव, पब्लिसिटी असिस्टंटला माहिती मदतनीस इत्यादी. या संबंधात सर्व विभागांचे लक्ष या विभागाच्या ज्ञापन क्रमांक मभावा-1164-म, दिनांक 29 एप्रिल, 1964 याकडे वेधण्यात येत आहे. पदनाम कोशात दिलेल्या पदनामांचाच उपयोग अनिवार्यपणे मराठीतून टीपा, मसुदे वगैरे लिहिताना करणे आवश्यक आहे व त्याबाबतीत वैयक्तिक आवड किंवा कल्पनेला स्थान नाही ही गोष्ट पुन्हा सर्व कर्मचाऱ्यांच्या लक्षात आणून देणे आवश्यक वाटते. टपालाच्या सोयीकरिता मात्र लिफाफ्यावर पत्ता लिहीत असताना मराठी पदनामा बरोबरच कंसात इंग्रजी पदनामदेखील लिहिणे सध्या तरी योग्य होईल. म्हणजे त्या शब्दाला मराठीत काय म्हणतात ते अंगवळणी पडेल.

5. काही विभागांत व कार्यालयात शाखांच्या नावांचे फलक वगैरे अजूनही इंग्रजीत लिहिलेले आढळतात. ज्या विभागांचा व कार्यालयांचा जनतेशी संबंध येतो त्यांनी जनतेच्या मार्गदर्शनासाठी म्हणून सूचना देणारे फलक मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांत करुन घ्यावेत व इतर फलक मराठीतून करुन घ्यावेत. त्याचप्रमाणे सचिवालयातील सर्व विभागांनी व इतर कार्यालयांनी उपस्थित-पट, ये-जा नोंदवही ( मुव्हमेंट रजिस्टर ) इत्यांदीतील नोंदी मराठीतूनच कराव्या. परिपत्रक क्रमांक ओएफएल 1063-एम,दिनांक 20 नोव्हेंबर 1963 मध्ये दिलेल्या आदेशांचे कटाक्षाने पालन करणे आता अनिवार्य आहे. त्यात उल्लेखिलेल्या सर्व बाबतीत, त्याचप्रमाणे नेमणुकीसंबंधीचे व रजेच्या मंजुरीचे आदेश अभिवेदनांना द्यावयाची उत्तरे इत्यादी बाबतीत सर्वांनी मराठीचा वापर करावा.

..2..

श्री.दिवाकर रावते........

6. भाषा संचालनालयातर्फे मराठी टंकलेखनाच्या व लघुलेखनाच्या प्रशिक्षणाच्या करण्यात आलेल्या व्यवस्थेचा पुष्कळशा कार्यालयांकडून पाहिजे तितका फायदा घेतला जात नाही, असे आढळून आले आहे. काही अपवाद खेरीज करुन सर्व राज्यकारभार लवकरच मराठीतून चालवायाचा असल्यामुळे सर्व लघुलेखक व टंकलेखक यांना मराठी टंकलेखनाचे व लघुलेखनाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्व कार्यालयातील टंकलेखकांना व लघुलेखकांना भाषा संचालनालयातर्फे चालू असलेल्या प्रशिक्षणासाठी पाठविण्याची दक्षता घेतल्यास मराठीकरणाचे काम पुष्कळ सुकर होईल. त्याचप्रमाणे ज्यांनी मराठीतून लघुलेखनाचे प्रशिक्षण घेतले असेल त्यांना अधिकाऱ्यांनी मराठीतून श्रुतलेखन दिल्यास त्यांच्या शिक्षणाचा त्यांना विसर पडणार नाही.

सभापती महोदय, आपण आजही मंत्रालयात वा राज्यातील अन्य कार्यालयात गेलो तर आपल्याला तेथे अनेक इंग्रजी टंकलेखन यंत्रे दिसतात. ही इंग्रजी टंकलेखन यंत्रे काढून तेथे मराठी टंकलेखन यंत्रे आणली पाहिजेत. याठिकाणी सांगण्यात आले पाहिजे की, येत्या आठ दिवसांच्या आत जर इंग्रजी टंकलेखन यंत्रे काढून टाकली नाहीत तर, नवव्या दिवशी दिवाकर रावते येऊन ती सर्व टंकलेखन यंत्रे वरुन फेकून देतील.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी उपसभापती )**

श्री.दिवाकर रावते........

पारिभाषिक शब्द किंवा वाक्प्रयोग यांच्या संबंधात काही अडचण भासल्यास भाषा संचालनालयाकडे त्यासंबंधी विचारणा करावी. दरम्यान ते शब्द वा वाक्प्रचार देवनागरीमध्ये लिहिण्यास हरकत नाही. म्हणजे इंग्रजी मसुद्याचे भाषांतर भाषा संचालनालयाकडून येत नाही तोपर्यंत ते शब्द वा वाक्प्रचार देवनागरीमध्ये लिहिण्यास हरकत नाही. पुढे असे नमूद केलेले आहे की, त्या त्या विभागातील अधीक्षकाने त्याच्या हाताखालील सहायक आठवड्यातून कमीतकमी दहा फाईलींवर मराठीतून टीपा लिहितात किंवा नाही याविषयी आपल्याजवळ माहिती ठेवावी. म्हणजे मराठीतून व्यवहार होतो की नाही याची गांभीर्याने नोंद घेतलेली आहे.

4. काही विभागांनी मराठीतून लिहिलेल्या टीपांवरुन असे दिसून आलेले आहे की, स्वत:च्या इच्छेनुरुप पदनामे बनवून त्यांनी त्यांचा वापर केलेला आहे. उदाहरणार्थ स्पेशल सेक्रेटरीला खास सचिव, पब्लिसिटी असिस्टंटला माहिती मदतनीस इत्यादी. या संबंधात सर्व विभागांचे लक्ष या विभागाच्या ज्ञापन क्रमांक मभावा-1164-म, दिनांक 29 एप्रिल, 1964 याकडे वेधण्यात येत आहे. पदनाम कोशात दिलेल्या पदनामांचाच उपयोग अनिवार्यपणे मराठीतून टीपा, मसुदे वगैरे लिहिताना करणे आवश्यक आहे व त्याबाबतीत वैयक्तिक आवड किंवा कल्पनेला स्थान नाही ही गोष्ट पुन्हा सर्व कर्मचाऱ्यांच्या लक्षात आणून देणे आवश्यक वाटते. टपालाच्या सोयीकरिता मात्र लिफाफ्यावर पत्ता लिहीत असताना मराठी पदनामा बरोबरच कंसात इंग्रजी पदनामदेखील लिहिणे सध्या तरी योग्य होईल. म्हणजे त्या शब्दाला मराठीत काय म्हणतात ते अंगवळणी पडेल. किती बारकाईने हे परिपत्रक काढलेले आहे याचा आपण विचार करावा.

5. काही विभागांत व कार्यालयात शाखांच्या नावांचे फलक वगैरे अजूनही इंग्रजीत लिहिलेले आढळतात. ज्या विभागांचा व कार्यालयांचा जनतेशी संबंध येतो त्यांनी जनतेच्या मार्गदर्शनासाठी म्हणून सूचना देणारे फलक मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांत करुन घ्यावेत व इतर फलक मराठीतून करुन घ्यावेत. त्याचप्रमाणे सचिवालयातील सर्व विभागांनी व इतर कार्यालयांनी उपस्थित-पट, ये-जा नोंदवही ( मुव्हमेंट रजिस्टर ) इत्यांदीतील नोंदी मराठीतूनच कराव्या. परिपत्रक क्रमांक ओएफएल 1063-एम,दिनांक 20 नोव्हेंबर 1963 मध्ये दिलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

आदेशांचे कटाक्षाने पालन करणे आता अनिवार्य आहे. त्यात उल्लेखिलेल्या सर्व बाबतीत, त्याचप्रमाणे नेमणुकीसंबंधीचे व रजेच्या मंजुरीचे आदेश अभिवेदनांना द्यावयाची उत्तरे इत्यादी बाबतीत सर्वांनी मराठीचा वापर करावा. याठिकाणी अनिवार्य शब्द वापरलेला आहे.

6. भाषा संचालनालयातर्फे मराठी टंकलेखनाच्या व लघुलेखनाच्या प्रशिक्षणाच्या करण्यात आलेल्या व्यवस्थेचा पुष्कळशा कार्यालयांकडून पाहिजे तितका फायदा घेतला जात नाही, असे आढळून आले आहे. काही अपवाद खेरीज करुन सर्व राज्यकारभार लवकरच मराठीतून चालवायाचा असल्यामुळे सर्व लघुलेखक व टंकलेखक यांना मराठी टंकलेखनाचे व लघुलेखनाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्व कार्यालयातील टंकलेखकांना व लघुलेखकांना भाषा संचालनालयातर्फे चालू असलेल्या प्रशिक्षणासाठी पाठविण्याची दक्षता घेतल्यास मराठीकरणाचे काम पुष्कळ सुकर होईल. त्याचप्रमाणे ज्यांनी मराठीतून लघुलेखनाचे प्रशिक्षण घेतले असेल त्यांना अधिकाऱ्यांनी मराठीतून श्रुतलेखन दिल्यास त्यांच्या शिक्षणाचा त्यांना विसर पडणार नाही.

सभापती महोदय, आपण आजही मंत्रालयात वा राज्यातील अन्य कार्यालयात गेलो तर आपल्याला तेथे अनेक इंग्रजी टंकलेखन यंत्रे दिसतात. ही इंग्रजी टंकलेखन यंत्रे काढून तेथे मराठी टंकलेखन यंत्रे आणली पाहिजेत. याठिकाणी सांगण्यात आले पाहिजे की, येत्या आठ दिवसांच्या आत जर इंग्रजी टंकलेखन यंत्रे काढून टाकली नाहीत तर, नवव्या दिवशी दिवाकर रावते येऊन ती सर्व टंकलेखन यंत्रे वरुन फेकून देतील.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या उप सचिवांनी, संचालक, सरकारी मुद्रण व लेखन सामग्री, चर्नीरोड, मुंबई यांना दिनांक 5 मार्च, 1966 रोजी पाठविलेल्या पत्रात अशा सूचना दिल्या होत्या की, "महाराष्ट्र शासनाच्या मराठीविषयक धोरणानुसार काही अपवाद वगळता, या राज्यात सर्व स्तरांवर मराठीचा राजभाषा म्हणून वापर व्हावयाचा असल्याने शासन व्यवहारात नेहमी लागणारी प्रपत्रे, नोंदवहया, आवक-जावक नोंदपुस्तके वगैरे सर्व प्रकारची सामग्री मराठीतून मुद्रित करुन घेणे आवश्यक आहे. तरी सध्या इंग्रजीत वापरात असलेल्या सर्वमान्य प्रमाण नमुन्यांचे (Approved Standard Forms) मराठी रुपांतर भाषा संचालनालयाकडून मान्य करवून घेऊन त्याप्रमाणे ती मुद्रित करण्याची व्यवस्था आतापासूनच केल्यास पुढे अडचण पडणार नाही." परंतु हे शासन लाजलज्जा कोळून प्यायलेले आहे. आम्ही आणखी काय बोलावे ? याठिकाणी माझा असा सवाल आहे की, या प्रस्तावावरील सन्माननीय सदस्यांची चर्चा संपल्यानंतर माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तरामध्ये सांगावे की, आपण हया प्रमुखास आज निलंबित करणार आहात की नाही ? आपण त्यांचे काही केले नाही तर मी उद्या त्यांचे काय करावयाचे असेल ते करीन. हे परिपत्रक मी माननीय सभापतींमार्फत माननीय मंत्रिमहोदयांना देतो.

( सदरचे परिपत्रक पीठासीन अधिकाऱ्यांना देण्यात आले. )

शासनानेच सन 1966 साली असे सांगितले असतानाही आपण अजूनही सर्व काही इंग्रजीतून छापता, हे योग्य आहे का ? आपल्याला काहीच कसे वाटत नाही ? याबाबतचा जाब आपल्याला द्यावा लागणार आहे. 1965 च्या आदेशाला पायदळी तुडवून मराठीच्या छाताडावर नाचणाऱ्या नराधमांना आपण कोणती शिक्षा देणार आहात ? यासंबंधी मी आणखी एक खटला माझ्या अंगावर घेण्यास तयार आहे, पण त्यांना शासन करीन. शासनाचे आदेश आपण का पाळत नाहीत ? आपण हे काय करताय ? याबाबतीत माननीय श्री.मनोहर जोशी व महाजन यांनी ओरडून सांगितले, पण त्याचा काहीही उपयोग झालेला नाही. पालथ्या घडावर पाणी असेल तर तोच दगड आपल्याला मारावा लागेल. छपाईखान्याबाबत आपण काय करणार आहात, ते आपण उत्तरात सांगावे.

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, सन 1963, 1964, 1965, 1966 चे परिपत्रक वाचून झाले. आता मी सन 1967 च्या परिपत्रकाकडे वळतो. त्यात असे म्हटले आहे की, "वेळोवेळी प्रस्तुत अधिसूचनांकडे शासनाच्या विभागांचे व कार्यालयांचे लक्ष वेधण्यात आलेले आहे व "वर्जित प्रयोजनांव्यतिरिक्त" अन्य सर्व कामकाज मराठीतून करण्याविषयी वेळोवेळी अनुदेश देण्यात आलेले आहेत. असे असतानाही, "वर्जित प्रयोजने" "वर्जित" म्हणून त्यासाठी इंग्रजीचा वापर करावयाचाच व जी प्रयोजने वर्जित नाहीत त्यांच्याशी संबंधित कामकाजही इंग्रजीतूनच या ना त्या सबबीवर चालू ठेवावयाचे अशीच सर्वसाधारणपणे शासकीय कर्मचाऱ्यांची वृत्ती असल्याचे आढळून येते. "टंकलेखन यंत्रे नाहीत" या केवळ एका कारणामुळे मराठीकरण शक्य नाही असे कळविणारी बहुसंख्य कार्यालये आहेत. या कार्यालयांना लहान-सहान पत्रे हाती लिहून निर्गमित करता येण्यासारखी आहेत. शिवाय टंकलेखन यंत्रावाचून होणारे व वर्जित प्रयोजनांत न मोडणारे सर्व कामकाज मराठीतून करता येण्यासारखे आहे व वस्तुत: त्यांनी ते मराठीतून करण्यास यापूर्वीच सुरुवात करावयास हवी होती. पण तेही कामकाज मराठीतून होत नसल्याचे आढळून येते." अशाप्रकारे बारीक सारीक सर्व गोष्टी यामध्ये नमूद केलेल्या आहेत. या अधिकाऱ्याला खरे म्हणजे गोल्डमेडल द्यावयास पाहिजे. यात पुढे असेही म्हटले आहे की, "पुढील बाबींशी संबंधीत कामकाज टंकलेखन यंत्रावाचूनही मराठीत करता येणे शक्य आहे व तसे ते केले जात असल्याची विभागाध्यक्षांनी व कार्यालयप्रमुखांनी खातरजमा करावी. कार्यालयाच्या सर्व शाखोपशाखांतील निरनिराळया नोंदवहया, आवक-जावक नोंदणी पुस्तके, उपस्थितीपत्रके, सेवापुस्तके, नामनिर्देशन वही, फाईलींचे सूचीपत्र, रोख शाखा/लेखा शाखा यामधील देयके, लेखे ठेवणे, शासन व्यवहारातील सर्व टिप्पण्या (नोटस्), याशिवाय हरघडी लागणारे सर्व प्रकारचे रबरी ठसे व मुद्रा मराठीतूनच असणे आवश्यक आहे." या अधिकाऱ्याने "कृपया" करावे, असे मुद्दाम म्हटलेले आहे. म्हणजे, अतिशय नम्रपणे म्हटले आहे. "सर्व सचिवालयीन विभागांनी, त्यांच्या नियंत्रणाखालील विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवरील सर्व शासकीय कार्यालयांमधील कामकाज शासनाच्या मराठीविषयक धोरणानुसार करण्यात येत असल्याची खातरजमा करावी,"

नंतर कु.गायकवाड...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते सुरु...

खातरजमा करावी अशा प्रकारचे हे धोरण, प्रपत्र,आदेश,परिपत्रक क्रमांक व.भ.आ.1067/ 107 म, दिनांक 31 मे 1967 रोजी काढण्यात आले. सभापती महोदय या ठिकाणी मी, 1963 सालापासून ते 1967 सालापर्यंत माझी ही कहाणी चालू आहे. शासनाने याबाबत केवढे आदेश काढले ? पण शासनाची आज अशी परिस्थिती झाली आहे की, कळते पण वळत नाही, ही अवस्था का निर्माण झाली, हे मला कळत नाही. मराठी भाषेची आज अशी अवस्था का निर्माण झालेली आहे हे मला कळत नाही. एवढया बेदरकारपणे का वागत आहात त्याचे कारण काय आहे? आणि एवढा हा बेदरकारपणा या अधिका-यांमध्ये कोठून आला ? अधिकारी स्वत:च्या आईची देखील निर्भत्सना करणार नाही अशा प्रकारची निर्भत्सना मंत्रालयामध्ये मराठी मातृभाषेची झालेली आहे. ही निर्भत्सना होत आहे याचे कारण मी येथे मांडणार आहे. या राज्यातील मराठी व अमराठी अधिकाऱ्यांकडे आपण कोणत्या दृष्टीकोनातून पहावयाचे ते आपल्याला प्रथम येथे ठरवावे लागेल.

सभापती महोदय, या देशामध्ये भाषावार राज्ये निर्माण झाल्यानंतर सर्व राज्यांनी आपापल्या राज्यांमध्ये आपापल्या राज्यभाषेचे ठराव आणले तो आपणही आणला यामध्ये काही कौतुक करण्यासारखे नाही. सर्व राज्यांनी आपापली मातृभाषा राजभाषा करण्याचे ठराव केले. तसाच ठराव आपल्या राज्यानेही केला. परंतु त्याची अंमलबजावणी किती प्रभावीपणे झाली हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. घटनेने दिलेल्या अधिकारांच्या अधिपत्याखाली सर्व राज्यांनी असा ठराव तयार केला की, राज्याची मातृभाषा हीच राज्याची राजभाषा राहील. सर्व राज्यांमधील न्यायालयीन कामकाजदेखील त्या त्या राज्याच्या राज्यभाषेतूनच चालले पाहिजे. उदाहरणच द्यावयाचचे झाले तर तामिळनाडू राज्याचे मुख्यमंत्री श्री करुणानिधी यांचे मला फार कौतुक वाटते त्यांनी निवडणुकीच्या वेळेस असे जाहीर केले होते की, आम्ही कलर टी.व्ही देऊ, मोबाईल देऊ ,अमूक देऊ, तमुक देऊ त्याप्रमाणे त्यांनी कृती देखील केली आहे. आम्ही हे देऊ का, ते देऊ का ? अशा प्रकारे शासकीय अधिका-यांकडे विचारणा केली नाही अगर कार्यवाहीची वाट पाहत ते बसले नाहीत किंवा अर्थ,नियोजन खाते अमुक खाते, तमुक खाते काय म्हणेल याची परवा देखील त्यांनी केलेली नाही. हे सर्व जाहीर केल्यानंतर त्यांनी केंद्रशासनालाही सांगितले की, मी असे केले, आणि मी तसे केले तुम्ही याला मान्यता द्यावी. मी लोकांना हे सांगितले आहे. हे बोटचेपे,

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

गुडघेटेके, परदेशी कंपन्या यांना घेऊन काय करणार आता काय यांच्याबाबतीत कपाळ फोडावयाचे ? करुणानिधींनी केलेला ठराव अंमलात आणला आपण तो अंमलात आणला नाही. या उलट तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांनी सभागृहात पहिल्या दिवशी ज्यावेळी भाषण केले त्यावेळीच त्यांनी सांगितले की आज पासून , या क्षणापासून तामिळी भाषेची अंमलबजावणी होत आहे, तुम्हाला पटत नसेल तर तुम्ही घरी जा. यावरुन मला करुणानिधींचे कौतुक वाटते. पाहा त्यांचे भाषण कसे आहे. आता आमचे सदस्य भाषणामध्ये काही बोलतील न्यायालयीन भाषा ही मराठी करता का हो करता का हो ? काय अवस्था आली आहे ? मी 40 वर्षापासून शिवसेनेमध्ये मराठी भाषेचा हिसका घेऊन जगतो आहे. या संदर्भात मला अंगावर केसेस घ्याव्या लागतात. मला काही कळत नाही हे कसले राज्य आहे तुमचे?

**उपसभापती** :आपण 'केसेस' हा शब्द न वापरता 'खटला' हा शब्द वापरावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, येथे ' केसेस 'हा शब्दच योग्य आहे. लोकांना केसेस याचाच अर्थ लवकर कळतो. 'खटला' शब्द वापरल्यास त्यांना खुनाचा खटला वगैरे असेच वाटते. समोरच्यांना कळत नाही खटला म्हटल तर कसला विचारतात 302 आहे का असे विचारतात राजकीय असेल तर त्या केसेस आणि हाणामा-याच्याचे असेल तर ते खटले.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अत्यंत पोटतिडकीने मराठी भाषेच्या संदर्भात जे विचार व्यक्त केलेले आहेत. मराठी भाषा सर्वांची असली पाहिजे यामध्ये कोणतेही दुमत नाही. आपल्या राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री कै.श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या पासून ही मराठी भाषा राज्यामध्ये राजभाषा असली पाहिजे अशी भूमिका सातत्याने या राज्यातील सर्व माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतलेली आहे. मराठी भाषेची आपणाला जेवढी आपुलकी आहे तेवढीच आपुलकी आम्हाला देखील आहे. माझा असा प्रश्न आहे की, हे जे सर्व पुढारी आहेत त्यांची मुले कोणत्या शाळेत शिकतात याची माहिती जर त्यांनी मला सांगितली तर मी त्यांची सर्वांसमोर क्षमा मागेल. बोलावयाचे एक आणि करावयाचे मात्र दुसरेच , हे योग्य नाही.

यानंतर श्री. रोझेकर...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांच्या भाषणाचा संदर्भ घेऊन मुले कोणत्या माध्यमाच्या शाळेत जातात, असा जो मुद्दा उपस्थित केला आहे, तो मला वाटतो, या ठिकाणी गैरलागू आहे. माझे स्पष्ट म्हणणे असे आहे की, आज सर्वांचीच मुले ही कॉन्व्हेटमध्ये..नॉट एक्झॅक्टली कॉन्व्हेंट..पण इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जातात. इंग्रजी भाषा हल्ली जगभर विकासाचे माध्यम समजली जाते. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना जे मुद्दे मांडावयाचे आहेत ते त्यांनी मांडावेत पण कृपा करुन आपल्या पोराबाळांपर्यन्त जाऊ नये.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण स्वत:च खुलासा केला, फार चांगले झाले. पण सन्माननीय सदस्य, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांना एक गोष्ट आपल्यामार्फत सांगावयाची आहे की, आपण जी काही माहिती गोळा केली आहे ती एकदा सभागृहात जाहीर करा. आमचे नांव कुठे त्या यादीत दिसते का, ते आपण पाहू. आम्ही स्वाभिमानाने जगलो आणि स्वाभिमानानेच मरणार. महाराष्ट्रासाठी, मराठी भाषेसाठी गेली 40-42 वर्षे आम्ही आंदोलने करीत आहोत. तुमच्याकडे जो प्रामाणिकपणा आहे तो दाखवा आणि नंतरच आरोप करा. आम्ही या सदनामध्ये बसतो, आपण जे आरोप करता ते आमच्यावर करता, असा त्याचा अर्थ होतो. मला एकच सांगावयाचे आहे की, चर्चेची दिशा बदलण्याचा प्रयत्न कृपा करुन करु नका.

**उपसभापती** : सभागृहाची परवानगी असेल तर ही चर्चा थोडावेळ थांबवून विधानसभेने संमत केलेले सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 16-महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक आता आपण घेऊ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विनियोजन (लेखानुदान) विधेयक

L.A. BILL NO. XVI OF 2007

( A BILL TO PROVIDE FOR THE WITHDRAWAL OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF A PART OF THE FINANCIAL YEAR 2007-2008.)

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 16-राज्याच्या एकत्रित निधीतून 2007-2008 या वित्तीय वर्षाच्या काही भागातील कामांकरिता विवक्षित रकमा काढून घेण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे,असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उपसभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

---------------

..3.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात सर्वच ठिकाणी मराठीची गळचेपी होत असल्यामुळे मराठी भाषेचा वापर अनिवार्य करणे

**मु.शी.**: राज्यात सर्वच ठिकाणी मराठीची गळचेपी होत असल्यामुळे मराठी भाषेचा वापर अनिवार्य करणे या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, संजय केळकर, डॉ.नीलम गो-हे, सर्वश्री रामनाथ मोते, श्रीकांत जोशी,वि.प.स.यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु............

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या राज्याची मातृभाषा मराठी आहे, राजभाषा देखील मराठी आहे. या राज्यातील दहा कोटी जनतेपैकी नऊ कोटी जनता मराठी भाषिक आहे. तेव्हा, आजचा जो प्रस्ताव आहे तो या मराठी भाषिक जनतेसाठी आहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर या राज्याचे नेते व तत्कालीन मुख्यमंत्री, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे सांगली येथे पहिले भाषण झाले. महाराष्ट्र राज्याची निर्मिती होतांना आपण विदर्भाची बांधिलकी स्वीकारली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांचा अवखळपणा माननीय यशवंतराव चव्हाण यांना माहीत होता. मराठवाडा हा प्रदेश कोणतीही अट न घालता महाराष्ट्रात सामील झाला, पण विदर्भाला आपण शब्द दिला आहे, त्यासंदर्भातील करार झाला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणात एक वाक्य आहे. ते असे म्हणाले की, "हे राज्य मराठयांचे नाही, हे मराठी राज्य आहे, याचेही भान ठेवा." सन्माननीय सदस्य, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, माझी मुले पूर्णपणे मराठी माध्यमातून शिकली आहेत. एक मुलगा आय.टी.मध्ये आहे तर दुसरा मुलगा एम.एस्.सी.पूर्ण करुन पी.एच.डी करतो आहे, असे उच्च शिक्षण घेत असताना त्यांना कधी मराठी माध्यमाचा त्रास झाला नाही.

यानंतर कुमारी जयश्री.........

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

माझी मुलं मराठी माध्यमाच्या शाळेतून शिकल्यामुळे त्यांना कुठल्याही प्रकारची अडचण आतापर्यंत आलेली नाही आणि भविष्यातही येणार नाही. असो मी माननीय श्री. करुणानिधींच्या भाषेच्या स्वाभिमानाबद्दल बोलत होतो. करुणानिधी यांनी मुख्यमंत्री म्हणून उच्च न्यायालयाला लेखी हुकूम दिला की, त्या त्या राज्याच्या राज्यभाषेतच तेथील न्यायालयाचे कामकाज चालले पाहिजे, असे आपल्या घटनेमध्ये निर्देश दिलेले आहेत, स्थानिक भाषेसंबंधी कोर्टाचे कामकाज कसे चालावे याचेही स्पष्ट निर्देश घटनेमध्ये दिलेले आहेत. तामिळनाडूची भाषा ही तामिळ असल्यामुळे कोर्टाचे सर्व कामकाज तामिळ भाषेतूनच झाले पाहिजे, असे घटनात्मक निदेश करुणानिधी यांनी तामिळनाडू उच्च न्यायालयाला दिलेले आहेत. तामिळनाडूमध्ये तामिळ भाषा, कर्नाटकामध्ये कानडी, बंगालमध्ये बंगाली, आंध्रप्रदेशमध्ये तेलगू भाषेतून सर्व कामकाज चालते. सर्व हिंदी भाषिक राज्ये राजस्थान, बिहार, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, हरयाणा, झारखंड येथे हिंदी भाषा चालते. या हिंदी भाषिक पट्टयामध्ये हिंदी भाषेतून कारभार चालतो. जम्मू व काश्मीरमध्ये काश्मीरी भाषा वापरण्याबाबत घटनेमध्ये निर्देश आहेत. इंटर स्टेट लॅंग्वेज काय असावी, यांसदर्भातही भाषेची विभागणी घटनेमध्ये करण्यात आलेली आहे. प्रत्येक राज्यातील न्यायालयाचा कारभार व महसूल दंडाधिकारी यांचा दावा सुनावणी, युक्तिवाद त्या राज्याच्या राजभाषेतूनच झाला पाहिजे, या संकल्पनेवर आधारित तामिळनाडू हाय - कोर्टामधील सर्व कामकाज तामिळनाडू भाषेतूनच झाले पाहिजे, अशा प्रकारची घटनात्मक नोंद घटनेमध्ये श्री. करुणानिधी यांनी केलेली आहे. आपल्या माननीय मुख्यमंत्र्यांमध्ये करुणानिधींसारखी हिम्मत आहे का ? आपल्या लेच्यापेच्या राज्यकर्त्यांमध्ये शासकीय अधिका-यांना सरळ करण्याची हिम्मत नाही ते कोर्टाला काय सांगणार ? त्याला ताकद लागते. सभापती महोदय, मी या ठिकाणी सन 1963, 1965, 1968 पर्यंतचे शासकीय व्यवहारामध्ये मराठी भाषेच्या वापरासंबंधीचे सर्व शासकीय आदेश मी वाचून दाखवित होतो आणि आता सन 1969 चा तशाच प्रकारचा शासकीय आदेश वाचून दाखवित आहे तो पुढीलप्रमाणे आहे. शासकीय कार्यालयांमध्ये जनतेसाठी काढण्यात येणारे निर्णय, परिपत्रके, नमूने, परवाने इंग्रजीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत होते. या शासन आदेशान्वये सर्व मंत्रालयीन विभागांना अशी विनंती करण्यात येते की, लिहून ठेवा हे मी का बोलतोय हे ? पाहिजे तर पुढे आपल्याला हे संदर्भ

3P - 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

कामाला येतील व पुढे आपल्याला याचे महत्व कळेल, परिपत्रकामध्ये असे म्हटले आहे की, "दिनांक 15 ऑगस्ट,1979 पर्यंत सर्व सामान्य माणसापर्यंत जाणारे शासकीय कार्यालयातील नमुने, निर्णय, परिपत्रके, परवाने मराठीतूनच प्रसिध्द झाले पाहिजेत. त्यापैकी जर काही नमुने अद्यापपर्यंत इंग्रजीतूनच जर असतील तर त्यांच्या सर्व प्रकारच्या नमून्यांचे लवकरात लवकर मराठीत भाषांतर करुन छापण्यात आले पाहिजे आणि ते मराठीत छापले गेले आहेत की नाहीत याची खातरजमा करुन व इंग्रजीतील सर्व नमूने ताबडतोब काढून टाकण्यात यावे, असे आदेश निर्गमित करावे." असे या परिपत्रकामध्ये लिहिलेले आहे. या शासकीय परिपत्रकांचा संदर्भ "व.भ.आ. 1079 -28 / 08 ऑगस्ट,1979" हा आहे. काय केल या आदेशाच. माननीय अर्थमंत्री सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांच्याशी बोलतांना म्हणाले की, तुम्ही ज्याच्या पुंगळया करावयाला सांगितल्या त्यापैकी काही पुंगळया उपयोगात येतात बाकी सर्व पुंगळया तशाच पडून आहेत सभापती महोदय, शासनाला अशा किती पुंगळया दाखवायच्या या राज्यकर्त्यांनी त्या कुठे टाकल्या त्या बघावयाच्या आणि शोधावयाच्या आहेत. महोदय, मार्च, 1964 च्या मार्चअखेरीस सदर नियम लागू करण्याचे कलम पाच नुसार जे ठरले ते होते, ते आता या राज्यामध्ये का होत नाही? त्याचेच मी आता हे सर्व विश्लेषण व्यक्त केले. ज्याच्या अंगात, धमण्यात मराठी रक्त धावत असेल त्यांनीच आम्हाला याबद्दल काहीतरी सांगावे आणि आमचे हे राज्यकर्ते किती नादान आहेत हेही सांगावे. तसेच दुस-याकडे बोट दाखवितांना नेहमी विचार करावा. सन्माननीय सदस्य ॲड गुरुनाथ कुलकर्णी आपणही लक्ष द्यावे. मराठी भाषेचया वापराबाबत विलंब होण्यामध्ये तुमच्या नादान कॉंग्रेसकारांचा नादानपणा दाखवितो जरा बसा ऐका.

श्री.जितेंद्र आव्हाड : वाह ! क्या बात है !

श्री.दिवाकर रावते : तुम्ही उठलात ना त्याच्यात तुमचेही प्रमुख आहेत वाह क्या बात आहे बोललात ना. पोर शिकण वेगळ, तुमचे असे म्हणणे आहे का की, या ठिकाणी मराठी भाषा यायलाच नको? आहे का तुमच्यामध्ये इंग्रजी शाळा बंद करण्याची हिम्मत ? दोन ठोश्यांमध्ये

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

इंग्रजी शाळा बंद करण्याची हिंमत आहे का आपल्यामध्ये ? या ठरावाला अनेक तत्कालीन अमराठी अधिका-यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन स्थगिती मागितली होती. मी ही गोष्ट सन 1964 सालातील सांगत आहे, आपण जन्माला तरी आला होता की नाही हे मला माहित नाही ?

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .........

सन 1964 मध्ये वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते. स्टे मागतांना त्यांनी कारण काय दिले ? हे द्विभाषिक राज्य होते, असे त्यांनी कारण दिले. गुजराती, कानडी, तेलगू, हिंदी, कोकणी भाषिक अधिकारी/कर्मचारी वर्ग 1 ते वर्ग 4 मधील होते. या सर्वांना मराठी शिकण्यास अवधी मिळावा म्हणून एक वर्षाची स्थगिती मागितली आणि ती मान्य झाली. अमराठी अधिकारी असा शब्द मी उच्चारणार होतो. या मातीशी, मिठाशी बेईमानी करणा-यांनी हे कारण दाखूवन एक वर्षाचा स्टे घेतला. तो स्टे उठविण्यात आला नाही. सन 1965 मध्ये युद्ध झाले. त्यावेळी अधिका-यांना वेळ नाही, असे कारण देण्यात आले. सन 1966-67 मध्ये देशात काँग्रेसचा 19 राज्यांमध्ये पराभव झाला. त्यामुळे हतबलता आली. त्यावेळी स्टे मागण्यात आला आणि तो मिळाला. 1968-69 मध्ये सिंडीकेट/इंडीकेट बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. त्यावेळी स्टे देण्यात आला. सन 1970-71 मध्ये पाकिस्तान युद्ध झाले. त्यावेळी स्टे देण्यात आला. सन 1972-74 मध्ये राज्यात भीषण दुष्काळ पडला. सभापती महोदय, अधिकारी किती निष्णात आणि हुशार आहेत ते बघा. सन 1975-78 मध्ये आणीबाणी लागू झाली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांकडे फाईल आली आणि पुन्हा एका वर्षासाठी स्टे देण्यात आला. दरवर्षी एका वर्षाचा स्टे मिळत गेला. सर्व मुख्यमंत्री स्टे देत गेले. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.वसंतदादा पाटील, श्री.शरद पवार, बॅ.अंतुले, श्री.शंकरराव चव्हाण, श्री.बाबासाहेब भोसले या सर्व मुख्यमंत्र्यांनी स्टे दिला. श्री.बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री असतांना राज्यात दुष्काळ पडला. राज्यात दुष्काळ पडला, पिण्यासाठी पाणी नाही तर मी येऊन मुतायचे काय ? असे राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री बोलले. त्यानंतर पुन्हा श्री.वसंतदादा पाटील मुख्यमंत्री झाले. श्री.सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री असतांना ते गँगवॉरच्या विरुध्द कारवाई करण्यात व्यस्त होते. त्यामुळे त्यांनी देखील स्टे देऊन टाकला. पुन्हा शरद पवार मुख्यमंत्री झाले. त्यांनी देखील स्टे दिला. सन 1995 मध्ये राज्यात युतीचे राज्य आले. मला तत्कालीन मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांचे अभिनंदन केले पाहिजे. ज्यावेळी त्यांच्याकडे स्टे घेण्याकरिता फाईल आली, त्यावेळी त्यांनी असे विचारले की, मराठी भाषेची अंमलबजावणी करण्यासाठी स्टे कशाला पाहिजे ? अधिका-यांनी त्यांना असे सांगितले की, साहेब हे वर्षानुवर्षे सुरु आहे. त्यांनी मागचे सर्व नोटींग

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .........

बघितले. त्यांनी कलम 5 नुसार मराठी भाषा लागू करण्याचा आदेश दिनांक 04.05.1995 रोजी काढला. त्यांनी असा आदेश काढला की, "दिनांक 15 ऑगस्ट, 1995 पासून मराठी भाषेची अंमलबजावणी करावी." त्यांनी स्टे दिला नाही. मराठी भाषेला लागलेली अवकळा घालवण्यासाठी शिवशाही यावी लागली. श्री.मनोहर जोशी साहेबांना मराठी भाषेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात त्या फाईलवर सही करावी लागली. सभापती महोदय, बोलणे सोपे असते. (..अडथळा..) माझी मुले काय करतात, कोणत्या शाळेत शिकतात याची चिंता तुम्ही करु नका. राज्यातील साडेनऊ कोटी जनतेच्या सन्मानाचा हा प्रश्न आहे. त्याची टिंगल टवाळी केली तर जनता तुम्हाला जोड्याने मारेल.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

आमचे एक मित्र, मंत्री म्हणतात की, सोनिया गांधींच्या विचारांचा, आचारांचा आणि नेतृत्त्वाचा हा विजय आहे तसेच त्यावेळी महापालिकेमध्ये बोरकर हे त्यांना मराठीतून जे इंग्रजी लिहून दिलेले असायचे ते वाचायचे. सभापती महोदय, मला आठवते, श्री.वामनराव महाडिक महापालिकेमध्ये गेले आणि त्यानपंतर त्यांनी तेथे मराठी भाषा आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यावेळेस या मराठीसाठी केवळ आम्हीच झगडलो असे नाही, त्यासाठी आमचा मी पणा नाही. संयुक्त महाराष्ट्र झाला तरी महापालिकेच्या सभागृहामध्ये सर्व काही इंग्रजीतूनच होत होते. त्यावेळेस तेथील चिटणीस कार्यालयामध्ये श्री.राळे साहेब होते. त्यांनी देखील तेथे मराठी भाषा आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यांच्या प्रयत्नातूनच चिटणीस कार्यालयातील मराठी विभाग सुरू झाला. तत्कालीन नगरसेवक पत्रकार श्री. आप्पा पेंडसे, मधू शेट्ये यांनीही यासाठी खूप मदत केली आणि त्यांनी इंग्रजीला पर्यायी मराठी शब्द शोधले. त्यावेळी मुंबई महापालिकेमध्ये आधी इंग्रजी आणि नंतर त्याचे मराठी भाषांतर असा कारभार होता. खरे तर 1964 नंतर राज्य शासकीय धोरणानुसार कारभार मराठीतून व्हायला पाहिजे होता. पण तसे झाले नाही आणि शिवसेना सत्तेवर आल्यानंतर मराठीला तेथे प्राधान्य मिळू लागले. हा बदल घडविण्यामध्ये अनेकांचा हात होता. त्यात सर्वश्री सुधार जोशी, मनोहर जोशी, बाबूराव शेटे या नगरसेवकांच्या अथक प्रयत्नाने मुंबई महापालिकेत भाषा विषयक धोरणात बदल घडून आला. इथेही श्री.राळे त्यांच्या मदतीला होते. पालिकेचे प्रस्ताव आधी मराठीतून व नंतर इंग्रजीतून होऊ लागले. पण हे सारे 1972-73 नंतर घडून आले. आमचा महापौर महापालिकेत आला, डॉ. हेमचंद्र गुप्ते हे आमचे महापौर झाले होते. सभापती महोदय, या ठिकाणी मला श्री.शरद आचार्य यांची आठवण होते ती एवढ्याचसाठी की, पालिकेप्रमाणेच बेस्ट उपक्रमातही मराठीतून कारभार सुरू झाला. पण त्यासाठी शिवसेना नेते श्री.शरद आचार्य यांनी खूप मेहनत घेतली. बीइएसटीचे अध्यक्ष म्हणून गेल्यानंतर त्यांनी पहिल्यांदा तेथे मराठीतून कारभार सुरू केला. त्यावेळी आता खासदार असलेले श्री.मोहन रावले यांनी तेथे पदसिद्ध सदस्य म्हणून असताना बीइएसटीची तिकिटे इंग्रजीतून होती ती देखील मराठीतून छापली जावीत म्हणून यशस्वी प्रयत्न केले. त्यानंतर बेस्टचे वीज देयक देखील मराठीतून मिळू लागले. तेव्हा यामध्ये आम्ही प्रामाणिकपणे काम केले आहे, अर्थातच ते करताना काही चुका असतीलही. पण आमचे यासाठी काही कमिटमेंट आहे. सभापती महोदय, या ठिकाणी मला नुकतेच दिवंगत झालेले आपले एक

....... 3एस 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

माजी सहकारी श्री.सदानंद वर्दे यांचीही आठवण सांगाविशी वाटते. श्री.सदानंद वर्दे या ठिकाणी सदस्य म्हणून असताना त्यांनी एक विधेयक आणले होते. ते मराठी भाषेसाठीचे नव्हते पण त्यांनी आणलेले विधेयक हे मराठीत व्यवहार आणि विक्रीच्या सर्व वेष्टनांवर देखील मराठीतून मजकूर असावा आणि तसा तो नसेल तर त्याबद्दल दंड करावा यासाठीचे होते. समाजवादी विचारसरणीच्या व्यक्तीला देखील मराठी असावे असे वाटत होते. केवळ शासनामध्ये नाही तर वस्तूंच्या वेष्टनांवर देखील मराठी असावी म्हणून त्यांनी तेव्हा अशासकीय विधेयक आणले होते आणि त्यावेसेळ त्यांचे भाडण कोठ झाले ? तर त्यांनी ते विधेयक मराठीतून पाठविले म्हणून ते प्रथमतः इंग्रजी भाषेतून द्या म्हणून त्यांचेकडे आग्रह धरला गेला. आता या विधीमंडळातून श्री.कांबळी सचिव म्हणून निवृत्त झाले आहेत, ते असते तर त्यांनी याबाबत दुजोरा दिला असता. त्यावेळी प्रा. सदानंद वर्दे यांना सांगण्यात आले की, सदरचे विधेयक इंग्रजीतून रूपांतरित करावे आणि इंग्रजीतूनच मांडले जावे. त्याला प्रा.सदानंद वर्दे यांनी नकार दिला. म्हणजे त्यावेळी देखील येथे इंग्रजीचा पीळ दाखविला गेला. या सदनामध्ये अशा अनेक गोष्टी विविध माध्यमातून येत गेल्या आहेत, मी नव्याने पदरचे काहीही सांगत नाही. माननीय श्री.प्रमोद नवलकर यांनी देखील सदस्य असताना येथे एक ठराव आणला होता, मला वाटते त्यावेळी अशासकीय विधेयकावर चर्चा होत होती. माहिती व तंत्रज्ञान विषय मराठीला विकल्प असावा या संबंधात तो ठराव होता. श्री.प्रमोद नवलकर यांनी त्या प्रस्तावावर खूप मोठे भाषण केलेले आहे, ते सारे रेकॉर्डवर असल्याने मी ते सारे वाचून दाखवित नाही. पण त्यांनी त्यावेळी सुरूवात अशी केली होती की, .....

( यानंतर श्री. किल्लेदार ....3टी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू.....

श्री.प्रमोद नवलकर यांनी सुरुवातीला प्रस्ताव मांडलेला आहे की, "राज्य मंत्रिमंडळाने नुकताच माहिती तंत्रज्ञान हा विषय मराठी विषयाला विकल्प ठेवण्याचा घेतलेला निर्णय, शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे महाराष्ट्रातून मराठी भाषेचे उच्चाटन होण्याची मराठी विषय शिक्षण समितीने व्यक्त केलेली भीती, शासनाने यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल जाहीर करून त्यावर चर्चा करण्याऐवजी मंत्रिमंडळाने परस्पर निर्णय घेऊन मराठी भाषा प्रेमिकांची केलेली अवहेलना, तसेच या विषयासाठी संस्थाना कोणतेही अनुदान देण्यात येणार नसल्याने...." अशाप्रकारचा प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव 12 डिसेंबर 2001 साली मांडलेला होता. त्यांनी आपल्या भाषणमध्ये उल्लेख केलेला आहे की, "आम्ही देखील दहा-बारा वर्षे आग्रह धरत आहोत की, कोर्टाची भाषा मराठी असली पाहिजे, व्यवहाराची भाषा मराठी असली पाहिजे, दुकानांवरील पाट्या मराठीतून असल्या पाहिजेत, रेशनची बिले मराठी असली पाहिजे याबाबतीत तुम्ही आमची पर्वा करीत नाही, आमची मागणी मान्य करीत नाही. अजून सरकारकडून आम्हाला जी पत्रे येतात ती मराठीतून येतात. एका बाजूने मराठी जगविण्यासाठी, टिकविण्यासाठी आमचा लढा चालू आहे. 1960 सालानंतर 40 वर्षे झाली आणि या वर्षामध्ये मराठी भाषा वाढविण्याऐवजी ही मराठी भाषा कशी नष्ट करता येईल अशा प्रकारची सारखी पावले पडत आहेत." अशाप्रकारे आदरणीय नवलकर साहेबांनी 12 डिसेंबर 2001 ला भाषणामध्ये विचार व्यक्त केलेले आहेत. तरीही आपण डोळे उघडले नाहीत. शासनाची झोप उडालेली नाही. अजूनही प्रयत्न चालू आहेत. हा जिवंत मूर्तीमंत पुरावा आहे. अशी अनेक भाषणे आहेत, ती मी येथे उद्धृत करत नाही. आपण "महाविद्यालय" न म्हणता कॉलेज म्हणतो. आपल्याला मराठीमध्ये "महाविद्यालय" म्हणायला काय अडचण आहे ? हे दळभद्री सरकार काय करणार आहे ? हे सरकार कपाळकरंटे आहे, काय करणार ? मराठी विषयाचा पेपर आहे, त्यामध्ये मराठीमध्ये "मानसशास्त्र" न म्हणता "सायकॉलॉजी" असे इंग्रजीमध्ये म्हटलेले आहे. मुले मराठीमध्ये पेपर लिहितात आणि त्यामध्ये इंग्रजीमध्ये शब्द वापरले जातात. जे पेपर तपासणारे आहेत त्यांच्याकडे मॉडेल अन्सर शीट दिलेले आहे, त्यामध्ये इंग्रजीमध्ये उत्तरे लिहिलेली आहेत. ते पेपर कसे तपासणार ? मराठीच्या पेपरमध्ये "अर्थशास्त्र" असे म्हणण्याऐवजी "इकॉनॉमिक्स" असा शब्दप्रयोग इंग्रजीमध्ये घातलेला आहे. हे काय चाललेले आहे ? मग आमचा हात पायाखाली

SKK/ KGS/ MAP/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु....

गेला तर आमचे कोठे चुकले ? एवढी मराठी भाषेची हेळसांड चाललेली आहे. 57 वर्षात त्यांना काही वाटले नाही तर आपल्याला काय वाटणार ? माझ्याकडे एक डॉक्युमेंट आहे. कोणते शहाणपण यांच्या डोक्यात आले कळत नाही. ...(अडथळा)... आईची वस्त्रे फेडणाऱ्यांची ही अवलाद आहे. शिव्यासुध्दा मराठी भाषेमध्ये सभ्यतेने देता येतात.

विज्ञान अभियांत्रिकी याला इंग्रजीमध्ये सायन्स इंजिनियरींग असे म्हटलेले आहे. संगणक आणि व्यवस्थापन याला इंग्रजीमध्ये कॉम्पुटर ॲन्ड मॅनेजमेंट असे म्हटलेले आहे. जैव तंत्रज्ञान ला बायो टेक्नॉलाज्ी असे म्हटलेले आहे. इतर राज्यामध्ये त्या त्या भाषेतून पेपर लिहिता येतात. केरळमध्ये मल्याळम, कर्नाटकामध्ये कानडी, आंध्र प्रदेशमध्ये तेलगू, बंगालमध्ये बंगाली, आणि सात हिंदी भाषिक राज्यामध्ये 12 वीपर्यन्त हिंदी भाषेमध्ये पेपर लिहिता येतात. पण आपणच कपाळकरंटे आहोत.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

बिहारमध्ये संस्कृतचे विद्यापीठ आहे. आम्ही विद्यापीठाच्या नामांतरासाठी सगळीकडे भांडतो. कृषी विद्यापीठापासून सर्व विद्यापीठांबाबत भांडतो. आम्ही प्रगतीकरिता भांडत नाही. मला अभिमान वाटतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हे समजले होते. त्यालाच द्रष्टेपण म्हणतात. या देशाची राष्ट्रभाषा संस्कृत असली पाहिजे असे त्यांना का वाटत होते याचा हा पुरावा आहे. बिहारमध्ये कमलेश्वरनाथ विद्यापीठ आहे. त्या विद्यापीठामध्ये विद्यार्थीसंख्या जगामध्ये सर्वात जास्त आहे. या देशाची राष्ट्रभाषा संस्कृत का असली पाहिजे हे त्या द्रष्ट्या व्यक्तीला समजले होते. त्या त्या राज्यात त्यांच्या भाषेमध्ये शिक्षण उपलब्ध आहे. आंध्र प्रदेशमध्ये अभियांत्रिकी म्हणजे इंजिनिअरींग आणि सायन्स म्हणजे विज्ञान यामधील पदवीपर्यंतचे शिक्षण मराठीत असलेली महाविद्यालये हैद्राबादमध्ये आहेत. मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद हे ते चालवित आहेत. उच्च शिक्षण म्हणजे अगदी एम.ए. पासून सर्व पदव्या आंध्रमध्ये मराठी भाषेमध्ये देत आहेत. परप्रांतात राहणाऱ्या मराठी माणसांना मराठी भाषेची कळकळ आहे. त्यांनी नुसते विद्यापीठच काढले नाही तर त्यांना विद्यार्थी मिळत आहेत, हे विशेष आहे. न्यायालयीन, उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण यांच्या अभ्यासक्रमाची व इतर पुस्तके इंग्रजीमध्ये उपलब्ध आहेत आणि त्यांच्या भाषांतराचा प्रश्न नेहमी शासनाकडून उपस्थित केला जातो. इंजिनिअरींगची सगळी पुस्तके इंग्रजीमध्ये आहेत ती मराठीमध्ये कशी करावयाची ? असा प्रश्न उपस्थित केला जातो. काखेत कळसा आणि गावाला वळसा अशी आपली अवस्था आहे. म्हणून मी कर्मदरिद्री असा शब्द वापरतो. जागतिक पातळीवर इंग्रजीचे ज्ञान घेणे आवश्यक आहे असे सारखे बिंबवले जाते. जगात जावयाचे असेल तर इंग्रजी भाषा आली पाहिजे असे सांगितले जाते. आपण परदेशात सगळीकडे जातो. सभापती महोदय, आपण पुण्याचे आहात. पुण्यातील श्री. मधुकर सप्रे आपल्याला माहीत असतील. ते भाषांतर तज्ज्ञ आहेत. सर्व क्षेत्रातील भाषांतर उपलब्ध करुन देण्यासाठी श्री. मधुकर सप्रे हे प्रसिध्द आहेत. संगणक सॉफ्टवेअरव्दारे हिंदी भाषिक राज्ये त्यांच्याकडून त्या पुस्तकांचे हिंदीत भाषांतर करुन घेतात. हिंदी भाषिक 8 राज्ये आहेत. त्या राज्यांमध्ये उच्च शिक्षण त्यांच्या भाषेमध्ये देतात. श्री. मधुकर सप्रे यांच्याकडून सगळी पुस्तके ते हिंदीमध्ये भाषांतरीत करुन घेतात. त्यांच्या राज्यात न्यायालयाची

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/ SBT/

श्री. दिवाकर रावते .....

भाषा हिंदी आहे. त्याची पुस्तके त्यांच्याकडून हिंदीमध्ये भाषांतरीत करुन घेतात. त्यांना मी विचारले की, आपण मराठीमध्ये भाषांतर का करीत नाही ? ते म्हणाले की, कोणी मागावयास येत नाहीत. ते भाषांतरतज्ज्ञ आहेत म्हणून इतर राज्ये उच्च शिक्षणाची सर्व पुस्तके श्री. मधुकर सप्रे यांच्याकडून त्यांच्या भाषेमध्ये कन्व्हर्ट करुन शिकवण्यासाठी घेऊन जातात. ते म्हणाले की, मराठीच्या बाबतीत कोणी मला विचारावयास येत नाही.

**तालिका सभापती** ( श्री. उल्हास पवार ) : आपले भाषण सुरु होऊन जवळजवळ दीड तास झालेला आहे. आणखी 11 सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर बोलावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला मरण्यापूर्वी एकदा मराठीवर बोलण्याचे समाधान लाभू द्यावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सर्व सभागृहाचा वेळ सन्माननीय सदस्यांना द्यावा परंतु त्यांना एवढ्या लवकर मरण येऊन नये अशी आमची सर्वांची इच्छा आहे.

यानंतर श्री. शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाविद्यालये, विद्यापीठे यामधील प्रवेशपत्रिका, परीक्षांच्या गुणपत्रिका, परीक्षांचे प्रवेश अर्ज हे सर्व मराठीमध्ये देणे सक्तीचे आहे. परंतु तसे ते मिळत नाहीत. तेव्हा ही सर्व कागदपत्रे मराठीमध्ये देण्याची सक्ती त्यांच्यावर करणार काय हा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही महाविद्यालयामध्ये मराठीमधून माहिती-पत्रिका- प्रॉस्पेक्टस - मिळत नाहीत. इंग्रजीचा घोशा लावणा-यांना मी सांगू इच्छितो की, जगामध्ये ज्या एकूण भाषा आहेत त्या भाषा बोलणारे भाषिक किती आहेत याची माहिती माझ्याकडे आहे. ती माहिती देण्यासाठी अधिक वेळ लागेल म्हणून मी ती देत नाही. आपण युरोपमध्ये गेलात तर तेथे इंग्रजी भाषा सक्तीची नाही. त्यांची जागतिक भाषा फ्रेंच आहे. जगातील 7 देशांमध्ये इंग्रजी भाषेतील गुणपत्रके व प्रमाणपत्रे चालतात. जगातील 150 देशामध्ये ती भाषांतर करुन चालतात. सभापती महोदय, आपल्या हिंदी या संपर्क भाषेचा मला अभिमान आहे. आपण ती भाषा बोलत असतो. त्या भाषेचा आदर केला पाहिजे. मी हे सांगू इच्छितो की, जगामध्ये इंग्रजी भाषिकांची संख्या 52 कोटी आणि जगाच्या पाठीवर हिंदी भाषिकांची संख्या 51 कोटी आहे. जगामध्ये फक्त 7 देशांमध्ये इंग्रजी भाषा बोलली जाते आणि 150 देशांमध्ये त्या त्या देशांची भाषा बोलली जाते. असे असताना मुलांनी इंग्रजीमध्ये शिकावे असा आग्रह का धरला जातो ? आपण कोणत्या दिशेने जात आहोत याचे आत्मपरीक्षण करण्याची ही वेळ आहे. आपल्या राज्यामध्ये 90 विविध देशातील विद्यार्थी शिकण्यासाठी येतात. त्यांची प्रमाणपत्रे इंग्रजीमध्ये नसतात. ती त्यांच्या देशाच्या भाषेत असतात. रशियामधील विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र इंग्रजीमध्ये मिळणार नाही. त्यांची राजभाषा ही राष्ट्रीय भाषा असते. या विद्यार्थ्यांनी आपल्या महाराष्ट्र राज्याव्यतिरिक्त इतर राज्यामध्ये इंटरनेटवरुन " which language should I accept for communication ?" असे विचारले तर ती राज्ये त्यांच्या राजभाषेचा आग्रह धरतात. मग महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेचा आग्रह का धरला जात नाही ? मी पुण्यामध्ये गेलो होतो त्यावेळी कोरीयन विद्यार्थी मला भेटले. त्या विद्यार्थ्यांचे सर्व दस्तऐवज कोरीयन भाषेत होते. त्यांनी पुणे विद्यापीठाला ईमेलवरुन संपर्क भाषा कोणती ठेवावी असे विचारले असता पुणे विद्यापीठाने इंग्रजी भाषा संपर्क भाषा असली पाहिजे असे सांगितले. पुणे विद्यापीठाने मराठी भाषेचा आग्रह का धरला नाही ? सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव आदरणीय





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

श्रीमती जे. शंकरन या आहेत. त्यांच्या कार्यालयातील खाजगी सचिव, स्वीय सहायक हे साऊथ इंडियन आहेत. ते मराठी नाहीत. त्यांना विचारले की, तुम्ही इंग्रजीमध्ये पत्रव्यवहार का करता ? तेव्हा त्यांनी सांगितले की येथे इंग्रजी चालते, मराठीची गरज नाही. सभापती महोदय, आपण जर वेगळया वेषामध्ये तेथे गेलात तर तुम्हाला सुध्दा असेच उत्तर दिले जाईल.

...नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

मी परवाचे उदाहरण सांगतो आहे. हे म्हणजे आमच्या राज्याचे मीठ खाणारे परप्रांतीय अधिकारी त्यांच्या आजूबाजूला देखील परप्रांतीय लोक ठेवतात. त्यांना मराठी कर्मचारी नको आहेत. पण आमच्या मुख्यमंत्र्यांचा हात कधी थरथरत नाही. या सगळयांना भूखंड देताना, त्यांच्या जागेकरिता, त्यांच्या पुढील भवितव्याकरिता, त्यांच्या भावी पिढीकरिता 2-2 हजार चौरस फुटाचे फ्लॅट बांधण्याकरिता सहकार्य केले जाते. त्यांना या मातीत स्थायिक व्हायचे आहे. पुढची पिढी इथेच घडविणार पण त्यांना आमची मराठी भाषा नको आहे. कोणाला डोक्यावर घेऊन चालला आहात?

सभापती महोदय, 19 ऑक्टोबर, 1965 च्या शासन परिपत्रकामध्ये म्हटले होते की, मुंबई शहरात शासकीय कार्यालयात इंग्रजी आणि गुजराथी भाषेतून पाट्या व नामफलक अजून आढळतात. त्यावेळी द्विभाषिक राज्य होते. मराठीतून मात्र ते लावण्यात आले नाही. ही सर्व परिस्थिती ताबडतोब बदलली पाहिजे. कार्यालयाच्या नावाचे व जनतेला सूचना देण्यासाठी लावावयाचे सर्व फलक मराठीतून लावले जातील याची दक्षता घ्यावी. त्यानंतरचे शासन परिपत्रक दिनांक 10 जून, 1666 चे असून सर्व नमुने मराठीतून मुद्रीत करुन घेण्याचे आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासन अधिनियम, क्रमांक-5 नुसार मराठी भाषेबाबत मी सगळे सुरुवातीला सांगितलेच आहे. सन्माननीय मंत्री प्रा.पुरकेसाहेब मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, महाराष्ट्र स्टेट बोर्ड फॉर सेकण्डरी ॲण्ड हायर सेकण्डरी एज्युकेशन, शिवाजीनगर, पूना-411 005, इंडिया हे इंग्रजीमध्ये शासनाच्या लेटरहेडवर लिहिलेले आहे. शासनाच्या लेटरहेडवर इंग्रजी भाषेची काय गरज आहे? वर ॲड्रेस देखील तसाच आहे. पुढचे सगळे इंग्रजीत नमूद केलेले आहे. एक उल्लेख फक्त मराठीत आहे. सेक्रेटरी, चेअरमन, फोन नंबर 022 वगैरे वगैरे. माझ्याकडे त्यांनी भाषा संचालनालयाला लिहिलेले पत्र आहे. 1965 च्या महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक-5 नुसार शासकीय कार्यालयात मराठीचा वापर करावा या संदर्भात पृष्ठ क्रमांक-2 वर सेकण्ड पॅरामध्ये काय म्हटले आहे? पृष्ठ क्रमांक-2, दुसऱ्या परिच्छेदात म्हटले आहे की, मंडळाचे कामकाज शाळा तसेच कनिष्ट महाविद्यालयाशी संबंधित असते. शासनाने मराठीव्यतिरिक्त अन्य माध्यमाच्या शाळा, कनिष्ट महाविद्यालयांना मान्यता दिलेली आहे. सभापती महोदय, शासनाने मराठीव्यतिरिक्त अन्य माध्यमामध्ये शाळा व कनिष्ट महाविद्यालयांना मान्यता दिली हे मान्य आहे. आम्ही घटनेप्रमाणे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

आपल्या राज्यात राहणाऱ्या सर्वांना सामावून घेतो. आम्हाला त्यांची मातृभाषा किती महत्वाची वाटते? परप्रांतीयांची भाषा किती महत्वाची वाटते? त्यांच्याकरिता काय करावे यासाठी यांचा जीव तडफडतो. शासनाने मराठीव्यतिरिक्त अन्य माध्यमामध्ये शाळा व कनिष्ट महाविद्यालयांना मान्यता दिलेली आहे, त्यानुसार मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांसाठी इंग्रजी, मराठी, गुजराथी, कन्नड, उर्दू, सिंधी, हिंदी या माध्यमांमध्ये विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट होतात. हे मान्य आहे. पुढे काय? मराठीव्यतिरिक्त अन्य माध्यमांमध्ये हे विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट होत असले तरी आवेदनपत्रे, परीक्षापत्रे इंग्रजी माध्यमामध्येच मंडळाला तयार करावी लागतात.

सभापती महोदय, हे वाचून माझा जीव जळतो. 92 टक्के विद्यार्थी मराठी माध्यमाचेच आहेत ना? उर्वरित 10 टक्के विद्यार्थ्यांना मराठी विषय आहे. म्हणजे 100 टक्के विद्यार्थी मराठी माध्यमाचे आहेत. मग कशाला हा कर्मदरिद्रीपणा आठवला? हे पत्र 2 मार्च, 2006 चे आहे. मराठीत अर्ज छापण्यास काय अडचण आहे? एक अडचण सांगितली जाते की, सॉफ्टवेअर इंग्रजीमधील आहे. सॉफ्टवेअर मराठीत का नाही?

(नंतर श्री.जुन्नरे.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

करा ते मराठीत. मराठीत करण्यास तुम्हाला कोणी नाही सांगितले? मला हे कळत नाही की, मराठीच्या संदर्भात शासनाची मानसिकता का बदलली आहे? मराठीत सुध्दा चांगल्या प्रकारची आज्ञाप्रणाली तयार झालेली आहे. तुम्हाला कोणी सांगितले की, त्या लोकांना फक्त इंग्रजीच समजते? गुजराती, कन्नड, हिंदी, उर्दू येत असलेल्या लोकांना केवळ इंग्रजीच भाषा समजते हे आपल्याला कोणी सांगितले? राज्य शासनाचे ज्ञानमंडळ मराठी आज्ञाप्रणाली चांगल्या प्रकारे बनवते. महाराष्ट्र शासनाचे ज्ञानमंडळ चांगल्या प्रकारची मराठी आज्ञाप्रणाली बनवित असेल तर त्यांना ते काम द्यावयास पाहिजे. या ज्ञानमंडळाने बनवलेले मराठी ज्ञान प्रणाली रुग्णालयात वापरली जाते. 8 लाख रुग्णांची माहिती रोज मराठीतून येत असते. सभापती महोदय, मराठीची तेवढी ताकद असल्यामुळेच हे शक्य झाले आहे. परंतु आता या ठिकाणी मराठीची व्यथा कशी मांडावी हेच मला समजत नाही. सभापती महोदय, घटनेच्या 346 कलमात म्हटले आहे की, राज्याराज्यांमधील अथवा राज्य व संघराज्य यांच्या मधील दळणवळणाची भाषा राजभाषा असेल. सभापती महोदय, केंद्रसरकार आणि आंध्रप्रदेश राज्याकडून आपल्याला काही माहिती हवी असेल आणि त्या माहितीच्या संदर्भातील पत्र आपण मराठीत लिहून पाठविले तर त्या पत्राचे उत्तर सुध्दा मराठीतूनच येते. यामुळे प्रत्येक राज्यातील भाषेचा आदर राखला जातो. आंध्र प्रदेश सरकारकडे आपण मराठीत माहिती मागवली तर ते राज्य आपल्याला मराठीतून माहिती पाठवते व त्यांनी त्यांच्या भाषेतून माहिती मागवली तर त्यांना सुध्दा त्यांच्या भाषेतून माहिती उपलब्ध करुन दिली जात असते. यामुळे प्रत्येक भाषेचा आदर राखलो जात असतो. यामुळे त्या ठिकाणी सुध्दा मराठी तरुणाला अनुवादकाची नोकरी मिळू शकते. लोकसभेत जो सदस्य ज्या भाषेत बोलेल त्या भाषेतून कार्यवाही मिळते. अशा प्रकारचा उल्लेख आपल्या घटनेत असतांना आपण इंग्रजीचा घोषा का करीत आहात? इंग्रजीच्या वापरासंबंधी आपण अधिका-यांना जाब का विचारीत नाही? मराठीचा वापर केला नाही तर मराठी भाषेला मूठ माती देण्याची लवकरच वेळ येईल. सभापती महोदय, आपल्या आसनावरुन सुध्दा मराठीची पायमल्ली करण्यात आलेली आहे. आपल्या आसनावरुन मराठीची पायमल्ली करणारे निदेश आले होते त्यामुळे मी फार व्यथित झालो होतो. असे निदेशआपल्या आसनावरुन तरी यावयास नको होते. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

सभापती महोदय, आपले सन्माननीय मंत्री महोदय श्री. रणजीत कांबळे यांनी परदेशात शिक्षण घेतलेले आहे परंतु ते नेहमी मराठीतून बोलत असतात. त्यांची मराठी भाषा शुध्द नसेलही. पण ते मराठीत बोलत असतांना या सदनाच्या सन्माननीय सदस्यांनी त्यांची कधीही अवहेलना केलेली नाही. परंतु ज्यांचा जन्म या मुंबईत झाला, जे या मुंबईत नागडले, बागडले ते सांगतात की, " मै मराठी मे बात नहीं करुंगा". सभापती महोदय, आम्ही हे कशासाठी सहन करावयाचे?

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ SBT/ 18:15

श्री.दिवाकर रावते...........

सभापती महोदय, संविधानाच्या अनुच्छेद 347 मध्ये लिहिलेले अत्यंत घातक आहे. म्हणून सर्व राज्ये स्वत:च्या भाषेबाबत जागरुक आहेत. कसले हे राज्यकर्ते आहेत ? यांना तृतीयपंथी बोलायला सुध्दा लाज वाटते. मुंबई,नवीन मुंबई,ठाणे यापरिसरात जवळपास 27लाख बांगलादेशीय आहेत. ही आकडेवारी माझी नाही. महाराष्ट्र राज्याचे खासदार, या देशाचे केंद्रीय गृहमंत्री यांनी लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना ही माहिती दिली. या देशात साडेतीन कोटी बांगलादेशीय आहेत. त्यातील 27 लाख बांगलादेशीय मुंबई, नवीन मुंबई आणि ठाणे येथे आहेत.

सभापती महोदय, एक गंभीर बाब मी सदनाच्या निदर्शनास आणून देतो. या सदनामध्ये वारंवार सांगितले जाते की, "हम मुस्लिम 16 टक्के है. इस देश के चौथे पहिए है. अगर इस चौथे पहिए की तरफ ध्यान नही दिया जाएगा तो गाडी नही चलेगी." ही टक्केवारी 3 टक्के होती ती 16 टक्के झालेली आहे. त्यांच्याकडून आपल्याला गर्भित धमकी ऐकावी लागते. उद्या मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे येथील त्यांची लोकसंख्या वाढल्यास काय होईल याचा कधी विचार केला आहे काय ? यापुढे मराठी भाषिक हे हाताच्या बोटावर मोजण्या इतके असतील. आम्ही मराठीचा आग्रह धरतो म्हणून आमच्यावर टीका केली जाते.

सभापती महोदय, संविधानाच्या अनुच्छेद 347 मध्ये म्हटलेले आहे की, " तशी मागणी केली गेल्यावर जर एखाद्या राज्यामधील भरीव प्रमाणातील लोकसंख्येची तिच्याकडून बोलल्या जाणाऱ्या कोणत्याही भाषेच्या वापरास त्या राज्याकडून मान्यता मिळावी अशी इच्छा आहे याबद्दल राष्ट्रपतीची खात्री झाली तर, तो विनिर्दिष्ट करीत अशा प्रयोजनाकरता त्या राज्यात सर्वत्र किंवा त्याच्या कोणत्याही भागात अशा भाषेला अधिकृतरित्या मान्यता मिळावी असे तो निदेशित करु शकेल." तसेच संविधानाच्या अनुच्छेद 351 मध्ये म्हटलेले आहे की, " हिंदी भाषेचा प्रसार वाढविणे, ती भारताच्या संमिश्र संस्कृतीच्या सर्व घटकावयवांना अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून उपयोगास येईल अशा रीतीने तिचा विकास करणे, तिच्या प्रकृतीला धक्का न लावता, हिंदुस्थानी व आठव्या अनुसूचीत विर्निदिष्ट केलेल्या अन्य भारतीय भाषा यांमध्ये वापरली जाणारी रुपे, शैली व शब्दप्रयोग सामावून घेऊन आणि जेथे जेथे आवश्यक वा इष्ट असेल तेथे तेथे तिच्या शब्द संग्रहाकरिता मुख्यत: संस्कृतीचा व गौणत: अन्य भाषांचा अवलंब करुन तिची समृध्दी साधणे हे संघराज्याचे कर्तव्य असेल."

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

सभापती महोदय, आता अनेक स्त्रिया करवाचौथ करायला लागल्या आहेत. आपल्या मराठी संस्कृतीवर प्रचंड अतिक्रमण होत आहे.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

सभापती महोदय, संविधानाच्या अनुच्छेद 347 मध्ये लिहिलेले अत्यंत घातक आहे. म्हणून सर्व राज्ये स्वत:च्या भाषेबाबत जागरुक आहेत.....कसले हे राज्यकर्ते आहेत ? यांना तृतीयपंथी बोलायला सुध्दा लाज वाटते. मुंबई,नवीन मुंबई,ठाणे यापरिसरात जवळपास 27लाख बांगलादेशीय आहेत. ही आकडेवारी माझी नाही. महाराष्ट्र राज्याचे खासदार, या देशाचे केंद्रीय गृहमंत्री यांनी लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना ही माहिती दिली. या देशात साडेतीन कोटी बांगलादेशीय आहेत. त्यातील 27 लाख बांगलादेशीय मुंबई, नवीन मुंबई आणि ठाणे येथे आहेत.

सभापती महोदय, एक गंभीर बाब मी सदनाच्या निदर्शनास आणून देतो. या सदनामध्ये वारंवार सांगितले जाते की, "हम मुस्लिम 16 टक्के है. इस देश के चौथे पहिए है. अगर इस चौथे पहिए की तरफ ध्यान नही दिया जाएगा तो गाडी नही चलेगी." या 16 टक्क्यांकडून आपल्याला गर्भित धमकी ऐकावी लागते. उद्या मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे येथे 27 लाख बांगलादेशीय आहेत म्हणजे ही टक्केवारी 3 टक्के होते. उद्या या 3 टक्केचे 16 टक्के झाल्यास काय होईल याचा कधी विचार केला आहे काय ? आपणास 16 टक्के वाल्यांकडून देश चालविण्याबाबत धमकी मिळते आणि 27 लाख बांगलादेशीय आहेत आणि ते तर भाऊबंद आहेत. यापुढे मराठी भाषिक हे हाताच्या बोटावर मोजण्या इतके असतील. आम्ही मराठीचा आग्रह धरतो म्हणून आमच्यावर टीका केली जाते.

सभापती महोदय, संविधानाच्या अनुच्छेद 347 मध्ये म्हटलेले आहे की, " तशी मागणी केली गेल्यावर जर एखाद्या राज्यामधील भरीव प्रमाणातील लोकसंख्येची तिच्याकडून बोलल्या जाणाऱ्या कोणत्याही भाषेच्या वापरास त्या राज्याकडून मान्यता मिळावी अशी इच्छा आहे याबद्दल राष्ट्रपतीची खात्री झाली तर, तो विनिर्दिष्ट करीत अशा प्रयोजनाकरता त्या राज्यात सर्वत्र किंवा त्याच्या कोणत्याही भागात अशा भाषेला अधिकृतरित्या मान्यता मिळावी असे तो निदेशित करु शकेल." किती मोठा धोका आहे. हे वाचताना मनाला वेदना होत आहेत. आम्ही बोलतो म्हणून आमच्यावर टीका करता. मी एक प्रस्ताव दिलेला आहे. तो चर्चेला येईल त्यावेळी मी सविस्तर बोलेन.

श्री.दिवाकर रावते...........

सभापती महोदय, संविधानाच्या अनुच्छेद 351 मध्ये म्हटलेले आहे की, " हिंदी भाषेचा प्रसार वाढविणे, ती भारताच्या संमिश्र संस्कृतीच्या सर्व घटकावयवांना अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून उपयोगास येईल अशा रीतीने तिचा विकास करणे, तिच्या प्रकृतीला धक्का न लावता, हिंदुस्थानी व आठव्या अनुसूचीत विर्निदिष्ट केलेल्या अन्य भारतीय भाषा यांमध्ये वापरली जाणारी रुपे, शैली व शब्दप्रयोग सामावून घेऊन आणि जेथे जेथे आवश्यक वा इष्ट असेल तेथे तेथे तिच्या शब्द संग्रहाकरिता मुख्यत: संस्कृतीचा व गौणत: अन्य भाषांचा अवलंब करुन तिची समृध्दी साधणे हे संघराज्याचे कर्तव्य असेल."

सभापती महोदय, आता अनेक स्त्रिया करवाचौथ करायला लागल्या आहेत. आपल्या मराठी संस्कृतीवर प्रचंड अतिक्रमण होत आहे.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, नोकर भरतीसंबंधी मी बोलणार आहे. नोकर भरतीसंदर्भात जाहिरात देताना, त्यामध्ये मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे, असा उल्लेख आवश्यक आहे. ते कायद्याने बंधनकारक आहे. परंतु तसे होत नाही.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : सन्माननीय रावते साहेब, आपले भाषण सुरु होऊन पावणे दोन तास झालेले आहेत आणि आणखी काही सन्माननीय सदस्यांना अजून बोलावयाचे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सुरुवातीसच म्हणालो की, मला अतिशय दुःख होत आहे की, स्वातंत्र्य प्राप्तीच्या 50 वर्षानंतरही आम्हाला मराठी भाषेसाठी आक्रंदन करावे लागत आहे. त्यामुळे आज वेळेचे बंधन कोणावरही टाकू नका. एकदा तरी या मराठीला मोकळेपणाने रडू द्या, तिला विवस्त्र करुन मंत्रालयाच्या दारात उभी केली, असे केशवसुत म्हणाले. तेव्हा आम्हाला रडू द्या.

**तालिका सभापती** : केशवसुत नव्हे तर कुसुमाग्रज असे म्हणाले आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण कसले वेळेचे बंधन घालत आहात ? आम्हाला मराठीसाठी रडू द्या. मराठी भाषेवरील एवढे अत्याचार आम्ही मांडत असताना, तुम्ही असे सांगितले पाहिजे की, आपण आणखी बोला, होऊन जाऊ द्या.. कसली घंटी वाजवताय ?....मंत्र्यांना झेपत नसेल तर तुम्ही निघून जाऊ शकता. हा माझा प्रश्न नाही.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मुंबईपुरतेच बोलत आहेत. राज्यामध्ये इतरही सर्व ठिकाणी मराठीतूनच बोलले जाते. याठिकाणी मराठीचेच राज्य आहे, हे त्यांनी लक्षात घ्यावे. परंतु दुर्दैवाने ते लक्षात घेत नाहीत.

श्री.दिवाकर रावते : महाराष्ट्रात किती मराठी बोलली जाते हे मी आपल्याला सांगतो. बरे झाले, माननीय सदस्य वेळेवर उभे राहिले. सभापती महोदय, राज्य शासनाची भाषा मराठी असल्याने, शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना मराठी भाषा अवगत असली पाहिजे, असे मी मघापासून सांगण्याचा प्रयत्न करीत आहे आणि ती कशी अवगत नाही, हेही सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे. शासनाने नोकर भरती करताना, जाहिरातीमध्ये मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे, अशी अट घातली पाहिजे. मग, ती भरती गडचिरोली, चंद्रपूर, महाराष्ट्रात कुठल्याही भागात होऊ दे,

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्याठिकाणी ही अट असली पाहिजे. मराठीचे ज्ञान आवश्यक आहे. दिनांक 15.3.2007 रोजी कृषि सहसंचालक, पुणे यांनी दिलेल्या नोकर भरतीच्या जाहिरातीमध्ये मराठीच्या ज्ञानाची अटच नाही, माझ्याकडे ही जाहिरात उपलब्ध आहे. पुणे हे महाराष्ट्रातच आहे ना ? केंद्रीय कृषि मंत्री माननीय शरद पवार यांच्या पुण्यामध्ये, पालकमंत्री असलेल्या अजित पवार यांच्या पुण्यामध्ये कृषि सहसंचालकांनी दिलेल्या जाहिरातीमध्ये मराठीचे ज्ञान आवश्यक आहे अशी अटच टाकलेली नाही. ते म्हणतात, या अटीची गरज नाही. त्यामुळे प्रत्येक नोकर भरतीमध्ये मराठीच्या ज्ञानाची अट समाविष्ट करावी, असा निर्णय आपण घेणार का ? मी आपल्यासमोर एक-एक मागणी ठेवत आहे. मराठी भाषेसाठी हे शासन काही करत नाहीत, हे आपल्याला दाखवत आहे. भारतात कोणीही कोणत्याही राज्यात राहू शकतो, हे आम्हाला मान्य आहे. पण राज्याची भाषा येत नसल्याने नोकरी देण्याचे बंधन राज्यावर घटनात्मक नाही. परंतु कपाळ करंटे मुख्यमंत्री काल म्हणाले, त्याचा समाचार आम्ही घेऊ. काय चाललेय तुमच्या लोकांचे ? ते असे म्हणाले की, "अशी छोटी छोटी घरे बांधून, झोपडीत राहू नका, या या या, सगळयांनी इकडे या आणि आमच्या घरामध्ये रहा." आम्ही काय सालं फुटपाथवर भीक मागत फिरायचे काय ? ......

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : आपले युतीचे शासन होते तेव्हा आपणच झोपडपट्टीमध्ये राहणा-या 40 लाख लोकांना घरे देणार होता, त्याचे काय झाले ?.....(अडथळा) ते आठवते का आपल्याला ?

श्री.दिवाकर रावते : देणार होतो ना. पण हा कपाळ करंटा मुख्यमंत्री घरे बांधून लोकांना बोलावतोय, मग आम्ही काय सालं...(अडथळा) राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी सर्व परप्रांतियांना आवतान दिलेले आहे. हे काय समजतात स्वत:ला ? हा काय परप्रांतीयाचा हक्क आहे काय ?

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आपण कृपया असे बोलू नका.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री.दिवाकर रावते : साले, 27 लाख बांगलादेशी लोक आज मुंबईत घुसले आहेत, काय केले शरद पवारांनी ? काय केले मुख्यमंत्र्यांनी ?

..3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व सन्मानननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी या दोघांनाही विनंती करतो की, कृपया त्यांनी आपल्या जागेवर बसावे. एक मिनिट आपण शांत बसा. माझे ऐका.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नाही. बांगलादेशी मुंबईमध्ये आले आणि हे हिजडयासारखे टाळया वाजवत बसले आहेत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य, कृपया आपण खाली बसा. आपण बसा, आपण बसा. मी आपल्याला विनंती करतो की, आपण कृपया खाली बसा.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री.दिवाकर रावते : आम्ही 40 लाख झोपडपट्टीवासियांना घरे देण्याचा प्रयत्न केला.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : स्वत:ची वेळ आली तेव्हा यांनी काही केले नाही आणि आता आम्हाला शिकवत आहेत. मुंबईमध्ये झोपडपट्टया आपण वाढवल्या.

**तालिका सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी मराठी भाषेसंबंधी आपल्या भावना व्यक्त कराव्यात, घरांचा प्रश्न सोडावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे बरोबर होणार नाही. मुंबईत येणाऱ्यांना मराठीचे ज्ञान असावे, हे सन्माननीय सदस्य ॲड.कुलकर्णी मान्य करीत नाहीत आणि उभे राहून मला शिकवत आहेत.

**तालिका सभापती** : आपण मागणी करु शकता.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : मुंबईमध्ये सर्व झोपडपट्टया आपणच वाढविल्या.

श्री.दिवाकर रावते : हे काय मुख्यमंत्री घेऊन बसले आहेत ? परप्रांतीयांच्या लोढयांना निमंत्रण देणारा मुख्यमंत्री हा महाराष्ट्राला कलंक आहे. महाराष्ट्राला कलंक आहे. हा मुख्यमंत्री महाराष्ट्राला कलंक आहे. परप्रांतीयांना येथे आणतोय.....

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते कृपया आपण खाली बसा. मी हे सर्व शब्द कामकाजातून काढतो.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

नंतर कु.गायकवाड...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते येथे जे भाषण करीत आहेत ते आम्ही अत्यंत शांतपणे ऐकत आहोत. माननीय मुख्यमंत्र्यांना करंटे म्हणणे, हे उचित होणार नाही. सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते हे सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांनी सन्माननीय मुख्यमंत्र्यांबाबत जे वक्तव्य केले आहे ते कामकाजातून काढून टाकावे, अशी माझ ी आपल्याला विनंती आहे.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती** :आपण मागणी करीत आहात त्याप्रमाणे मी सन्माननीय सदस्यांचे वक्तव्य कामकाजातून काढून टाकतो.

श्री.दिवाकर रावते : हा मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्याला कलंक आहे. परप्रांतियांच्या लोंढयाला निमंत्रण देणारा महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री हा कलंक आहे......

**तालिका सभापती** : सनमाननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. रावते साहेब आपण आपल्या चांगल्या भाषणाला वेगळे वळण देऊ नका. आपण विषयावर बोलावे. आपण विपर्यस्त उल्लेख करु नका.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्य, श्री. दिवाकर रावते यांचे भाषण आम्ही शांतपणे ऐकून घेत आहोत. त्यांनी त्यांच्या भाषणात भावनेच्या भरात अनेक अपशब्द वापरले आहेत, परंतु आम्ही हरकत घेतली नाही. आता मात्र त्यांनी आपल्या भाषणात "हे मुख्यमंत्री महाराष्ट्राला कलंक आहेत" असे जे उद्‌गार काढले आहेत हे अती झाले आहे. मराठीचा कळवळा आपल्यालाच आहे, असे कृपा करुन समजू नका. आम्ही शांतपणे ऐकून घेत आहोत याचा अर्थ सन्माननीय सदस्यांनी काहीही वक्तव्य करावे, असा होत नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी माननीय मुख्यमंत्र्यांबद्दल जे वक्तव्य केले आहे, ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी कृपया आपापल्या जागेवर शांत बसावे.......

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक पाच मिनिटांकरिता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 6 वाजून 26 मिनिटांनी 5 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

-------

यानंतर श्री. रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती, श्री.उल्हास पवार)**

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : मराठी भाषेविषयी अतिशय चांगली चर्चा सभागृहात सुरु आहे. सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या भाषणातील काही शब्द नव्हे तर अनेक शब्द असे आहेत की, जे कामकाजातून काढले पाहिजेत. सन्माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांच्या संदर्भात आपण जे वक्तव्य केले आहे, ते मी कामकाजातून काढून टाकतो. कारण, माननीय मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्याचा विपर्यास आपण आपल्या भाषणात केला आहे. गरीब माणसाला घर द्यायचे नाही का ? अशी भूमिका त्यांनी आपल्या भाषणातून मांडली होती. तेव्हा, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण विषयावर बोलावे. आपण या विषयावर दोन तास बोलला आहात. या चर्चेसाठी जो वेळ निश्चित केला आहे त्यानुसार आता अर्धा तास शिल्लक आहे, एवढेच मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ही चर्चा अर्ध्या तासात संपणारी नाही.

**तालिका सभापती** : आवश्यकता भासली तर आपण चर्चेसाठी वेळ वाढवून घेऊ. मी केवळ चर्चेसाठी निश्चित केलेला वेळ सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सभागृहात जी चर्चा उपस्थित करण्यात आली आहे त्या चर्चेचा विषय अतिशय महत्वाचा आहे. आम्ही सर्वजण लक्षपूर्वक सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.दिवाकर रावते यांचे भाषण ऐकतो आहोत आणि त्यांनीही या चर्चेला एका उंचीवर नेण्याचा प्रयत्न केला आहे. या चर्चेच्या निमित्ताने सदनातील सर्वच सन्माननीय सदस्यांना आपल्या भावना व्यक्त करावयाच्या आहेत. सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.दिवाकर रावते यांना जवळ जवळ पावणे दोन तास बोलण्याची आपण संधी दिलेली आहे. सभागृहातील जवळपास 10 ते 12 सन्माननीय सदस्यांना अजून आपल्या भावना व्यक्त करावयाच्या आहेत. आज सभागृहाचे कामकाज सकाळी 11 वाजता सुरु झाले आहे. अद्याप अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे त्यामुळे कुठेतरी वेळेचे नियोजन करणे आवश्यक आहे. तेव्हा, सभागृहानेच याबाबतीत निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने सर्व सन्माननीय सदस्यांना न्याय मिळाला पाहिजे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, चर्चेला सरकारची तयारी आहे. फक्त वेळेच्या नियोजनासंदर्भात मी विनंती केली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, भावनेच्या भरात माझ्या भाषणात काही अपशब्द आले असतील तर ते मी मागे घेतो. मराठी भाषा अवमानित होते आहे, या भावनेने मी बोललो. माझा इतरांना अपमानीत करण्याचा उद्देश नाही. माझी एवढीच विनंती आहे की, आम्हाला किमान मराठी भाषेकरिता मोकळेपणी रडू तरी द्यावे. आज ही चर्चा पूर्ण होणार नसेल तर उद्या पुन्हा ही चर्चा पुढे सुरु करा. परंतु सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना या चर्चेच्या निमित्ताने व्यक्त झाल्या पाहिजेत आणि त्या रेकॉर्डवर आल्या पाहिजेत. मी ज्याप्रमाणे विविध संदर्भ माझ्या भाषणात दिले त्याप्रमाणे या चर्चेमध्ये ज्या भावना व्यक्त होतील त्या भविष्यात या सभागृहात येणा-या सन्माननीय सदस्यांच्या लक्षात येतील व मराठी भाषेसाठी या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याची जाणीव त्यांना होईल.

यानंतर कुमारी जयश्री.........

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : उद्या जरी अशासकीय कामकाज बाजूला ठेवून सदर प्रस्तावावर चर्चा घ्यावयाची असेल तरी देखील काही हरकत नाही. कारण हा विषयही तितकाच महत्वाचा आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, उद्या कोकणाच्या विकासाच्या संदर्भातील प्रस्ताव आपण चर्चेसाठी घेतलेला आहे, तोही या प्रस्तावा इतकाच महत्वाचा आहे. या दोन्ही प्रस्तावांच्या चर्चेबाबतचे वेळेचे नियोजन आपण करावे, अशी मी आपल्याला विनंती करतो.

**तालिका सभापती**: माननीय मंत्रिमहोदयांचे बरोबर आहे, वेळेचे नियोजन हे करावेच लागेल. सर्व सन्माननीय सदस्यांच्या या प्रस्तावाबाबतच्या भावना लक्षात घेऊन सदर प्रस्तावावर कोणी किती बोलावे, याबाबतचे वेळेचे नियोजन करणे अत्यंत महत्वाचे आहे. आताच्या या प्रस्तावाखेरीज उद्या कोकणाच्या विकासासंबंधीचा जो नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आहे तो आपण चर्चेला घेऊ व बाकीचे अशासकीय कामकाज पुढे कधीतरी घेऊ उद्या कोकणाच्या विकासाच्या संदर्भातील नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव व आताचा हा प्रस्ताव अशा दोन्ही प्रस्तावावर चर्चा असे कामकाज घेण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : उद्या चर्चेला असणारी शासकीय विधेयकेही बाजूला सारुन या प्रस्तावावर चर्चा घेण्यात यावी, कारण उद्या अशासकीय कामकाजाचा दिवस आहे व त्यातरी अशासकीय विधेयकांवर चर्चा होणार आहे.

**तालिका सभापती** : शासकीय विधेयके नंतर घेता येणार नाहीत.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, उद्या टॅक्सेशनच्या संदर्भातील जे शासकीय विधेयक आहे त्याच्या इंम्प्लिमेंटेशनबाबत मार्च अखेरपर्यंतच मर्यादा आहे त्यामुळे शासकीय विधेयकामध्ये टॅक्सेशनचे विधेयक पुढे ढकलता येणे शक्य नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : दिनांक 14 मार्च,2007 रोजी अधिवेशन सुरु झाले. आज 15 दिवस झाले, तरी शासनाने या आधीच शासकीय विधेयके का मांडली नाहीत ? सदर शासकीय विधेयक आपण घाईगडबडीत मंजूर करुन घेणार का?

श्री.हर्षवर्धन पाटील : या विधेयकावर आपण विस्तृतपणे चर्चा करु शकता, कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरविल्याप्रमाणे विधानसभेमध्ये टॅक्सेशनचे विधेयक मंजूर झाल्यानंतर ते उद्या आपल्याकडे घेण्यात येणार आहे तसेच, सभापती महोदय,आता मला या सभागृहात आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सादर करावयाचा आहे.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे.

श्री.हर्षवर्धन पाटील ( विधानकार्य मंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार,दिनांक 29 मार्च,2007 रोजी भरलेल्या बैठकीत शुक्रवार,दिनांक 30 मार्च,2007 ते 16 एप्रिल,2007 पर्यंतचा विधानपरिषदेच्या कामकाजाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे.

**<u>मार्च 2007</u>**

शुक्रवार, दिनांक 30 : 1) शासकीय विधेयक
2) अशासकीय कामकाज (विधेयके)

शनिवार, दिनांक 31 : सुट्टी (महावीर जयंती)

**<u>एप्रिल 2007</u>**

रविवार, दिनांक 1 : सुट्टी (ईद ए मिलाद)

सोमवार, दिनांक 2 : बैठक होणार नाही

मंगळवार, दिनांक 3 : 1) शासकीय विधेयके
2) सत्ताधारी पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा

बुधवार, दिनांक 4 : शासकीय विधेयके

गुरुवार, दिनांक 5 : 1) शासकीय विधेयके
2) विरोधी पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4C - 3

शुक्रवार, दिनांक 6 : सुट्टी (गुड फ्रायडे)

शनिवार, दिनांक 7 : बैठक होणार नाही

रविवार, दिनांक 8 : सुट्टी

सोमवार, दिनांक 9 : शासकीय विधेयके

(2) मंगळवार, दिनांक 10 : 1) शासकीय विधेयके

2) सत्ताधारी पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा

बुधवार, दिनांक 11 : शासकीय विधेयके

गुरुवार, दिनांक 12 : 1) शासकीय विधेयके

2) विनियोजन विधेयक

शुक्रवार, दिनांक 13 : अशासकीय कामकाज (ठराव)

शनिवार, दिनांक 14 : सुट्टी (डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती)

रविवार, दिनांक 15 : सुट्टी

सोमवार, दिनांक 16 : शासकीय विधेयके

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : अध्यक्ष महाराज,कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आता कामकाजाचा अहवार सादर करतांना मंत्रिमहोदयांनी दिनांक 01एप्रिल,2007 रोजी सुट्टी आहे, असे सांगतांना आपण सांगितले की, ईद - ए - मिलाद ची सुट्टी आहे, तसे सांगण्याएवजी "रविवारची सुट्टी "आहे असे का नाही सांगितले ?

श्री.श्रीकांत जोशी : हनुमान जयंतीच्या सुट्टीचा आपण "हनुमान जयंतीची सुट्टी" असा उल्लेख का केला नाही ?

डॉ.दीपक सावंत : तेव्हा रेकॉर्डवरुन ईद -ए-मिलाद हा उल्लेख काढून टाकावा.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>हरकतीच्या मुद्याबाबत.</u>**

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपली परवानगी असेल तर मी माझा हरकतीचा मुद्दा मांडू काय ?

**तालिका सभापती** : होय.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मराठी भाषेच्या संदर्भात सभागृहात चर्चा सुरु आहे. या चर्चेला पातळी राहिली पाहिजे. आपण सभागृहामध्ये मराठी भाषेच्या भवितव्याची चर्चा करीत आहेत. दिनांक 1 मे, 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. तरी आजही आम्हाला मराठी भाषेच्या नावाने रडावे लागत आहे. एवढी चांगली चर्चा सुरु असतांना आमच्या सन्माननीय सदस्यांच्या तोंडून काही चुकीचे शब्द निघाले असतील तर ते कामकाजातून जरुर काढून टाकावेत. त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी आपला शब्द मागे घेऊन दिलगिरी व्यक्त केलेली आहे. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी साहेबांना मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी झोपडपट्टीसंदर्भात विषय निघतो त्यावेळी ते असे म्हणतात की, युतीच्या सरकारने 40 लाख लोकांना घरे देऊन मुंबईत झोपडपट्टी वाढविली, असा त्यांच्याकडून वारंवार उल्लेख केला जातो. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांना मला हरकतीच्या मुद्याद्वारे एकच गोष्ट सांगावयाची आहे की, झ ाोपडयांच्या वाढीची तपासणी केली तर राज्यात राज्यकर्ते म्हणून कॉंग्रेस पक्षानेच जास्त काळ राज्य केले आहे. माननीय श्री.शरद पवार यांचा 24 महिन्यांचा अपवाद आहे. युतीचा काळ सोडला तर महाराष्ट्रावर कॉंग्रेस पक्षच राज्य करीत आहे, हे नाकारता येणार नाही. या राज्यात झोपडया वाढविण्याचे काम कॉंग्रेस पक्षानेच केलेले आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांचे म्हणणे पूर्णपणे जाणून घेणे आवश्यक आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, एक सन्माननीय सदस्य हरकतीच्या मुद्यावर बोलत असतात, तेव्हा दुस-या सन्माननीय सदस्यांना हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येत नाही.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, यासंदर्भात निर्णय घेतील. मुंबईत झोपडया कशा वाढल्या याची सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना जेवढी माहिती आहे तेवढी माहिती



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड ........

आम्हाला सुध्दा आहे. आम्ही त्यांच्यापेक्षा वयाने लहान असलो तरी आम्हाला याबाबतची माहिती आहे. मुंबईची सत्ता कोणाच्या हातात होती ? मुंबईचा सम्राट कोण आहे, हे जगाला कोणी सांगितले, हे आम्ही बोलावयाचे काय ? फक्त मराठी विषयावर चर्चा होणार असेल तर त्या चर्चेला चांगले रुप प्राप्त होईल.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आणि सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी मांडलेले दोन्ही मुद्दे हरकतीचे मुद्दे होऊ शकत नाहीत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कोणावर टीका करण्यासाठी मी हरकतीचा मुद्दा मांडलेला नाही. सन्माननीय सदस्य झोपडयांच्या बाबतीत आपले मत मांडू शकतात. माझा हरकतीचा मुद्दा सन्माननीय सदस्यांना ऐकून घ्यावा लागेल. माझे बोलणे थांबवून त्यांनी आपला मुद्दा मांडणे, ही संसदीय पद्धत नाही.

**तालिका सभापती** : आता झोपडयांच्या विषयावर पडदा पडलेला आहे. आता आपण मूळ विषयावर चर्चा करु.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, शिवसेनेने झोपडया वाढविलेल्या नाहीत. मुंबईत मराठी माणसाकडे दुर्लक्ष होत होते. जे लोक झोपडयांमध्ये राहतात, त्यांचे हाल होतात. म्हणून गलिच्छ वस्ती निर्मुलनाचा कार्यक्रम हाती घेतला गेला. गलिच्छ वस्ती निर्मुलनाचा कार्यक्रम तुम्हाला मंजूर नव्हता तर तुम्ही तो कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेऊ शकला असता. झोपडया वाढवाव्यात, अशा मताचे आम्ही नाही. मुंबईमध्ये येऊन झोपडयांमध्ये राहणारे लोंढे थांबावेत, यासाठी शिवसेनेचा जन्म झालेला आहे, ही मुलभूत गोष्ट सन्माननीय सदस्य विसरुन जातात. झोपडयांचा जेव्हा उल्लेख केला जातो तेव्हा सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी असे म्हणतात की, युतीच्या काळात झोपडया वाढल्या, याबाबत माझा हरकतीचा मुद्दा आहे. 10 लाख झोपडयांमधील 40 लाख लोकांना गलिच्छ वस्ती सोडून चांगल्या घरात रहाता यावे, हा त्यामागचा उद्देश आहे.

यानंतर श्री.गागरे .......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ यापूर्वी श्री.बोरले 18:45

श्री.मधुकर सरपोतदार .....

याची नोंद घ्यावी, याबाबत त्यांनी असे बोलू नये असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**तालिका सभापती** : नियम 260 अन्वये जी चर्चा उपस्थित झालेली आहे, या चर्चेमध्ये दुसरा कोणताही विषय आणता येणार नाही. आता मूळ विषयावरील चर्चा पुढे सुरु करावी.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

**पृ.शी.**: राज्यात सर्वच ठिकाणी मराठीची गळचेपी होत असल्यामुळे मराठी भाषेचा वापर अनिवार्य करणे.

**मु.शी.**: राज्यात सर्वच ठिकाणी मराठीची गळचेपी होत असल्यामुळे मराठी भाषेचा वापर अनिवार्य करणेबाबत सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री.मधुकर चव्हाण, डॉ.अरविंद सावंत, श्री.संजय केळकर, डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या विविध वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जाहिरातीमध्ये मराठी भाषा अनिवार्य असावी असे लिहिले आहे. वेळोवेळी माझ्या भाषणात मी जाहिरातीचा उल्लेख केलेला आहे, शासनाचे परिपत्रक क्रमांक मवाभा/1069 म/ दिनांक 6 ऑगस्ट 1969 च्या आदेशात स्पष्ट म्हटले आहे की, "शासनाच्या मराठीकरणाच्या धोरणास अनुसरुन मराठी वर्तमानपत्रात प्रसिध्द केल्या जाणाऱ्या शासकीय जाहिराती मराठीतच प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तरी शासनाच्या सर्व कार्यालयांना अशी विनंती करण्यात येते की, वर्जित प्रयोजने वगळता मराठी वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येणाऱ्या शासकीय जाहिराती शक्यतो मराठीतच प्रसिध्द करण्यात याव्यात. मराठीत जाहिराती प्रसिध्द करण्याबाबत कार्यालयांना काही अडचणी असल्यास त्यांनी सामान्य प्रशासन विभागाकडे त्वरीत कळवाव्यात". अशा प्रकारचे निर्देश शासनाने दिलेले आहेत, त्याप्रमाणे जाहिराती प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पुणे येथील समर्थ मराठी संस्थेचे अध्यक्ष श्री.अनिल गोरे हे मराठी भाषेच्या वृध्दीकरिता काम करीत आहे. श्री.अनिल गोरे यांची मी संवाद मुलाखत घेतली, मराठी भाषेच्या वृध्दीसाठी त्यांना दाद मिळत नाही. मी त्यांना सांगितले आहे की, मराठीला भाषेला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहीन. शासनाचे धोरण परिपत्रकाला व स्वत:च्या आदेशाला छेद देणारेच आहे. तंत्र शिक्षण संचालनालय मुंबई यांच्या दिनांक 3 जानेवारी 2006 च्या पत्र क्रमांक 2 अ/एडीएम/तक्रार/2006/05 नुसार मध्ये असे म्हटले आहे की, " महाराष्ट्र राज्यामध्ये राहात असलेल्या विद्यार्थ्यांना मराठी भाषा अवगत असतेच असे नाही, त्यामुळे सर्व भाषिक विद्यार्थ्यांना

.....3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

समजेल अशा इंग्रजी भाषेतून उपरोक्त अभ्यासक्रमांच्या जाहिराती दिल्या जातात." यापुढे असेही म्हटले आहे की, प्रवेशासाठी जर काही न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवल्यास इंग्रजी भाषेतील जाहिरातीच न्यायालयात संदर्भासाठी सादर कराव्या लागतात. भाषांतरीत कागदे मूळ इंग्रजीचा आदेश नाहीत असे म्हटले आहे.

तुमची व माझी सर्वांची इच्छा आहे की, मराठी भाषा अनिवार्य केली पाहिजे, पण अधिकारी तसे वागत नाहीत. मराठी वृत्तपत्रामध्ये मराठी जाहिरात देण्याच्या संदर्भात मी पूर्णपणे भूमिका मांडली आहे. शासनाच्या दिनांक 5 मार्च, 1980 च्या आदेशान्वये माहिती व जनसंपर्क संचालनालयाला सूचना देण्यात आल्या आहेत की, "यापुढे मराठी किंवा हिंदी वर्तमानपत्रांना दिल्या जाणाऱ्या जाहिराती इंग्रजीतून आल्यास, त्या छापण्यासाठी स्वीकारल्या जाऊ नयेत व त्या संबंधित कायर्‌ालयास वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याकरिता परत पाठविल्या जाव्यात". याचा अर्थ इंग्रजी वर्तमानपत्रातही मराठी जाहिरात छापण्यात याव्यात, असे सांगितले आहे. तरीही आपले अधिकारी इंग्रजी भाषेत जाहिराती देण्यात येत आहेत.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या माननीय उर्जामंत्र्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या विभाजनाची घोषणा करुन एका वीज मंडळाची तीन वीज मंडळे केली आहेत.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

त्यांची नावे काय असायची ? ऊर्जा सचिव श्री.पाण्डे आहेत. मूळ इंग्रजीचा मराठी आदेश नोंदणी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आपण हे लक्षात घ्यावे. वीज मंडळाचे चार भागांमध्ये विभागणी झाली तेव्हा याच श्री.पांडे यांनी त्यांची नावे काय आहेत ते सांगितले. जनको, ट्रान्स्को, डिस्को, होलडको अशी नावे ठेवली असल्याची घोषणा पत्रकार परिषदेमध्ये मंत्र्यांनी केली. सन्माननीय सदस्य श्री.गिरीष बापट यांनी मराठी नावे ठेवण्याची मागणी मंत्री महोदयांकडे केली आणि त्यांनी ती मान्यदेखील केली. त्यासाठी प्रत्येकी दोन दोन नावे इंग्रजी आणि मराठी अशी राजपत्रात प्रसिद्ध केली गेली. म्हणजे मूळ मराठी नाव मराठी राजपत्रात तर मूळ मराठी नावाचे भाषांत करून इंग्रजी नाव, जे सरकारने ठेवलेलेच नाही, राजपत्राच्या इंग्रजी आवृत्तीमध्ये प्रसिद्ध केले. ती राजपत्रे आजही माझ्याकडे आहेत. इतकेच नाही तर केंद्र शासनाच्या उद्योग निबंधक म्हणजे कंपनी रजिस्ट्रारकडे या कंपन्यांची नोंदणी करताना मुद्दाम इंग्रजी नावे, जी सरकारने ठेवलेली नाहीत, वापरून नोंदणी केली. ऊर्जा विभागातील अधिकाऱ्यांनी जाणून बुजून मराठी नावे टाळून इंग्रजी नावांची नोंदणी केंद्र सरकारच्या उद्योग निबंधकाकडे केली याची माहिती तेथील मुख्य अधिकाऱ्यांनी दिली. आता ही नावे पुन्हा बदलून मूळ मराठी नावांची नोंदणी करावी आणि इंग्रजी नावे वापरणे बंद करावे अशी मागणी करीत असतानाच मी आपल्याला सांगू इच्छितो की, कंपनी रजिस्ट्रार यांचेकडे अस्तित्वात असलेल्या कंपनीचे नाव बदलण्याची तरतूद आहे, त्या तरतुदीचा आधार घेऊन आपण ही इंग्रजी नावे बदलून मराठी नावांची नोंदणी करावी. तसेच यापुढे वीज मंडळाच्या सर्व निविदा, निविदा प्रपत्रे, कामपूर्ती अहवाल, देयके मराठीत असावीत असा आग्रह मी या निमित्ताने धरतो. वीज देयकांवरील आणि इतर पत्र व्यवहारातील ग्राहकांची नावे, पत्ते इ. सारे मराठीमध्ये असावेत असाही आग्रह मी धरतो आणि तशी मागणी करणारे विधेयकच मी आणणार आहे. सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची ज्या चार भागांमध्ये विभागणी होऊन चार कंपन्या निर्माण करण्यात आल्या त्यांची मूळ मराठी नावे काय आहेत याची माहिती स्वत: ऊर्जा मंत्री श्री.वळसे-पाटील यांनी सन्माननीय सदस्य श्री.गिरीश बापट यांना पत्र पाठवून दिली आहे. त्यात त्यांनी ही नावे 1) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ धारक कंपनी मर्यादित., 2) महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित., 3) महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी मर्यादित, आणि 4) महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी मर्यादित. सभापती महोदय, या मराठी नावांनी या कंपन्यांची नोंदणी करण्यास

....... 4एफ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

गेल्यानंतर तेथे मात्र इंग्रजी नावांनी, जी नावे सरकारने ठेवलेलीच नाहीत, करण्यात आली. याबाबतीत माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी पत्र पाठवून अशी माहिती दिली आहे की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित हे राज्य शासनाने निश्चित केलेले नाव कंपनी निबंधकांकडे नोंदणी करताना न योजना अन्य अमराठी भाषेत (इंग्रजीत) ठेवण्याचा निर्णय ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांनी घेतला. तसेच कंपनीचे नाव नोंदताना इंग्रजी नाव नोंदण्याच्या प्रक्रियेत मूळ टिप्पणी तयार करणे, त्यावर विचार विनिमय करणे, इंग्रजी नाव नोंदणी करण्यास संमती देणे, प्रत्यक्षरित्या सदर इंग्रजी नाव कंपनी निबंधकांकडे नोंद करणे या सर्व बाबतीत सहभागी असणाऱ्या कर्मचारी, अधिकारी यांचे नावे, या प्रक्रियेत सहभागी होत असताना तत्कालीन पदे व आज असणारी पदे यांची माहिती देताना माहिती अधिकाऱ्यांनी आपल्या पत्रात सांगितले आहे की, कंपनीचे नाव नोंदताना फॉर्म-1-ए, श्री. प्र.ब.पाटील, शासनाचे उपसचिव यांच्या सहीनिशी कंपनी निबंधकांकडे सादर केला आहे आणि आता श्री.प्र.बा.पाटील हे सेवानिवृत्त झाले आहेत. हे अधिकारी आता निवृत्त झाले असल्याने त्यांच्यावर कारवाई करता येणार नाही. परंतु त्यांना निवृत्त होऊन चार वर्षे झाली नसतील तर त्यांच्यावर आपल्याला निश्चितपणे कारवाई करता येईल. सभापती महोदय, ही प्रवृत्ती अशा प्रकारे ठेचून काढली नाही तर यावर काहीच होणार नाही. सभापती महोदय, महापालिकेबाबत मी आपल्याला सांगितलेच आहे. पण शेवटी तेथे जो आयएएस अधिकारी असतो तो आपल्या इकडूनच तेथे जात असतो. महापालिकेकडून, 'बेस्ट' कडून दिली जाणारे देयके, विद्युत देयके`मराठीतून असावी अशी आग्रही मागणी केली गेली होती आणि तसा प्रयत्न महापालिका तसेच बेस्टने देखील केला होता आणि मला बेस्ट कडून पहिले देयक हे मराठीतून आले होते. संगणकामध्ये इंग्रजीमध्ये टाकले म्हणून नंतर इंग्रजीमधूनच देयक आहे. म्हणजे आता तेथे मराठीतून कारभार करणारे आमचे शरद आचार्य नाही म्हणून त्यांना दिलेली ही श्रद्धांजली म्हणावयाची काय ? ..

( यानंतर श्री. सरफरे ..... 4जी 1 ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

हे मला आलेले दिनांक 14.12.2006 चे बी.ई.एस.टी. चे वीज वापराचे 225 रुपयांचे बिल असून ते इंग्रजीमध्ये छापले आहे. आता मी केंद्र सरकारच्या धोरणांकडे वळणार आहे..

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : माननीय सदस्यांचे भाषण सुरु होऊन 2 तास 20 मिनिटे झाली....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या मराठी भाषेवर शासनाकडून किती अन्याय होत आहे, त्याला न्याय मिळण्यासाठी ही चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. ही चर्चा आपण उद्यापर्यंत दहा तास चालू ठेवू या. सभापती महोदय, सभागृहामध्ये ही चर्चा सुरु असतांना आपण पीठासीन अधिकारी म्हणून आसनस्थ आहात हे पाहून मला आनंद झाला आहे. आपण पुण्याचे आहात, पुणे हे मराठीचे माहेर घर आहे, आपण नेहमी मराठी भाषेचा सन्मान करणारे आहात, मराठी संस्कृतीचे जतन करणारे आहात. सभापती महोदय, शासनाच्या व्यवहारामध्ये मराठी भाषेचा वापर कशाप्रकारे होतो या संदर्भात विक्रीकर सहआयुक्त, पुणे विभाग यांच्याकडून श्री. अनिल गोरे यांना "पशू-पक्षी औषधालय, 705, बुधवार पेठ, पुणे-2" या पत्त्यावर आलेल्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, "विषय : शासन व्यवहारामध्ये मराठीचा वापर" "उपरोक्त संदर्भास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, शासन व्यवहारात 95 टक्के मराठी भाषेचा वापर केला जातो. तसेच, वर्जित प्रयोजने वगळता सर्व व्यवहार मराठीतच आहेत. या विभागातील सर्व नमुने, विवरणपत्रके, फलक कार्यालयामध्ये मराठी भाषेमध्ये लावण्यात आलेले आहेत". माझ्याकडे असलेली त्यांची डॉक्युमेंट मराठीमध्ये नाहीत. 9 कोटी मराठी लोकांपैकी 2 कोटी व्यावसायिक विविध कर भरतात. त्याकरिता विवरणपत्रे, तपासणी, अहवाल परतावा, वाद-दाद निर्णय यामध्ये मराठीचा वापर अत्यंत कमी होतो. ही सर्व कामे इंग्रजीमध्ये होतात, ती मराठीमध्ये कां होत नाहीत? हे करदाते मराठी असतांना व ते विक्री कर भरीत असतांना विवरणपत्र मराठीमध्ये कां नाही? त्यांना मराठी येत नाही काय? विक्रीकर उपायुक्त, पुणे यांनी या संदर्भात धादांत खोटे लेखी उत्तर दिले आहे. त्यांनी म्हटले आहे की, "आमच्या खात्यामध्ये मराठीचा वापर 95 टक्के केला जातो." प्रत्यक्षात व्यापाऱ्यांच्या संपर्कासाठी इंग्रजीमध्ये फॉर्म छापले जातात. ते अर्जाचे नमुने मराठीमध्ये छापले जात नाहीत. सभापती महोदय, आपल्या पुण्यामध्ये मराठीचा वापर होत नाही. विक्री कर उपायुक्तांच्या कार्यालयामध्ये आपण उद्या जाऊन बघा. त्याचप्रमाणे याठिकाणी अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांनी ही निविदा काढली आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामध्ये इंग्रजीचा वापर करीत असतांना त्यांनी असे म्हटले आहे की, "इतर राज्यातून निविदाधारक निविदा भारणार असतील तर इतर राज्यातील निविदाधारकांना अवगत होण्यासाठी शासनाने इंग्रजीतून निविदा प्रसिध्द करण्यास कळविले होते". माझ्या राज्यामध्ये पोट भरणारे ठेकेदार असतील, पुरवठादार असतील त्यांची चिंता नाही, परंतु इतर राज्यातील लोकांची यांना चिंता वाटते. अशाप्रकारचे लेखी उत्तर याठिकाणी देण्यात आले आहे. या शासनामध्ये काय चालले आहे? कोणत्या पध्दतीने कारभार चालला आहे? इतर राज्यामधील जाहिराती त्यांच्या राजभाषेमध्ये दिल्या जातात तर मग महाराष्ट्रामध्ये जाहिरात देतांना ती मराठीमध्ये दिली जाते कां? महाराष्ट्रामध्ये इतर राज्यातील जाहिराती आपण वाचल्या आहेत काय? एवढी मराठीची दुरवस्था सातत्याने होत असल्यामुळे मराठीला पायदळी तुडविण्याचे प्रकार सुरु आहेत. यामुळे मला किती त्रास झाला आहे हे मी पुढे सांगणार आहे.

सभापती महोदय, मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या कर्मचाऱ्यांना अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्याबाबतचा सामान्य प्रशासन विभागाचा दिनांक 21 जून 1969 चा जी. आर. आहे. त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "सर्व कामकाज मराठीतून करण्याच्या शासनाच्या धोरणास अनुसरुन मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झालेला कर्मचारी अत्युत्कृष्ट कार्यक्षमतेमध्ये कमी पडतो असे समजणे इष्ट ठरते, त्यामुळे याबाबत शासनाने असा निर्णय घेतला आहे की, जोपर्यंत शासकीय कर्मचारी/अधिकारी विहित मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होत नाही तोपर्यंत त्यास अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढीस पात्र ठरविण्यात येऊ नये." या संदर्भात आपल्या विधानमंडळाचे प्रधान सचिव श्री. कळसे साहेबांना मी जाऊन भेटलो. त्यांनी सांगितले की, जे अमराठी कर्मचारी आहेत त्यांनी मराठी भाषेची परीक्षा दिल्यानंतर त्यांना प्रमोशन मिळेल, वेतनवाढ मिळेल असा नियम आहे. परीक्षेमध्ये तीन वेळा नापास झालेल्या कर्मचाऱ्याला काहीही मिळणार नाही. या जी.आर. मध्ये स्पष्ट लिहिले आहे की, "मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झालेला कर्मचारी अत्युत्कृष्ट कार्यक्षमतेमध्ये कमी पडतो असे समजणे इष्ट ठरते, त्यामुळे याबाबत शासनाने असा निर्णय घेतला आहे की, जोपर्यंत शासकीय कर्मचारी/अधिकारी विहित मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होत नाही तोपर्यंत त्यास अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढीस पात्र ठरविण्यात येऊ नये". या परिपत्रकाची अंमलबजावणी मंत्रालयामध्ये अजिबात होत नाही. तेथील कर्मचाऱ्यांना वेतनवाढ मिळत आहे. शासनाच्या दिनांक 21 जून 1969 च्या या आदेशाची पायमल्ली चालू आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याबद्दल कुणालाही देणे-घेणे नाही. त्याबाबत मी याठिकाणी दुसरे शब्द वापरणार नाही. कारण त्यामुळे या अधिकाऱ्यांना वाईट वाटेल. त्यांना मानसिक त्रास होईल तो होता कामा नये, ते शासनाचे अधिकारी आहेत, कर्मचारी आहेत. त्यांच्याकडे महत्वाच्या फाईल्स असतात. आमच्या फाईल्स त्यांच्याकडे जातात.

सभापती महोदय, मी आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाकडे येतो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ( पुढे सुरु..

राज्यपाल महोदय कर्नाटकामधील आहेत. त्यांची मातृभाषा कन्नड आहे. सन्माननीय सदस्य श्री. मोते यांनी उल्हासनगरमधील बेकायदेशीर बांधकामाच्या संदर्भात चर्चा उपस्थित केलेली होती. "समर्थन" या संस्थेचे अध्यक्ष प्रा.अनिल गोरे यांनी बेकायदेशीर बांधकाच्या संदर्भात अध्यादेश काढलेला होता, त्या संदर्भाने राज्यपाल महोदयांना पत्र लिहिले होते की, मराठीमध्ये काढलेल्या अध्यादेशावर आपण सही का करत नाही ? त्यावर माननीय राज्यपालांनी शासनाने पाठविलेली इंग्रजीची प्रत परत करून मराठीची प्रत मागविली आणि मराठीमध्ये काढलेल्या अध्यादेशावर सही केली. तसे नगर विकास विभागाने पत्राने त्यांना कळविले आहे की,"अध्यादेशावर मराठी राज्य भाषेतच असलेल्या प्रतीवर मा. राज्यपालांनी स्वाक्षरी केली आहे". पण आमच्या शासनकर्त्यांना मात्र हे कळत नाही याचा खेद वाटतो. केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार महाराष्ट्र राज्यातील केंद्र शासनाच्या कार्यालयांमधून किंवा प्राधिकरणांमधून तसेच शासकीय अंगीकृत व्यवसायात (मंडळे/महामंडळे इत्यादी) राजभाषा मराठीचा वापर कितपत होतो, यासंबंधात आढावा घेण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना भाषा संचालनालयाने पत्रे पाठविलेली आहेत. केंद्राने काढलेल्या परिपत्रकाचा उल्लेख करून राज्याने परिपत्रक काढलेले आहे की, "मराठीचा वापर करण्याबाबत केंद्र शासनाचे आदेश असून ही महाराष्ट्र राज्यातील केंद्र शासनाची काही कार्यालये, राष्ट्रीयकृत बँका, प्राधिकरणे, मंडळे/महामंडळे इत्यादींकडून त्रिभाषा सूत्रानुसार मराठीचा वापर होत आहे किंवा नाही ते तपासून त्यसंबंधीचा सविस्तर अहवाल व त्यासंबंधात आपल्या कार्यालयाने केलेली कार्यवाही यासंबंधीची माहिती या कार्यालयास तात्काळ पाठविण्याची व्यवस्था करावी ", असे म्हटलेले आहे. त्याची अंमलबजावणी सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी करायला पाहिजे. जिल्हाधिकाऱ्यांनी कळवूनही त्याची अंमलबजावणी संबंधित कार्यालयाने केली नाही तर दंडाची कारवाई करण्याचा अधिकारही जिल्हाधिकाऱ्यांना आहे. कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या पाट्यांवर " पी.एस. वडके", असे लिहिले असेल तर त्या ऐवजी त्यांनी "प्र.शं.वडके" असे लिहायला पाहिजे. या संबंधात जिल्हाधिकाऱ्यांनी पहाण्याची जबाबदारी आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये सगळीकडे याची अंमलबजावणी होत नाही. असे असले तरी मुंबईतील स्टेट बँक ऑफ महाराष्ट्राला आपण जाब विचारला पाहिजे. नोकर भरतीच्या संबंधात जाहिरात देताना हिंदी किंवा मराठी भाषेमध्ये ती द्यायला पाहिजे. परंतु ते इंग्रजी भाषेमध्ये जाहिरात देतात. खरे तर मराठी भाषेमध्येच ती जाहिरात देणे आवश्यक आहे. केंद्र सरकारची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ SBT/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

आस्थापना आहे त्यांच्यावर याबाबत घटनात्मक बंधन आहे. घटनेने सांगितलेले आहे. केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार महाराष्ट्र राज्यातील केंद्र शासनाच्या कार्यालयांमधून किंवा प्राधिकरणांमधून राजभाष मराठीचा वापर झाला पाहिजे. बँकांचे फॉर्म हे मराठी भाषेमध्येच असायला पाहिजेत, तसे बंधन आहे. तसे होत नसेल तर जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाई केली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, आता वर्ल्ड कप चालू आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

भाषेचा कसा अभिमान आहे आहे ते आपण पहावे. आपण चुकत असून पण आपण एकमेकांना बोलत राहणार हे मराठी माणसाचे दुर्दैव आहे. वर्ल्ड कपच्या बाबतीत सांगतो. ई.एस.पी.एन. क्रीडा वाहिनी आहे. त्या वाहिनीवरुन क्रिकेटचे समालोचन इंग्रजी, हिंदी, मल्याळी, पंजाबी, तामीळ, तेलगू, कन्नड या भाषांमध्ये प्रसारित केले जाते. त्यांना याबाबत विचारले. ते असे म्हणाले की, त्यांनी आम्हाला सांगून टाकले आहे की, या ठिकाणी दुसरी भाषा चालणार नाही. त्या त्या राज्यामध्ये त्या त्या भाषेमध्ये वर्ल्ड कप क्रिकेटचे समालोचन केले जाते. मग या ठिकाणी मराठीमध्ये समालोचन का करत नाही असे विचारल्यावर त्यांनी सांगितले की, या ठिकाणी मराठीची मागणी नाही. येथे सर्व ठिकाणी इंग्रजी आणि हिंदी भाषा चालते.

सभापती महोदय, नोकिया कंपनीचे ग्राहक सेंटर आहे. त्यांना आता फोन लावा. त्याची जी ग्राहक सर्व्हिस आहे त्यावर देशातील सर्व भाषा उपलब्ध आहेत. फक्त मराठी भाषा उपलब्ध नाही. मी त्यांच्या सर्व्हिस सेंटरला विचारले की, तुमच्याकडे मराठी भाषा का नाही ? जसे श्रीमती जॉयस शंकरन यांच्या कार्यालयामध्ये सांगितले होते की, "जरुरत नही" त्या पध्दतीने त्यांनी सांगितले की, "महाराष्ट्र में हिन्दी और इंग्रेजी चलती है, मराठी की जरुरत नही." हिंदुस्थानात नोकियाचे जास्तीत जास्त ग्राहक महाराष्ट्र आणि मुंबईमध्ये आहेत. म्हणजे आपल्या भाषेला कोणी विचारावयास तयार नाही, कोणी मोजावयास तयार नाही. विचारले तर मराठीची मागणी नाही असे सांगितले जाते. अशी सगळी आपली परिस्थिती झालेली आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील 10.5 कोटी जनतेपैकी नऊ ते सव्वानऊ कोटी मराठी भाषिक आहेत व अन्य दीड कोटी लोकांना मोडक्यातोडक्या स्वरुपात मराठी भाषा येते. या 10.5 कोटी लोकांसाठीचा सर्व कारभार मराठीत असल्यास कारभार सोपा होऊन जनतेचा कामकाजात सहभाग वाढेल. प्रशासनातर्फे जनतेला मराठी ऐवजी अन्य भाषेतील अर्ज नमुने, पत्रव्यवहाराची सक्ती झाल्यास, जनता व प्रशासन यांच्यात दरी वाढते. 9 कोटी लोकांची भाषा मूठभर अमराठी लोकांनी शिकणे सोपे काम आहे. मात्र अकारण 9 कोटी लोकांनी मूठभरांना कळण्यासाठी परराज्यातील किंवा परदेशातील भाषा शिकणे हा उफराटा व्यवहार नाही काय ? हे ताबडतोब थांबले पाहिजे. महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्वांना मराठी भाषा आली पाहिजे असा आग्रह शासकीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/

श्री. दिवाकर रावते .....

पातळीवर धरला पाहिजे. महाराष्ट्र प्रशासनातील इंग्रजीधर्जिण्या अधिकाऱ्यांमुळे मराठी भाषिक अडाणी अशिक्षित व चुकीचे पण भराभर इंग्रजी बोलणारे सुशिक्षित अशी घातक समजूत निर्माण झालेली आहे. त्याच्या परिणामांची आपल्याला कल्पना आहे. ही व्यथा आहे. मी आमदारांच्या बाबतीत बोलत आहे. जनतेचे प्रश्न समजावून घेणारे, जनतेची भाषा व व्यथा जाणणारे आणि ते सोडविण्याचा प्रयत्न करणारे लोकप्रतिनिधी, आमदार, मंत्री, सभापती विधिमंडळात असतात. त्यातील बहुतेकजण स्वाभाविकच जनतेची आवडती लोकभाषा म्हणून मराठीच वापरतात. मात्र अनेक आमदार, मंत्री यांची दररोज वापराची भाषा इंग्रजी नाही म्हणून जाणूनबुजून कारभारात इंग्रजीचा वापर करणारे अधिकारी त्यांची खासगीत कुचेष्टा करतात, थट्टामस्करी करतात. मंत्रालयात हे नेहमी चालते. घाटी आहे, अक्कल नाही वगैरे इंग्रजी भाषेत ते बोलत असतात. 11 कोटी लोकांच्या प्रतिनिधींची भाषाच अधिकाऱ्यांनी वापरली पाहिजे. 200-250 अमराठी अधिकाऱ्यांसाठी 11 कोटी जनतेने मराठी सोडून अमराठी अधिकाऱ्यांच्या सोयीची भाषा का वापरावी ? आणि ती पूर्णपणे येत नाही म्हणून अमराठी अधिकाऱ्यांनी खुशाल टिंगल करावी हा जनतेचा व विधिमंडळाचा अपमान आहे असे मला आवर्जून सांगावयाचे आहे. हे टाळण्यासाठी या मूठभरांच्या भाषेचा वापर बंदच करावा. नाहीतरी इंग्रजी ही राज्य घटनेच्या अनुच्छेद 37 नुसार देशाच्या अधिकृत 18 भाषांच्या यादीत नाही. मी शेवटी एकच सांगणार आहे. दोन वर्षापूर्वी श्री. गोरे आणि श्री. राजू परुळेकर यांचा संवाद कार्यक्रम पाहिला. दिला. मराठी भाषेचा वापर व्हावा म्हणून ते एवढे प्रयत्न करीत आहेत परंतु दाद लागत नाही. ते मला बोचले त्याप्रमाणे मी कामाला लागलो. किमान नामफलक मराठीत लिहावेत याबाबतीत आग्रह धरला. राज्य सरकारला पत्र लिहिले. माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले. मुख्य सचिवांना पत्र लिहिले. संबंधित मंत्रिमहोदयांना पत्र लिहिले. नागरी प्रशासनाला पत्र लिहिले. अगदी रीतसर पत्र लिहिले. त्यानंतर दोन तीन स्मरणपत्रे पाठवली. माननीय मुख्यमंत्र्यांचे पत्र आले की, याबाबतीत योग्य ती दखल घेऊन कार्यवाही करीत आहोत. इतर कोणीही उत्तर दिले नाही. डीपीडीसीच्या बैठकीमध्ये पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले होते. ते प्रकरण वर्तमानपत्रामध्ये आले. त्यानंतर सुध्दा काहीही घडले नाही. त्यानंतर मग मी जाहीररीत्या सांगितले की, आपण बोर्ड बदलणार नसाल तर डांबर फासावे लागेल. तरी सुध्दा लक्ष दिले गेले नाही.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

मंत्रालयातील जेवढ्या अधिका-यांना नावाच्या पाट्या बदलण्यासंबंधी विनंती केली त्यापैकी काही अधिका-यांनी कायद्यानुसार सरकारच्या आदेशाची अंमलबजावणी केली. काही अधिका-यांनी ती केली नाही म्हणून त्यासंदर्भात प्रतिकात्मक निदर्शन करावे यासाठी मी मुख्य सचिवांच्या कार्यालयाबाहेरील पाटीवर "दे.कृ. शंकरन" या नावाचा स्टिकर लावला. त्याना आपले आणि आपल्या वडिलांचे नाव पाटीवर लावण्यास संकोच का वाटतो हे कळत नाही. श्री. शंकरन साहेब हे मराठीमध्ये बोलत असतात. मी त्यांच्या बद्दल अनादराने बोलणार नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की या राज्याचे ते मुख्य सचिव असल्यामुळे त्यांनी मराठी भाषेच्या वापरास "चॅरिटी बिगिन्स ॲट होम" या ऊक्तीनुसार स्वतःपासून सुरुवात करावयास पाहिजे. इतर राज्यांमध्ये आपण पाहिले तर असे दिसून येईल की, त्याठिकाणी अन्य राज्याची व्यक्ती मुख्य सचिवाच्या पदापर्यन्त गेलेली नाही. मी मराठीच्या वापरासंबंधी पालकमंत्र्यांना पत्र लिहिले. त्याचे उत्तर मला चार महिन्यांनी जानेवारी महिन्यामध्ये प्राप्त झाले. त्या पत्रामध्ये असे नमूद केलेले आहे की, "कायद्याप्रमाणे सर्व तरतुदी केलेल्या असून त्याप्रमाणे आदेश गेलेले आहेत. परंतु प्रशासकीय अधिका-यांना यातून सूट देण्यात आलेली आहे." हे शासन असे का करीत आहे ? आपण राज्यकर्ते आहात. या लोकांना सूट देण्याचे काय कारण आहे ? हे अधिकारी हिन्दुस्थानामध्ये जन्माला आलेले आहेत ना ? ते इंग्लडमध्ये तर जन्मलेले नाहीत ना ? मग ते आपले आणि आपल्या वडिलांचे नांव केन्द्र सरकारचे आणि राज्य सरकारचे आदेश असताना त्या आदेशाप्रमाणे का लिहीत नाहीत ? केन्द्र शासनाने नावे कशी लिहावीत यासंबंधीचे आदेश काढलेले असताना या अधिका-यांना सूट देण्याचे कारण काय ? सभापती महोदय, मी काय गुन्हा केला आहे हे मला माहीत नाही. मी मराठी भाषेच्या वापरासंबंधीची रीतसर मागणी करतो. अशा प्रकारची विनंती केल्यावर देखील माझ्यावर एखाद्या गुंडाप्रमाणे गुन्हा दाखल केला जातो, खटला भरला जातो हे कशाचे द्योतक आहे ? आज मला कोर्टात जावयाचे होते. मी कोर्टामध्ये माननीय न्यायमूर्तींना सांगणार आहे की, मी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून चार महिने थांबलो. तरी देखील कायद्याची अंमलबजावणी होणार नसेल तर राज्याचा एक आमदार म्हणून कायद्याच्या अंमलबजावणीचा आग्रह धरणे आणि त्यासंदर्भात निदर्शने करणे हा माझा अधिकार आहे. हा अधिकार बजावत असताना मी कोणतेही विध्वंसक कृत्य

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

करीत नाही, शांतपणे निदर्शने करतो. हे सर्व मी राजभाषा मराठीसाठी करतो. या कृत्यासाठी जर मला तुरुंगात टाकायचे असेल तर टाका. या राज्यामध्ये कायद्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी आग्रह धरणे हा गुन्हा ठरतो. पोलीस घरी येऊन उचलून घेऊन जातात, अशी या महाराष्ट्रामध्ये परिस्थिती असेल तर कोणासाठी 105 हुतात्म्यांनी बलिदान केले ? कशासाठी महान नेत्यांनी मंगल कलश आणला ? 105 हुतात्म्यांनी बलीदान केले म्हणून हे महाराष्ट्र राज्य आहे. परंतु आज दुर्दैवाने या महाराश्ट्रामध्ये मराठी अवमानित होत आहे. मनोहर जोशी हे मुख्यमंत्री झाल्यानंतर मराठीच्या बेड्या तोडण्यासाठी त्यांना शासकीय प्रस्ताव आणावा लागला आणि 15 ऑगस्ट 1995 ला मराठी भाषेच्या वापरावरील स्थगिती उठवावी लागली. या गोष्टी कराव्या लागणे हेच महाराष्ट्राचे मोठे दुर्भाग्य आहे. हे मराठी राज्य आहे असे सांगणारे महान नेते कै. यशवंतराव चव्हाण यांना मराठी भाषेची स्थिती पाहून स्वर्गात किती वेदना होत असतील ? या महान नेत्याला आपण मराठी भाषेच्या वापरासंबंधीच्या कायद्याची अंमलबजावणी करुन आदरांजली वाहणार का ? असा प्रश्न मी शासनकर्त्यांना विचारतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

---

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अर्धातास चर्चा पुढे ढकलण्यासंबंधी**

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविलेल्या अर्धातास चर्चा पुढे ढकलण्यात येत आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, राज्य कारभारामध्ये मराठी भाषेचा वापर होण्याच्या दृष्टीने जो प्रस्ताव चर्चेला घेण्यात आला आहे त्या प्रस्तावावर विस्तृत चर्चा व्हावी म्हणून ज्या सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत त्यांना बोलण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : उद्या या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु होताना ज्या सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत त्यांना पुरेपूर बोलण्याची संधी दिली पाहिजे. अन्यथा त्यांच्यावर आणि मराठी भाषेवर अन्याय केल्यासारखे होईल.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या शुक्रवार, दिनांक 30 मार्च, 2007 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 7 वाजून 17 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 30 मार्च, 2007 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही